## December 2018

### December 31

जखमा बऱ्या करत
नसते बसायचे रे बाळा
जखमा होण्याचा भागच
टाकून द्यायचा असतो
थुंकावाच लागतो तो
म्हणाले प्रिय तुकोबाराय

इथली अंधळी कोशिंबीर
रेल्वे लाईनच्या शेजारीच घर
असल्यासारखी अव्याहत
राहते वाहात मनात

तुला जगायचे असेल
तर मरावे लागेल
म्हणतात तुकोबाराय
तुझी ती आत्महत्येची
जी प्रेरणा म्हणतोस वो भी फेक दो

तू स्वतःला वृक्षवल्लींपासून
वेगळा खास समजणार
त्यांच्या सौंदर्याने मोहित होऊन
त्यांचा आनंद घेत राहणार
घुटक्याघुटक्याने पिकनिकला जाऊन
तर जा बाबा तुझी मर्जी
घे आनंदाने हवा तेवढा थकून

मी नाही तुला वाचवू शकत

म्हणतात तुकोबाराय

--- ००० ---

हो हो अवश्य

भेटू ना

आत्ताच मी इथून

पाचशे कोंबड्या

पळत जाताना पाहिल्या

काळजीच नको

सूप उत्तम होणार

तुम्ही ग्रीनीच लाईनला

केलाय कधी स्पर्श

नाही ना

मुळाशी जाणाऱ्यालाच

मरणाची भीती

असे म्हणतात बाबा

आणि आपल्याला काय

अफवा बास असतात

नव्हे त्यांच्यावरच

चालू शकते आपले

पथ्य एकच

मुळाकडे फिरकायचे नाही

सत्य नाही हो समजू शकत

अफवाच सत्य मानायच्या

काय फरक पडणाराय

राजकीय धार्मिक प्रचारक

खूप ताकदवर असतात

ते सोडा

थंडी उकाडा दुःख

या तर नाहीयत ना अफवा

बास मग

--- ००० ---

December 30

दारूत भेसळ म्हणून ती नको आणि रोगट बकऱ्या, कोंबड्या विकल्या जाताहेत म्हणून मांसाहार नको -- मग लोकांनी ३१ ला करावे तरी काय ?

Champra Deshpande shared a post.

Sanjay Bhaskar Joshi's photo.

Sanjay Bhaskar Joshi's photo.

धर्म आणि विचारसरणी यांचा पराभव झाल्याने भविष्यात मानवी प्रश्न कलेकडूनच सुटू शकतील !

- चंप्र देशपांडे

पुस्तक पेठेत अनौपचारिक गप्पांच्या कट्ट्यावरच्या दीर्घ मैफिलीत आज चंप्र यांनी मोजक्या पण दर्दी रसिकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

मित्रवर्य संजय भास्कर जोशी यांच्या कौशल्यपूर्ण आयोजनाप्रमाणे आज सकाळी ' पुस्तक पेठ ', पुणे इथे मस्त कोवळ्या ऊनसावल्यांत बसून दोन तास गप्पा मारल्या. स्नेहशील वातावरण आणि पंधरा स्नेहीजन ! अनौपचारिक गप्पा असल्याने ' अनौपचारिकपणे ' बोलता येईल, असेही काही बोललो -- मजा आली ! नंतर मिसळ-पाव आणि चहा असा थंडीला साजेसा बेत होता -- तेही छान झाले ! आहे असे सुटे जाऊन मित्रांशी अशा सविस्तर गप्पा मारण्याचा योग खूप दिवसांनी आला -- मजा आली !

धन्यवाद, संजय भास्कर जोशीजी !

December 28

Champra Deshpande shared a post.

'उद्या 30 डिसेंबर, सकाळी 11 वाजता पुस्तक पेठेत नक्की या...'

उद्या 30 डिसेंबर, सकाळी 11 वाजता पुस्तक पेठेत नक्की या...

मुळात मी कोट वापरत नाही
त्यामुळे सोन्याच्या बटणांचा
प्रश्नच नाही

असतात हे मला माहीत आहे
जगात आणखीही खूप फुले
पण मला उपलब्ध नसलेली

नेटवरच्या वस्तू हॉटेलांची वर्णने
स्त्रियांचे बहाणे अत्तरे
माझ्या स्पर्शाबाहेर

सिंहासने शस्त्रे झुंबरे
नोकर वाहने
महाल बागा

राजकारण सिनेमा
समाजकारण प्रबोधन
हेही नाही माझे

गरिबीचे चटके
असह्य अन्याय अत्याचार
उपासमारही नाही

मी नाहीच असेच समजा ना

काय प्रॉब्लेम आहे

मलाही नसायला जमले की झाले

--- ००० ---

December 27

" तुम दो मिनिट बैठो -- मी झटपट शादी करके आती हूँ ! " -- हा संवाद लिहिला आहे अब्रार आल्वी यांनी -- ' मि. अँड मिसेस ५५ ' या चित्रपटात. मधुबाला गुरुदत्तला उद्देशून हा संवाद म्हणते ! एक अत्यंत खास संवाद म्हणून हा माझ्या लक्षात राहिलेला संवाद आहे.

असेच आणखी काही संवाद तुम्हाला खास वाटले असतील -- ते इथे द्यावे. खास संवादांचा एक मजेदार गुच्छ तयार होईल !

उदाहरणादाखल आणखी एक संवाद ' जाने भी दो यारो ' या चित्रपटातला आहे -- " उधर अमरिका मे क्या है मालूम ? पीने का पानी अलग और गटर का पानी अलग ! "

सांगा तुमच्या लक्षात राहिलेले असे कोणतेही खास संवाद -- चित्रपट मराठी, हिंदी वा इंग्रजी -- कोणताही असो --

शब्दकोशातले किती शब्द

आहेत त्याच्या मनात

तेवढाच त्याचा विस्तार

आणि तेवढेच

त्याच्या स्मृतींचे वैविध्य

अप्पलपोटेपणाच

झालेला असला तरीही

आकाशाच्या विघटनाचे गणित

कधीतरी मांडावेच लागणार

जगणे म्हणजे एकखांबी तंबू

अनुभवांचा एस्टी स्टँड

तळागाळापासून

सर्व शहरे गाठणारा

जेव्हा केव्हा उघडीप असेल
तेव्हाही दुर्लक्षच करावे
स्वच्छ उजेडाकडे
मळक्या डोळ्यांनी
हे तर जणू एक अटळ तत्त्वच

काही ना काही मागण्यांसाठी
सतत बंद पुकारलेल्या शहराप्रमाणे
अंताचे विचार दबा धरून बसलेले

त्याआधीच ग्लॅमर मिळवून
जेवण उरकून घ्यावे हे एकमेव शहाणपण
--- ००० ---

December 26

एकात्मता म्हणजे अमुक व तमुक सोडून बाकीच्यांची एकात्मता !

पारदर्शी असणे म्हणजे पुरेसे चतुर असणे !

जातिभेदातीत असणे म्हणजे ' आतून ' जातवादी असणे !

संस्कृती जोपासणे म्हणजे जास्तीत जास्त धार्मिक उत्सव वा कार्यक्रम साजरे करत राहणे !

सर्वधर्मसमभाव म्हणजे स्वतःच्या धर्माची अस्मिता न बाळगणे !

अन्य विचारांच्या लोकांना जखमा करायचे स्वातंत्र्य म्हणजे विचारस्वातंत्र्य ! जखम सहन करून शांत राहणे म्हणजे सहिष्णुता !

कधी ना कधी

समोरासमोर येणे घडतेच

मी सावध होतो

माझ्या नजरेतली भीती त्याला दिसते

मी काय करेन हे सांगता नाही येत

असे वाटून तो गुरगुरतो

दात दाखवतो

गरज पडल्यास हल्लाही करावा अशा विचाराने

भयानक दिसू लागतो

मी अधिकच घाबरतो

आता इथून निसटावे कसे

तेच मला कळत नाही

मी घाबरल्याचे त्याला कळू नये

याची मी काळजी घेत राहतो

आकाशातून चंद्र निसटला

तर काय होईल या कल्पनेलाही मी घाबरतो

पण त्या निर्जीव वस्तूला माझी भीती

कळत नसावी बहुतेक

मी ज्यांना ज्यांना घाबरतो

त्या सर्वांचीच

माझ्याबद्दल तक्रार असते

की मी अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा खुनी आहे

आमचा एकमेकांना अंदाज नसल्याने

अवसरच नाही राहात आम्हाला हे विचारायला

स्वतःला की बाबा मला कुणी घाबरूच नये

असे कधी मला होता येईल का

--- ००० ---

December 25

ज्ञानाच्या आंतरशाखीय क्षेत्रात बुद्धिसंचार करणारे
कमी ज्ञानवाल्यांपेक्षा आहे तेवढ्याच आयुष्यात
जास्त जगतात हे उघडच होते

तसेच तीव्रतेने हाय होल्टेज जगणारे
सर्वच लैंगिक भावनिक तीव्रता करत
बीपी मधुमेह हृदयाची लफडी
स्वीकारत जगणारेही
सामान्यांपेक्षा जास्तच जगतात

शहरांत जगायला जरा व्यापक आवाका
लागत असल्याने खेडवळांपेक्षा तेही
अधिक जगतात हेही मान्य झाले

साधे एखादी किरकोळ नोकरी करत
जगणारे मध्यमवर्गीय हे मात्र
सर्वात जास्त मर्यादित आणि
क्षणभंगूर ठरले

तुकारामाकडे तर रिकामीक होती
तिच्यासारखे अमर्याद काहीच नाही असू शकत
त्यामुळे तो तर आजही जिवंत आहे
आणि कायमच जिवंत असणार
हे पटवून घेणे भाग पडले

तेवढ्यात एकजण म्हणाला की विद्रोही

क्रोधाचा खूप वापर करत कमी क्रोधवाल्यांपेक्षा

जास्त जगतात आणि हिंदुत्ववादी आणि कम्युनिस्ट

--- ००० ---

December 24

Champra Deshpande shared a post.

दुबेजींवर अनेकांनी भरभरून लिहिलेले आहे.

त्यांतलाच, गिरीशचा हा एक उत्तम लेख --

राजकारण आणि करमणूक

यांच्या माऱ्यामुळे

सगळे पाणी सतत

डचमळत राहते

आयुष्यात

आता साधी माहिती

अशी काही नाहीच

उरफाट्या घटना

आणि पिरगाळलेले ऊर

यांनी हजारोंचे बीपी

मनमग्नपणे सतत विचलित

खिशात

शेंगदाणे फुटाणे

विचारांचे आणि भूतकाळी

पावसाचे सोसाट्याचे

झाडांचे शेंडे

पाताळात

गाडले गेलेले
हेतुहीन श्वासांचे
वर्तमान देह
वासनेत

सतत फुलत ठेवलेले अंगार
नॉर्मल समजून जणू निखारे
अस्तनीत

--- ००० ---

आपण उदासीनपणे बसलेले असताना
आपल्या दातांवरची हिरवळ
जगभर पसरावी तसे होते सगळे
प्रत्यक्ष सत्य अनपेक्षित धक्कादायक

उत्साह वाढल्याशिवाय
कोणती वाहने वापराल आणि
कराल चैन श्रीमंती कंगव्यांची
हा प्रश्न गहन असला
तरी तो फक्त आपला एकट्याचाच
कारण कोणतीही टोळी
त्यात इंटरेस्ट घेत नाही

टोळीला लागतो भावनिक एकोपा
चरणारी जनावरे निरुपद्रवी
सहज फस्त करू शकणारा
आणि लागते

मानवतावादी हिंसक वृत्ती
जगाचा स्वर्ग करू इच्छिणारी

एकेकट्यांनाही एकत्र येऊन
आता त्यांचीही एक टोळी करावी लागेल
हे पाहून आपले धाबे दणाणते
एकटे राहण्याचे स्वातंत्र्य नाकारते
ती कसली मानवता आपण विचारतो

तोवर मानवता या शब्दाचा अर्थच बदलून
अनपेक्षित उदात्त स्वर्ग असा झालेला असतो
--- ००० ---

रस्त्यात भेटलेला तो मला आणि मी त्याला
अनोळखी असतो
रस्त्यावर उभी केलेली एक दुचाकी
येताना त्याने लाथ मारून पाडलेली
मी पाहिलेली असते

मी नाही ओळखत तुम्हाला
मी म्हणतो सावधपणे
तर तो म्हणतो की तो दिल्लीचा आहे

अच्छा आता येते माझ्या लक्ष्यात
म्हणजे हाच तो ज्याचा पत्ता
नोटराईज केलेला कागद
माझ्या खिशात आहे

भले शाब्बास मग तुम्ही असे

भर माधान्हीच्या वेळी
इथे काय करताय मी विचारतो
तर तो म्हणतो की त्याला
प्रश्न विचारायची पद्धत नाही

मी म्हणतो की ठीक
लगेच असे हळवे नका होऊ
किंवा रागावूही नका
शोधताय काय ते सांगाल तर मी करेन मदत

तर तो माझेच नाव सांगतो
मी खजिल होतो
--- ००० ---

मोदी बुद्धिप्रमाण्यवादी भक्तिमार्गी
तालिबानी कम्युनिस्ट चीन ट्रंप
अनेक धर्म कर्मकांडे
असंख्य भूमिका आदर्श
प्रणाली स्वप्ने एवढेच काय
माझ्यासह सर्व माणसे सर्व संबंध
सर्व वस्तू निसर्ग भेसळ
अस्वच्छता भ्रष्टाचार युद्धे
डावपेच जिंकणे हरणे
असे हे सर्वच मला
काहीच पूर्ण न पटणारे
त्रास देणारे खरचटणारे
आणि हे सर्व असे का आहे
हा एक पिच्छा न सोडणारा प्रश्न

हे सगळे बदलायला हवेय

या व्यवस्थेत राहूनच

तिच्यात क्रांती घडवायला हवीय

मध्यमवर्गच नष्ट व्हावा

रस्ते खड्डेमुक्त होऊन

त्यांवरचे दिवे कायम नीट

लागावेत रात्री आणि हो

पाणीपुरवठा नीट असावा भरपूर

पण नको हे असे हवेच सतत काही ना काही

दयाघना असू दे असे खूप पण माफक

दुःख देत जा

माझे असणेच त्यावर अवलंबून आहे

--- ००० ---

भावनांच्या संपर्कांना

आपण एकत्र जगणे समजलो

उंबऱ्याच्या अलिकडे

बत्तीस वेळा चावून खाल्लेले सर्व घास

गंजलेली शरीरेही

हवेच्या सवयीमुळे निर्धास्त राहिली

भिडली बेशुद्धपणे तेव्हाही

त्यांची हत्यारे

मग्न राहिली आठवणी कोरण्यात

उकिडवे बसून शेकोट्यांची

कृतिचित्रे काढणारे चित्रकार

स्वतःच्या पिढ्यांची घरे भरत

नखांनी ओरबाडत राहिले
वर्तमानाचे मादक द्रव्य

याला हलगर्जीपणा कोण म्हणेल
हा तर मिळवलेला
शांततेवर कसून विजय

पाषाणांसारखे
चिकटून उभे राहात
आणि आवाज न होता
आकाश भेदून
भावनेला वाट करून देणे
आज
बाराशे तेराव्यांदा घडले
--- ००० ---

कागद येत राहतात
मासिके पुस्तके येत राहतात
निरनिराळ्या केसेसचे निकाल
आणि युद्धांच्या पाताळयंत्रणा
येत राहतात असंख्य
ताणांच्या कारणमीमांसा

मुळात इतके वाचणे शक्य नाहीय
आणि मुख्य म्हणजे'मेमरीचाच प्रॉब्लेम आहे
किंवा माझे मनच जगण्याच्या नादात
याला फारसे महत्त्व देत नसल्याने
ते बरेचसे लयाला जात असेल

मग हवेयत कशाला इतके कष्ट
पण संस्कार तर काही होत असतीलच ना
माझ्या जगण्यावर या सगळ्याचे
पण ते श्रेयस्करच असतील
हे कसे ठरवणार

इतर कुणी कुणी घेत राहतीलच ना
ते संस्कार जे आपोआप पाझरतील
मानवी जगण्यात म्हणजे माझ्याही पण तरीही
ते वेगवेगळे असणार ना

त्यापेक्षा आऊटसाईड द ऑफ स्टंप
समजून जाऊ द्यावे सगळे मागे टच न करता
आपली इनिंग संपेपर्यंत – ती संपण्याच्या
घटनेचा चेंडू मात्र टोलवेल कुणितरी सीमापार
--- ००० ---

धुके पडलेय
बरे, पडलेय, मग ?
यालाही काही अर्थ असेल !
असेल ?
कशासाठी व्याकूळ व्हावे अर्थासाठी ?
कसली ही सवय ?

सर्व सृष्टीत भावना दिसतात
थोड्याफार
पण भावनांना अर्थ म्हणावे ?
पक्षिणीला तिच्या
पिल्लांबद्दल वाटणाऱ्या

आसक्तीचा अर्थ काय लावणार ?

हे छोटे छोटे पक्षी
कुठून आलेत ?
कसली एवढी लगबग चाललीय त्यांची ?
इथल्या इथेच तर फिरताहेत !
असेल त्यांचा त्यांना अर्थ
की ती
माझ्या मनाची मिजास ?

माझ्यामुळेच
जर सगळे अर्थपूर्ण होत असेल
तर माझाही अर्थ
शोधावा लागेल !

माझा मीच ?
--- ००० ---

जे जे काही अर्धवट अपूर्ण
ते ते असते घर्षणमय अस्वस्थ
सकाळ दुपार संध्याकाळ रात्र
उगीचच निघत राहिलेला
सुशोभित मॉलमधून धूर

सिगरेट न पिताही स्वतःसह
घुसमटून टाकणे
आप्तमित्रांसह सर्वांचे जगणे

मुहूर्त हरवलेले प्रेमिक

दशदिशा शोधत राहतात
मीलनांच्या कल्पनांचे अवशेष
हरेक दुकानात अधीरपणे

ऊन पडते तेही जणू
मृत्यूचे भय या रूपात
आणि त्याची प्रतिबिंबे
खात राहतात सावल्यांना
वाळवीप्रमाणे

मनाला मनच नाही आवरू शकत
शुद्धीकरणाला बाहेरचे लागेल भिंग
हे समजत असूनही चाललेली
निरर्थक तडफड

धावा तरी कुणाचा कसा करणार
सर्वच प्रार्थना शिळ्या असल्यावर
--- ००० ---

The novelist is neither historian nor prophet : he is an explorer of existence. ---- Milan Kundera.

कादंबरीकार हा ना इतिहासकार असतो ना भविष्यवेत्ता ः तो असतो अस्तित्वाचा सखोल शोधक. ------ मिलान कुंदेरा.

गुजराती लोकांच्या आहारात दूध जास्त असल्याने त्यांचे दात मुबलक कॅल्शियमने मजबूत असतात, पण ते गोड जिभेचाच जास्त वापर करतात !

येत्या १० कोटी वर्षांत शनी या ग्रहाभोवतीची कडी नष्ट होणार आहेत -- माणसाने यावर काहीतरी करायला हवे !

त्याच्याकडे काही हजार फोटो होते
सूर्यास्तांचे इकडचे आणि जगातले
चित्रकारांच्या चित्रांना तो खोटे म्हणे
किती तऱ्हांचे असतात सूर्यास्त
असे म्हणून आल्यागेल्याला
तो आल्बम दाखवे पाहायची सक्तीच करे
सौंदर्य पसरवणे अनेक मनांतून
हेच तो त्याचे जीवितकार्य माने

सूर्यास्तांइतके सुंदर काही असूच नाही शकत
त्या सौंदर्याला तोडच नसते
गुंगवून टाकणे आणि स्तिमित करणे
हे करावे तर सूर्यस्तांनीच तो म्हणे

त्याने त्या फोटोंची काही प्रदर्शनेही भरवली होती
लोक वाहवा करत तेव्हा तो म्हणे
यात माझे काहीच नाही श्रेय सर्व सूर्यास्तांचे आहे
त्याचा नम्रपणा हाही एक चर्चेचा विषय होई
सूर्यास्त पाहणारे आपोआप नम्र होतातच तो म्हणे
लोकांना सूर्यास्त पाहायला उद्युक्त करणे
हे जगात शांतता प्रस्थापित करणारे ठरू शकेल
हे ओळखून त्याने सूर्यास्तांवर एक पुस्तकही लिहिले होते

सूर्यास्त या विषयावर एक माहितिपट वा सिनेमाच निघायला हवा
असे त्याला वाटे एखाद्या सूर्यास्ताला मीलन दाखवून
मग त्याला जोडून सूचक रात्रीत विलीन होणारा

त्याच्या चेहऱ्यावर एक तेज दिसते असे बरेच लोक म्हणत

--- ००० ---

असे झाल्यावर तसेच व्हायला हवे
ही कल्पना घट्ट असल्याने
इतकी शांत झाडे पाहून भीती वाटते
जगाची जणू रेंजच गेल्याप्रमाणे
इमारती नुसत्याच दिवे लावून
राहतात संपर्कहीन

जगाला शिस्त असल्याने
दुःख झाले की रडावेच लागते
कधीकधी दुःखाचेही हसू येणे
हा ठरतो शिस्तभंग

अनुक दिवशी तमुक इतका पाऊस
असे रटाळ रूटीन
निसर्ग नाही पाळत
आणि बदलांचीही अमुक इतकीच
हीच फक्त कारणे
हेही तो नाही म्हणत

मनही सारखे बदलते
पण असण्याचा ताण आहे तसाच
सतत भीतीयुक्त

झाडे चटावत नसावीत शिस्तीला
नाही तर तीही झाली असती भयग्रस्त
मन विचारते एकच प्रश्न

संपूर्ण बेशिस्त असू शकेन का मी
निर्भय

--- ००० ---

अ विचाराने ब विचाराचा प्रतिवाद केला म्हणजे अ विजयी आणि ब पराभूत असे काही नसते. वैचारिक क्षेत्रातले व्यावहारिक जयपराजय हे विचारबाह्य ताकदीवर ठरतात. हे पाहता ' सत्य ' विचाराचा शोध हा एक गधडेपणा ठरतो. त्यामुळे, हरारेसारखा बुद्धिमान माणूस ध्यानाबद्दल काही बोलत असेल तर ते उथळ टिंगलटवाळीत गुंडाळण्याचा बालिश प्रयत्न अयोग्य वाटतो.

नाते विचारांनी कंट्रोल केल्यासारखी कविता
डल होते एकमार्गी
सर्व पाकळ्यांच्या शक्यता छाटलेली --
तिला भरभरून
बहर नाही येऊ शकत --
ती असते एकरेषीय आणि हेतुयुक्त --
तिला हवे ते हवेच असते
आणि हवे असतात
हवे तेच बदल

विचाराचे मुळात दुर्लक्ष होते
वर्तमानाकडे
अंतिम टप्पा मनात घेऊन
तो असतो माहितियुक्त
आणि कवितेला हवा असतो
सर्वस्वस्पर्श
कळण्याबाहेरचा

विचार असतो बोधप्रद
विचाराला असतात साचे
विचार असतो सनसनाटी

आणि रक्तयुक्त त्यागाला तयार

कविता नसते शस्त्र खुनाचे
ती असते समूळ उच्चाटन
विचाराच्या राज्याचे
एका नकळत्या भरपूर प्रांतात
बेहद्द झोकून देणारे
--- ००० ---

भूपेश बघेल
छत्तीसगडचे नवे मुख्यमंत्री ! का ? हाय कमांड का नाही बघणार ?
आणि हा भूपेश कोण ?

गुजरातेत डॉ. तेजस पटेल यांनी ३२ किमी अंतरावरून जगातली पहिली रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केलेली आहे !

मी घडवू देतो माझे एक विकृत शिल्प
माझ्याबद्दल तिरस्कार वाटणाऱ्याला
कारण माझ्या गाण्यातून
जमवायच्या असतात मला अगणित
काडेपेट्या माझे वैभव वाढवणाऱ्या

गाणे माझ्या आवाजात आल्याने
माझे हक्क निर्माण होतात
सर्व कानांवर आणि हृदयांवर

गाणे हे जगणे असू शकते
असे असले तरी
हेटाळणीने माझाच चेहरा विद्रूप होतो

मी आणि माझे गाणे आणि श्रोते
जेव्हा मतांच्या जगात भिडतो
तेव्हा माझ्या शिल्पाला
येत जाते एक अष्टावक्र रूप
नुसतेच कुत्सित हसणारे

माझ्या गाण्याचे श्रेय
माझेच असायला हवे
मीच असणार राज्यकर्ता
असे मला म्हणायला लावून
पूर्ण केले जाते माझे शिल्प

ओबडधोबड गळ्याचे आणि
क्रुद्ध डोळ्यांचे
--- ००० ---

--- यांचे समर्थक आंदोलनाच्या
पावित्र्यात !
-- साम.

कधी कधी तर सत्य समोर येतच नाही. दोन विरोधी बाजूंचे मुद्देच सत्य बनतात. सर्वांच्या डोक्यांचे भजे आणि भरिताचे वांगे होत राहते !

अंदाजाने वाचक घेतो समजून
बंद खोलीत सतत
सिगरेट ओढणारा माणूस
पण तो स्वतःच तो माणूस
नाही होऊ शकत

डायरेक्ट ते तसेच न घडणे
म्हणजे थोडे डायरेक्ट
आणि बाकीची माहिती पोचणे

एखाद्या कवितेला
डायरेक्ट अनुभव नसतोच द्यायचा
पण डायरेक्ट सुरुंग पेरायचा असतो
वाचकाच्या मनात
अनुभव-माहिती यांच्या द्वारे

अधिकाधिक खरा अनुभव
देणारी कविता हे नाही करू शकत
कारण तिच्या धुरात
गुदमरून जात राहतो
वाचकाचा भूतकाळ

धुराचा तपशील असूनही
वर्तमानात अवकाश
मोकळा ठेवणारी कविताच
उडवून लावू शकते
वाचकाचा भूतकाळ
एकमेव अंतिम शक्यता म्हणून

--- ००० ---

मनाच्या अवनत भागाला कळते की
मनाच्या उन्नत भागाला वाव दिला
की एकूणच आपले बरे चालते
म्हणून ते वाव देते उन्नताला
तरी उन्नत नाही होत कृतिशील

कारण कुणाच्या वाव देण्याने
ते काम नाही करत
ते असते स्वतंत्र स्वायत्त

अवनताला आठवते की च्यायला
बरोबर आहे आपण नव्हतोच त्या वेळी
जेव्हा उन्नतराव जागे होते
म्हणून अवनत तयार होते नसायलाही
आणि तसा प्रयत्न जारी करते
पण त्याच्या त्या तीव्र प्रयत्नाच्या असण्यामुळेच
त्याचे स्वतःचे असणेच तीव्र होते
त्यामुळे उन्नतराव हलतच नाहीत

आयला म्हणजे सत्ताच सोडायची
की काय जरा बरे वाटण्यासाठी

उन्नताच्या काळात आपल्या पायाची
वर्षानुवर्षे ठसठसणारी जखम
बरी झाली होती ते अवनताला आठवते

काहीही न करता जागच्या जागी
विलय पावावे लागेल हे ओळखून
अवनत आता वाट पाहात राहते
--- ००० ---

December 12

Champra Deshpande shared a link.

६० टक्के पृथ्वी मृत झालेली आहे : राहुल बनसोडे

youtube.com

माझा प्रिय मित्र राहुल बनसोडे याचे थोडक्या वेळाचे पण अति महत्त्वाचे भाषण ! मला यातून दिसते ते असे -- माणसाची बुद्धी समस्या तयार करते आहे पण त्या समस्यांवर बौद्धिक उत्तरे वा निराकरणे नाहीत --

पादाक्रांत झालाय फूटपाथ तेवढा पाहू
गर्दीतून वाट काढत खांदे तिरके करत
चालताना कळते ही पूर्ण गर्दी
मला नाकारणारी आहे आणि मीही तिला
माझ्या अंधाराची खबर
ना सार्वजनिक मुतारीला
ना राष्ट्रचिन्हांना

मी नसतोच तरी कुणालाच काहीही
कळले नसते मीही नसती थांबवली
पावले पुढील काळाच्या भल्यासाठी

पण आज तरी मला वाटतेय
की आपली प्रजाती नष्ट
होण्यापासून वाचवावी
त्यासाठी हवे तर काढलेली तिकिटे
ब्लॅकमध्ये विकून
संगणकाची साफसूफ करावी

हा गरीब देश आहे
इथे कलेचा खर्च
वाह्यातच ठरेल श्रीमंती लग्नातल्या

कपड्यांच्या किळसवाण्या

घमघमाटासारखा

आग्रह नकोच आणि खपवणेही नको

आपले चरित्र नीट मातीत घालून

त्यावर एक चबुतरा बांधून जावे म्हणजे झाले

--- ००० ---

December 11

**साहित्यनिर्मिती कोणासाठी ?**

सर्व कलांबद्दल बोलावे असा अनुभव वा ठसेही ( इंप्रेशन्स ) नाहीत, त्यामुळे फक्त साहित्याबद्दल बोलतोय. त्यातही, हा अमुक ठिकाणी असे म्हणाला, तो तमुक ठिकाणी तसे म्हणाला, अशा नोंदी मी ठेवत नसल्याने, सध्या हवेत अस्तित्वात असलेले – जाणवणारे प्रश्न, या स्वरूपात बोलत आहे. साहित्यनिर्मिती म्हणजे ललित साहित्यनिर्मिती एवढ्या मर्यादेतच बोलत आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक – हे साहित्य.

आपल्या वाचकांची करमणूक करावी, त्यातून प्रसिद्धी, पैसा व इतर आनुषंगिक फायदे मिळवावेत आणि आपली साहित्य-कारकीर्द सुखाची करावी, हे ज्यांचे ठरलेले असते त्यांना ‘ कोणासाठी ‘ हा विशेष प्रश्न नसतो. आपला नेमवर्ग ( टार्गेट रीडर/ ऑडियन्स ) आणि माध्यम ठरवले की त्यांचे काम विकासमार्गावर जात राहू शकते. मग कुणाला पडतो हा प्रश्न ? तर, एक म्हणजे ज्यांना वैचारिक वा भावनिक अशा काही आदर्शांचे साचे संक्रमित करायचे आहेत त्यांना आणि असा कोणताही साचा न ठरवता, जगणे समजून घेण्याची खुली प्रक्रियाच ज्यांना व्यक्त करायची आहे, त्यांना. आदर्शवाल्यांचा हा प्रश्न द्विविध असतो – एक तर आदर्श सारखे धुळीला मिळत असलेले दिसत असतात आणि दुसरे म्हणजे, वेगाने बदलत्या वास्तवाचे आकलनच पुरेसे होऊ शकत नसते. विचार, भावना, अनुभव यांतले गोंधळ आणि तेच, तसेच गोंधळ वाचकांतही असल्यामुळे नेमवाचक ठरवताच न येणे – या स्वरूपात हा प्रश्न असतो. जगण्याची आकलन-प्रक्रिया ‘ पाहात ‘ जावे, असे वाटणाऱ्यांना असे दिसते की यात कुणालाच स्वारस्य वा इंटरेस्ट नाहीय. अशा प्रकारे हे सगळेच ‘ सर्जक ‘ लेखक वाचकांविना आपण पोरके आहोत अशा भावनेत जगत / लिहीत राहतात. ( काहीजण लिहिणे बंदही करत असतील. )

मी लेखक म्हणून याकडे कसा पाहतो, ते सांगतो. मुळात मी कुणासाठीतरी लिहितो आहे, ही कल्पनाच मी स्वीकारत नाही. कोणत्याही गटातल्या कोणत्याही वाचकाला याचे कधीही निमंत्रण पोचू शकते, असे मी समजतो. सध्या हे कुणालाच नको आहे, असे दिसते, हेही स्वीकारतो. ( शिवाय, आपण अभिव्यक्तीच्या काही वेगळ्या मार्गांनी जाणे आणि ते सवयीचे नसल्याने ते हेटाळले वा फेटाळणे जाणे, या शक्यताही असतातच. ) मुख्य म्हणजे पूर्ण मानवजातीचा मेंदू एकच असून त्याचा मी एक भाग आहे, असे मी याकडे पाहतो. जरा लहान स्वरूपात, एकूण मराठी माणसाच्या मेंदूचा मी एक भाग आहे, असे. त्यामुळे, मी लिहिणे आणि कुणासाठीतरी लिहिणे, असे याचे स्वरूप राहात नाही. एकाच मेंदूत चालणाऱ्या अनेक क्रिया असतात – त्यांतली माझी एक असते. मी लिहितो ते कोणत्याही कारणासाठी ‘ उपयोगी ‘ नसल्याने त्याला प्रतिसाद कसा, कितपत मिळतो, या बाबतीत मी बराचसा शांत राहू शकतो. आजच्या काळाच्या संदर्भात याचा एक परिणाम असाही दिसू शकतो की मार्केटिंग आणि प्रमोशन हे उद्योग मी फारसे करत नाही.

पण, एकूणात, ‘ साहित्यनिर्मिती कोणासाठी ‘ हा प्रश्न अत्यंत तीव्रतेने हवेत असल्याचे जाणवते. यावर थोडीफार वैचारिक घुसळण व्हावी म्हणून ही पोस्ट देत आहे.

--- ००० ---

भाषेतून नेमके
काहीच नाही पोचू शकत
हे पाहून अर्थातच
म्हणजेच अर्थहीनपणेच
भाषेच्या आत्मनाशाच्या
प्रक्रिया शोधणे सुरू झाले

टेकडीवर सॉस फासून
तोंडात टाकावी एखादी शिवी
आणि अक्कलदाढ पडल्याप्रमाणे
टाहो फोडावा एखाद्या मादक नर्तकीने
तशा सगळ्या जमलेल्या ॲसिडचा
झाला डोह आणि मग त्यात पडले चांदणे
शांतपणे जगण्याचे प्रतीक बनून

नुसतेच जाऊ द्यायचे होते शब्द
विचारांची उरस्फोड करायचीच नव्हती
टेकडीवरून ओघळलेले सॉस चाटताना
उल्लेख टाळायचे होते सर्वच वाचस्पतींचे
जरी सभा फुल भरलेली होती
आणि श्रोते सगळे पदवीधर होते

विनोदतत्त्व हेच या जगाचे मूळ सूत्र आहे
निदान माणसासाठी तरी कारण इथे
दुःख ही एक खोटी गोष्ट आहे
हे सर्वच धर्मांनी सांगितलेले आहे
काठ्या टेकत टेकत रस्ते ओलांडताना
खात्रीपूर्वक
--- ००० ---

आच आणि आस असतेच
जे हवे ते हवेच असण्याची
जोवर डोंगराचा आवाज
विरोधात गेल्याचे
कळतच नाही नीट

जी हवा ओळखीची झाली
ती आपोआप होत गेली
हक्काची मार्गिका प्रवासोत्सुक
पण अचानक जणू
दरड कोसळल्याने
थांबावे सगळेच विचार
तसेच झाले भूतकाळाचे सार

गरज नसताना आणि खरे तर
हवेलाही हवेच असताना
सामाजिक प्रभावांनी
थबकले सारे
सध्याच्या सावलीचे वैभव

जबाबदार कुणाला धरणार
या हजारो वर्षांच्या
छिन्नविच्छिन्न समाजात
यांच्यांतलीही प्रत्येक व्यक्ती
अशाच नाइलाजात गोठलेली

त्यामुळे उरते फक्त जाने दो
सर्वच पूर्णपणे जाने दो
--- ००० ---

कोणत्या ना कोणत्या
समूहात बुडून
आत्महत्या केलेला माणूस
बाहेरच्या बाहेर
जगून संपतो
हे माझे मला दिसले
तेव्हाच मी एकटा झालो

मला आता
ना सहानुभूती
ना हवे होते सांत्वन

आता समूहा ऐवजी

एकटेपणात
रुतून मरणे होते

एकटेपणा असणार होता
एक भळभळती जखम
आत्मकीवेची

हे ना धैर्य होते
ना पराभव

ना समूह वाचवू शकत
होता ना एकटेपणा मला

अहिंसक जगण्याची इच्छा
किती बेगडी आणि तोकडी
--- ००० ---

रूटीन गोष्टींत मी उगीचच प्रायोगिकपणा करत बसत नाही -- चाललेय ना नीट मग ठीक -- असे करत राहतो. त्याच पद्धतीमुळे ट्विन ब्लेड कोणते वापरायचे ते मी ठरवून टाकलेले आहे. तर काल एका दुकानात मला हवा असलेला ट्विन ब्लेड सेट आहे का, ते विचारले. विक्रेता तरुणीने, " ते नाहीय, पण ही आहेत -- " असे म्हणत दुसरी ब्लेडस दाखवली. " हे कसे असेल कोण जाणे, नकोच -- " त्यांतला एक सेट पाहात मी म्हणालो. तर ती म्हणाली की, " चांगले आहे -- बघा वापरून -- " मी म्हणालो, " चांगले आहे ? ! तुला कसे माहीत ? " यावर ती हसली. " आम्ही चांगले तेच ठेवतो ना दुकानात ! " -- ती म्हणाली. तिच्या या हजरजबाबी हुशारीमुळे माहोल एकदम दिलखुलास, छान झाला ! सगळेच मनापासून फ्रेश हसले !

रस्ताभर पसरलेल्या धारदार काचा
कधीही बळी घेऊ शकतात
अविरत चालणाऱ्या प्रेमविचाराचा
कारण उद्यान म्हणजे गटार असले

तरी डॉक्टरला कुणीही

हसवू नाही शकत

मंदिराच्या सावलीतून काही मैल

चालणे म्हणजे सैनिकी अधिकाऱ्याच्या

आज्ञा न मानता चित्रकाराला महत्त्व देणे

-- पावसाळ्यात हे कोण चालवून घेईल

तरुणपणातले चळणेच म्हणतील लोक याला

उघड उघड व्यभिचार म्हणावा असे पाणी

वाहताना कुठे करते विचार

की माझ्या वाटेतली ही ताजी मुंडकी

पुन्हा जिवंत झाली तर काय होईल

ऊठसूट पशुपक्ष्यांना शिव्या देणे

किंवा झाडांना स्तुतिसुमने वाहणे

म्हणजे दुसरेतिसरे काहीही नसून

आशाळभूतपणे पाहणे असते

सूर्याकडे तो जेवणानंतर हात धुवत असताना

सबबींचा काही उपयोगच नाही

हे कळण्यासाठी पापड नाही लाटावे लागत

त्या ऐवजी दूरदृष्टी लागते ओळखण्याची की

आपले सर्व जगणे म्हणजे नुसतीच एक उधळपट्टी आहे

--- ००० ---

December 5

**आलोक** – ले० आसाराम लोमटे – शब्द प्रकाशन.

नोकरी करत आणि स्वतःचे वाचन-लेखन करत असा मी साहित्य क्षेत्रात वावरत आलो. त्यामुळे, व्यापक वाचन झाले नाही. याचा परिणाम म्हणजे एखादा महत्त्वाचा लेखक मला खूप उशिरा माहीत होतो आणि मी चकित होतो ! आसाराम लोमटे यांचा हा कथासंग्रह वाचून मी याच पद्धतीने नतमस्तक झालेलो आहे. आता इतक्या उशिरा मी काही बोलण्यात अर्थच नाही, हे समजूनही, या लेखकाला सलाम करावेसे वाटतेय, ते व्यक्त करतोय.

या कथांचा माहोल – कच्चा माल – अनुभव-क्षेत्र सगळे ग्रामीण जीवनातले आहे. पण, म्हणून ‘ ग्रामीण कथा ‘ अशा बंधनात अडकवण्यासारख्या या कथा नाहीत. या सर्वच माणसांच्या जगण्याला प्रस्तुत असणाऱ्या अशा ‘ माणसांच्या ‘ कथा आहेत. अत्यंत सूक्ष्मपणे मानवी जगण्याचा सर्वव्यापी आवाका घेण्याची या लेखकाची कुवत निव्वळ अद्वितीय आहे ! यात काहीशा दीर्घच म्हणाव्यात अशा स्वरूपाच्या सहा कथा आहेत. सर्वच कथांमधून लेखकाची समजूत आणि मानवी जगण्याकाडे एका व्यापक करुणेने पाहणे, हे जाणवत राहते. कमकुवत माणसांना बलवान लोकांनी जगणे हराम करण्याचे अनेक प्रकार या कथांतून जाणवतात. हे एकूण माणसाचेच जगणे आहे. याचे इथे असे सर्वांगीण भान व्यक्त होते की त्या भानात आपण या सर्वातून बाहेर, स्वतंत्र आहोत, असे वाटावे. मी खूप सविस्तर काही लिहिणार नाहीय. ज्यांनी लोमट्यांच्या कथा वाचलेल्या नसतील त्यांनी त्या मिळवून वाचाव्यात, एवढेच मी म्हणेन. यातल्या ‘ वळण ‘ या कथेत लेखकाची जरा फसगत झाली आहे, असे वाटले. त्या मुलीला शाळेतून काढल्यामुळे, तिने साक्ष देण्याचा प्रश्न कसा सुटू शकतो, हे कळले नाही. पण, या अर्थाने ही एक फसलेली कथाही लेखकाचे सामर्थ्य दाखवतेच.

या पुस्तकाच्या परिशिष्टात लोमट्यांनी त्यांच्या लेखन प्रक्रियेबद्दल लिहिले आहे. तो लेखही मराठीतला एक महत्त्वाचा लेख ठरावा. असे आणखीही काही लेखकांनी वा कवींनी स्वतःच्या लेखन प्रक्रियेबद्दल गंभीरपणे लिहिलेले आहे ( उदाहरणार्थ, मीही ). असे काही निवडक लेख एकत्र करून एक पुस्तक निघावे, असे वाटले. लोमट्यांनी या लेखात त्यांचे जे मानवी जगण्याकडे ‘ पाहणे ‘ व्यक्त केलेले आहे, ते खूपच मौल्यवान आहे.

या निमित्ताने आसाराम लोमटे यांना सविनय सलाम !

--- ००० ---

या घरात राहिल्याने  
सगळेच आजूबाजूचे  
भावनिक आणि वैचारिक  
गुंतलेले एकमेकांत  
खिडकी रस्ता टॉवर

आणि साठत साठत गेलेल्या
शेकडो आठवणी

हे सगळॆ म्हणजे
कविता नव्हे हे समजते
हे सर्व नसण्यातच
असते कविता हे पाहूनही
कवी घट्ट चिकटून

कविता सांगण्यासाठी
भाषा लागेल
आणि लागतील
सुखदुःखे सवयीतली

सांगायला तरी
कशाला हवीय कविता
या प्रश्नाचे उत्तर नसते कवीकडे

तडफडीतून बाहेर
असणे सांगत राहायलाच हवे
हे गृहीत धरून
कवी अनावश्यक तडफडही
स्वीकारत राहतो

--- ००० ---

हिंदीत तर खून म्हणजेच रक्त
लाल रंग बिचारा
हिंसक ठरतो
तोच रक्ताचाही असल्याने

मृत्यूच्या भीतीमुळे

स्मशानाचे भूत होऊन

बसते मानगुटीवर

आणि फूल

प्रियेच्या केसांत जात असल्याने

ठरते मोहक

दुसऱ्याच गोष्टीने

तिसरेच काही

घडण्याच्या या जगात

असे सर्व गुन्हे

नोंदवता येतात

मनाच्या नावावर

अमुक गाण्याने

तमुक मूड

नाहीच जागा झाला

तर काय होईल

नको नको

जगण्यासाठी मनाचा साठा

लागणारच सगळा

अनावश्यक असला तरीही

--- ००० ---

साथी न कोई मंजिल - Google Search

google.com

हे माझे एक अत्यंत आवडते गाणे -- साथी न कोई मंजिल -- ' बंबईका बाबू ' -- एसडी -- मजरूह -- देव आनंद. दिग्दर्शक राज खोसला आहेत. गाणे गंभीर आहे. फारशी हालचाल असणार नाही. सुरुवातीला कॅमेरा संथपणे चालतोय -- मग ती संथपणे चालत येताना दिसते. तो स्थिर आहे -- एका ठिकाणी -- गाणे सुरू होते. हा असाच राहील की काय ? आणि हलायचे, चालायचे कारणच

काय अशा मूडी गाण्यात ? मग तर हे बोअर होईल की काय ? पण, कौशल्य बघा -- किती हळुवारपणे आणि बेमालूमपणे हालचाली सुरू होतात त्याच्या ! शिवाय तिची आणि कॅमेऱ्याची हालचाल आहेच ! हे एक गंभीर गाणे किती दृश्यात्मकही इंटरेस्टिंग झालेय ते पाहा --

अत्युच्च बिंदूवर होणारा स्फोट
तेवढा परिपूर्ण अन्यथा
झाड असो की कविता
काहीच नसते निःशेष

शरीराने नाकारल्याने
व्यसने बंद पडलेली
आणि बराचसा संन्यास
स्वीकारल्याने सर्व डावपेच
आणि मनस्ताप निस्तेज झालेले

ही काय पंक्चर झाल्याने
थांबलेली सरकारी
वाहतूक बस थोडीच आहे
का नाही मन
असू शकत परिपूर्ण

कुठे भूतकाळातल्या दंगली
वा सत्तेतून केलेले अत्याचार
यांच्यांत शोधावीत कारणे
तरीही अपूर्णताच सगळी

शेवटी मनच म्हणते
माझे अधिकारच घ्या काढून

मी नाही होऊ शकत परिपूर्ण

अशा वेळी तरी दोन पेग मारून
शांत बसता यावे
--- ००० ---

सांस्कृतिक उन्नयन म्हणजे काय ? ते कलेमुळे होते का ? कोणत्या प्रकारच्या कलेमुळे ? कोणत्या प्रकारच्या माणसाचे ?

रात्रीचे अकरा
कवी टेबलाजवळ बसून
त्याचा एक दिवा
आणि बाहेर काही दिवे
घरे शांत

राहून गेलेली कामे
आणि त्यांच्या भावनिक सावल्या
त्रासदायक यांची कविता
काय म्हणेल जगण्याबद्दल

फक्त तेच म्हणणार असेल
तेवढेच तर नकोच ती कविता
असे म्हणत कवी
बसतो मागे झुकून

एकच डास उडतो आहे
तो मारता येईल वा
त्याच्यामुळे मी मरू शकेन

कवी दचकतो हे सगळे

एकत्र कशासाठी आहे
या विचारात
तो बसून राहतो

या प्रश्नासह सगळे
एकत्र गिचमिडून मग
लिहितो तो एक जटिल कविता
--- ००० ---

कधी कधी शब्द
अर्थांसाठी नाही येत
ते येतात माहीत नसलेले
आंतरसंबंध घेऊन

हिरव्या गार मसणवटीत वास्तव्य
करतात म्हणून काही
कावळ्यांचे मॉल नाही होत
की ऑन लाईन खरेदी केल्याने
शाळांना आगी नाही लागत
उलट प्रत्येक स्त्रीचा आग्रहच
असणार खाजगी ते निळेच ठेवण्याचा
उगीचच कोण उकरत बसेल
गतकाळात गाडले गेलेल्या
गडगंज पुढाऱ्यांचे सडके अवशेष

माणसाची खरी टेस्ट
त्याच्या बौद्धिक मनोऱ्यांत नसून
ती असते उदासीनपणे आयुष्य
निरुपयोगी करण्यात

आपला मुक्काम कोरला जावा
इथल्या मातीत म्हणून इथल्या
माणसांचा लळा बाळगणारेच जास्त

निराशा अपयश वा नकार
हेही शब्दांचेच तर प्रकार
त्यांना कविता म्हणा की निवेदन
--- ००० ---

मन म्हणते वाह
मन म्हणते सुंदर
मन म्हणते आई गं
मन म्हणते क्या बात
मन म्हणते अप्रतिम
मन म्हणते क्रांतिकारक
मन म्हणते डोळ्यांत अंजन
मन म्हणते विदारक
मन म्हणते संवेदनशील
मन म्हणते आरसा
मन म्हणते अस्वस्थ केले
मन म्हणते अंगार फुलला
मन म्हणते उत्तेजक
मन म्हणते प्रेरणादायी
मन म्हणते अद्वितीय
मन म्हणते खासच
मन म्हणते अद्भूत
मन म्हणते इत्यादी
मन म्हणते वगैरे

असे खूप खूप

अशी कविता
काय कामाची
मनाला व्यग्र करणारी
आहे तसे खुश करणारी

मूल्य म्हणजे कविता
मनाच्या असण्यालाच आव्हान देणारी हवी

--- ००० ---

हत्ती थंड आहे
हत्ती डल आहे
हत्ती आहे अकार्यक्षम
हत्ती हलत नाही

हत्तीला हत्तीरोग
झालाय की काय

काही विनवतात
काही हिंसक होतात
काही वेडे होतात
हत्ती मात्र
दात बाहेर असल्याने
सस्मित वाटत राहतो

हत्तीचा शरीरधर्म
पाहून भलेभले चकित
नकोच ते त्याच्या नादी लागणे

असे शक्तिप्रदर्शन

हत्तीचे डोळे लहान
तो फारसे पाहात नाही
त्याचे कान मोठे
त्याच्या आळसात
काहीसा व्यत्यय आणणारे

हत्ती पांढरा नसूनही लाडावलेला
पूर्ण देशाला हत्तिबुद्ध करणारा
--- ००० ---

हो किंवा नाही
काहीतरी उत्तर हवे असते तुम्हाला
त्या सरकारी ऑफिसातून
म्हणजे पुढची दिशा
ठरणार असते
आणि दिवस जात राहतात

भांडण करा वरपर्यंत जा
व्यवस्था बदलवा
असे सर्वांनी म्हणावे
असे खूप

त्यापेक्षा एका बंद
अंधाऱ्या खोलीत बसून राहा
हाच एक उरलेला मार्ग
मग जे होईल ते होवो

होतच असते नुकसान

थोडेफार आयुष्यात

अशी मनाची समजूत घालत

झाडावर चढणाऱ्या

खारीकडे पाहात राहा

मनाला असे जायबंदी करणारे

काय काय आहे हे शोधावे

तर मन स्वतःच ते आहे

हे उत्तर पाहून

होकार नकार दिङमूढ होतात

--- ००० ---

November 2018

November 30

दगड हा एक प्रश्न

झाड हा एक प्रश्न

आणि इमारत आणि प्रदूषण

आणि हो जागतिकिकरण

आणि हे सगळे प्रश्न

एकमेकांत गुंतलेले

एकेक सोडवणे अशक्य

मन हात टेकते -- म्हणते

ये मेरे बसकी बातही नही

सगळे मिळून एकत्र

निराकरण

म्हणजे काय हेच नाही माहीत मला

स्वस्त दारूच्या दुकानात
जमतात सगळे असेच मनवाले
हे प्रश्न वाटूनही नाही घेता येणार
यावर त्यांचे एकमत होते
पण प्रत्येकाला सुचणारे उपाय
वेगवेगळे असल्याचे पाहून
ते खिन्न होतात

गोंधळलेले आणि उद्विग्न असणे
या समान धाग्याचे प्रेम मात्र
त्यांना सुखावते

खूपच बदलली रहदारी
असे म्हणत ते शून्य होतात
--- ००० ---

त्रुटी नाहीशा करून
पुन्हा जगायची सोय नाहीय
किंवा एकच जुळलेला गुण
आकर्षक असला तरी
पूर्ण जगणे कवेत घेईल
हेही शक्य नाहीय

त्यामुळे अटळ तेच घडले
कशामुळे नेमके काय घडले
हे न कळता मनात असूनही
साधे विचारातही नाही आले
व्यक्त होणे वा विचारणे

कदाचित एकमेकांच्या मनांत
असे काही घडून गेलेही नसेल
असेच वाटत असेल एकमेकांना
आणि नॉर्मल जगण्याच्या
ओघात बदलले असतील मार्ग

काही कटाक्ष वा एखादे स्मित
म्हणजे कितीसे सखोल असणार
आणि असले तरी कधी
व्यक्तच न झाल्याने
ते उथळच राहिले असणार
सहज विसरण्याजोगे

पण आठवणीत राहतेय म्हणजे
त्या त्रुटींची राहिली असणार टोचणी
--- ००० ---

रात्रीच्या अंधाराचे अंतरंग
पाहता येते हे कळण्यातच
कळते की आपल्याला
वाटते तसे काहीच नाहीय

हे नुसते कळणे नसते
हे असते मी नसलेले सत्य
जे सगळ्या जखमा बऱ्या
करून मोकळी करते हवा

हे सगळ्यांनाच कळावे
या माझ्या तळमळीवर

आवाजांचे डोंगर कोसळतात
मला नगण्य करत

तरीही मी जणू कविता लिहितोय
असे दाखवत वापरत राहतो आडमार्ग
कमावलेल्या भाषेतून सांगू पाहतो
स्मृती टाकण्याचे कसब

मन ही एक वस्तू असते
हे कोण ऐकून घेणार
आणि तिचे जगाइतकेच अनिश्चित
असणे-नसणे

अपमान वा क्षुद्र लेखले जाणे
वा नाक चोंदणे हे सर्व
सर्व मनांशिवाय
नाही घडू शकत

--- ००० ---

भाषा, शैली, रचनाप्रकार, गद्य की पद्य, अशा गोष्टींबद्दल ज्या उत्साहाने बोलले जाते तसे आशयाबद्दल फारसे का बोलले जात नसावे ?

November 27

Champra Deshpande shared a photo.

लौकरच कुडाळला बाबा वर्दम नाट्यमहोत्सवात सादर होणार

पीडीए निर्मित आणि अजित सातभाई दिग्दर्शित
माझे दोन अंकी नाटक ' जिंदगी ख्वाब है ' --

स्वतःच्या घराची एक खोलीच
ढापली गेल्याने कावराबावरा
झालेला माणूस आणि स्वतःच्या
शर्टाला चारचौघांत ब्लेड मारले गेल्याने
विद्ध झालेला माणूस
हा एकच एकाच त्याच शरीरात

त्या त्या वेळी वाटते की आता
ही अवस्था कधी संपणारच नाही

हा स्थिरपणा प्रचंड क्लेशदायक
तरीही असण्याचा भरोसा
तर त्यातच उपलब्ध

बॅग हरवली म्हणून शोधतोय
तोवर गाडी सुटून निघालेली
तहान लागून इतका वेळ झाला
तरी अजून पाण्याचा घोटही नाही

कधी पोचायला उशीर होणे
कधी खूप वाट पाहावी लागणे
कधी आपल्याला हवी असलेली
सर्व ऑफिसेस बंद असणे

मधेच काही क्षण सुंदर निसर्ग
पाहून अचंबित आनंदित होऊन

पुन्हा घर्षणात मग्न होणे
-- आणि जात राहणे काळाचे
--- ००० ---

शरीराबाहेरच्या अवकाशातून
ऊर्ध्वप्रवाही भान
क्षणभरही न थांबणारे
शरीरासह निव्वळ असणे

घरे माणसे इमारती
यांसह सर्व संबंध
विरघळून एका
विस्तीर्ण शांततेत
असणारे वस्तुमात्र

प्रश्नांबाहेर मन
सर्व विचार
सर्व दुःखे
पोटात घेऊन
आस्था असणारे
जगणे

हे ना स्वतःचे
ना स्वतःपुरते
बेफिकीर नसलेले
पूर्ण असण्याला
जबाबदार असणारे

ही काही सत्ता नव्हे

ना न्यायाची सोय

हे तर सर्वांसह असणे

--- ००० ---

फ्रेंडस, आज माझा वाढदिवस नाही आहे -- एफबीवर काही चूक झाली आहे का ? मला धडाधड शुभेच्छा येताहेत ! -- तरीही सर्वांना धन्यवाद !

मला सगळेच खरे वाटत असल्याने
मला शहरांच्या जागा बदलाव्याशा वाटतात
माझ्या खिशात वा बॅगेत
पुरेसा न्याय नसल्याने
मी संसार करू शकत नाही
आणि मुख्य म्हणजे
हे कुणामुळे घडतेय
याचे पक्के मत लागणारच ना मला
नवे बूट हवे असतील तर

बरोबर की चूक हे ठरवता येण्याइतके
ना माझे कपडे भारी आहेत
ना माझा गॉगल
आहे या त्रासातून बाहेर पडण्यासाठी
आणि त्यासाठीच मी रिक्षा चालवतोय
शक्य तो अपघात न करता
एवढे तर समाधान
लागणारच ना मला
किंबहुना हीच खात्रीची उग्र कृतीच
आहे असे मनात समजून

माझी शक्ती वाया जातेय
हेही कळते कधी कधी मला
त्यामुळे मी सारखा मागे पडत जातोय
हेही सगळे आधीचे सगळे घडण्याच्या
कारणामुळेच घडतेय अर्थातच

त्या कारणाच्या विरोधात जगत राहणे घडत राहावे हेच माझे ध्येय

--- ००० ---

तयार आहे मी माझा अहंकार टाकायला
पण, त्यात माझा फायदा काय होईल, ते सांगा.

डुगडुगत्या टेबलाला
पॅकिंग लावताना आला विचार
की जगात राहायचे
तर होणारच जगाचे परिणाम

परिणामच नाही होणार मनावर
असे वाक्य लिहिलेले पाहिले
एका आश्रमावर
म्हणजे मग जगाबाहेरच
होणे झाले ते

रोगट तरी व्हा
नाही तर सोडून तरी जा जग
यांतली निवड करताना मन
रोगट होण्याकडेच झुकत होते

काढू असेच चार दिवस
आधीच का बाहेर जा

वस्ती वाढल्याने आता
मोठ्या पाईपलायनी टाकत होते
पण पाणीपुरवठ्यात कपात होणार होती
प्रश्न येणार आणि त्यांवर
मार्गही काढावे लागणारच

पण मरू दे सगळे
जगत राहणेच बरे
आत्महत्या करून जगणार कसे
--- ००० ---

आमच्या भागातला सर्वाधिक रहदारीचा रस्ता. ऑफिसला जाण्याच्या आणि तिथून परतण्याच्या वेळी तर इथे ट्रॅफिकचे भरीतच होते. त्यात सध्या रस्तेदुरुस्तीची कामे चालू आहेत ! आणि उलट दिशेने बिनदिक्कत येणारे स्मार्ट वाहनचालक तर आहेतच ! खूपच सावधपणे चालावे
लागते !

तर संध्याकाळी त्या रस्त्याने चाललो होतो. अर्थात सावधपणे. तेवढ्यात माझ्या मागून आवाज आला, " उद्धव तिकडे जाऊन काय करतोय ? " आणि तोंडाने शिट्टी वाजवल्याचा आवाज आला. मी मागे वळून पाहिले तर तो एकटाच माणूस होता. तो पुन्हा तेच म्हणाला आणि पुन्हा शिट्टी ! माझ्या लक्षात आले की बहुतेक जगातले सगळे वेडे टिपून मला मारायच्या प्रयत्नात आहेत ! ( एक घडून गेलेली घटना डोक्यात होतीच ! ) पण, मी जरा रस्त्याच्या कडेला गेलो. तर तो माणूस तेच तेच पुन्हा पुन्हा म्हणत मला ओलांडून पुढे गेला ! तो ज्याला शोधतोय तो मीच आहे, हे, तो वेडा असल्यामुळे बहुधा त्याला कळले नसावे !

या एकूण जगात आपण तरी कसे अजून शहाणे राहू शकतोय याचे आश्चर्य करत मी माझे काम उरकून घरी परतलो !
--- ००० ---

दुसरी भाषा नुसती येऊन उपयोग नाही
शब्दांच्या विणकामातून
दिसले पाहिजेत निर्माण झालेले
कधीच न पाहिलेल्या अर्थांचे आवाज
-- आणि माझ्या भाषेत तर
चहू बाजूंनी सुरुंग
पेरून ठेवलेले आहेत
कुणी पोचूच नये
माझ्या आवाजांपर्यंत म्हणून

त्यांचे बरोबर आहे
त्यांचे राज्य स्थापन होण्यासाठी
किती तरी घाम रक्त अश्रू
खर्ची घातलेत त्यांनी
-- माझ्या अमर्याद शक्यतांमुळे
झाकोळून जाणारच ना
त्यांच्या सावल्या

मी भाषा कशासाठी वापरतो
हे त्यांनी कधी विचारलेही नाही
माझ्या कवितांची पाने निव्वळ आलिशान
चैन म्हणून त्यांनी निकालात काढली

माझी भाषा माझ्याच लोकांनाही
परकी वाटते हे पाहून ते खुश झाले
आता मी अगदीच निरुपद्रवी
आणि निर्धोक असल्याचे पाहून
माझ्या कवितेला त्यांनी तीट लावली
--- ००० ---

Yesterday I was clever, so I wanted to change the world. Today I am wise, so I am changing myself. --- RUMI.

काल मी हुशार होतो, त्यामुळे मला जग बदलायचे होते. आज मी शहाणा आहे, त्यामुळे मी स्वतःला बदलतोय. ---- रुमी.

उदासी वा क्रोध वा जल्लोष
असल्याशिवाय वाचकाला
नाही सापडत कविता म्हणून
मी टपरी टाकून धंदाच करायचे ठरवले

वाचक राहात एसीत वा झोपडीत
पण व्यवहार पाहात
आपण अन्नपाणी घेतो
तर आपण जगलोच पाहिजे
असे ते म्हणत --
क्रोधाने असो की प्रेमाने
बोध हवाच कवितेत
अन्यथा युनोची तत्त्वे
अंमलात आणणारे जग
येणार कुठून असे ते म्हणत

मलाच काही समजत नाही
हे दिसले तेव्हा ती टपरी
दिली मी उडवून स्वप्न म्हणून
आणि हाताशी काहीच नाही
असा रिकामा झालो

म्हणजेच आता धंदाही नाही
आणि बोधही नाही

अशा कंगाल कवितेतून माझ्या
मी सांगू लागलो निःशब्दता

यात आता अस्वस्थता नव्हती

--- ००० ---

मनाच्या अभावामुळे
नदीला घाई नसते
कुठेही पोचण्याची
तिच्या काठावरची
पितरकृत्ये
ती निवांत बघत जाते

मृत्यूपूर्वी ( माझ्याच कल्पनेत )
लावायला हवी विल्हेवाट
आणि संपवायला हवे
जगाचे भले करणारे काम
म्हणून सगळी झाडे येतात एकत्र
आणि ठरवतात मृत्युपत्राचा मसुदा
आणि वाटणी ठरवतात जगाची
डोंगराडोंगरांत

मीही आधी ठरवतो कल्पनेने
काय काय व्हायलाच हवेय ते
आणि बाकीचे देतो सोडून अधांतरी

जी कामे माझ्याशिवाय
कुणी करूच नाही शकणार
तीही समजा नाहीच झाली

माझ्या हातून कल्पनेत
निव्वळ आल्तूफाल्तू समजा
वाचनात वेळ गेल्याने तरी

कुणाला कळणार आहे असे झालेय ते

--- ००० ---

मी वाट पाहात असतो घड्याळाखाली
तेव्हा घड्याळाचे विचार
चावत असतात गर्दीला
आणि गर्दीच्या मनातल्या मुंग्या
लागत असतात
सर्व बाळगलेल्या वासनांना

बासनात गुंडाळून ठेवलेला शब्दकोश
खूप काटछाट करायच्या लायकीचा
उरलेला उपकारापुरता

सपकारे पाण्याचे बसल्याने
पांगलेल्या मोर्च्याप्रमाणे
पसरून विभागलेली हिंसा
कधीही उसळून दाखवेल रंग
अशी तप्त आणि सुप्त

व्यापून टाकत स्वप्नांचा आसमंत
खदिरांगारांचे डोळे
आप्तेष्टांसाठी फक्त
हळवे होताना खजिल होतात
स्वतःच्या आत्मकेंद्रिपणामुळे

खिळखिळ्या झालेल्या या जगात

मग उरतेच काय

उत्साहाने खाणे चिकन फ्राय वा सवयीने

म्हणणे हाय काय आन नाय काय

--- ००० ---

काही वैचारिक प्रामाणिक वैचारिक बावळटही असतात कारण ते असे समजतात की कविता विचारात असते !

कधी कधी कविता ही वास्तव समजून नाही घेत,

उलट, ते विस्कटून

त्याचा खोटेपणा दाखवते !

त्या आठवणी जाग्या होणे

म्हणजे आत्ताही पुन्हा तेच घडणे

साग्रसंगीत

प्रथमच घडत असल्याप्रमाणे

जसे मनाला तेव्हाही ते वाटत होते

सत्याबाहेरचे

आता तर तीच मागतेय

त्या आठवणींची फुले

खरे तर

तिच्याच मनाच्या बागेतली

जी तेव्हाच

मला निगराणीला दिलेली होती

माझ्या नुसत्या होकारात

घडून जाते सगळे

तेव्हा आणि आता

काय घडले हे फक्त

आम्हालाच माहीत

जणू सत्याबाहेर

तेव्हाचे दंवबिंदू

व्हावेत वर्तमान क्षण

हा चमत्कार

काळातला कसा असणार

त्यासाठी लागते जादू

सत्याबाहेरची

--- ००० ---

मी समजून असतो

एकूण जग नव्हे पण माणसाचे जग

कधीही विसरून जाऊ शकते

स्वतःला विचारांच्या जंजाळात

काही माणसे हिरवी

काही उष्ण

आणि काही गतिमान राहात

हे शब्द परीक्षेसाठी नाहीत

तान्या मुलांना म्हातारे करण्याऱ्या

वा नाहीत माझा डंका पिटत राहण्यासाठी

सवयीने पिळले जाणाऱ्यांच्या पिढ्यांत

एखाद्या उत्सुक मनाने ऐकले हे शब्द
की खरे तर संपते त्यांचे काम
पण तरीही एक वा अनेक
यांत फरकच नसल्याने
ते चालूही राहू शकते
आकाशाबरोबर पुढेही
निळा रंग धारण न करता

निसर्गात घडलेली डिझाइन्स
आणि या कविता
यांत एक फरक आहे
निसर्गाचे बेफिकीर असणे आणि माझेही
एकच असले तरी
मी ओलांडलेले असते रंगांचे जंगल
आणि निसर्गाला माहीत नसतात विचार
--- ००० ---

आमच्या एरियात एक
' प्युअर नॉन-व्हेज '
हॉटेल आहे !

त्या त्या वेळी ते ते विचार
येऊन गेलेले असतात जे आता वाटतात
मुरलेले वाडे ज्यांतले लाकूड कुठून आले
वा माती कुठून आली आणि ते सगळे
एकसंध कसे झाले नेमके
हे मला कधीही माहीत न झालेले

हे सगळे जाते घडत
माझ्या व्यक्तिगत अनुभवांतून
व्यक्तीचे मूळ न कळता

आता कविता लिहिताना
हे सगळे हजारो वर्षांचे संचित
उपलब्ध होते त्यातले फक्त
नेमकेच शब्द घेतले जात

वाचणारे तरी कुठे
स्वतःचे स्वतःला निर्माण करून
लावू शकतात स्वतंत्र अर्थ
-- त्यांचेही मन असते सहभागी
सर्व संचितासह

म्हणूनच
कविता ना माझी असते
ना वाचकाची
ना तिची स्वतःची
तिची असण्याची प्रक्रिया फक्त असते
अस्तित्वात परस्पर
--- ००० ---

मानापमान रागलोभ
निष्ठाफसवणूक हे सर्व
अपेक्षिले जातेच मानवी संबंधांत
म्हणून मी ढोंग करत राहतो
कधी कधी तर
पराभूत होऊन खट्टूही होतो

खरे तर मला स्वभाव नाहीय
पण तो नसण्याची भीती वाटावी
अशा असतात सर्व व्यक्ती ठाम
त्यांचे त्यांचे स्वभाव
त्यांना नॉर्मल वाटतात
आणि नैसर्गिक --
माझ्या स्वभाव नसण्याने
ते सैरभैर होऊ शकतात
आणि मुख्य म्हणजे
त्यांच्या दुःखांवर बाँब टाकणारा
मी कोण विकृत
हा प्रश्नही त्यांना साहजिकच वाटतो

ढोंग करता करता
मी हळूहळू
सस्वभावच जगायला लागतो
त्यातला प्रचंड धोका
मला माहीत असतो
-- यात तर साधी सर्दीही
माझ्या प्राणावर बेतू शकते
माझा स्वभाव सत्य मानून
--- ००० ---

नाटक सुरू व्हायला काही मिनिटे आहेत
पूर्ण टीम तयार आहे त्या पूर्ण नाटकासह
त्यांना माहीत आहे काय काय घडणार आहे ते
पण ते घडायचे तसेच त्याच क्रमाने
योग्य त्या विरामांसहच घडत जाणार आहे

पूर्ण नाटकाचा ताण पडदा उघडताना
माहीत असल्याने सर्व घटना भावभावना

आपण इतके तुटक वगायला नको होते तिच्याशी
नाटक नीट पार पडावे तिच्यामाझ्यातली दृश्ये
खरी वाटावीत यासाठी आधी ती खरी वठावीत

कितीही खात्री असली तरी प्रत्येक प्रयोग
वेगळाच होतो सर्व तेच असूनही
ठरलेल्या जागांना टाळ्या आल्या तरीही
हंशे आले तरीही उगीचच काही
राहून गेल्याचे वाटते कधी कधी
लोकांनी गर्दी करून वा छान ग्रेट म्हणूनही

घटना माहीत आहेत पण बहुतेक
त्या जगल्या गेल्या नाहीत
की वाहून जाणे घडले त्यांच्या नाइलाजी
अटळ आणि जोरकस लाटांत

मी तुटक वागल्यामुळे भूतकाळ घडत राहिला
आणि त्याला बाजूला ढकलण्यासाठी
वर्तमानाचे भावोद्रेक वाढले असावेत बहुतेक
--- ००० ---

Avinash Gaikwad अविनाश गायकवाड यांच्या ‘ खिंडीत गोठलेलं सुख ‘ या कवितासंग्रहाचे आसाराम लोमटे यांनी केलेले ‘ समष्टीचे विधान ‘ हे परीक्षण आज दिनांक १८-११-१८ च्या लोकसत्तेत आलेले आहे. परीक्षण वाचल्यावर, हा संग्रह ताकदवर असणार हे लक्षात येते. त्याबद्दल, अर्थातच माझे मित्र गायकवाड यांचे मी अभिनंदन करतो ! वस्तुतः काळाचा महिमा पाहता, एवढेच लिहून थांबायला हवे. पण, मी तसे करणार नाही. गायकवाड जर मैत्रीत कधी कधी मला काही खोचक प्रश्न विचारत असतील तर

त्याच मैत्रीत मलाही तो तसा अधिकार मिळतो, असे मी समजतो. ( शिवाय, गायकवाड आणि संतोष पद्माकर यांनी त्यांच्या कॉमेंटसमधून मला लिहायला उद्युक्तही केलेले आहेच. ) हे सगळे आरोप-प्रत्यारोप अशा निरुपयोगी मार्गाने न जाता यावर खुली चर्चा व्हावी.

१. शोषिताने शोषकाबद्दल संताप बाळगणे ही नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. एवढ्यावरच कला थांबावी का ? कला म्हणजे, राग-लोभ-प्रेम-क्रोध-द्वेष वगैरे व्यक्त करत राहणे, इतकेच असते का ?

२. व्यवस्था म्हणजे काय ? काही लोक शोषक, विषमतावादी, असंवेदनशील, क्रूर असणे आणि काही लोक शोषित, समतावादी, संवेदनशील आणि मायाळू असणे – म्हणजे व्यवस्था का ? मुळात या दोन गटांतल्या लोकांच्या मनांमध्ये काही मूलभूत फरक असतात का ? एकूणच ही व्यवस्था घडते कशी ? दुष्ट आणि सुष्ट लोकांची ही विभागणी कशामुळे होते ? नियतीमुळे की प्रारब्धामुळे की मागच्या जन्मातल्या पापपुण्यांमुळे की आत्ताच्या – या जन्मातल्या आपल्या मन वापरण्याच्या पद्धतीमुळे ? मुळात एकूण मानवी मनांत काही मूलभूत फरक नसतील तर काही माणसे वर्चस्ववादी कशी होतात ? बाकीच्यांना वर्चस्ववादी व्हायचे नसते का ?

३. चांगल्या व्यवस्थेची आपली कल्पना संतत्वाच्या गुणांशी वा बुद्धाने सांगितलेल्या मार्गाशी जुळणारी असते. तसे घडू शकेल असे खरेच आपल्याला वाटते का ? की आहे त्याच वर्चस्ववादी मनाने ती स्वर्गीय व्यवस्था जन्माला घालता येईल, असे वाटते ?

४. चांगली व्यवस्था कशी हवी ते समजा सगळ्यांना कळते आणि पटतेही. समता हे तर मूल्य म्हणून पूर्ण मानवजात स्वीकारते. मानवी हक्क ही तर खूपच प्रचारात असलेली गोष्ट आहे. तरीही, यात चांगले बदल तर होतच नाहीत तर उलट, व्यवस्था अधिकाधिक किडत, बिघडत, सडत जाताना दिसते – असे का होते ?

५. जातीच्या वा धर्माच्या वा भाषेच्या वा पक्षाच्या पायांवर टोळ्या करून शक्तिप्रदर्शन करत राहावे, असे माणसाला का वाटते ? अशा शक्तींच्या प्रभावांतून काही स्वार्थ साधले जातात की नाही ? हे सगळे चालू ठेवून व्यवस्था बदलू शकेल का ?

६. बाजार, जागतिकिकरण, भांडवलशाही, मालकी हक्क, वर्चस्ववाद – हे सगळे समजा वाईट आहे – धिक्कारण्यायोग्य आहे, तर नवी व्यवस्था आणायची म्हणजे काय करायचे ? आता जे शोषित आहेत त्यांची सत्ताही आज ना उद्या येईल समजा – तर ती नवी चांगली व्यवस्था असेल का ? माणसाचे मनच जर भ्रष्ट होणारे, अमानुष होणारे असेल तर असे मन नवे काय घडवू शकेल ?

७. आताचे शोषित पुरुष स्त्रियांशी समतेने वा न्यायाने का वागू शकत नसतील ?

-- असे आणखीही अनेक प्रश्न विचारता येतील. हे प्रश्न कलावंताच्या चिंतनात असायला हवेत की नकोत ? आपापल्या पद्धतींनी प्रतिक्रिया देत कुणी नक्षली, कुणी अतिरेकी, कुणी तालिबानी वगैरे होताहेत – ते सगळे बरोबर समजायचे का ? – यावर मित्रवर्य गायकवाडांचे काय विचार आहेत, ते समजून घ्यायला या निमित्ताने संधी आहे. त्यांनी यावर बोलावे, ही विनंती.

--- ००० ---

काय काय वाचायची गरज नाही हे ज्याला कळते त्याचे रविवार-पेपर्स लौकर वाचून होतात !

फिक्षन म्हणावे की फिक्शन ?

-- हे ठरवायचे कसे ?

**वास्तव आणि फिक्शन**

संजय भास्कर जोशी संपादित ' साहित्य सूची ' च्या यंदाच्या दिवाळी अंकात, ' एकविसाव्या शतकातील कथात्म साहित्य ' हा एक महत्त्वाचा परिसंवाद आलेला आहे. जगण्यात उत्तर-आधुनिक अवस्था आणि जाणिवा कशा तयार होतात याचे दर्शन या परिसंवादात घडते. आपण आपापले छोटे छोटे किल्ले घट्ट धरून बसून काही उपयोग नसतो. जगण्याच्या आव्हानांपुढे ते फारच थिटेही असते. इथे त्या परिसंवादातल्या सर्वच मुद्यांवर लिहिण्याचा विचार नाही. पण, कदाचित सर्वच मुद्दे कव्हर करणाऱ्या अशा एका कळीच्या मुद्याबद्दल बोलणार आहे. कुणाच्या विरुद्ध बोलणे वा एखादी बाजू मांडणे, असा कोणताही अभिनिवेश यात नाही. निव्वळ विचारासाठी म्हणून माझे आकलन व्यक्त करत आहे.

तो कळीचा मुद्दा वास्तवाचा आहे. वास्तव खूप वेगाने वाढत आणि बदलत असल्याने त्याचे आकलन करून घेणे आणि कलेतून ते व्यक्त करणे अशक्य होत आहे, हा तो मुद्दा आहे. मागे जयंत पवारांनीही म्हटले होते की कलावंताला ते वास्तव समजेपर्यंत ते जुने होते आहे, तर ते व्यक्त करून उपयोगच काय किंवा त्याला अर्थ तरी काय ? माझ्या मते हा एक बौद्धिक प्रश्न आहे. वस्तू वेगळ्या आणि वास्तव वेगळे, हे लक्षात न घेण्याचा आहे. संगणक, मोबाईल, मॉल, मल्टिप्लेक्स या वस्तुरूप गोष्टी आहेत. आजचे राजकारणही त्या अर्थाने वस्तुरूपच आहे. पण, ' आजचे वास्तव ' असे काही अस्तित्वातच नसते. प्रत्येकाचे वास्तव हे त्याच्या त्याच्या मानसिक घडणीप्रमाणे वेगवेगळे असते. त्यामुळे, त्या त्या वास्तवाला येणाऱ्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या असतात. वास्तव म्हणजे प्रतिक्रिया. ते सर्वांना सामान्य वा एकच असे असूच नाही शकत. बौद्धिकतेचे आणि तथाकथित विवेकाचे महत्त्व माजवणाऱ्यांनी वास्तव हेच अंतिम सत्य मानले. शास्त्र व तंत्रज्ञान हे विषय सोडता कोणत्याही मानवी संबंधांत एकच एक असे समान वास्तव असूच शकत नाही, इकडे दुर्लक्ष झाले वा हेतूपूर्वक करण्यात आले. त्यामुळे, कला म्हणजे वास्तवाची म्हणजे प्रतिक्रियांची अभिव्यक्ती असा भ्रम दृढ होत गेला. आपल्या सांस्कृतिक क्षेत्राची वाट लागण्याचे हेच मुख्य कारण आहे.

कलेतली अभिव्यक्ती म्हणजे वास्तव नसून फिक्शन असते हे विसरले गेले. काय फिक्शन म्हणजे ? फिक्शन ही मनाची प्रतिक्रियारूप अवस्था नसते. ती वास्तवाच्या विदीर्णतेचा भाग नसते. ती वास्तवाचा अपुरेपणा, विदीर्णता आणि भ्रामकता यांचे भान

असते. कलेतल्या या फिक्शनला हद्दपार केले गेल्याने बांधिलकी, भूमिका यांचे स्तोम माजले. जगण्याचे समग्र अवधान हे कोणत्याही बांधिलकीपेक्षा मौल्यवान, सर्जक आणि जीवनदायी असते, हे गाडून टाकण्यात आले. त्यामुळे, वास्तवकेंद्री सर्व कलावंत गोंधळून जाण्याची वेळ आली. विचारसरण्या, भूमिका यांचा तर ऱ्हास झालेला आहे, मग मी कशासाठी, काय लिहितोय, अशा प्रश्नांनी ते भंजाळून गेले. फिक्शन फक्त कलेतच असते, असे नाही. जगण्यातही असते. वास्तव म्हणजे सत्य आणि फिक्शन म्हणजे असत्य वा भ्रम, असल्या निर्बुद्ध कल्पनांमुळे कलाक्षेत्राचे वाटोळे होत गेले आणि होत आहे.

कला म्हणजे वास्तव नव्हे तर फिक्शन – हे समजण्याची नितांत गरज आहे. अन्यथा कलेतूनही अस्मितांचे आणि विध्वंसाचेच पीक निघत राहील !

--- ००० ---

मान्यच आहे ना आता सगळे
म्हणजे उदाहरणार्थ घटना घडतात
समजा हेच मान्य आहे पण का
कुठे घडतात त्या तर मनातच ना
पण मन ही काय
खरी घटना आहे का

जग घडले ही पहिली घटना
त्यानंतर आपले मन
आणि मग या मनाने
रिस्क घेण्याची घटना --
जगाच्या प्रतिसादाची घटना
वाईट येऊ शकली असती
म्हणून रिस्क म्हणायचे
पण झाले ना आता
आलाय ना पॉझिटिव्ह रिस्पॉन्स

होय तेच जग म्हणजे
होय तेच तुम्ही समजताय तेच

म्हणजे तीच

तीच तर जग

मग बाकीचे सगळे

कष्ट हिकमती हुशारी

यांच्या घटना बऱ्याच लागल्या

पण आता कशालाच नकार नाही

गुण्यागोविंदाची चालू आहे

सगळी घटना जगातल्या जगात

--- ००० ---

चित्रपट ही एक कला आहे.

पण, चित्रपट निर्मितीला खूप खर्च येतो.

झालेला खर्च आणि वर काही नफा मिळवण्याची चिंता असते.

बहुसंख्य प्रेक्षक हे फक्त करमणूक मागणारे आणि ' डोक्याला ताप नको ' वाले असतात.

त्यामुळे, जगण्यातल्या प्रश्नांना सामोरा जाणारा चित्रपट निर्माण होणे अशक्य बनते. ( तसेच काहीसे व्यावसायिक नाटकाचेही असते. )

याउलट, प्रायोगिक नाटक अत्यंत कमी खर्चात सादर होऊ शकते -- साध्या माणसाला खिशातले पैसे घालवूनही ते करणे शक्य असते.

त्यामुळे, प्रायोगिक नाटक हे आशयदृष्ट्या अधिक चिंतनशील व अधिक समृद्ध व अधिक आव्हानात्मक असू शकते.

म्हणजेच, सादरीकरण कलेत प्रायोगिक नाटकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

-- हे कितपत योग्य वाटते ?

स्वप्न आभास सत्य

यांतले नेमके फरक नव्हते समजत

कारण सत्यातही दिसत या सर्वांचेच भास

-- आधी तर ती स्वप्नालाही तयार नव्हती

पण हळूहळू आली आभासापर्यंत --

मी म्हणालो की मी देईन
आभासाचे पूर्ण शिक्षण तुला
असे की तुला तेच सत्य वाटेल
तर ती म्हणाली की त्यापेक्षा
स्वप्नात येऊन मी पटकन शिकून जाईन

या अशा लहरी समजणे अशक्य असते
सरळ त्या मान्य करणेच परवडते
पराभूतपणे वा आपल्या इच्छित फायद्यासाठी
आपण मान्य करतोय असे वाटू नये म्हणजे झाले
किंबहुना आपला फायदाच आपल्या मनात आहे
हे सूक्ष्मपणे कळलेलेही फायद्यात पडू शकते
ते कळलेच नाहीय असे दाखवत प्रतिसाद मिळाल्याने

तिला खरेच काही कळलेलेच नाहीय
असेच ठेवायचे आपणही निरागस भाव

दोघांनाही त्या न कळण्याचे महत्त्व
कॉमन असल्याने पण तरीही ते तसे नसल्याने
त्याची तीव्रता वाढत जाते

मग मात्र स्वप्न आणि आभास हे सत्यच होतात
अचानक कळूनसवरून निव्वळ नकळतच
--- ००० ---

मेहनत, पैसा, प्रामाणिकपणा, कौटुंबिक परिस्थिती, मिळालेले प्रशिक्षण, वय -- अशा मुद्यांमुळे कलेला वेटेज मिळत नसते !

आणि मीही पाहिला –

‘ आणि डॉ. काशिनाथ घाणेकर ‘

मेहनत खूप घेतलीय, सगळ्यांचा अभिनय चांगला आहे, हा असा माहोल निर्माण करणे सोपे नाही, जराही कुठे कंटाळा येत नाही – थोडक्यात, ‘ कडॅक ‘ झालीय निर्मिती – हे सगळे सुपरिचित मान्य ! सदर सिनेमा एक उथळ करमणुकीचा सिनेमा म्हणून धंदा करायला काढलाय – दुसऱ्याच कुठल्यातरी अपेक्षा घेऊन तो बघू नका – असेही म्हणावे लागणारच – म्हणजे तो ‘ ग्रेट ‘ का होऊ शकलेला नाही, हा विषयही मिटून जातो ! असा डोक्याला ताप न देणारा, उथळ करमणुकीचा सिनेमा काढण्यासाठी काय काय करावे लागते, ते या निमित्ताने मांडतोय –

१. सिनेमा घटनाप्रधान करायचा – कुठल्याही मानवी संबंधात खोलात जायचे नाही. काशिनाथची प्रेयसीसुद्धा इथे नुसतीच गोड दिसत बसते.

२. वादळी व्यक्तिमत्व तर घ्यायचे पण त्याच्या वा त्याच्या संपर्कात येणाऱ्या कुणाच्याही डोक्यातल्या कुठल्याही वादळाचा प्रेक्षकाला वाराही लागू द्यायचा नाही.

३. ग्लॅमरचे उदात्तीकरण, त्या व्यक्तीचे दोष सहन करणारी माणसे आणि प्रेयसी असा मूर्ख रोमँटिक माहोल घ्यायचा.

४. आपण खूप यशस्वी व्हावे, आपल्या तिरसटपणाला आणि लहरींना आणि बेजबाबदारपणालाही लोकांनी चालवून घ्यावे – अशी हाव असतेच सगळ्यांना – ती लुटायचीय, हे ध्येय ठेवावे.

५. नटावरचा सिनेमा असल्याने त्याच्या मुखी येऊन गेलेले काही लोकप्रिय संवाद, दृश्ये आणि गाणी यांचे तुकडे घ्यावेत.

६. अगदीच संघर्ष नाहीय असे वाटू नये म्हणून लागू-काशिनाथ अशी दोन डॉक्टरांची टसल घ्यावी.

७. शोकात्म दुर्गुण वगैरे फंदात पडू नये – नायक शेवटी मेला तरी इथल्या नाजुक मनाच्या प्रेक्षकांना फारसे सखोल दुःख होऊ नये, याची काळजी घ्यावी. भावनांचे विरेचन वगैरेची मराठीत गरज नसते.

८. मुळात इथल्या लोकप्रिय नाटकांत काम करून ग्लॅमर मिळवलेला नट ! ती नाटकेही फारशी जगण्याचा वेध वगैरे घेणारी नसतात. त्यामुळे, सिनेमाचा उथळपणा टिकवणे सोपे जाते.

९. या अशा उथळ उंचीवर पोचणेही सोपे नसते – ती प्रक्रिया फारशी घेऊ नये – तीत कुणाला इंटरेस्ट नसते – यश – यशाचे असते सर्वांना कौतुक – हे लक्षात ठेवावे.

१०. ‘ कोण आहेत इथे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ ‘ असा तत्त्वज्ञानात्मक संवाद घेताना – इथे नीतीच्या न्यायनिवाड्यापेक्षा आपला धंदा नीट चालण्याची सर्व निर्मात्यांना काळजी आहे, इकडे दुर्लक्ष करावे.

११. तरीही ऑस्कर मिळवायची स्वप्ने बघायला काय हरकत आहे – त्याला कुठे पैसा पडतोय ?

-- खूप झाले विचाराला मुद्दे. या सिनेमाकडून नाहीय ‘ ग्रेट ‘ अपेक्षा, पण, निघावा मराठीत कधीतरी एखादा ग्रेट सिनेमा – ही इच्छा करायला तरी कुठे पैसा पडतोय ?

--- ००० ---

तो तिला म्हणाला तू मला तुझा आवडता
पक्षी म्हणून जवळ घे तर तिने
हसून चार दाणे टाकले
त्याला ती नव्हती भूक

पण पक्षी म्हणून जवळ घेऊन
मिळेल का समाधान या प्रश्नाने तो व्यथित झाला
तो जे आहे ते तसे समजूनच
घडायला हवे होते सगळे

पण तिने त्याला हीरो समजणे
चालणार होते त्याच्यात नसलेले
अनेक गुण आहेत असे मानून
त्याच्यावर अनावर आरक्त होणे
चालणार होते त्यानेही तिला
मिस वर्ल्ड मानणे

मानलेलेच दुतर्फी खरे समजून
उत्तेजित होत देणेघेणे चालणार होते

आपण जे आहोत ते आहोत
एक सादरीकरण इतरांना
त्यांना हवे तसे पोचणारे

हे समजून शेवटी तो म्हणाला

की तू मला तुझा आवडता
पक्षी समजलीस तरी चालेल
मी मला हवा तोच असेन

--- ००० ---

सगळेच बदलत असले क्षणोक्षणी
तरीही काहीतरी घट्ट स्थिर असते
समोरच्या डोंगरासारखे जरी आज
त्यावर पाण्याचे ओघळ असतील
आणि उद्या नसतील

या स्थिरतेतच येतो एखादा क्षण
जेव्हा वाटते आपले सर्वात मोठे आकर्षण
आता दुरावणार आपल्याच अधीरपणामुळे

तो अधीरपणा असतो धसमुसळेपणा
स्थिर डोंगरातूनच आलेल्या प्रेरणांचा लाव्हा
निरुपद्रवी पण खूप काही मागणारा

डोंगरापलिकडे काय घडले
स्वीकार की अस्वीकार झाला
हे कळायच्या आधीच रेंज जाते

आता मात्र बदल कोणताच नाही जाणवत
जणू सगळे स्थिर आहे खंत पश्चात्ताप
विश्वास शंका भय लाज आणि तरीही
काहीच नाही चुकलेले ही खात्री यांत

कालांतराने येतो बदलाचा क्षण

काही फारसे बदललेले नाही हे सांगणारा

डोंगर मोहरतो एक स्थिरतेतला बदल होत

अन जगत

बदलण्या न बदलण्याची खेदखंतउत्तेजकता स्थिर

--- ००० ---

मराठीतली अभिनय क्षेत्रातली दंतकथा म्हणावी अशी अलिकडच्या काळातली व्यक्ती म्हणजे निळू फुले ! पण, त्यांच्यावर बायोपिक निघाल्यास त्यांची भूमिका निभावू शकणारा अभिनेता कोण असू शकेल ?

कविता समजायला आवश्यक असणारा खुलेपणा म्हणजेच तर कविता ! तो असेल तर कवितेची गरजच काय ?

November 10

Champra Deshpande shared a link.

nashe mein ham nashe mein tum..Suman Kalyanpur_Rafi_Jan Nisar Akhtar_N Dutta..a tribute

youtube.com

१९५९ साली आलेला चित्रपट ' ब्लॅक कॅट ' -- तेव्हा त्याचे नाव ' ब्लैक कैट ' असे लिहीत ! तर तो माझ्या बालपणातला एक खास चित्रपट होता ! मी तेव्हा १३ वर्षांचा होतो. एकदा बघितला की कोणताही चित्रपट मला बारीकसारीक तपशीलांसकट पाठ होत असे. तसाच हाही मला पाठ होता. कोणतीही चार पोरे सापडली की या चित्रपटाची कथा सांगण्याचा माझा लाईव्ह पर्फॉर्मन्स चालू होई ! पोरेही डोळे विस्फारून पाहात राहात ! यात एका हॉटेलातले एक गाणे आहे. जॉनी वॉकर हा मुळात एक चांगला नट होताच -- इथे तो त्या नर्तकीला म्हणतो की आता तो दारू चढल्याचा अभिनय करेल आणि मग नंतर तिने अमुक करावे. यावर हे गाणे सुरू होते -- ' नशे मे हम, नशे मे तुम ' ! गायले आहे सुमन कल्याणपूर आणि रफी यांनी आणि संगीत आहे एन दत्तांचे. एक मजा म्हणून बघा -

आज जॉनी वॉकरची जयंती आहे --

झाड आहे तसे दिसतेय तेवढेच असते का
समोरच्या इमारतीवर होत असलेले
तिच्या आतल्या आणि बाहेरच्या माणसांचे परिणाम
तर सतत चालूच असतात
काही हजार प्रकाशवर्षे दूर
असलेला एखादा ताराही करत असतो
एकूणच असणे प्रभावित
-- हे सगळे पदर अदृश्य

परिणामांच्या अचूकतेचे क्षेत्र
फक्त तेच असते
जिथे बाकीचे जग नाकारून
फक्त एकाच क्षणाचे
वस्तुरूप सत्य
मानलेले असते सत्य

शास्त्रात न सापडलेले परिणामही असतातच
कधीच माहीत नाही होऊ शकणार
इतके एकत्रित असते भूत-वर्तमान-भविष्य

आपला निर्णय असे समजून नष्ट करतो आपण झाड
तेव्हाही ते नष्ट नाही होत जिवंतच राहते पूर्ण
प्रकाशकिरणांच्या रूपात आणि भेटते
काही हजार प्रकाशवर्षांपूर्वीच्या त्या ताऱ्याला
नवा परिणाम घडवत

आपले बुद्धिवादी टाळके मात्र पूर्ण आयुष्य संपवते
निश्चित माहितीच्या खात्रीत
--- ००० ---

November 9

Champra Deshpande shared a link.

Saamana

epaper.saamana.com

आज दिनांक १०-११-१८ च्या ' सामना ' त आलेल्या माझ्या मुलाखतीची लिंक --

( ' फुलोरा ' पान क्रमांक २ बघा. )

हा घ्या तो विका आणि हा तिसरा मात्र

घेऊन शांत बसा याचे नतीजे सध्या चांगले नसले तरी

लैंगिक आकर्षणासारखे राहा गुंतून

नाही तरी जगणे म्हणजे गुंतूनच तर असणे

आणि फावल्या वेळात

कुणी कशात गुंतणे मानवाच्या हिताचे आहे

यावर ठासून बोलण्यात गुंतणे

विषमता माजते त्याला आपण काय करणार

हा गुंतवणुकीचा बाजार काय आपण थोडाच चालू केलाय

--- ००० ---

पाब्लो सॅबोरियोची एक कविता वाचनात आली आणि मला ती खूपच आवडली. कलेचे इंगीतच चिंतनात घेणारी ही कविता आहे. ही कविता माझ्या मराठी मित्रमैत्रिणींच्या वाचनात व चिंतनात असावी असे वाटल्याने मी तिचा ( अर्थातच मला जमेल तसा ) अनुवाद केला आहे. तो खाली देत आहे --

**पाब्लो सॅबोरियोच्या ‘ एग्झिस्टन्स ॲज फिक्शन ‘ या कवितेचा अनुवाद --**

**अस्तित्व फिक्शनरूपातले**

आपले अस्तित्व असते
फिक्शनमधला एक उपक्रम
आणि त्याच्या विकृतिकरणातूनच
फिक्शन बनते अनुकरण वास्तवाचे
आणि म्हणून समस्यात्मक

खरे महान कार्य हे असते की
निराकरणासाठी प्रयत्न न करता
समस्या समजून घेणे

सर्वांत महान अभिनेते
प्रेक्षकांना पोचवतात समस्येची समज
आणि शूरवीर म्हणून वाखाणले जातात
कारण ते सातत्याने भरभराटीला येत असतात
आंतर्विरोधात समस्येच्या निराकरणहीन
( कल्पित वास्तव असणाऱ्या )

हे मनाचे प्रेक्षागृह असते
आणि इथे अनेक शौर्यगाथा
लिहिल्या गेल्या आहेत रक्ताच्या फोलपणातून

शोकात्म नायकाची एकमेव निश्चितता
त्याच्या परिणामशून्य यशातली
आणि आपला एकमेव दिलासा
हे दोन्ही मिळून असतो त्याचा दुःखस्वीकार

आपली दयनीयता ही असते की
तो शोकात्म माणूस करतो त्याची समस्या

म्हणजेच केवळ त्याचा प्रेक्षक

त्याला करावेच लागते दुःख
जोवर होत नाही त्यातली वेदना
वास्तव समस्येइतकी खरी

नंतर तो म्हणतो की अप्राप्य आहे मुक्ती
आणि स्वातंत्र्य म्हणजे दुसरेतिसरे काही नसून
असते फिक्शनची परमशुद्ध अवस्था

आणि विशेष म्हणजे त्याच्या
त्या भाषेच्या दुर्विलासात
तो मरणाचा अचूक असतो

--- ००० ---

( ' फिक्शन ' ला अन्वर्थक प्रतिशब्द न सुचल्याने तोच शब्द वापरला आहे. )

झाडांमुळे शंकानिरसन
तर नाहीच होत उलट
तहान लागते मरणाची

हे आता शेवटचे दिवस
असल्याप्रमाणे थांबलेले पत्थर
त्यांच्यांतली शिल्पे विसरून
प्रवाही व्हायला तयार आहेत
विचाराच्या त्याच दगडी माध्यमातून

उष्ण हवेने कोमेजलेले आदर्श
आता वायाच जाणार हे ओळखून

विनापाश भुकेल्यांचे दैवत असलेले
मशिनी कारखाने सहज सुलभ
करतात भावनांचे अनावश्यक जंगल

आता काहीही घडू शकेल
असे ढगाळ आकाश
रस्त्याची त्वचा सोलून वाकून पाहते
स्वतःच्या पूर्वजांचे अद्वातद्वा इतिहास
आता भजावे तरी कशाला असे

अंतिम इशारा म्हणून
मृत भावनांचे ताट येते स्वप्नात
नजराणा म्हणून
आपल्याच बालपणातल्या
फाटक्या शर्टाने पेश केलेला
बिरुदावली म्हणून
--- ००० ---

कुणालाही कमी लेखणाऱ्या वा कंडेम करणाऱ्या किंवा विभूतिपूजा करणाऱ्या कविता खुज्या आणि स्थितिशील असतात -- आशयप्रवाहाच्या अभावी !

जगण्याचा अर्थ व्यक्त करण्यासाठी
त्याने वस्तू वापरल्या
त्यांची रूपे बदलली
जागा आणि संबंधही बदलले
त्यांचे असणे-नसणे
भलत्याच गोष्टींवर
अवलंबून ठेवत
त्याने याच सवयीच्या जगाला

अनपेक्षित धक्के देत
वस्तूंबाहेर उभे राहता येते
हे दाखवले

मला नुसत्या वस्तूंचे जग दिसलेच नाही
मी घटनायुक्त अनुभव वापरले
मनात काय कसे घडले हे सांगताना
मी अनुभवांच्या मालिकाच बदलल्या
आणि अनुभवांच्या अनपेक्षित
शक्यता निर्माण करत
अस्तित्व दाखवले अकल्पित प्रश्नांचे
ज्यांची उत्तरे असूच नाही शकत कुठेही
हे सुचवत त्यांच्या बाहेर पडणे अटळ केले

सारांश म्हणजे
वस्तू आणि अनुभव यांत
फक्त एक दिखाऊ भेद असतो एवढेच
-- दोन्ही अंतिमतः
एकाच निरर्थकतेत
एक होतात
--- ००० ---

' दिल देके देखो ' या सिनेमातले, ' बोलो बोलो, कुछ तो बोलो -- प्यार हो तो कह दो यस, प्यार नही तो कह दो नो -- फिर जो हो हो तो हो -- ' हे एक गंमतीशीर गाणे आहे ! प्यार आहेच, हे त्याला माहीत आहे पण ती तसे बोललेली नाहीय, इतकेच ! त्याला आता तो सस्पेन्स नकोय ! " काय ते एकदा सांगून टाक, मग जे होईल ते होईल " ! -- या लेव्हलला आलीय गाडी !

मानवी जगण्यातले असे नाजुक पण आल्हाददायक क्षण व्यक्त होत राहणे हे हिंदी चित्रपटसृष्टीचे वैभव आहे ! ( उषा खन्ना -- मजरूह -- रफी. )

कसेही फेकलेले असू देत शब्द
ते ज्या मनातून येतील
त्याचे अस्तित्व दर्शवतील
-- माझे शब्द दर्शवतील
माझ्या मनाचे
क्षणभंगूर असणे

तीव्र लैंगिक शब्द उच्चारल्यानंतर
जशी प्रतिसादाची अतितीव्र उत्सुकता
तसाच असेल प्रत्येक शब्द
त्या आधीच्या शब्दानंतर येणारा

जग अनुकूलही नसते
आणि प्रतिकूलही
आपणच निर्माण केलेले ताण
जगाचे चित्र घडवतात
हे लक्षात आल्याने
जगही झाले क्षणभंगूर

माझ्या मागून येणारे लोक
नाही येऊ शकत माझ्या मार्गाने
संबंधाच्या कडेलोटावर
नाहीसे होण्यापूर्वी
असावी लागते
प्रतिमाभंगाची तयारी

प्रतिमाभंग न होणेही मग
दाखवते अनिश्चिततेचे चमत्कार
--- ००० ---

नरकासुर, रावण, दुर्योधन, कंस, भस्मासुर अशा लोकांना खतम करण्याला एक मूल्यात्मक महत्त्व आहे. असा माणूस खलनायक आणि त्याला मारणारा तो नायक ! अशी खरेच असतात का सज्जन आणि दुष्ट या दोन प्रकारांची माणसे ? सज्जनांचे प्रतिपालन आणि दुष्टांचे निर्दालन -- असे खरेच काही असते का ? मानसशास्त्राच्या अभ्यासकांची यावर काय आहेत मते ? मला असे दिसते की दुष्ट होण्याच्या शक्यता प्रत्येक मनामध्ये असतात. काही कारणाने, वा संधीने वा परिस्थितीच्या रेट्याने त्या व्यक्त होतात. याचा अर्थ बाकीची माणसे सज्जन असतात का ? हा भ्रम आहे, असेच दिसते. हा भ्रम जोपासायला माणसाला का आवडते ? जो दुष्ट होऊ शकला नाही वा झाला नाही, तो आपोआप सज्जन साईडचा गणला जातो ! यातूनच मग महान परंपरेची नायक-खलनायक अशा कथा असलेली बावळट करमणूक निर्माण होत राहते ! मला सज्जन-दुर्जन हा भेदच संशयास्पद वाटतो. या संशयास्पद भेदावर पूर्ण श्रद्धा ठेवून आपण सण साजरे करतो ! एकमेकांना अत्तर लावत बसतो !

माझ्या मनात असलेले विचार इथे ' विचारार्थ ' आणि ' चर्चार्थ ' मांडलेले आहेत. तुम्हाला काय वाटते ? कृपया यावर खुलेपणाने बोलावे, ही विनंती --

Champra Deshpande shared a post.

https://www.facebook.com/ssushma.rao/videos/10155871908411477/?t=3

कानडीतल्या ' ढोलताशे ' ला प्रेक्षक प्रतिसाद --

रखरखीत चुन्याची कोरडी डबी खरडावी नखाने
तसे शहारे आणणारे आयुष्य
पाहून स्वतःचे इतर सर्व लोक
गडद होत जात
सुखी समाधनी मजावाले

वर्षातून एक दिवस
सणासाठी थांबे एक पॅसेंजर माझ्या स्टेशनावर
तिथे त्या दिवशी रांगोळ्या घातल्या जात
इकडूनतिकडून आलेल्यांकडून हसतखेळत
वर्षभरातल्या एकमेकांच्या

यशांच्या काहाण्या सांगत

तसे काही माझे असणार नव्हते
सणाच्या दिवशीही
मी असणार होतो पारोसा
रंग धूर नव्या कपड्यांचा वास
अन्नपदार्थांच्या चवी
या सर्वांची ऍलर्जी
घेऊन जगणारा कोरड्या डोळ्यांनी
भिंतीकडे तोंड करून पडून राहात

का हे अंतर का ही तफावत
या विचारात माझा सण पार पडे
आणि आलेले लोक निघून जात
एकदाच जाणाऱ्या परतीच्या पॅसेंजरने

माझे ओबडधोबड आयुष्य आहे तिथे सुकत राही
--- ००० ---

November 4

Champra Deshpande shared a post.

https://www.facebook.com/ssushma.rao/videos/10155871908411477/?t=3

कानडीत अनुवादित होऊन सादर झालेल्या माझ्या ' ढोलताशे ' या नाटकाला बंगळुरूत मिळालेला प्रेक्षक प्रतिसाद --

Champra Deshpande shared a post.

कानडीत अनुवादित होऊन सादर झालेले माझे मूळ मराठी नाटक ' ढोलताशे '.

Champra Deshpande shared an event.

Beediyolagondu Maneya Madi

RANGASHANKARA

कर्नाटकात माझे ' ढोलताशे ' चांगलेच आवडतेय लोकांना !

दिग्दर्शन -- मोहित टाकळकर.

९ आणि १० नोव्हेंबरला पुन्हा प्रयोग !

जन्मापासून तेच घर होते

मग ती आली आणि फ्लॅट घेतला

या बदलाची भीती वाटत होती

पण तो टप्पा पार पडल्यावर छान वाटले

छान म्हणजे काय वाटले

असा विचार केला तर

बदल होऊनही काहीच नव्हते बदलले

फारसे काहीच नव्हते अवघड गेले

बरे झाले थोडा बदल झाला

शिवाय ती आली आयुष्यात

आपण उगीचच घाबरतो बदलाला

घरच वेगळे आणि सजावटही

मी कपडेही सगळे

नवेच घ्यायला हवे होते

हळूहळू ती जुनी झाली
हे घर आधीच्या घरात मुरून गेले
तेच जुने घर जणू आता हे झालेय

मला माझे बालपण आवडते
शाळेतले दिवस आठवतात
आणि चिंचा – आहा

मी लेखक थोडाच आहे हे सांगत बसायला
माझा झोपाळा कुई कुई वाजतोय
--- ००० ---

कविता म्हणजे भाषिक वा आशयाच्या स्तरावर मनाला लुभावणारी नुसती चमत्कृती नव्हे तर ती वैचारिक स्थितिशीलतेला आव्हान देणारी ठिणगी असते !

स्वतःच्याच विरुद्ध
जेव्हा मनाला वागायचे असते
तेव्हा तसे वागायचे तर असते
पण विरुद्ध वागल्याचा दोष न येता
आणि अपराधी न वाटता

हवे असलेले असते
हाताच्या अंतरावर
इटालियन जॉब मधल्या सोन्यासारखे
घ्यायला जावे तर इतिश्री
आणि हवे तर आहे

प्रत्येक मनात असतोच थोडा
एक दरोडेखोर
त्याला वाव द्यायची मनाला
हिंमत व्हायला हवी
त्यासाठी ते विरुद्ध
हे नैसर्गिक वाटायला हवे

नाही तरी आता निसर्गाचाच काळ आहे
तोच राखेल वा करेल नष्ट
प्रदूषक तर आपणच ना
बळी पडणारे त्यानेच दिलेल्या
धगधगत्या जिवंत प्रेरणांना

कोणताच विचार नसेल समर्थनीय
अशी ही आकर्षक अवस्था
विचाराशिवाय निर्णय मागणारी
--- ००० ---

चंद्रसेनकडून शिवून घ्या
की सूर्यसेनकडून रेडिमेड घ्या
जगात कंफर्टेबल कपडे
असूच नाही शकत
या विचाराने तो
चोवीस तास वैतागलेला असे

कितीही घट्ट पट्टा बांधला
तरी वाहत्या ढगासारखी
त्याला पँट ढिली वाटे
त्यामुळे त्याचे विचारही पॉईंटेड

राहात नसत आणि नेमकी
आपली स्वप्ने तरी काय
हेच त्याचे ठरत नसे

कुणी म्हणे आदर्श हवा
कुणी म्हणे भूमिका हवी
एकटे नका राहू
माणसांत राहा
असेही सल्ले मिळत

तो मनातले कुणाला सांगत नसे
सगळे ओके कपडेवालेच वाटत त्याला
नंगे झाल्यासारखा हा कुठे सांगणार
प्रॉब्लेम ढिला आणि सुरकुतलेला
म्हणून तो सर्वांचे ऐकून घेई
-- सोपी सोल्यूशन्स शोधायची सोडून लोक
उगीचच अवघड करतात सगळे असे त्याला वाटे
--- ००० ---

तिने डोळा मिचकावला
तेव्हा मी गडबडीत होतो
आपल्याला हवा तोच असेल अर्थ
या विचारात मी ऑफीसबॅग उचलली

या अधांतरात
आता मस्त जाईल दिवस
नेहमीसारखाच
ढोर मेहनतीचा असला तरी

शेवटी सगळे
अध्यात्मातच जाते हे माहीत असल्याने
मी फार पुढे गेलो नाही
पण आहे त्या अधांतरात
खूप घुमवले स्वतःला

अलिकडे माझ्या गाड्या चुकत
चष्मा विसरला जाई
आणि समोरच्या कामाऐवजी
कल्पनेचीच चाले घाई

सरळ एकदा विचारूनच घ्यावे
रिस्क घ्यावेच लागेल
नुसतेच गणित सोडवत किती बसणार

पुन्हा भेटली तेव्हा सरळ विचारलेच
तर डोळा मिचकावून ती म्हणाली
गंमत रे
--- ००० ---

माझ्या घराच्या खिडकीतून रोज सकाळी एक अतिसुंदर दृश्य दिसते -- उन्हात तासंतास बागडत-उडत राहणारा पांढऱ्या शुभ्र कबूतरांचा एक थवा ! असेच दृश्य आम्ही लंडनला मुलगी-जावई यांच्याकडे गेलो होतो तेव्हा तिथल्या त्यांच्या घराच्या खिडकीतूनही दिसे ! त्यांच्या घरासमोर एक मोठे हिरवेगार गवताळ मैदान होते -- तिथे उतरून ती कबुतरे मधेच बसतही !

त्या मैदानाची गंमत म्हणजे, तिथे, माझी आई, मी, माझी पत्नी, मुलगी, जावई आणि आमची दोन नातवंडे -- नात आणि नातू -- असे क्रिकेट खेळायला जात असू ! चार पिढ्यांची ही कबुतरे तिथे एकत्र खेळताहेत, हा चमत्कार पाहायला तिथली ' गोरी ' कबुतरे कौतुकाने उभी राहात ! जणू त्यांना ते जागतिक महत्त्वाचे दृश्य वाटे !

1. A character is not a simulation of a living being. It is an imaginary being. An experimental self.

2. Making a character " alive " means : getting to the bottom of his existential problem. Which in turn means : getting to the bottom of some situations, some motifs, even some words that shape him. Nothing more.

--------- Milan Kundera

१. एखादे पात्र म्हणजे एखाद्या जित्याजागत्या व्यक्तीची प्रतिकृती नव्हे. ती काल्पनिक व्यक्ती असते. एक प्रायोगिक ‘ स्व ‘ .
२. एखादे पात्र ' जिवंत ' करणे म्हणजे -- त्याच्या अस्तित्व-प्रश्नाच्या तळाशी जाणे. याचाच पर्यायाने अर्थ -- त्याला आकार देणारी एखादी परिस्थिती, काही हेतू, किंबहुना काही शब्दसुद्धा -- यांच्या तळाशी जाणे. याहून अधिक काही नाही.
------------- मिलान कुंदेरा.

नवीन कवींसाठी --

१. पद्यता वा गेयता ही आवडीने सहज येत असेल तर ठीक, अन्यथा, त्याची काळजी करू नये.

२. एखादी कल्पना सुचल्यावर तीच कल्पना पुन्हा पुन्हा राबवणारी वा त्या कल्पनेला धरून मालगाडीसारखी यादीची कडवी नसावीत.

३. जे अनेकांना जाणवते वा अनेकदा व्यक्तही झालेले आहे तेच आपण पुन्हा लिहिणार असू तर त्यात कुठेतरी एका ओळीत तरी आपली काही खासियत असायला हवी.

४.एकूण कविता ' हटके ' लिहिली जात असेल तर उत्तमच.

५. कविता लिहिताना कोण काय म्हणेल ( उदा० एवढी छान बायको असून प्रेमकविता लिहितोय ! ) याची चिंता करू नये.

६. आशयाचे नावीन्य हे, जगणे समजून घेण्याच्या आपल्या चिंतन-प्रक्रियेतून येते -- ते असेल तर कशीही येऊ दे कविता -- मग ती न-कविता का असे ना.

७.मराठीत नव्याचे वा काही वेगळे असण्याचे स्वागत वेळेत होत नाही -- त्याबाबत बेफिकीर असावे -- अन्यथा चांगली कविता अशक्यच होईल.

८. मराठीतल्या वा इतर कोणत्याही, जमेल त्या भाषेतल्या कविता भरपूर वाचाव्यात.

९. जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जावे -- त्यांपासून पळू नये.

१०. कविता म्हणजे फक्त व्यक्तिगत अनुभवाची प्रतिक्रिया-अभिव्यक्ती नसते -- हे समजून घ्यावे.

११. वाचकांच्या, समीक्षकांच्या वा पारितोषिक देणाऱ्यांच्या धारणांना बळी पडून कविता लिहू नये.

--- ००० ---

प्रमाण मराठी भाषेबाबतचा तिरस्कार -- १. प्रमाण मराठी २. कोणतीही मराठी बोली ३. इंग्रजी वा ४. अन्य -- कोणत्या भाषेतून व्यक्त करावा ?

October 2018

October 31

साखरझोपेतून उठल्यावर
जग सुरळीत दिसले
सगळे वेळेत चालू होते
समोरचे दुकानही उघडलेले होते

च्यायला याला काय अर्थ आहे
हे तर काहीच नसणे होतेय
कुठे अपघात नाही
कुणी चिरडले जाणे नाही
इतके निर्जीव कसे झाले लोक
कसली ही दडपशाही

या रस्ताखालचा मुरूम
सातशे वर्षांपूर्वीच्या
एका अन्यायी राजाच्या
कारकीर्दीतला असल्याने
त्याचा प्रभाव रस्त्याला गुलाम करतो
या कारणाने फतवा निघाला

सर्वांनी आपापली बोलीच फक्त वापरा
व्याकरण नकोच आणि मुख्य म्हणजे
प्रमाण भाषा जाळूनच टाका

आधीचे सगळे नष्टच करायला हवे
आहे याला धरून नवे नको

दूधवाला पिशव्या ठेवून गेला आहे
दुधाला दुसरेच काही म्हणायला हवे
आणि विचकलेल्या दातांनाही
--- ००० ---

वाह्यात शब्दांना आवर घालता येई ना
म्हणून सर्व गाड्या रद्द केल्या
त्या गाड्यांनी जाणार होतो मीच
पण माझ्या मिशांची जन्मशताब्दी
साजरी करण्यासाठी
मला थांबावे लागले

अप्रतिहत म्हणजे काय
हे मला ठाऊक नव्हते
खरे तर आजही नाही
तरीही देवापुढे नेमाने दिवा लावावा
तशी पाणीकपात चालू ठेवली

जनता निर्लज्ज असते
आपल्या दुःखांचे भांडवल करून
ती सर्व संस्कृतिनाशाचे
समर्थन करते

कोणत्याही कारणाने सिग्नलव्यवस्था
कोलमडता कामा नये हे सांगूनही
खरेदीला निघून जाणारे महाभाग
असलेल्या या देशात
सौख्य कुठले नांदणार

बेरोजगारीची समस्या एकदा सुटली
की सगळ्या गाड्या वेळेवर सुटतील
या आशेवर चालू राहते माझे मिशा
वाढवणे आणि त्यांना पीळ देणे
--- ००० ---

लाख्यांच्या एका कवितेवर, त्यांच्या आणि माझ्या कवितांबद्दल आशुतोष दिवाणांची एक कॉमेंट होती. ते वारंवार असे काही आक्षेप व्यक्त करत असतात. त्यामुळे, त्यांना थोडे सविस्तर उत्तर दिले -- ते असे --

एक म्हणजे, लाखे किंवा मी, तुमची कविता लिहिणार नाही. आपापल्या आकलनाचीच कविता लिहिणार. स्वतःच्या सवयीतली आणि आवडीचीच कविता सर्व कवींनी लिहावी अशी अपेक्षा वाचकांनी ठेवू नये आणि ठेवली तरी आत्मनिष्ठेचे कवी तिची फिकीर करणार नाहीत. जगात हजारो प्रकारची चांगली कविता लिहिली जाते -- अगदी न-कविता ( anti-poetry ) पर्यंत ! विभ्रमवाली कविता हा एकच प्रकार नसतो. कोणताही कवी प्रदीर्घ काळ लक्षात राहावी या हेतूने कविता लिहीत नाही -- तो त्याची आकलन-प्रक्रिया व्यक्त करत असतो. एखाद्या वाचकाच्या आवडी फार मर्यादित असतील तर त्याला कवी काय करणार ? वाचकाने खुले नसणे हा कवी-वाचक यांच्या नात्यातला एक मोठा अडथळा आहे. तो तसाच ठेवून तुम्ही कवींना दूषणे देत बसता. काहीजण या कविता आत्मीयतेने वाचतात, वाखाणतातही. तुम्ही तेच तेच ' दोष ' सारखे इथे मांडत बसून इतरांच्या स्मूथ प्रक्रियेतही अडथळा आणत बसण्यातून काय साध्य होणार ? ' बीज भाजून केली लाही ' हा तुकारामाचा अभंग कोणते विभ्रम व्यक्त करतो ? तुम्हाला फक्त मूडवाली कविता आवडत असावी, असे दिसते. तुमच्या दृष्टीने इतर सर्व कविता बाद असल्या तरी ते ते कवी तुमचे मत फारसे मनावर घेणार नाहीत. फर्नांडो पेसोआ सारख्या जागतिक महत्त्वाच्या आणि ' अमर ' ही असणाऱ्या कवीच्या कविता वाचायचा प्रयत्न करून पाहा. तुमच्या आवडीनिवडींत घट्ट रुतून बसणे हेच तुमचे ठाम असेल तर आमच्या कविता न वाचणे, हाच त्यावर उपाय आहे. धन्यवाद !

डॉ. अरुणा ढेरे मराठी कवितेबद्दल, एकूणच कवितेबद्दल आणि साहित्याबद्दल अभ्यासपूर्ण आणि मूलगामी असे काही बोलतील, हीच अपेक्षा !

त्यांची, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

जे पूर्णतेस पोचले
तेही इतर रहदारीसारखेच कसे असेल
सिग्नलसाठी धूर सोडत
थांबलेली खुर्च्याटेबले
असतीलही जिवंत कधीकाळी
पण आता ठरून गेलीय त्यांची नियती

पूर्णतेला नियती नसते
ती असू शकते एक सुसज्ज बेडरूम
संभोगदृश्यही घडणारी
पण ती
प्रदूषित नाही करत आसमंत

हकनाक बळी पडत चाललेले जग
स्वतःला समजते
नॉर्मल आणि अटळ आणि शूर
कारण आयुष्यात किती कोथळे
काढले बाहेर हाच फक्त सारांश

पूर्णता असते अनिश्चित
पूर्णता असते सस्पेन्स
पूर्णता असते थ्रिल
दोघे असूनही एकत्र असण्याचे

कोणत्याही व्यसनापासून होईल

एक वेळ सुटका

पण इथून

परतीचे दोर कापलेले आणि किनारा सोडलेला

--- ००० ---

अतिमहत्त्वाच्या विषयावरचे ढोबळ मानवी विचार

‘ युती आणि आघाडी ‘ हा तो विषय. युती कुणाची म्हणायची आणि आघाडी कुणाची म्हणायची हे मी नेहमी विसरतो याचा अर्थच माझ्या दृष्टीने ते शब्द फुटकळ आहेत !

तर निवडणुका झाल्या झाल्या राष्ट्रवादीने पाठिंबा नजराण्याचे तबक घेऊन बीजेपीच्या मागे फिरायची काय गरज होती -- हा प्रश्न येणारच की जनतेच्या मनात. आणि उत्तरही असेच येणार की या सज्जनांवर जे आरोप झाले होते त्यांत तथ्य असणार ! बरे, सतत, इकडे जोरदार विरोधी बोल आणि वर्तनात अनुकूल राहा, असेही दिसत गेले. राष्ट्रवादीचे चेले भारी असतात. साहेब फार धूर्त आहेत यावर त्यांचा पक्का विश्वास असतो. साहेब डावीकडे बाण सोडतात तर इकडे उजवीकडचा माणूस मरून पडलेला असतो ! शेवटी हे राजकारण आहे, असे करावेच लागते – साहेब लई तयारीचे हायेत ! पण अखिल भारतीय प्रतिमा बनवू पाहणाऱ्याने असली कारस्थानी राजकारणे करावीत का, हा एक प्रश्न असतोच. सारांश, ते तबक घेऊन फिरणेही धूर्तपणाचेच !

दुसरी महत्त्वाची बाब अशी की राज्यावर असताना पृथ्वीराजांना यांनी खूप त्रास दिला. त्यांच्या सवयीप्रमाणे, ‘ जनतेच्या हितासाठी कायदा मोडणारी कामे ‘ घेऊन ते पृथ्वीराजांकडे जाऊन त्यांच्यावर दबाव आणत असत, पण, पृथ्वीराजांनी त्यांच्या आत्मबळाच्या योगाने त्यांची डाळ शिजू दिली नाही. ( पृथ्वीराज हे एक आपले पंतप्रधान होण्याच्या योग्यतेचे नेते आहेत, असे मला वाटते. ) म्हणजे प्रश्न दोन – ट्यूनिंग न जमणे आणि बीजेपीशी गुप्त शय्यासोबत असणे ! राष्ट्रवाद्यांना जरी हे गौरवास्पद राजकारण वाटत असले तरी काँग्रेसला तसे वाटण्याची शक्यता नाही. त्यामुळेच, आपण अगदीच एकटे पडलोत असे दिसू नये म्हणून साहेबांनी मनसेबरोबर चुंबाचुंबी सुरू केलेली आहे. धूर्त राजकारण हो ! पण, यामुळेही काँग्रेसपासून दुरावा तयार होणार. परप्रांतियांच्या कर्दनकाळाशी जे संबंध दृढ करतात, ते काँग्रेसला कसे चालतील ? मुंबईतली परप्रांतियांची मते त्यांनी का घालवावीत ? राष्ट्रवादीला ‘ नीट ‘ समझोता, म्हणजे योग्य जागा मिळून काँग्रेसबरोबर समझोता झाला, तर चालेलच – मग त्या वेळी ते मनसेचे झुरळ झटकून टाकतील ! तो त्यांचा आणखी एक धूर्तपणा होईल ! पण, हे होईल ? शिवसेना-बीजेपी युती होणार नाही, असे जहाल वातावरण आहे. त्यामुळे ‘ आपलीही नाही झाली तरी चालेल ‘ या ढिलाईत काँग्रेस आणि राष्ट्रवादी आणखी दुरावत राहतील. शेवटी अचानक बीजेपी-शिवसेना ही युती होईल पण मग त्या वेळी साहेबांचे राजकारण चालणार नाही ! त्यांची युती झाली तरी आपली आघाडी नाही करायची, असा

एक अत्यंत धूर्त, राजकारणी निर्णय त्यांना घ्यावा लागेल. त्या वेळी आणखी थोडा धूर्तपणा करून, ती आघाडी काँग्रेसच्या आडमुठेपणामुळे तुटली, असे ते दाखवतील ! मग मात्र, मोदींनी सोडलेले साहेबांचे बोट राजसाहेबांना धरता येईल !

सारांश, महाराष्ट्रातल्या वातावरणावर बीजेपीविरोधकांना काही कंट्रोल आणता येईल, असे सध्या तरी दिसत नाही. त्यामुळे, शिवसेना-बीजेपी हे रोज भांडणारे पतिपत्नी घटस्फोटापूर्वीच, यापुढे आपले लग्न नसून लिव्ह इन असेल, असे ठरवून का असे ना, एकत्र नांदत राहतील !

मी काय फुल टाईम अभ्यासक थोडाच आहे ? आणि जे अभ्यासक आहेत ते एक बाजू घेणारे असल्याने लोक त्यांना ओळखून असतात हे एक आणि मुख्य म्हणजे पक्षपाती विचारामुळे त्यांचा सगळा अभ्यास मातीत जातो ! मग, त्यापेक्षा हे एका सामान्य नागरिकाचे विश्लेषण काय वाईट आहे ?

संख्याशास्त्र वा यशाचे डावपेच न समजणाऱ्या मतदाराची इंप्रेशन्स --

प्रकाश आणि ओवेसी हे दोघे, इतर कुणी जवळ न केल्याने, एकत्र आले आहेत, असे दिसते. अगदीच बिचारे राहू नये वा डिपॉझिटेच जप्त व्हावीत, असे होऊ नये, एवढा तरी वचक ठेवावाच लागणार. प्रकाशांच्या मागे दलितांतला फार मोठा समूह असावा, असे वाटत नाही. तसेच ओवेसींचा पूर्ण मुस्लिम समाजावर प्रभाव असेल, असे वाटत नाही. हे एकत्र आल्यामुळे फार तर तुरळक काही जागा त्यांना मिळू शकतील, पण, मुख्यतः बीजेपीविरुद्ध प्रचाराची राळ उडवत राहणे, या कामालाच त्यांचा उपयोग होईल. त्यामुळे, उघड वा छुपेपणाने काँग्रेस त्यांचा सहानुभूतिदार राहील. याचाच दुसरा अर्थ त्यांनी कुणाची मते खाल्ली असा प्रश्न येईल तेव्हा -- काँग्रेस व त्यांच्या मित्रांची, असेच होण्याची शक्यता आहे.

भीमा-कोरेगाव प्रकरणात भिडे गुरुजींवर कारवाई न होणे आणि प्रकाश यांच्या मित्रांवर कारवाई सुरू होणे आणि या दोन्ही बाबतींत ते लुळे पडलेले दिसणे, यांमुळे त्यांची ताकद कमी होण्याची शक्यता आहे. प्रकाश यांच्यापेक्षा ओवेसी खूपच प्रभावी नेते वाटतात. ते बोलतातही छान, मुद्देसूद आणि त्यांचे म्हणणे बऱ्याचदा योग्यही वाटते. पण, नाइलाजाने त्यांनी प्रकाशवाट धरल्याने त्यांचाही तोटा होऊ शकतो. आपला फायदा व्हावा म्हणून बीजेपीनेच यांना एकत्र केले असेल, असे म्हणवत नाही. कारण हे १०० टक्के स्वाभिमानहीन असतील असे गृहीत धरता येत नाही.

पण एकूण फील्डिंग पाहता हे दोघे बीजेपीचे कॅच सोडणार, त्यांच्या रन्स होऊ देणार आणि काँग्रेस परिवाराचे मात्र अनेकजण रनाऊट करणार असेच वाटते आहे.

' वर्कर्स ऑफ द वर्ल्ड युनाइट ' हा नारा आता कालबाह्य झाला आहे. ' शोषित म्हणजे डाऊनट्रॉडन ऑफ द वर्ल्ड युनाइट ' असे म्हणत खरे तर आता नवीच रचना करायची गरज आहे ! इतका असा आवाका असलेले शोषितांचे नेते आहेत तरी कुठे ? ' आमचा बहुजन समाज ' असे म्हणणारे सगळेच ' चालू ' नेते त्याबरोबरच, ' आणि आमचे दलित, पीडित बांधव ' असेही म्हणतील !

--- ००० ---

प्रख्यात इतिहासकार आणि तत्त्वज्ञ युवाल हरारी काय म्हणतो ते बघा --

History isn't a single narrative, but thousands of alternative narratives. Whenever we choose to tell one, we are also choosing to silence others.

― Yuval Noah Harari, Homo Deus: A Brief History of Tomorrow

" इतिहास म्हणजे एकच एक निवेदन नव्हे तर हजारो पर्यायी निवेदने. जेव्हा तुम्ही त्यांतले एकच सांगायचे ठरवता तेव्हा तुम्ही इतरांना गप्प करायचे -- इतरांची मुस्कटदाबी करायची -- हेही ठरवत असता. "

--- 000 ---

लोकशाही आणि मते

१. पक्क्या मतांच्या रोबोंमध्ये होणाऱ्या चर्चाच तेवढ्या चर्चा, ही नुसती बालिश नव्हे तर मानवी जगण्याला घातक असणारी कल्पना आहे.

२. भारतीय लोकशाहीत गुप्त मतदान पूर्ण मान्य आहे. इथली जनता स्वतःची मते कायम गुप्त ठेवून चर्चा करू शकते, वाचू वा ऐकू शकते. घट्ट मताच्या लोकांनी लवचिक मताच्या वा मत बदलू शकणाऱ्यांच्या अस्तित्वाला हेटाळणे हे निश्चितच लोकशाही विरोधी आहे.

३. इथल्या लोकशाहीच्या कल्पनेप्रमाणे कुणावरही मत सांगण्याची सक्ती करता येत नाही.

४. मत सांगतात, त्याचा प्रचार करतात, तेच फक्त शूर आणि निरनिराळे विचार समोर यावे, त्यातून ज्याचे त्याला आकलन व्हावे, असे मानणारे भित्रे -- हीही एक अतिसंकुचित श्रद्धा आहे.

५. मते व्यक्त करणे वा व्यक्त न करणे -- दोन्हींचे स्वातंत्र्य म्हणजे लोकशाही.

६. सहिष्णुता ही फक्त विरोधी मताबद्दलच नव्हे तर समजून घेण्याच्या प्रक्रियेत असलेल्यांबद्दलही असावी लागते.

--- ००० ---

कोणकोणत्या द्वेषांना पुरोगामी द्वेष म्हणता येईल ?

सायबरनिरक्षराचे सायबर आकलन

पूर्वी असा संवाद शक्य होता --

" मेरे पास विचार है, चरित्रवान लोग है, निःस्पृह कार्यकर्ते हैं -- तुम्हारे पास क्या है ? "

" मेरे पास पैसा है ! "

काँग्रेस जिंकले की त्यांचे विरोधक रडगाणे गात की ते पैशामुळे जिंकले !

आता परिस्थिती बदललीय ! आजचे प्रभावी उत्तर आहे, " मेरे पास बुद्धिमान सायबर-तज्ञ हैं ! "

मॅन्युफॅक्चरिंग कन्सेंट म्हणजे होकाराचे उत्पादन करायचा हा वेगळा काळ आहे !

जुन्या राजकारण्यांना सवय काय आहे -- अमुक ठिकाणी धरण बांधणे हे शास्त्रीय दृष्ट्या सर्वोत्कृष्ट आणि कमी खर्चाचे आहे, असे तज्ञाने सांगितले तरीही, नाही, मी सांगतो तिथेच व्हायला हवे धरण -- तसा शास्त्रीय रिपोर्ट करून द्या ! -- असे म्हणायचे आणि तसे करून घ्यायचे ! पण या सायबर तंत्रात तो प्रश्नच येत नाही -- तंत्रज्ञाचे ऐकावे लागणार ! म्हणजे काय, चार बुकं शिकला म्हणून तो श्रेष्ठ ? -- असे विचारणारे त्याचे ऐकणार नाहीत आणि वर त्यालाच अक्कल शिकवतील !

तंत्रज्ञांच्या बुद्धीवर विश्वास ठेवून माध्यमे वापरणाऱ्यांना खूप फायदा होऊ शकतो !

--- ००० ---

ब्राम्हणांचा पक्ष ?

-- एक साधे, फुटकळ विश्लेषण

" अहो, काँग्रेसने किती दिलेत ब्राम्हण पंतप्रधान, ते नाही दिसत का ? बीजेपीने तर दुसराच पंतप्रधान बिगर ब्राम्हण दिलाय ! " -- हे असते बीजेपी भक्ताचे उत्तर, त्यांना ब्राम्हणांचा पक्ष म्हणणाऱ्यांना ! जातीय आधारावरच मुख्यतः तगून असणारे असतीलही काही पक्ष, त्यांचे नेते वैश्विक मानवहिताच्या गप्पाही मारत असतील, पण, ते अखिल भारतीय पक्ष कदापि होऊ शकत नाहीत ! बीजेपी कधी काळी असेलही ब्राम्हणकेंद्रित पक्ष पण आता तसे म्हणता येणार नाही -- तो निश्चितच एक अखिल भारतीय पक्ष झालेला आहे. जातकेंद्रित पक्षाला प्रामुख्याने ब्राम्हणद्वेष्टा राहावेच लागते, अन्यथा, शत्रू कोण ? कुणाविरुद्ध जातीय संघटन ? या दृष्टीने पाहिले तर, सतत ब्राम्हण द्वेषाचे बोलणारे पक्ष हे संकुचित, मर्यादित आवाक्याचे आणि देशाच्या विशाल दृष्टिकोणाच्या विरोधात असतात ! ब्राम्हणकेंद्रित पक्ष असू शकतच नाही कारण त्याला एखादा निरुपद्रवी जातसमूह शत्रू म्हणून सापडूच शकत नाही. हिंदुत्ववाद म्हणजे

मनूवाद वा चातुर्वर्ण्यवाद -- असे म्हणता येईल ? तसे असते तर बीजेपी एवढा मोठा पक्ष बनू शकला असता ? की पूर्ण भारतीय जनतेला मूर्ख बनवण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे, असे म्हणावे ? आपण तर भारतीय मतदारांचे शहाणपण आणि परिपक्वता यांचे गोडवे गात असतो ! ( त्याशिवाय लोकशाहीचे तरी गोडवे कसे गाता येतील ? ) शिवाय शिवसेना या पक्षाचे उदाहरण समोर आहे. तोही हिंदुत्ववदी पक्ष आहे पण जातीय कुठे आहे ? त्याला सर्व जातींच्या मतदारांचा जनाधार आहे !

ब्राम्हण यावर बोलत नाहीत. संख्याही कमी आणि तीही अतिशहाणपणामुळे विभागलेली ! " अंगात नाही बळ आणि खोडी काढून पळ " हेही ब्राम्हणांना शक्य नाही ! त्यामुळे हल्ली त्यांतले बरेचसे म्हणतात की राजकारण हा आपला प्रांतच नाही -- किंबहुना आपल्याला त्यातले काही कळतही नाही !

खरे तर सगळ्यांना जेवढे कळते तेवढे त्यांनाही कळत असते !

-- ००० ---

बिगर अभ्यास मतदाराचे अनमोल आकलन

अनमोल म्हणायचे कारण इतकेच की सामान्यतः कुणी अभ्यास करून मते नाही बनवत. इंप्रेशन्सवर वा सामान्य प्रभावांवर ती बनवली जातात. काही विषय ठराविक समूहांचे असतात -- उदाहरणार्थ -- जी एस टी वा नोटाबंदीचे फायदेतोटे, गरिबांना घरे, खेड्यांना वीज, वगैरे. तशा बाबतीत तिथे तिथे भलेबुरे प्रभाव असतातच. पण, ' पंतप्रधान कुणी व्हावे ' हा एक सर्वसामान्य इंटरेस्टचा विषय असतो. पवार साहेब म्हणाले की त्यांचे खासदारच इतके कमी असतात की पंतप्रधानपदाचा ते विषयच काढू नाही शकत. त्यांच्यासारखेच आणखीही काही असतात की बाबा ते पद मिळालेच तर एक चमत्कार म्हणून किंवा देवेगौडा लॉटरी या पद्धतीनेच मिळेल ! असे सगळे लोक लोकशाहीचे परमभक्त असतात. ते म्हणतात की पंतप्रधान हा निवडणुकीनंतर, लोकशाही पद्धतीनेच निवडला जाणार ! यात दुसरा एक प्रश्न दिसतो -- बीजेपीला हटवणे हाच प्रमुख अजेंडा असलेले बरेच आहेत -- त्यांत काँग्रेस जरी मोठा पक्ष असला तरी राहुलना या सर्वांचा नेता म्हणून प्रोजेक्ट करायला ते तयार नसतात ! वैचारिक फरकांमुळे हो ! मग तेही लोकशाहीचेच गुणगान करतात ! काँग्रेसच्या मनात, शेवटी राहुलच असणार, अशा विचारामुळे एकीचे बळ कमी होऊ नये म्हणून चिदंबरम साहेबांनी क्लियर केले की राहुलच पंतप्रधान, असे काही नाही ! ( काँग्रेसच सर्वात मोठा विरोधी पक्ष असल्याने आपल्याला हवे ते घडेलच, हे त्यांच्या मनात असू शकते ! ) याउलट बीजेपीकडे या पदासाठी मोदी हे ठाम उमेदवार आहेत ! मोदींना विरोध जास्त वाटू लागला तर बीजेपीवालेही लोकशाहीचे बोलू लागतील ! पण, तसे फारसे झाले नाही तर पंतप्रधानपदाचा आत्मविश्वास बीजेपीच्या पथ्यावर पडू शकतो !

कधी लोकशाही आणि कधी आत्मविश्वास हे म्हणजे ' कधी बहर कधी शिशिर परंतू दोन्ही एक बहाणे ' असे असते !

--- ००० ---

मी सुमारे चार वर्षे जळगाव जिल्ह्यातल्या एका खेडेगावात होतो. तिथल्या मुली एक गाणे म्हणत --

बांधून दे बंगला रे भीमराया बांधून दे बंगला
त्या बंगल्याला एकच खिडकी
हवा येण्याकरिता
त्या बंगल्याला एकच दार
जाण्यायेण्याकरिता

यावर मी म्हणायचो --

या धडावर एकच डोके
विचार करण्याकरिता !

असे मग खूप रचले जायचे !
' बांधून दे बंगला ' !

एका सामान्य मतदाराचे प्रगल्भ विचार

मोदींना पाठिंबा पण बीजेपीला विरोध अशी महाविनोदी भूमिका घेणारे विनोदवीर राज या खेपेला कोणता चुकीचा निर्णय तयार करणार याबद्दल सगळ्यांनाच उत्सुकता आहे. ते आहेत बुद्धिमान, विनोदही छान करतात, तळमळही तीव्रपणे व्यक्त करतात पण ते आहेत हाडाचे कलावंत ! व्यवहारशून्य ! -- निदान राजकीय बाबतीत तरी ! शरदरावांची मुलाखत घेतल्यापासून ते भलतेच खुशीत दिसतात. महाराष्ट्राच्या राजकीय हिताचे काही महत्त्वाचे डावपेच त्यांच्यांत झाले असतील वा होऊ शकतील, असे दिसते. पण, राष्ट्रवादीच्या काँग्रेस युतीचे काय ? त्यांची मनसेशी युती काँग्रेसला चालेल ? परप्रांतियांचे कर्दनकाळ आणि मराठी लोकांचे तारणहार जवळ करणे म्हणजे हार जवळ करणे, असे काँग्रेसला वाटणार ! मुंबईतला परप्रांतीय सोडता येणार नाही. मनसे आणि राष्ट्रवादी कितीही एकमेकांच्या प्रेमात असले तरी मोठ्या फायद्याची वेळ येईल तेव्हा राष्ट्रवादी मनसेला पायाखाली घेईल, हे उघड आहे. त्यामुळे, सध्या कोण कुणाला खेळवतोय ते कळत नाही. पुढे लाथ खाण्याचा धोका असला तरी मनसेला आत्ता तातडीचा काही फायदा वाटत असावा. याचा अर्थच असा की उत्तम वक्तृत्व असले तरी ते कशासाठी वापरायचे, याचे विचार करणे जमत नसेल तर पुन्हा तेच घडणार ! लोकांच्या फायद्याचे फारसे काही बोलता येत नसेल तर भावनिकता, उपरोध, चेष्टा, नकला, टिंगली यांचाच

आश्रय घ्यावा लागणार ! मराठी लोक विनोदप्रिय आहेत पण साले एक नंबरचे स्वार्थी आहेत ! राजकारणी कितीही गोंधळ घालू देत, त्यातूनही आपले कसे नीट चालेल हेच ते बघतात ! काही राजकारण्यांना त्यांचा दीर्घकालीन स्वार्थही कळत नाही, हेच खरे !

--- ००० ---

एक ऍब्सर्ड राजकीय विश्लेषण --

महाराष्ट्रात शिवसेना आणि बीजेपी यांचे सरकार असले तरी शिवसेनेने सरकारविरुद्ध बोलत राहून विरोधकांची स्पेस खाऊन टाकायची असे चालू आहे. याचा आता आणखी एक उपयोग आहे. राम मंदिर काही मोदी कार्यकाळात अजून बांधता आलेले नाही. एक रणनीती म्हणून सध्या बीजेपीने त्या विषयावर बोलू नये असे ठरलेले दिसते. त्यामुळे इतर हिंदुत्ववादी संघटनांनी राम मंदिरावर जोर लावायचे ठरलेले आहे. म्हणजे राम मंदिराचा प्रचार तर होईल पण त्याचे नकारात्मक परिणाम बीजेपीला टाळता येतील. याला धरूनच आता शिवसेनेने बीजेपीवर राम मंदिर या विषयावरून तिखट निशाणा साधायला सुरुवात केलेली आहे. त्याचा फक्त फायदा व्हावा आणि तोटा होऊ नये या दृष्टीने आता राष्ट्रवादीचा वापर सुरू झालेला आहे. राष्ट्रवादीही, प्रेमाने असो की नाइलाजाने, बीजेपीला अनुकूलच आहे. अजितदादा म्हणतात की, " उद्धवना स्वतःच्या वडिलांचे स्मारक इथे मुंबईत बांधता आले नाही तर ते अयोध्येला जाऊन राम मंदिर कसले बांधणार ? त्यांनी राम मंदिराची तारीख जाहीर करावी -- " जनतेची करमणूक होत असली तरी विरोधकांना मात्र हात चोळत बसावे लागत आहे !

कळले ना राजकारण म्हणजे काय ते ? सर्वांचे हात, पाय, डोकी एकमेकांत अशी गुंतागुंतीची अडकणे की कुठला हात वा पाय कुणाचा आहे तेही कदापि कळू नये ! एकूण मानवी जगणे तरी याहून वेगळे काय असते ?

( ही अशी ' जाणकार ' निरीक्षणे/विश्लेषणे तुम्हाला वाचायला आवडतील का, ते सांगा -- २०१९ च्या निवडणुका पार पडेपर्यंत मधून मधून ' गंभीरपणे ' देत जाईन -- )

--- ००० ---

आकलनक्षमतेला शून्य किंमत आणि मते मात्र केंद्रस्थानी, असे झाले तर आपण आपलेच भूत म्हणून जगतो आहोत, असे समजावे !

एकूणातच कवीने, स्तुतीने हुरळून जाण्यात वा निंदेने व्यथित होण्यात काही तथ्य नसते !

फ्रेंडस, पहाट-कवितांचा २५ चा गुच्छ पूर्ण झाला आहे ! यातल्या शक्यता बऱ्याचशा व्यक्त झाल्या आहेत ! आता वेगळे, नवे काही करेन --

पहाटेचा निरोप नाही घेता येत
दिवसात मिसळून ती असतेच सोबत
आणि रात्र
ती तर असते पहाटेची निरोपदूत

पहाट सतत असते चोवीस तास
तिची शांतता भरून असते
व्यापतापांच्या कोलाहलातही
कुणा एखाद्या अनामिकाच्या
असण्यात तरी असतेच तिचे निशाण
घटनांना नेस्तनाबूत करणारे

मला होते इंटरेस्ट
या पहाटस्तुतीत
ती खुश व्हावी म्हणून नव्हे
तर तिचे सत्य उजागरावे म्हणून

ती सतत असतेच सगळीकडे
हे समजलेले असले तरी
मी नाही ना तसा
मला मर्यादांचे वेड आहे
त्यांच्या यातनांसह
-- या अर्थाने
मी विकृतही आहे

पण मला होत असतो तिचा स्पर्श

आणि अर्थात माझा तिला
ज्यामुळे मी भीत नाही माझ्या मनाला
--- ००० ---

वाट खूप झालीय चालून एकत्र
असे मला वाटते आता जे आहे
ते भावनेचे सातत्य प्रेमाच्या
म्हणजे आकर्षणाच्या
आणि खात्रीच्या साथीच्या

पण तिचे नसावे तसे
पहिल्या क्षणापासूनच
ती पूर्णच आहे सहभागी
खूप सहवास खूप काळ
या तिच्या लेखी
निव्वळ कल्पना आहेत

तिला ना आधाराची गरज
ना सुरक्षिततेची
माझी पहाट स्वतःच तर असते
निसर्ग पायाभूत
सर्व अस्तित्वाला

बिघडलेल्या हवेत
वा पावसाळी चिखलातही
ती अविचल असते
-- बिघडणार वा संपणार तर नाही
हे सगळे – हे फक्त माझेच विचार

अम्लान आश्वासन
आणि निर्भयतेची पेरणी
ही तिची वैशिष्ट्ये मला धीर देतात

--- ००० ---

कधी संध्यातारा तर कधी पहाटतारा
असणारा शुक्र
असतो सदोदित
आमच्या सोबत तो कुठेही असला तरी
-- आम्हा दोघांचे हे चैतन्यतत्त्व
प्रकाशमान करते
आमच्या मनांत
आकर्षणाचे चांदणे

मन निर्माण झालेय
ते मनानेही जगण्यासाठीच
विकार वासना भुका
यांचेही अस्तित्व मान्य करतच

ती आदर्शवादी नसते
तिला मनाचे घोळ माहीत असतात
तिलाही हवेही असतात

त्या क्षणाचा आधी वा नंतर विचार करणे
तिला मान्य नसते
तिच्या उपस्थितीत
तिचा प्रतिसाद असेल तरच
मग काहीही कितीही
हे असते तिचे जगणे

शुक्र असतो शांतच
शांततेतून देणारा
समृद्ध श्रृंगार
--- ००० ---

पक्षी कुत्री वाहने
यांचे नीरवतेतले आवाज
जसे आहेत
तुझ्या शरीराबाहेरचे
तसेच ऐक
मनाबाहेर
जसे आहेत तसे
-- पहाट म्हणते

हे आवाज
कानांनी नको ऐकूस
तुझ्या अस्तित्वाने ऐक

हाच आहे मार्ग
दुःखाबाहेरचा
विषमता आणि अन्यायाबाहेरचा
युद्ध आणि हिंसेबाहेरचा

तुझ्या विचारांनी पकडत गेलास
इथले सगळे पृथ्वीवैभव
तर तुझे मन फाटून जाईल
आवाकाच थिटा पडल्याने
मग तू संतापशील

जरब बसवशील
इतरांना घाबरवत जगणे
हाच होईल तुझा अभिमान

मग मी असण्याला अर्थच काय तुझी

--- ००० ---

आपुलकी आदर
प्रगल्भता आणि चातुर्य
यांच्या योगे होते क्रीडा
अत्युच्च जिवंत
लागतात चार चाँद

पहाटेला नसतात ते माहीत
माझ्याच मनात असते
त्यांचे उगवणे मावळणे
जरी तिचा असतो
शंभर टक्के सहभाग
आपोआप

निर्मितीचा हेतू नसतो
हीच असते निर्मिती
कृतीचा प्रत्येक क्षण
असतो सर्जक
कारण आता माझी पहाट
झालेली असते माझी कविता
कुणाच्याच मालकीची नसलेली

या तीव्र एकात्मतेत

खुले असतात सर्व धागे

अर्थांचे

माझ्या अनुभवाच्याही बाहेर

अनपेक्षित सरमिसळते

ओसंडून नष्ट होताना

सर्व कर्तृत्व

--- ००० ---

१ हवामानबदलाच्या धोक्यांबाबतच्या अहवालांची माहिती ऐकून ट्रंपसाहेब म्हणाले की असल्या कुणा वैज्ञानिकांचे ऐकून मी लाखोंचे रोजगार घालवण्यास आणि अब्जावधींचा खर्च करण्यास तयार नाही.

२ कोळसा आणि तेलाचे उपलब्ध साठे जमिनीत गाडून टाकले तरच हवेच्या प्रदूषणापासून बचावण्याची शक्यता आहे. पण कोळसा आणि तेल यांचे सम्राट ते होऊ देणार नाहीत. कारण असे केल्यास त्यांचे लाखो कोटी बुडतील.

एकूणात माणसांना आणि पृथ्वीला धोका झाला तर इलाज नाही.

आणि येतील ते प्रश्न सोडवत जाऊ ना !

( २१ ऑक्टो ' १८ च्या लोकसत्तेतील लेखावरून. )

मी कसा पिसाट आहे

हे कळूनही तिच्यात काहीच फरक पडत नाही

तिला ते माहीत असल्याचे सांगून

वर माझी पहाट मला आलिंगन देते

तुझ्याशीही मी एकनिष्ठ नसेन

फसवेन गुप्तता बाळगेन

माझे मन अनेक ठिकाणी वाटत सुटेन

असे नाही वाटत – मी तिला विचारतो

ती हसते म्हणते मला काळ नाहीय
काल आज उद्या असे फाडत नाही मी मन
या क्षणी मी पूर्ण तुझी आहे

ही पहाट एखाद्या मत्सरी स्त्रीहून
प्रचंड धोक्याची आणि प्रचंड
विध्वंसक शक्तीची वाटते

याचा अर्थ माझ्या कृती
ती साठवतच नाही मनात
माझ्या स्मृती पुसून टाकते
मला ओॅळखणारही नाही ती
मग कुणाकुणांतला हा प्रेमसंबंध

तिच्या या अमर्याद औदार्याने
मी नष्ट होतो
आधी तिच्या चरणी लीन होऊन
मग तिला मिठीत घेतो
--- ००० ---

कधी ना कधी पाहिलेले
की पहाट असते प्रवाही
पण ती तशी माहितीही असते
स्थिर माझ्यात तिच्यासह
हळूहळू विरत जाणारी

ती नेमकी कधी संपते
तो बिंदू सापडत नसल्याने
कधीकधी भर माध्यान्हीपर्यंत

ती चालूच आहे असे मी समजत राहतो

लोकांना मी वेडा वाटतो -- एवढे काय
ते पहाटेचे कौतुक असे ते म्हणतात

पण ती कधीच
माझ्या बाजूने उभी नाही राहात
आणि हेही तिचे ठरवून नाही असत
हे समजते

ती अशीच कुठे कुठे पुढे पुढे
जात असेल पण वर्तमानात
-- पण मी स्थिर असल्याने
मला ती दुष्प्राप्य वाटते

सूर्याचा प्रश्न नसता तर
काळाचा प्रश्न नसता
मग मीलनच मीलन झाले असते
ही कल्पना मला मस्त वाटते
--- ००० ---

तिच्या विरहात राहणे
वा तिच्या आठवणीत राहणे
किंवा तिची वाट पाहात राहणे
माझ्या पहाटेला नाही चालत
-- एक तर पूर्ण तिच्यासह
वा पूर्ण तिच्याविना
हेच तिचे संबंधतत्त्व असते
-- नुसतेच – कालची तू

अधिक चांगली होतीस
असे म्हटले तरी ती लुप्त होते

आता मला ती नुसती माहीतच
झालेली नसून माझीच वाटते
त्यामुळे खरे तर माझ्यापुढे
एकच पर्याय उपलब्ध आहे

पूर्ण तिच्यासह या एकमेव पर्यायासाठी
मला हजारो गोष्टी टाकाव्या लागतील
मी प्राणपणाने जपलेल्या जोपासलेल्या

मी तिला घाबरतोही
पण तिच्यासह असणे म्हणजे
या विश्वाचे सम्राट असणे
हेही भुरळ घालणारे असते

तिला अशी भुरळही नाही चालत
ती माझ्या मनाच्या चिंध्या करून
निघून जाते
--- ००० ---

मुळात ती माझी पहाट होती निसर्ग
तिचे काहीच जाणार नव्हते
क्षणात ती होऊ शकत होती
अहंकारहीन – त्यामुळे
माझ्यावर हल्ला करणे
तिला सहज शक्य होते
कारण झाला तर माझाच

फायदा झाला असता

तिच्याच निमित्ताने सुरू झालेल्या
माझ्या या कविता पाहून
ती म्हणाली की मी अहंकारी आहे
मी तिला कमी लेखतो

हे कसे चूक आहे अनेकदा
उलटच कसे आहे
हे मी तिला दाखवायचा प्रयत्न केला
तर ती फक्त हसली

इथे तरी सर्वांसमोर
मी तिच्यापुढे असणारे माझे न्यूनत्व
मान्य करतोय बिनशर्त

कविता तुझ्यासारखीच असते
तिच्याकडे मते आणि पूर्वग्रह
घेऊन जाता नाही येत
नम्र अनिश्चित हळुवार असावे लागते
-- मी तिला अनावश्यक अक्कल शिकवतो
--- ००० ---

पहाट आणि मी एकमेकांना
कळू नाही शकणार हे आम्हाला कळते
वायरिंगच वेगळे असल्यावर
प्रयत्न फोलच ठरणार

कुणीही कुणाला कळावे

अशी योजनाच नाहीय निसर्गात
कित्ती व्हास्ट फील्ड ओपन होते
त्यामुळे प्रेमासाठी

न कळण्याचे सौंदर्य
आणि जोडीला लिंगभेद
जबरदस्त होते तयार
रसायन कालातीत

एकाच मानसिक साच्यात
राहणे हे अनैसर्गिक आहे
हे आम्हाला कळते ( जरी तिला कमी )
लोक काय म्हणतील ते ओलांडून

खरे खोटे निष्ठा विश्वासघात
यांना नाही स्थान या विश्वात
जरी तिने सवयीने स्वीकारलेय
नीतीचे सुरक्षाकवच

किरकोळ असते माझे काही मागणे
जे त्या शिस्तीसाठी अव्हेरले जाते
मला खजिल आणि नाराज करत
आणि तिला बधीर आणि क्रूर
--- ००० ---

माझे प्रेम म्हणजे भावनिक
धक्के देणे वा घेणे नाही
हे मी का सांगितले असावे
ते तिला स्त्रीत्वाच्या प्रतिमेमुळे

कळले नसावे --

तिच्या आढेवेढे घेण्याच्या काळात

मी दाखवूनही दिले

की एका क्षणात मी तिला

पूर्ण टाकू शकतो

पकडणारे काही असल्याशिवाय

कसले प्रेम – हा तर नुसता

भुकेलेपणा होईल

ती म्हणाली

कसेही काहीही केले तरी

प्रेमामुळे दुःख

हे नाहीच घडणार

मी म्हणालो

खरे तर निसर्ग म्हणून

तिला माहीत असणार

जगण्यातली अनिश्चितता

आणि दोन प्रतिमांचे अटळ वियोग

ती माझी प्रिय पहाट खरोखर रडली

आणि क्षणात डोळे पुसून म्हणाली

मीही आकाशातूनच आलेय

--- ००० ---

काही घडणारच नसेल तर जाऊ दे मोडून

नकोच ते बिचकणे – तुटू दे –

असे म्हणून सांगूनच टाकले की

ती माझी प्रेयसी आहे – माझी
सतत हवीशी स्त्री

पहाटेच्या शांततेत लांबून
फक्त रेल्वे इंजिनाची एक शिट्टी ऐकू आली
त्या नादात तिचे उत्तर देणे राहूनच गेले
पण तिने माझे ते ऐकले तर होतेच नक्कीच

ती निसर्ग आहे तर मी का नसावे
तिचे सगळे स्वाभाविक आणि माझे मात्र
मुद्दाम हेतूपूर्वक असे कसे असेल

ती वाद नाही घालू शकत
ती फक्त उत्स्फूर्त असते
साधक बाधक बोलल्यास ती बिथरते

तिला वाटते मी सगळे विचारपूर्वक वागतो
नको कटकट म्हणून मग मीही
कारणे आणि विश्लेषण यांना फाटा देतो
तिच्या नैसर्गिकतेपुढे अनैसर्गिक होतो
त्यामुळे मग ती सहज सस्मित राहू शकते

शेवटी सापळे तर विचारांनीच लावले जातात
तिच्या सर्व नैसर्गिकतेसह ती पडते
माझ्या जाळ्यात – तिचाच विजय झाल्याप्रमाणे
--- ००० ---

ती माझी शिष्या असल्याचे म्हणत असली
तरीही
मीही काही कच्च्याया गुरूचा चेला नाही
माझे डाव बऱ्याचदा तिलाही कळत नाहीत

( कळत नाहीत असे ती वरवर दाखवत असावी
ही शंका मला सुखावत असतेच )

संवादाची एक गंमत असते
तो फक्त चालू ठेवण्यात यश मिळायला हवे
की तो इच्छित दिशेने जातोच

आणि खूप फटी आणि मोकळ्या जागा
मिळत जातात बोलता बोलता
ज्यांचा खुबीने वापर केला तर
तिला जवळ येण्यावाचून गत्यंतरच नसते

विशेष म्हणजे जणू नकळत
ती सहज गुरफटत जाते
एखाद्या वेळी नको बाबा म्हणत
पसरत्या उजेडाचे कारण सांगून
पळूनही जाते

माझी पहाट
काय असते तिचे असणे म्हणजे तरी
सूर्योदयाची ललकारी की
माझा कडेलोट करणारी न्यायदेवता
की माझ्याच इच्छेचे मूर्त रूप
--- ००० ---

छे छे पहाट म्हणजे
नुसतीच सूर्योदयापूर्वीची वेळ नव्हे
आणखी खूपच असते ती
निवांत
पण प्रगतीला जणू सिग्नल देत
हरकत नसणारी
पुढील सर्व
प्रेमवादळांना

पण शिस्त तिचीच असणार
कधी किती पावले
हे तीच ठरवणार

तिची ही उत्तेजक हुकुमशाही
मला नुसती मान्यच नसते तर
हवीही असते

तारे हळूहळू दिसेनासे होताना
आदराने तिला सलाम करत असतात
एवढ्या मोठ्या माहोलात मी कोण
निसर्गाची चावी जणू फक्त तिच्याच ताब्यात

मी तिचा होणार काय आहेच
हे तिला माहीत असते पण
ती आहे का माझी हे मला नसते माहीत
तिचाही निसर्ग असावाच बहुधा माझ्या ताब्यात

पण माझाच कब्जा घेऊन ती निभ्रांत असते

--- ००० ---

अरे वा

आजची सुरुवात तर खूप वेळ

छान झाली

खूप वेळ

ती एकदाही रागावली नाही

नाही म्हणाली नाही

कारण मी नुसताच

तिचे असणेच येऊ देत होतो

पूर्ण अनाक्रमक होतो

तिचा नाजुकपणा माहीत असूनही आणि

हवे म्हटले की काहीच मिळत नाही

हे माहीत असूनही

माझ्या मनाला ती हवीशी होतेच

अलिप्त नाहीच राहता येत मला

हे नाते अविभाज्य असूनही

ते शब्दांत मांडलेले नाही चालत तिला

तीच फक्त असावी आणि मी नसावेच

अशी अट्टल स्वार्थी आहे ती

मूर्त तर आहे हसतेही रुसतेही

कधी तिचा गुणगुणल्याचा आवाजही येतो

कधी तिची लांबसडक बोटे दिसतात

तिचे पक्षी तिला प्राणप्रिय आहेत हे मला माहीत आहे

माझी प्रिय पहाट – तिच्या पक्ष्यांचे पूर्ण हवेनको बघताना

तिचे माझ्याकडेही लक्ष आहे हे मला स्पष्ट जाणवत राहते

--- ००० ---

गहन अंधार तासंतास भेदावा
तेव्हा हाती लागते पहाट

रात्र किती काळ चालेल
किती दूरवर असेल प्रवास
हे इथे माहीत नसते
पण या रहस्यामध्येही
असते सुख
पहाट सापडण्याचे

रात्र आणि पहाट
यांचे असते संगनमत
पहाटेला वाटेल तेव्हा ती
रात्रीचा ताबा घेऊ शकते

सुरुवातीला हे क्वचित कधी घडते
नंतर वारंवारता वाढते
मला वाटते की हे सहजच घडतेय
पण त्यातले चातुर्य लक्षात येणे तर
महाप्रचंड उत्तेजक असते

मध्यंतरीच्या काळात मी राग पचवतो
एखादा कडक नकारही सहन करतो
नकारच मान्य करून हळुवारपणे
पुढील प्रयत्नांना नेटाने तयार होतो

आता औपचारिकता संपलेली असते आणि
हो -- पूर्ण नकळत पहाट अवतरलेली असते
--- ००० ---

पहाटा असतात तीन
खऱ्या आभासी आणि काल्पनिक
आणि मनाच्या भूतकाळात
खऱ्याच अनेक कल्पिलेल्या
त्यामुळे खूपच
आभासी खऱ्या

आता शारीरिक शक्यतांचा नसतो प्रश्न
कितीही मोठा असू दे पहाटखाना
सर्व पहाटांनी
माझी वाट पाहणे
आणि माझ्या सहवासांत खुश होणे
हेच असते सार्वकालीन मूल्य

इतक्या पहाटांमुळे
मी आपोआपच अलिप्त राहतो
माझ्या भावना
आणि माझी स्वभाववैशिष्ट्ये
महत्त्वाची राहात नाहीत

त्या कशा दिसतात वा वाटतात
हे महत्त्वाचे नाही राहात
माझ्या उगवण्यामुळे त्या होतात
असंख्य सूर्यफुले
हेच असते रहस्य मनोमन जगण्याचे

मी माझ्या मनातून बाहेर पडल्याशिवाय
या अविरत पहाटछळातून माझी सुटका नाही
--- ००० ---

Amazing Speech The Next 100 Years Of Humanity Yuval Harari

youtube.com

संदीप गोडबोले या मित्राच्या कृपेने समोर आलेले हे एक अतिमहत्त्वाचे विशेष भाषण !

सर्वच क्षेत्रांत याने घुसळण होईल -- प्रचंड विचारमंथन होईल !

यात सांगितलेले कवीचे महत्त्व अधोरेखित करावे, असे !

कधी सुखवणाऱ्या घटनांचे मुलायम पीठ
असे पिठूर चांदणे तर कधी पावसाळी दरारा
असते माझी विविधांगी अनिश्चित पहाट
जणू बुद्धशब्दांचे सत्य – काहीच नसते
टिकाऊ – बदलत असते सतत विश्वसर्वस्व

तिच्यामुळे मी शिकतो चकित न होणे
जे येईल ते स्वाभाविक म्हणून पाहणे
आणि तिला माहीत नसलेले माझे जगणेही
तिच्यासमोर नग्न ठेवणे तपासणीसाठी

ती मग्न असते जणू तिच्या मूडसमध्ये
तिचा एक स्वयंचलित प्रवाह म्हणून
मी माझाही मानलेला त्यामुळे मला
विचलित न करणारा उलट
उत्तेजितच करणारा

तिला दिसतो माझा प्रवाह वेगळा
तिच्या स्वयंचलिततेत बाधा आणणारा
ती रागावते जाब विचारते वा फुरंगटून
दूर जाते जणू मला विनाशाची

धडकी भरवत

पण आता मी समजून चुकलोय
तपशीलांना खूप महत्त्व देणे
म्हणजेच ते नगण्य समजण्याची तयारीही असणे

जे करते माझी लाडकी प्रिय पहाट बिनबोभाट

--- ००० ---

रिकाम्या अवकाशाची भाषा
अवगत नसल्याने आम्हाला
तारे हेच शब्द होतात
किंवा ढग वा विजा

आमच्या लक्षांत येते की यांत
बिनचूक असे काहीच नाहीय
सांगितलेल्या निरोपांऐवजी
दुसरेच काही पोचवले जातेय

पण माझी प्रिय पहाट भाषा बदलायला तयार नसते
ताऱ्यांचाच वापर करून नेमके
परस्परांना हवे तेच अर्थ
पोचू शकतील ही तिची खात्री असते

मी म्हणातो अर्थ म्हणजे भूतकाळ
तू नव्याने बघ माझ्याकडे
तुझ्या स्वतःच्या प्रकाशात
तुझ्यातून मीच पडेन माझ्यावर

जणू खूप चर्चेनंतर

ती किंचित हसते

चर्चेत तथ्य नसल्याचे ओळखून

‘ हो ‘ म्हणते

विजय-पराजय कसला

हा असतो दोघांनाही

एकच अर्थ

कळण्याचा गोड क्षण

--- ००० ---

मी दिवसभर कुठेही असलो

तरी तिचे लक्ष असते

ती असतेच सोबत एका अटीवर

स्पर्श नाही चालणार

खरे तर दंगल उत्स्फूर्त होती

असे म्हणता येते पण

पुढे नासधूस किती होईल

तिच्याकडून याला मी घाबरतो

ती मला समजल्यापासून

तिला जपायचे तर असतेच

ती किती नाजुक किती कणखर

किती परिपक्व आणि किती

सूड शिक्षा यांचे महत्त्व मानणारी

हे माहीत नसूनही

ती आहे प्रेमळच हे नक्की

किती छान वाटते ती
पण मी तिच्या रहस्यात प्रवेशण्याने
ती वेडी तर नाही होणार

मी कोण एवढा लागून गेलोय
सर्व घटनांतून सहीसलामत
जाणारा हवे ते न ठरवलेला

माझी पहाट घेईलच मला समजून
माझे अपराध पोटात घालत न बिथरता
--- ००० ---

आज तर दिवसभर
भेटत राहिली पहाट
रात्रभरही तयार होती थांबायला
उजेडाचा स्पर्श न होता

म्हणाली मी म्हणजे ती
कधी संपणारच नाही
आणि म्हणे
पक्ष्यांवर तिचे प्रेम आहे

मी मला हवा तसा
समजून घेतला अर्थ
तिला न सांगता
भरून घेतले मन

तिचा सगळा
रुक्षपणा कडकपणा

मावळला होता

सावयव मऊ झाली होती ती

जणू मी पाहुणा होतो

आणि ती विचारत होती

माझे हवेनको माझे विचार

जणू न कळता

आता ती माझी असेल

तिच्या कलाने उगवेल

पण मला हवी तितकी

राहील न उजाडता

--- ००० ---

किता आणि अडकित्ता

टिळकांचा कित्ता गिरवण्या ऐवजी त्यांचा अडकित्ता घेणारेच जास्त, असे म्हटले जाते ! ( टिळक सुपारी कातरून खात असत. ) त्याचप्रमाणे मराठीतल्या अभिनयपटूंचे आहे. हिंदीतल्या नटनट्या बहुधा इंग्रजी माध्यमातून वा परदेशात शिकलेल्या असतात. त्यांचे बोलणे-राहणे-वागणे वगैरे सर्व अति-उच्चभ्रू असते. ते असतात बिचारे भारतीयच पण त्यांना बोलताना बऱ्याचदा हिंदी शब्द आठवतच नाहीत. मग ते सरळ इंग्रजी शब्द वापरतात. काही वेळी तर पूर्ण वाक्येही इंग्रजीतच बोलतात ! ते एक वेळ ठीक आहे, पण, मराठीतल्या कलाकारांनाही तोच आहे ' प्रॉब्लेम ' ? त्यातलेही बरेच, उगीचच आपल्याला मराठी शब्द आठवत नसल्याचा अभिनय करतात ( आणि फडतूस इंग्रजीत बोलतात ! ). तसेच आत्ताच एक पाहिले -- शनाया गेली होती घंटाळी देवीला. तिथे ती म्हणाली की घंटाळी ही एक ठाण्यातली सर्वात फेमस देवी आहे ! यावरून मला काय आठवावे -- पूर्वी ' जय संतोषी माँ ' नामक एक हिंदी सिनेमा येऊन गेला होता. फारसा भव्य, खर्चिक नसूनही त्याने त्या काळात उत्पन्नाचे विक्रम केले होते ! त्यामुळे, त्या सिनेमाचा गौरव करणारा एक लेख एका प्रतिष्ठित दैनिकात आला होता. त्याचे शीर्षक होते -- ' सुपरहिट संतोषी माता ' ! यावर काय बोलणार ?

October 16

माझी पहाट
मला पहाटेच भेटली
अचानक सर्व गात्रे
उजळली

खरे तर ती
रागावली होती
उगवणारच नाही
असे म्हणाली होती

शांततेतच
तर होती
शब्दांबाहेर
सहज होती

हे समजल्याने
आता शब्दांना
अर्थ आला
माझ्या इच्छांना

मी फक्त किंचित
स्पर्श केला
तिचे ओठ विलगले
आमेन शब्द किरणला

निर्धास्त होत पुन्हा
मी जगू लागलो
हव्याशा अपूर्णतेत
--- ००० ---

झी २४ तास वर आत्ताच एक उत्कृष्ट कार्यक्रम पाहिला -- नंदेश उमप आणि त्यांचे साथीदार यांनी सादर केलेले ' देवी आख्यान ' आणि देवीचा पारंपरिक गोंधळ ! मी सश्रद्ध नसलो तरी इथल्या कोट्यवधी लोकांच्या रक्तातून जी भाषा आणि कला वाहते तो फील माझ्याही रक्तात असावा, असे मला वाटतेच ! फारच सुंदर वाटला मला हा कार्यक्रम -- मी रंगून गेलो होतो त्यात ! कुठे उपलब्ध असेल तर शोधा आणि कुणी इथे लिंक द्या आणि जरूर बघा !

( त्यात संबळ वाजवणारा तडफदार वादक तरुणपणातल्या शाहरुख खानसारखा दिसत होता ! )

वैज्ञानिक दृष्टिकोणाचा पुरस्कर्ता समाज
नैतिकतेत
आध्यात्मिक अपेक्षा ठेवतो !

कार्यालये काय आणि न्यायालये काय
तीच ती मेंदूफुटकी माणसे
रचत असतात उत्तुंग शिल्पे
म्हणत असतात
वर्चस्वाचे सुख हवेच
पण इतके नको
ताण हवाच
पण इतका नको
आदर्श हवा ध्येय हवे
राग हवा हिंसा हवी

पण पुढील पिढ्या नष्ट होतील
इतके काहीच नको
आपण एकदा महासत्ता झालो की बास

विषमता नसावी
स्त्रिया मुक्त असाव्यात
अन्याय अत्याचार नसावेत

यांवर एकमत असलेला
हा सात्त्विक सज्जन समाज
तयार होतो शेवटी आत्मछळाला

इकडचे तिकडच्यांना
फाशी सुनावतात आणि तिकडचे
इकडच्यांची लिंगे कापतात

समाज निरामय हवा

--- ००० ---

या पहाटेचा होकार असतो
पण अप्रत्यक्ष
तिची वस्त्रे प्रावरणे अलंकार
अव्यक्त – मलाच निर्माण करावे लागते
ते तिचे अमूल्य भांडार

ती लाजते की बुजते
की तिला नको असतो
टप्प्यासारखा पूर्णविराम
की ती एखाद्या काल्पनिक
सुरक्षिततेच्या मागे
लपते

हे सगळे मलाच घ्यावे लागते
किरणांसारखे विचारात
तिचे असणे निश्चित असल्याने
मी निश्चिंत असतो

तिला माहीत असतात
माझ्यात होणारे बदल
किनारा सोडून मी
तिच्या दिशेने सतत
सन्मुख राहण्याचे

कधी ना कधी
अटळ असलेले मीलन
आत्ताच भिनत चाललेले
फाकता प्रकाश होत शारीर
--- ००० ---

ही पहाट
एक पूर्ण गाणे की
फक्त एक लकेर
सांगता नाही येत
मर्यादित असूनही
पूर्ण असणारी

ती सहजच सामावते
माझ्या मनात
पण जणू तिला नकळत
जणू अलिप्तपणे
जणू हा असावा फक्त
एक माझ्याच मनाचा भ्रम

तो अलिप्तपणा तसा तर
दोघांनाही माहीत असलेला

मला उद्युक्त करणारा

उत्तेजित, आक्रमक आणि

समाधानीही करणारा

चिडवणारा, संतप्त करणारा

आणि लीनही करणारा

हव्याशा सहवासासाठी

एकदा वाटते हा फक्त

आपलाच एकतर्फी

गोंधळ आहे पण असे कसे असेल

ती उगवतेच का मग माझ्या मनात

--- ००० ---

१९५८ साली आलेल्या ' चंदन ' या सिनेमात खालील गाणे होते ( गायक महंमद रफी -- नट जॉनी वॉकर ) --

बडा ही सी आय डी है वो नीली छत्रीवाला

हर ताले की चाबी रखे हर चाबी का ताला

अशी, देवाचा गौरव करणारी गाणी हिंदी चित्रपटांतून हळूहळू कमी कमी होत गेली का ? हल्ली तर असे काही ऐकूच नाही येत !

याचा अर्थ, भारतात नास्तिक लोकांची संख्या वाढली किंवा एकूणातच वैज्ञानिक दृष्टिकोणात वाढ झाली, असे म्हणावे काय ?

एका खाद्यतेलाची जाहिरात --

आम्ही तुम्हाला चक्क बटाटेवडा खाताना पाहतोय !

यावर सचिन म्हणत की, कारण, माझ्या बायकोचे प्रेम आणि अमुक तेल !

मग सुप्रिया त्या तेलाचा डबा दाखवत.

पुन्हा बघा ही जाहिरात बारकाईने --

तिच्यातले ' बायकोचे प्रेम ' हे शब्द आता वगळण्यात आलेले आहेत !

बरोबरच आहे -- बायकोच्या प्रेमाशिवायही ते तेल उत्तमच आहे ना !

आणि कोट्यवधी ठिकाणी जिथे बायकोच्या प्रेमाचा अभावच आहे त्यांच्या जखमांवर मीठ चोळल्यासारखे नाही होत ? ते म्हणतील, मरू दे, दुसरे कुठलेही तेल आणू, पण, हे नको !

प्रेम गेले तेल लावत, ते हे असे !

एक निव्वळ गंमतकविता --

मी तिला मानले
दलालांच्या चित्रांतली नायिका
काही प्रॉब्लेम आला नाही
तसाच बोललोवागलो
ती ते सहज खरे समजली

मलाही ती
समजली एक
रोमँटिक नायक
-- मी तिचेच जगणे
ट्रिक म्हणून वापरले

तिच्या मनातल्या
इमेजप्रमाणे मी नसलो
तरीही काळजी केली नाही
त्या इमेजपर्यंत पोचायचा
वा तसे व्हायचा
प्रयत्नही केला नाही

त्यामुळे चालू राहिले
तिचे स्वातंत्र्य
अबाधित

प्रेमात प्रयत्न म्हणजे

समजा

पायावर धोंडाच

--- ००० ---

नाते प्रवाही ठेवायचे असेल तर त्यातल्या कोणत्याही स्थितीला, ' प्रेम ', ' राग ', ' आस्था ', ' काळजी ' अशा शब्दांत थांबवू नये !

October 10

ही पहाट

अपूर्ण

पूर्ण होणारही नसते

तरीही मी म्हणतो सुंदर

तेव्हा ती

दिवसात रूपांतरित

होत असते

तिला नक्कीच

आवडलेले असते

मी सुंदर म्हणणे

पण तिचे जगणे

असते वेगळे

माहीत असते

उद्या नक्कीच

ती वाट पाहील

तिच्या जगण्यात

मूकपणे

पुन्हा स्वीकारण्यासाठी
माझे सुंदर म्हणणे

आता मधेच
तोडता नाही येणार
ती विद्ध होईल
बेफिकीर असली तरी

मलाच काळजी घ्यावी लागेल

--- ००० ---

सर्व टाके काढले -- पुन्हा रूटीन सुरू -- एक सुलट, दोन उलट आणि मग पुन्हा -- असे -- काटेकी टक्कर पेक्षा टाकेकी टक्कर वाईट, हेच खरे !

अनिमिष नेत्रांनी उसासे टाकत बसण्यापेक्षा
मोडून खावेत मातीचे पुतळे
आपल्या आकांक्षांचे
आणि पक्व फळांप्रमाणे
उद्भवणाऱ्या विचारांना गोंजारत राहावे

एवढ्यातेवढ्यावरून उगवणारे अधिकारांचे तण
माजू द्यावे हवे तसे आणि माजुरड्या
वासनेने हुंगावे घर्षणपरिप्लुत विश्व

इथे कुणाचाही अधिकार नाही चालत
कुणीच नाही इथे दरबारी मटणमालक
भीती एकाच गोष्टीची बाळगावी
की बाबा इथे न्याय द्यायला कुणीच नाहीय

जे घडेल ते घडेल या तत्त्वज्ञानाने
कैक पिढ्या नासल्या इथे
नुसती पापे करत मुक्तद्वार पाहून

अवहेलना झालीच असेल तर ती
आकाशाची झाली त्याला नकळत
तरीही पावसापाण्याचे वेळापत्रक
बिघडलेच अविरत शहरी रस्त्यांवर

गल्लीबोळांतले जुने वाडे पाडण्यापूर्वी
त्यांचे फोटो तरी संग्रही घ्यावेत म्हणून
तिथे पोचताच ऐकू आले
त्यांनी टाकलेले उसासे नाइलाजाचे
--- ००० ---

घटनांचा खेळ आणि विचारांचा खंडोबा

जे घडून गेले, जे आपल्या अवधानात आले, जे थोडेफार सांगोवांगीचे आहे आणि त्यातले जे लक्षात राहिले – त्या सगळ्यावरून लागू शकतो का जगण्याचा अर्थ ? पाहू. नियतिवादाची अंधश्रद्धा सोडून कारणपरिणाम साखळीची वैज्ञानिक दृष्टीही अवलंबून पाहू. एका माथेफिरू वा उद्रेकी वा वेड्या माणसाने माझ्यावर अचानक हल्ला केला आणि त्याच्या हातातल्या पट्ट्याच्या बक्कलच्या बाजूने, लागेल तिथे लागेल या पद्धतीने, जोरात आघात केला. तो मला उजव्या कानाच्या वर डोक्यावर बसला. जखम, रक्त, आठ टाके – हे झाले. तो फटका जर डोळ्यावर वा मागच्या बाजूला लहान मेंदू भागात बसला असता तर ? त्याच्या हातात पट्ट्या ऐवजी लाठी वा सळी वा एखादा रॉड असता तर ? हे काही असे घडले नाही, हे बरेच झाले म्हणायचे ! तीन मित्र बरोबर असणे, आमच्याच सोसायटीतले एकजण नेमके त्या वेळी तिथे असणे, हेही सगळे उपकारकच ठरले. तिथे रिक्षा मिळणे अशक्य असते, पण त्या वेळी अचानक तिथे आलेली एक रिक्षा मिळाल्यामुळे मला सत्वर इस्पितळात नेता आले. आघात झाल्यावर मी उभाच्या उभा कोसळलो होतो, तरीही, इतर कुठेही मला लागले वा साधे खरचटलेही नव्हते. मी पडलो तेव्हा तो मारणारा जरा पुढे जाऊन उभा असलेला मला दिसत होता. त्याने असाच आणखी एक फटका दिला तर आपला ग्रंथच आटोपेल असा विचार माझ्या मनात येऊन गेला. पण, तसे काही घडले नाही. नंतर घरच्यांनी इस्पितळात येणे, तिथल्या चाचण्या, उपचार इत्यादी झाले. ते संकट पार पडले ! पहिल्या इस्पितळात सिटी स्कॅन ची सोय नसल्याने दुसऱ्या इस्पितळात जावे लागले. तिथून जाण्यासाठी रिक्षावाला कुरकुरत होता. माझ्या

एका मित्राला योग्य ते सुचले आणि काही जास्त पैसे त्या रिक्षावाल्याच्या हातात कोंबून तो त्याला ‘ जा आता ‘ म्हणाला. असे तेही काम झाले.

तुलनेने कमी धोक्याच्या जागेवर मार बसला होता. जखम फार खोल जाऊन मेंदूला धक्का पोचलेला नव्हता. जिवाला धोका असे काही घडलेले नव्हते. इस्पितळात जर सत्वर नेले गेले नसते तर रक्त वाहात राहिल्याने काहीही धोक्याचे घडू शकले असते – तसे काही घडले नाही. म्हणजेच अमुक इतके घडावे पण जिवावर बेतू नये, अशी या एकूण घटनेची रचना होती ! हे सगळे कोणत्या ना कोणत्या कारण-परिणामांच्या साखळ्यांतूनच घडले असणार. जे काही घडते वा अस्तित्वात येते त्याला एक वा अनेक कारणे असणारच ! आघात जोरात व्हावा पण पुढे अनेक गोष्टी उपकारक असाव्यात, अशी ही योजना होती, असे दिसते ! या कारण-परिणामांच्या साखळ्या म्हटले तर माझ्या जन्मापासून आणि त्या उद्रेकी माणसाच्या जन्मापासूनही घडत आल्या असणार. यांत आनुवंशिकता, जनुक नकाशे, कुटुंबांतली माणसे, वगैरे सगळेच असणार. या एका घटनेसाठी जर इतके पाताळयंत्री विचार लढवले जात असतील तर सर्व माणसांच्या आयुष्यांतल्या सर्व घटनांसाठी किती काय काय रचले जात असेल ! तेही एकमेकांशी टक्कर न होता ! आणि क्षणाक्षणाच्या इतक्या अब्जावधी घटनांच्या, इतक्या, बुद्धीच्या आवाक्यात कदापि येऊ शकणार नाहीत अशा साखळ्या सहज विणल्या जात राहणे ! हे मानवी बुद्धीचे काम असूच नाही शकत ! आता, घडणारे सगळेच बौद्धिक कारण-परिणामांतूनच घडते, असे म्हणावे तर ‘ कदापि न कळणाऱ्या ‘ निर्बुद्ध प्रक्रियेकडे आपण येऊन पोचतो. मग काय चान्स एलेमेंट म्हणजे अनियंत्रिततेचे तत्त्व असेल ? एका बाजूला विश्व ही एक सुनियंत्रित व्यवस्था आहे, असे मानले जाते आणि दुसऱ्या बाजूला ही अशी अनियंत्रितता ? गोंधळ आणि अराजक ? की शास्त्र आणि तंत्र यांच्या क्षेत्रातच फक्त नियम असतात आणि मानवी संबंधांच्या क्षेत्रात ते नसतात ? वैज्ञानिक दृष्टिकोणात असा भेदभाव असू शकतो ? एकूण विश्वात असे अनियंत्रित काहीही असले तरी ते विश्वाची वाट नाही लावणार ? की वाट लागणे वगैरे हे आपले बौद्धिक विचार असून विश्वाला त्याचा काही फरकच पडत नसेल ?

एका ठिकाणी असे वाचनात आले की विश्वांतर्गत गोष्टींना कारणमीमांसा आहे पण तशी ती खुद्द पूर्ण विश्वाला नाही ! कारण, विश्वनिर्मितीचे कारण म्हटले तर ते विश्वातलेच असणार – असा तो पेच आहे म्हणतात ! एखादी गोष्ट स्वतःच स्वतःच्या अस्तित्वाचे कारण असू शकत नाही ! एकूण हा सगळा ११५ की ११८ मूलद्रव्यांचा खेळ आहे म्हणतात. हे तरी कुठून आले, हा प्रश्न सोडला तरी, हे सगळेच जर क्षणोक्षणी एकमेकांवर परिणाम करत एकत्रितपणे जगत असेल तर स्वतंत्र कारणमीमांसा आणि स्वतंत्र घटना यांना कसे अस्तित्व असेल ? म्हणजेच सगळे असते पण घडत काहीच नाही, असे म्हणावे लागते !

अशा पद्धतीने, काही कळो वा न कळो, आपण घटनांच्या जंजाळात गुरफटत राहतो आणि मग सुरू होतो या बाबतीतल्या विचारांचा खंडोबा ! एकूणात होत राहतो आपल्या जगण्याचा खेळखंडोबा !

--- ००० ---

" हा हल्ला तुमच्या लेखनामुळे तर झाला नसेल ? " -- " अहो, माझे लेखन कुणाला कळूच नये याची मी काळजी घेत असतो ! " -- " मग ठीक आहे ! "

निराकरण आणि सत्य

माझ्यावर झालेला हल्ला अचानक आणि अनपेक्षित होता. हल्ल्याला कारण काहीच नव्हते. माझे कोणतेही लेखन असा हल्ला ओढवून घेईल, असे मला वाटत नाही. मला चोपणे-मारणे हा उद्देश असता तर तो हल्लेखोर नंतर पळून गेला असता. तो तिथेच थांबलेला होता. उन्मादी दिसत होता. यावरून, ते कृत्य त्याच्या हातून वेडाच्या वा उन्मादाच्या वा एखाद्या अतिविकृत मनःस्थितीच्या वा एखाद्या अंमली पदार्थाच्या प्रभावाखाली घडले असावे. तरीही, यावर मी काही निर्णय घेणे – पोलीस तक्रार करणे वा न करणे – हे अपेक्षित होते. तो निर्णय मी कसा घेतला ते या आधीच्या पोस्टमधून मी सांगितले होतेच.

आता माझी तब्येत ठीक असून ड्रेसिंग व जखमेला पाणी न लागू देणे व औषधे घेत राहणे यांच्या योगाने या प्रकारातून लौकरच मी पूर्ण बाहेर पडेन. त्यात आता काळजीचे फारसे काही नाही.

या निमित्ताने काही विचार डोक्यात आले. कायदा कितपत सुव्यवस्था राखू शकतो वा होणारे गुन्हे थोपवू शकतो ? कायदा आणि शिक्षा यांच्या भीतीने कोणते गुन्हे थोपवले जाऊ शकतात ? वेड, अतिविकृत मनःस्थिती, उन्माद, भावनोद्रेक वा व्यसनांचे प्रभाव – अशा अवस्थांतून होणारे गुन्हे थोपवण्याची शक्ती अर्थातच कायद्याकडे नाही. त्याचप्रमाणे, कायद्याची माहिती असूनही थंड डोक्याने, योजनापूर्वक गुन्हे करणारेही थोपवले जाणे अवघड आहे. गुन्हा घडल्यानंतर त्यासाठी शिक्षा देण्याची प्रक्रिया कायदा पार पाडू शकतो. गुन्हा थोपवणे वा त्या गुन्ह्यामुळे झालेल्या नुकसानीची पूर्ण भरपाई करणे हे कायदा करू शकत नाही. गुन्हापीडित व्यक्तीचे आयुष्य गुन्हा घडलाच नाही अशा प्रकारचे पूर्ववत बहाल करू शकत नाही.

मग कोणते गुन्हे कायद्याच्या अस्तित्वामुळे थोपवले जाऊ शकतात ? मुळात भित्रे असणारे लोक, ‘ लोक काय म्हणतील ‘ याचे दडपण घेणारे लोक, नोकरी संभाळण्याला महत्त्व देणारे तसेच कौटुंबिक जगण्याला महत्त्व देणारे लोक, पाप-पुण्याच्या कल्पनांमुळे स्वतःवर आवर घालणारे लोक – अशा लोकांकडू्न होऊ शकणाऱ्या संभाव्य गुन्ह्यांच्या बाबतीत, कायद्याची भीती ते गुन्हे थोपवण्याचे काम करू शकते.

आहे त्या कायद्याची अंमलबजावणी आणि त्या प्रक्रियेतले गोंधळ, प्रश्न आणि अपूर्णता – यांचा विचार तर इथे सध्या सोडूनच दिलेला आहे.

इथे शिक्षा म्हणजे काय, हाही एक प्रश्न येतो. अमुक शिक्षा जंगली आहे, अमानुष आहे, वगैरे विचार आपण ऐकत असतो. म्हणजे शिक्षेची पद्धत आणि तीव्रता यांबाबत मतभेद असतात. फाशीची शिक्षा असावी की नसावी याबाबत मतभेद असतात. शिक्षा म्हणजे समाजाच्या सामूहिक शक्तीच्या आणि कायदायंत्रणेच्या साहाय्याने गुन्हेगाराला करायला लावलेले सक्तीचे परिमार्जन असते वा गुन्हेगारी कृत्याचा सूडच असतो. गुन्हेगार जसा सूडभावनेने प्रेरित होऊन एखादा गुन्हा करू शकतो, त्याचप्रमाणे, शिक्षा ही एक समाजमान्य, रीतसर सूडाचीच प्रक्रिया असते, असे म्हणता येते. ती समाजाच्या मानसिक प्रभावयुक्ततेतून होणारी एक प्रतिक्रिया – या अर्थाने एक वेगळी कृती असते. पण, तिचा अर्थ वा तिचे मूल्य एक प्रतिक्रिया म्हणूनच फक्त असू शकते. अमिताभ बच्चन मोठेपणी गुन्हेगार झाला तर, त्याचे बालपण कसे वाईट आणि अन्यायग्रस्त गेले हे आपण त्याच्या समर्थनार्थ दाखवतो-पाहतो, पण, तेच अमजदखानबद्दल विचारात घेत नाही. सगळेच प्रभावग्रस्त वा कशाचा ना कशाचा परिणाम म्हणूनच अमुक एक प्रकारचे जगत असतात – हे कधी पाहायचे आणि कधी नाही पाहायचे, ही आपली निवड असते !

हे सर्व पाहता, व्यक्ती-व्यक्ती, समूह-समूह वा देश-देश यांच्यांतले प्रश्न हे हक्क, न्याय वा प्रतिष्ठा-सन्मान यांचे असतात. त्यांवरची ‘ उत्तरे ’ ही ताकद, डावपेच यांच्या आधारे शोधली जातात. उत्तरे म्हणजे निराकरणे वा ‘ प्रश्न नाही ’ अशा अवस्था नसतात. तरीही, यालाच आपण ‘ विवेकी ’ जगणे असे म्हणतो. खरे तर याला अविवेकी जगणे म्हणणेच योग्य होईल. पण, मॅन इज ए रॅशनल ऍनिमल – म्हणजे, माणूस हा एक विवेकी प्राणी आहे – असे म्हणणे आपल्याला आवडते. आणि याहून दुसरे काही शक्यच नसणे याला हजारो वर्षांचा इतिहास साक्ष असतो – तेच समर्थनही असते !

माणसाच्या मनाने – बुद्धीने निर्माण केलेल्या संबंधांच्या कोणत्याही रचना या अशा निर्बुद्धपणावर आणि हिंसेवर आधारलेल्याच असतात ! त्या त्या रचनेत आपण योग्यायोग्य काय यावर चर्चा करत असतो ! सगळी प्रक्रियाच सदोष असल्याचे आपण कधी पाहात नाही, आणि खरे तर, पाहू इच्छितही नाही !

मी हे काही फार आद्यतेचे ( ओरिजिनॅलिटीचे ) वा नवेच काही बोलतोय, असे माझे म्हणणेच नाहीय. जगात अनेकांनी या प्रकारचे आकलन मांडले असेल. मी या रचनेबाहेरचे काही जगू-वागू शकेन का ते मला माहीत नाही. माझे जगणे-वागणे हे कोणत्या तरी एखाद्या तत्त्वाला धरून कायमच संगतवार आणि आंतरविरोधाशिवाय असू शकते का, हेही मी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही.

पण, जे काय आहे ते समजून घेतल्याशिवाय नवे काही घडण्याची शक्यताही नाही, हेही तितकेच खरे आहे. गोंधळातल्या आपल्या एखाद्या मताला मूल्यात्मक महत्त्वाचे समजण्यापेक्षा पूर्ण गोंधळ हा गोंधळ म्हणून पाहिला जाणे हेच ‘ कदाचित ’ मूल्याच्या म्हणजे क्लॅरिटीच्या दिशेने जाण्याची शक्यता निर्माण करणारे ठरू शकेल – असे वाटते !

‘ माहीत नाही ’ इथून सुरुवात होणे हेच सत्याला धरून होईल !

( नुसतेच ‘ आता मी ठीक आहे ‘ एवढेच फ्रेंडसना सांगण्यापेक्षा मनातले हे विचारही सांगावेत, असे वाटले. )

--- ००० ---

September 2018

September 29

प्रश्न -- बाहुबलीने कटाप्पाको क्यों मारा ?

उत्तर – मालूम नही !

शुक्रवार २८ सप्टेंबर २०१८ रोजी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास मित्रांबरोबर फिरून परतत असताना माझ्या बाबतीत एक अनपेक्षित घटना घडली. मारणारा एक आडदांड तरुण आणि मार खाणारा मी एक ज्येष्ठ नागरीक या अर्थाने एका बाहुबलीने कटाप्पावर अचानक हल्ला केला. त्याच्या हातात जाड बक्कलचा एक पट्टा असावा. त्या पट्ट्याने त्याने लागेल तिथे लागेल अशा अविचारीपणाने माझ्यावर आघात केला. तो मला डोक्यावर उजव्या बाजूला कानाच्या वर बसला. तिथे अर्थातच जखम झाली आणि रक्ताची धार लागली. माझे कपडे रक्ताने भिजले. त्याही परिस्थितीत मी पाहिले असता तो माणूस माझ्या मुळीच माहितीतला नसून कोणत्या तरी उन्मादात असावा असे मला वाटले. पुढे अर्थातच माझ्या मित्रांनी मला इस्पितळात नेणे वगैरे अत्यावश्यक गोष्टी घडल्या. मला त्या जखमेच्या ठिकाणी एकूण आठ टाके पडलेले आहेत. नंतर सिटी स्कॅन वगैरे तपासण्या झाल्या. त्यांवरून, गंभीर वा काळजीचे काही नाही. आता मी ठीक असून तब्येत सुधारत आहे. औषधे चालू आहेत.

अशा या एकूण परिस्थितीत माझ्यापुढे आता आलेला प्रश्न असा होता की यावर मी कोणती कृती करावी ? इस्पितळात असताना पोलिसांनी मला भेटून माझा जबाब घेतलेला होता. त्यात मी घडलेल्या घटनेची माहिती दिलेली होती. नंतर पोलीस अधिकाऱ्यांनी माझ्याशी पुन्हा संपर्क साधला. मी जबाब दिला होता, पण त्या अज्ञात इसमाबद्दल अजून तक्रार दिलेली नव्हती. पोलीस यंत्रणा या बाबतीत अत्यंत तडफेने आणि कार्यक्षमतेने सक्रीय असल्याचे मला दिसून आले. त्याबद्दल अर्थातच मी त्यांचा आभारी आहे. माझ्यापुढे प्रश्न असा आला की आपली तक्रार काय आहे ? या बाबतीत आपण कसला न्याय मागू इच्छितो ? अशा प्रश्नाचे कोणतेही उत्तर हे पूर्ण जगण्याचा समावेश करणारे असे परिपूर्ण उत्तर असू शकत नाही, याची मला जाणीव आहे. मी प्रामुख्याने पुढील गोष्टींना महत्त्व द्यायचे ठरवले -- ( १ ) तो हल्लेखोर माझ्या माहितीचा नाही. कोणत्याही कारणाने वा विचाराने त्याने माझ्यावर हल्ला केलेला नाही. व्यसनाच्या वा एखाद्या मूडच्या भरात त्याच्या हातून हे कृत्य घडलेले असावे, असेच दिसते आहे. आपण सगळेच एकत्र -- एकत्रितपणे जगत असतो, हे लक्षात घेतले तर प्रत्येकालाच कुणी ना कुणी कधी ना कधी माफ केलेले असते. तसेच मीही या घटनेकडे समजुतीने पाहायला हवे, असे मला वाटले. ( २ ) घरातले लोक व जवळचे नातेवाईक यांचे म्हणणे असे पडले की आपण त्या अज्ञात

इसमाशी कायमचे शत्रुत्व घेऊ नये. ते उपद्रवाचे, त्रासाचे आणि खूप वेळ खाणारेही ठरू शकते. शिवाय या कारणाने त्याच्या कूटुंबियांनाही डूःखात पाडू नये, असाही विचार आला. – यांत आणखी अनेक विचारांच्या आणि तत्त्वांच्या शक्यता असू शकतात. तरीही, वरील दोन विचारांचा समावेश करणारा निर्णय आपण घ्यावा, असे मी ठरवले. या बाबतीत माझी कोणतीही तक्रार नसल्याचे मी पोलिसांना लेखी सांगितले.

जगण्यातल्या अनिश्चिततेच्या क्षेत्रातली ही एक अ-बौद्धिक गधडी घटना आहे, असे मला वाटते. जमल्यास त्या इसमाला समजावून, सुधारण्याचा प्रयत्न करून सोडून द्यावे, असेच मला वाटते. कोणताही निर्णय घेताना काही विचार प्राधान्याने महत्वाचे ठरणार आणि काही विचार बेदखल राहणार. माझ्या याही निर्णयात तसे झालेले असणार, त्याबद्दल माझा कोणताही अभिनिवेष वा हट्टाग्रह नाही. काय कसे घडले ते आपल्या फ्रेंडसना सांगावे या हेतूने ही पोस्ट दिलेली आहे.

हे असले प्रश्न नुसते गुन्हा, शिक्षा अशा मार्गाने सुटणार नाहीत, असे मला वाटते. अमुक माणूस वेडा किंवा माथेफिरू होतो त्याला तो एकटाच जबाबदार असतो का ? आपण सगळेच एकमेकांचे समतोल घालवतो आहोत का, याही पद्धतीने याकडे पाहायला हवे. मी हे जे बोलतोय तोही काही अंतिम शहाणपणा असेल, असेही माझे म्हणणे नाही.

--- ००० ---

September 28

नैतिकतेच्या समाजमान्य चौकटीप्रमाणे, ज्याच्याकडून कोणतीही चूक झालेली नाही, असे मन वा माणूस असू शकत नाही ! अपवाद -- ब्रेनडेड !

नैतिक धारणा महत्त्वाची की संविधानिक तरतूद -- असे प्रश्न पुरोगाम्यांनाही पडू शकतात ! तीही माणसेच तर असतात !

यातून अनेक प्रश्न आणि गोंधळ निर्माण होतील -- पण, सध्या एकच बघा --

विवाहबाह्य संबंध हा गुन्हा नाही. ज्याला व्यभिचार म्हटले जाते त्यात बेकायदेशीर काही नाही. म्हणजेच या देशाच्या कायद्याच्या चौकटीतच ते परपुरुष आणि परस्त्री जगत आहेत. तरीही, समजा, पत्नीचे असे वागणे सहन न झाल्याने तिच्या पतीने आत्महत्या केली आणि त्यामुळेच ती आत्महत्या झाली असे पुरावे समोर आले तर तो मात्र त्या पत्नीचा गुन्हा ठरणार -- आत्महत्येला प्रवृत्त करणे -- हा गुन्हा ! आता समजा या गुन्ह्याखाली ती पत्नी गेली आत ( म्हणजे तुरुंगात ) तर त्या बिचाऱ्या परपुरुषावर अन्याय नाही होणार ?

सगळे कायदेशीर असूनही प्रेमाला मुकायची शिक्षा त्याला का म्हणून व्हावी ? आणि अशी त्याची परस्त्री शिक्षा होऊन दुरावल्याचे सहन न होऊन त्याने आत्महत्या केली आणि आत्महत्येचे तेच कारण लिहून ठेवले तर जबाबदार कोण ?

" त्यांच्यांत सुंदर, गोड असे एक व्यभिचाराचे नाते होते ! " -- असे वाक्य लिहिणे यापुढे लेखकांना शक्य होईल !

' व्यभिचार ' या शब्दातला निषेधात्मक अर्थ आता रद्द -- आता तो फक्त एक साधा वर्णनात्मक शब्द राहील !

नैतिक कल्पना आणि घटनात्मक स्वातंत्र्य यांच्यांत टक्कर होणे, ही मानवी जगण्यातली ऍब्सर्डिटी म्हणजे असंगती वा निर्बुद्धता आहे !

निमित्त काहीही असू शकते पण माझी कविता एखाद्या व्यक्तीवर वा अनुभवावर नसते. लिहिताना कोणतेही अनुभवकण एकत्र येत असतात.

आय आय टी, पवईला होणाऱ्या बायॉलॉजिकल इंजिनियरिंग सोसायटी कॉन्फरन्स साठी भारतातून निवडल्या गेलेल्या दहा विद्यार्थ्यांत एक माझी नात ( मुलीची मुलगी ) दुर्गा पारखी आहे ! ती एक प्रचंड मेहनती आणि अतिहुशार मुलगी आहे ! आम्ही आनंदाने चिह्लीपिह्ली झालोय !

मनाच्या अतिसूक्ष्म हालचाली जर दिसू-जाणवू लागल्या तर एका क्षणी हळूच तुम्ही मनापासून मुक्त होता !

हवे असेल तेव्हा स्वीकारले जाते
आणि
नको असेल तेव्हा दूषणे दिली जातात !

तुझ्यासाठी आणि तुझ्यामुळे
हरेक दिवस खास दिवस
सूर्योदयानंतर
उलगडत जाणाऱ्या मनासारखा

आणि तू तर अष्टभुजा

निर्विकार आणि भयप्रद
कारण निवाडा करण्याची
तुझी व्यवस्थाच अनाकलनीय

विकारी असणे हेच पाप
की फक्त काही विकारच पाप
हे माहीत नसल्याने
तुझे आकार जाणवणेही पाप वाटते

तुझी शक्ती इतकी
अमोघ असल्यावर कशाला हवेत
तुला आठ हात – साध्या नॉर्मल
शरीरानेही तू करू शकशील घात

तुझे डोळे प्रेमळ की रागीट
तुझी हत्यारे संरक्षक की विध्वंसक
तुझे अलंकार आकर्षक की तपोभंगवाले
हे काहीच न समजणारा धर्म नको

साध्या आकर्षणाला निष्पाप समजून
दाद दे प्रतिसाद दे आणि मग हवे तर
शिक्षा म्हणून नष्ट कर
--- ००० ---

नवे संशोधन -- पुरेशी झोप झालीय की नाही ते रक्त-चाचणीवरून कळणार !
काय काय होतील याचे उपयोग ?
( आजचा पुणे लोकसत्ता ).

हळुवारपणे नकळत
पण अस्पष्ट इच्छापूर्वकतेने
आम्ही नेमक्या
योग्य त्याच विमानतळावर पोचलो

दोन पायलट तंबाखू मळत
गप्पा मारत उभे होते
विमान सुटायला अजून वेळ होता

तोवर आम्ही बाहेर जाऊन
ताजमहाल पाहून आलो
येताना पेठा खाल्ला
मग घाईत आलो

तर पायलट म्हणाले चला चला
किती वेळ लावलात विमान लेट झाले ना

हवाई सुंदरीने सर्वांना
ऑक्सिजन मास्कची माहिती दिली
ती काय बोलतेय त्याकडे कुणीच
लक्ष देऊ शकले नाही
इतकी ती सुंदर होती
कशासाठी निर्माण होतात
इतक्या सुंदर गोष्टी कोण जाणे

विमान उडाल्यावर लक्षात आले
आमचे भूतकाळ खालीच राहिले होते
मग आम्ही कोण आहोत
--- ००० ---

नुसतेच दाटून येण्याला काय अर्थ
एक तर पाऊस पडतो वा नाही पडत
झाड काही पावसाला बोलावत नाही
पण तो त्यावर पडला तर ते खुश होते

रेल्वे प्रवासात रात्री सगळे झोपेत असताना
एकच दिवा चालू असतो
आणि प्रेयसीला ते माहीत असते

मनांचे खेळ सरसकट नसतात
प्रत्येक खेळ वेगळा असतो
आणि प्रत्येक खेळाचे नियम वेगळे

सत्य मन कुठे असते
सत्य मनाचा असत्य मनाने
शोध घेण्यापेक्षा
असत्य मनात सहज सामील व्हावे
किंवा
आपल्याला आवडणाऱ्या
असत्य मनाचा शोध घ्यावा

असत्यात जगायचीच फक्त सवय आहे
असत्याचे स्थापत्य वाटल्यास
बदलता येते अन्यथा एखादे हवेसे असत्य
सोडून द्यावे लागते

शेवटी नकाराधिकार प्रेयसीकडेच असतो
भक्त नुसता नामस्मरणात राहतो -- असत्यपणे
--- ००० ---

टप टप टप टप

हे असे सद्भाव

सर्वांसाठी ब्यूटिफुल

दुसऱ्याच्या संदर्भात

नाही होत आपल्यात बदल

तो निरपेक्ष असावा लागतो

घटनांचा हट्टाग्रह

नसेल तर कुणीच

नाही करू शकत मनाला बंदी

मतभेद ओलांडायची खोटी असते

लगेच खरे

प्रेम सुरू होते

कोणतेही ग्रेट काम

आपल्या यशासाठी नाही होत

त्या कामासाठीच ते करावे लागते

किती जणांनी वाचली तुमची कविता

याला काहीही महत्त्व नसते

ती दुसऱ्या एका मनात पोचली की झाले

ओशो म्हणतात

रिकाम्या मनात नसतो सैतान

तो सतत व्यग्र मनात असतो

--- ००० ---

सर्वांचे स्वभाव वेगवेगळे आहेत, हे तर सर्वांनाच समजते हो ! फक्त आपलाच स्वभाव आदर्श आहे, या भ्रमात राहू नये, म्हणजे झाले !

आपल्या समाजात विनोदबुद्धीची कमतरता असल्याने असहनशीलता वाढत आहे -- असे निरीक्षण औरंगाबाद खंडपीठाने अलिकडेच नोंदवले आहे. यावरचा, श्रीकांत बोजेवारांचा एक चांगला लेख -- ' विनोदबुद्धीचे वावडे ' -- हा आजच्या पुणे मटात वाचा.

विनोदाशिवाय दुसरे काही चालतच नाही अशा मराठी माणसाबद्दल हे असे निरीक्षण ? पुरुषाला लुगडे नेसवून यावरही विनोद करून जल्लोषी हसल्याशिवाय आता हा समाज राहणार नाही !

" दैनंदिन व्यापताप आणि ताणतणाव यांनी तू त्रासलेला, थकलेला असतोस -- रात्री थोडी करमणूक घे करून आणि झोप " -- असे पटवून दिला गेलेला हा सुहास्यवीर, अस्मितायुक्त, दुखावल्या जाण्यास सदोदित उद्युक्त अशा भावनांचा, गौरवशाली इतिहासाचा पुरोगामी प्रांत आहे !

उसकी ये हालत ?

मनात उगवेल ते पेरता येईल
हा भ्रम ठरतो समोरची माणसे निघतात
युनोचे प्रतिनिधी मग आपल्याला
मानवी अधिकारांच्या कक्षेतच
उरकावे लागते सगळे बेजान

माझे असे माझे तसे मला
हे नाही आवडत – इथपर्यंत
ठीक एक प्रतिनिधी म्हणून
पण तुम्ही कसे रटाळ आहात
हे भाषण जांभया आणते

भटकी कुत्री पकडा म्हटले तर

विभागप्रमुख युनोच्या कायद्यांची

रिजिडिटी आणि त्याच्या स्वतःच्या

स्वभावाचे अटळ विशेष सांगतो

या जगात एवढी कडक

कोणतीही मानसिक गोष्ट

तुकडे होत विघटित होते हे खरे तर

युनोच्या स्टाफला

माहीत असायला हवे

जाऊ दे म्हणून

आपण देतो सोडून

ज्याचे तो पाहील

असे म्हणून आपण फक्त

आंतरराष्ट्रीय शांतता पाळतो

--- ००० ---

समीक्षक भालचंद्र नेमाडे

-- लेखक – सुधीर रसाळ – पाने ११५ – राजहंस प्रकाशन.

या पुस्तकाचे परीक्षण वा समीक्षण करण्याची माझी कुवत नाही, हे आधीच सांगतो. दोन विद्वानांच्या या लढतीत आपण पडणे म्हणजे आपले हातपाय मोडून घेणे, एवढे मला साहित्यातले समजते. नेमाड्यांच्या विद्वत्तेतल्या त्रुटी, आहे ती विद्वत्ता वकिली पद्धतीने काहीही सिद्ध करण्यासाठी वापरण्याची त्यांची पद्धत आणि तर्कशुद्धतेचा अभाव हा अपशब्द, शेरेबाजी, उपहास आणि उपरोध यांनी भरून काढण्याची त्यांची सवय -- हे सगळे उघडे पाडण्याचे काम या पुस्तकात झालेले आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने, देशीवाद, वैश्विकता, इकडचे वा तिकडचे वाद, मूल्यमापनाची प्रमाणके या विषयांवर आपले काही आकलन मांडावे, या हेतूने ही पोस्ट लिहीत आहे. त्यानंतर, ‘ आहे ऐसा देव ‘ या तुकारामाच्या अभंगाचे जे अर्थ लावले जातात त्याबद्दल थोडे बोलायचे आहे.

माणसांच्या जगण्याचे आणि प्रभावयुक्ततेचे ( conditioning चे ) असंख्य प्रकार आहेत. निरनिराळे देश, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक संचित असे अनेक आयाम त्याला असणार. शिवाय आनुवंशिक वा जनुकीय प्रभावही असणारच. यात आणखी एक

महत्त्वाचा आयाम सामान्यतः विसरला जातो. तो म्हणजे आपल्या अनुभवात वा अभ्यासात नसलेल्या गोष्टींचेही आपल्यावर असणारे प्रभाव. सार्त्रचा किंवा काफ्काचा जगावर प्रभाव आहे असे आपण म्हणतो, त्याचा अर्थ असा असतो की मानवी मनाला कुठेही काहीही जे दिसते, सुचते, भावते, समजते – ते सर्व पूर्ण मानवाला प्रभावित करत असते. सगळीच मने, फक्त मनेच काय, यच्चयावत सर्व वस्तुमात्र सतत एकमेकांवर परिणाम करत असते. या अर्थाने सर्व मानवी मन आणि सर्व जगच एकत्र जगत असते. देशीवादाच्या अंगाने विचार करताना यात जणू अधिक प्रभावी, अधिक मूलभूत काही असते, असे समजून विचार केला जातो. नुसते भारतात म्हटले तरी भौगोलिक प्रचंडतेमुळेही निव्वळ खूप वेगवेगळ्या प्रभावयुक्तता संभवतात. अनेक भाषा, जाती, शहरे, खेडी, गरीब, श्रीमंत असे अनेक नमूने असतात. प्रत्येक व्यक्तीची प्रभावयुक्तता वेगळी असते, हे लक्षात घेतले तर प्रत्येक माणूस हा एक बेट असतो. एका बाजूला तो सामाजिक परिणामांनी बद्धही असतो आणि दुसऱ्या अर्थाने सर्व समाजापासून तुटलेलाही असतो. त्यामुळे, व्यक्तिगत आणि सामाजिक अशा भेदावर आधारित विचार करणे निरुपयोगी असते. तरीही एका एका समूहाचे काही सामान्य गुणधर्म काढून देशीवादाचे बोलणे चालूच ठेवता येते. एक साधी गोष्ट आहे की प्रत्येक माणसाची काही ना काही प्रभावयुक्तता असतेच. ती अमुकच प्रकारची असली पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही. हा आग्रह धरला जाण्यात एक मूलभूत चूक असते ती ही की प्रभावयुक्ततेचेच दर्जे असतात वा अमुक प्रभावयुक्तता अधिक मौल्यवान असते असे समजणे. साहित्याच्या वा कलाकृतीच्या प्रभावयुक्ततेच्या नमून्यातच मूल्यात्मकता दडलेली असते असे समजणे. या मार्गाने मग, लेखक ग्रामीण आहे की शहरी आहे, खालच्या वर्गातला आहे की वरच्या – एवढे पाहूनच प्रमाणपत्रे वितरित केली जाऊ शकतात. कोणत्याही काळात काय किंवा आता तर जागतिकिकरणानंतरच्या काळात विशेषत्वाने काय, लेखक कशा, कोणत्या प्रभावयुक्ततेने लिहील हे सांगता येणार नाही. प्रभावयुक्ततेच्या नमून्यात मूल्य असते ही कल्पना सोडून देणे हे महत्वाचे आहे. ती चूक सुधारली नाही तर समीक्षेचे क्षेत्र कायमच खुजे आणि गोंधळलेले राहील.

आता वैश्विकतेचा मुद्दा पाहू. कोणताही लेखक, त्याची प्रभावयुक्तता व्यक्त करणे एवढेच काम करत असेल तर तो वाचकांना पोचणे अवघड होईल. त्याने कथनात्मक, निवेदनात्मक, करमणुकीचे असे क्षेत्र निवडले तर कदाचित जमून जाईल. यातली मुख्य गोष्ट ही आहे की प्रभावयुक्तता कोणतीही, कशीही असली तरी मनाचा वापर होण्याची पद्धत जगभर एकच आहे. राग, लोभ, सूड, सुखेच्छा, वर्चस्वाची इच्छा – हे सगळीकडे तेच तसेच असते. कोणत्याही साहित्यकृतीच्या संपर्कात येताना त्या त्या लेखकाच्या प्रभावयुक्ततेत असणारे तपशीलांचे वेगळेपण समजून घ्यावेच लागते. परदेशांतल्या साहित्यासाठी कदाचित अधिक परिश्रम घ्यावे लागतील. आणि इतके करूनही ती प्रभावयुक्तता, तिचा पोत, तिचा दाह, पेच हे सगळे पूर्ण समजेलच, असे नाही. मग, महत्वाचे काय असते ? मानवी मनाच्या वागणुकीने निर्माण होणारे असंख्य गुंते आणि त्यांचे परिपूर्ण भान व्यक्त होणे. कोणत्याही प्रभावयुक्ततेत वैश्विकता नसते तर ती या समावेशक भानात असते. कारण ते भान, प्रभावयुक्तता कशीही असली तरी पूर्ण मानवी जगण्यालाच प्रस्तुत असते. ते भान प्रभावयुक्ततेचा भाग नसून प्रभावयुक्ततेच्या निरपेक्ष असते.

थोडक्यात लिहायचे म्हटले तरी बरेच झाले. आता फक्त तुकारामाच्या एका विवाद्य अभंगाबद्दल बोलू या. त्यातल्या पहिल्या दोन ओळी अशा आहेत --

आहे ऐसा देव वदवावी वाणी ।

नाही ऐसा मनी अनुभवावा ।।

-- या ओळींचा आधार घेऊन नेमाडे, तुकारामाने निरीश्वरवादही व्यक्त केला होता, असे म्हणतात. आणखी एक विद्वान डॉ. आ. ह. साळुंखे तर तुकाराम नास्तिकच होता हे सांगण्यासाठी या ओळी वापरत असल्याचे वाचले होते. या दोन ओळींमुळेच अनेकांचा घोटाळा होतो, असे दिसते. याबद्दल मला काय वाटते, ते सांगतो. ‘ असणे ‘ ही होकारात्मक अभिव्यक्ती आहे आणि ‘ नसणे ‘ ही नकारात्मक. देव आहे असे जरी आपण होकारात्मक म्हणत असलो तरी त्याचे प्रत्यक्ष अस्तित्व नकारात्मक आहे. ‘ रिकामीक ‘ आहे. ‘ तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ‘, ‘ मजहून नष्ट आहे ऐसा कोण ‘, ‘ अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ‘, ‘ मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ‘, ‘ तुका म्हणे पोते । देवे भरिले नव्हे रिते ‘, ‘ देह निवेदुनि पायीं । जालों रिकामा उतराई ।। ‘ – असे बरेच सापडेल. जे कृष्णमूर्ती, ओशो वा आणखीही काही संत या रिकामेपणाबद्दल ( emptiness ) बोलतात. सारांश, हा निरीश्वरवाद नसून ‘ देव ‘ या शुद्ध अनुभूतीचे हे वर्णन आहे. हे लक्षात घेऊन या अभंगाच्या पुढील ओळींचा अर्थ लावला पाहिजे.

धन्यवाद !

--- ००० ---

काहीजणांच्या मागणीवरून, नवरात्रीचे पावित्र्य भंग पावू नये म्हणून, एका सिनेमाचे नाव बदलून ' लवरात्री ' ऐवजी ' लवयात्री ' केले !

एक होता प्रियकर

एक होती प्रेयसी

दोघांच्याही प्रतिमा

एकमेकींवर प्रेम करत

एकमेकींना सुख देतघेत

प्रतिमाच भेटत -- त्यांना वाटे

राम हमारा जप करे

हम बैठे आराम

एकमेकींच्या आवडीनिवडी

त्या संभाळत आणि महत्त्व देत

सुखाला

प्रतिमा खुश धुंदीत मग्न राहात प्रेमात

एकमेकींच्या तत्त्वांचे प्रश्न आले
तेव्हा प्रतिमा विचारात पडल्या
समोरच्या प्रतिमेला
तडा तर नाही जाणार
या विचाराने गांगरल्या

सुखासाठी तत्त्वे पाळायचे ठरले
प्रतिमा कोमेजू लागल्या
तत्त्वे तरारू लागली
पण प्रतिमांशिवाय
ती जगणारच कशी
असा प्रश्न आला
--- ००० ---

ही एक परीकथाच आहे
अचानक अज्ञातातून सुरू झालेली
पण प्रत्यक्ष आता तर
हातही हातात घेता येईल अशी
अगदी जवळ इंद्रियगम्य

तीही गुंतते माझ्या घटनांत
माझ्या शब्दांत
आणि मी ताणलेल्या सस्पेन्समध्ये
पुढच्या क्षणी कसा होईल स्पर्श
तिच्या मनाला याच्या

तिलाही मी खरा वाटत असणार
कारण तिचा रस्ता बदलून
ती सहज सामील होते
माझ्या कथेत

पृथ्वीवर ठेवतात
या दोन्ही कथा विश्वास
त्यांना आहे या सहवासात
यथेच्छ जगता यावे म्हणून

ठरवले की लगेच परी
झोपू शकते हवा तसा परिपूर्ण
निरोप देऊन माझ्या कथेला
जागे होताच पुन्हा
इंद्रियगम्य होण्याचे मान्य करून
निष्पापपणे शांत
--- ००० ---

नेमाड्यांच्या समीक्षेचा अत्यंत संयत, तर्कशुद्ध भाषेत चक्काचूर करणारे सुधीर रसाळांचे पुस्तक वाचतोय -- नंतर लिहीनच --

रामचंद्र कदम या आपल्या मित्राची खूप दिवसांनंतर आलेली उत्तम कविता ---

चं.प्रं.च्या प्रेमळ आग्रहाला "बळी" पडून खूप दिवसानी एक कविता लिहिलीय.. " निसर्ग". आपलं शरीर कधीच असू शकत नाही समांतर शरीराबाहेरच्या कुठल्याही व्यवस्थेला;. निसर्गा,तूच समजावलेस मला तुझ्या विस्कळीत फांद्यानी. आपण दोघं मिळूनच शोधली होती. माझ्या पौगंडी लैंगिकतेची भाषा;तिच्या सतत नवीन आवृत्त्या. तूच सावरला होतास पदोपदी. माझ्या द्विपाद चालीचा असमतोल;. उभ्या करून भोवती भूगामी पारंब्या. तुझ्या पुरातनतेने कैकदा उद्दीपित केले माझ्यात. नैतिक रक्ताभिसरण. मी पहात आलोय तुझ्या बिनशरीराचे वेडसर अवयव. मी मान्य करतो माझ्यातील निसर्गाचे अष्टांगवक्र शरीरसौष्ठव!
-- रामचंद्र कदम.

काही कविता साध्या जगण्याच्याही -- जगण्यातली मजा म्हणून --

उडत्या गाण्याने
साध्यच नाही होणार
रागदारीच हवी
दरबारी

सारखी खळबळ नको
शांतता हवी धीर हवा
जाळ्याला

हळूहळू चढणारी
उच्च धुंदी
प्रेम
--- ००० ---

दुतर्फी आसक्ती होती
प्रचंड सुखदायक
पण स्वतःच्या आणि इतरांच्या
मताप्रथांचे अडथळे होते
कधी दुतर्फी कधी एकतर्फी मान्य

तीव्रतेने उद्युक्त करणारे
सूर्योदय येत आणि जात

कधीतरी एखादी जलवाहिनी फुटे
तिचे उंचच उंच कारंजे पाहात
वा त्या दृश्याच्या आठवणीत

सूर्योदय येत आणि जात

--- ००० ---

काहीतरी चूक होती
गियर बदलून तोच प्रवास
चालू ठेवला तर आकाशात
ढग जमू लागले फिकट रंगांचे
आणि घडू लागली त्यांची अमूर्त चित्रे

झाडाच्या फांदीवर बसलेले नरमादी
पक्षी भडक रंगांतले आणि ही चित्रे
यांचा काय असेल संबंध --
इथे हे अमुक असे न कळताही
कुठला हा सनसनाटीपणा

यांचा अर्थ जाणवणारा
या पृथ्वीवर मी एकटाच
हे समजून मी वर्षाव झेलत होतो

पण किती चालेल हे असे
पूर्णता म्हणजे काय

या प्रश्नांतली अधीरता
ढगांना कळली
ते एकवटू लागले
त्यांनाही नकळत
आणि तयार झाले एकच
पूर्ण उत्तराचे चित्र

ही माझ्या कल्पकतेची कमाल होती
समाधानाचा परमोच्च बिंदू अमूर्त

--- ००० ---

Obviously, the less one interferes with the internal organism, the better; the less the mind takes charge of the organism, the more healthy and natural is its function.

-- J. krishnamurti.

हे तर स्पष्टच आहे की अंतर्गत शरीरयंत्रणेच्या बाबतीत आपला जितका कमी हस्तक्षेप असेल तितके चांगले. त्या यंत्रणेचा मनाने जितका कमीत कमी ताबा घ्यावा तितकी ती यंत्रणा, तिच्या कार्यात अधिक आरोग्यमय आणि नैसर्गिक राहील.

-- जे. कृष्णमूर्ती.

पाऊस नवा असला
तरी सहजच होता थेंब न थेंब
सहज अधिकाराचा
न सांगता न दिसता
पंखांवर उडतानाही
सर्वस्व उधळल्याप्रमाणे

प्रत्येक आघात
मनच तयार करते
हे समजून
मनच देऊन टाकावे प्रियेला
आणि तिच्या इच्छेवर सोडून द्यावे
ऑफीसकाम इतर रूटीन
आणि सर्व उत्तेजनेचे

सर्व संवाद झाल्यावरही
पानांवरून टपकत राहणारे थेंब

व्यापतात पूर्ण रात्र
जणू हेही जाणून असल्याप्रमाणे

काही शब्द इकडेतिकडे
चुकलेमाकलेही होते
उगीचच आक्रमक वा अधीर

आता काहीच फरक नाही पडणार
शब्दांनंतरची शांतता
व्यापून आहे देह आणि देहबाह्य
सर्वच समजून
--- ००० ---

घरोघरी डाफराडाफरी

गणेशागमनघरांमध्ये आज सर्व कर्ते मेन रोलमध्ये असतात ! पूजेच्या तयारीतल्या त्रुटींबद्दल आणि गैरसोयींबद्दल ते घरातल्या नववस्त्रपरिधानित स्त्रियांवर सतत डाफरत असतात -- त्या स्त्रिया एक तर खट्टू होत असतात किंवा अधिक मोठ्या आवाजात उत्तरे देत असतात !

प्राणप्रतिष्ठित गणेश आपापल्या मूर्तींत तटस्थ असतात !

ॲंटिबायोटिक्सच्या भरमसाट माऱ्यामुळे एकदा जे. कृष्णमूर्ती पॅरालाईज ( बधीर ) होऊन गेले होते -- पूर्ण एक महिना सर्वच बाबतीत परावलंबी झाले होते. हे सांगताना मधेच ते म्हणाले की मला तुमची सहानुभूती नको आहे -- तुमचे पैसे तर मुळीच नको आहेत --

मग, ' आजारपण ' या विषयावर ते पुढे बोलू लागले --

एका ढोलपथकात फक्त ५२ ढोल अलौड -- आमची पथकेच तीन असतील तर ?

Ravindra Damodar Lakhe यांनी काल एक फार महत्त्वाचे काम केले ! आमचा दोघांचाही अत्यंत आवडता कवी शोधून काढला ! रामचंद्र वामन कदम ! वस्तुतः माझे ५००० पूर्ण झालेले असूनही काल आकडा ४९९९ वर आलेला होता, त्यामुळे, कदमांची फ्रेंड रिक्वेस्ट मला लगेच स्वीकारता आली. मी आनंदात आहे !

गेली कित्येक वर्षे हे सज्जन फारसे काही लिहीत नाही आहेत. आपल्या प्रेमाचा दबाव टाकून त्यांना पुन्हा कविता लिहायला प्रवृत्त करायचा विचार आहे. कृपया एक लक्षात घ्या -- या फेसबुकच्या आखाड्यात दोन देणे आणि दोन घेणे याला आपण सरावलेले आणि चटावलेलेही आहोत. कदम बहुधा नवीनच इथे आलेले असावेत. आपल्यांत जातिवंत समीक्षक आणि न्यायमूर्ती बरेच आहेत, हे मान्य -- पण, कदमांना जरा लिहू द्या -- इथल्या ' उजेडाला ' त्यांचे डोळे जरा सरावू द्या. निकाल लावण्याची घाई नको !

अजूनही प्रत्यक्ष भेट न झालेल्या माझ्या या जुन्या मित्राचे आणि मराठीतल्या एका महत्त्वाच्या कवीचे मी अत्यंत दिलखुलास हार्दिक स्वागत करत आहे !

Ramchandra Kadam

--- ००० ---

माझ्या विश्रांतीत मी
मला नष्ट करतो
म्हणजेच तुम्हालाही
-- मी आता परका दिसतो
आणि तुम्ही अनोळखी

तुम्ही घट्ट धरून ठेवलेले
तुमचे सातत्य
आता माझ्या लेखी
वितळून गेलेले

तुमच्या जुन्या प्रतिमेवर आधारित
कसा वागणार मी आता
आता आपला संबंध

एकमेकांत मिसळून गेलेला

इथेच मी घाबरतो
मला वाटते माझ्या अशा असण्याला
तुम्ही घाबराल
आणि निष्कारण होईल
विस्कटाविस्कटी

त्यामुळे मी तो नाद सोडून
पटकन येतो मूळ पदावर
आणि होऊ देतो घर्षण
आपल्या भूतकाळांचे
आणि विस्कटू देतो आपले जगणे
सुरक्षितपणे
--- ००० ---

जे चाललेय ते नीट चालावे एवढ्याच हेतूने बोलतोय -- राग मानू नये -- " महागाई कमी -- झालीच पाहिजे " ही घोषणा देताना सगळ्यांनी हात वरून खाली आणावेत -- हात खालून वर नेल्यामुळे, महागाई अजून वाढली पाहिजे, असे दिसतेय ते --

मुख्य आव्हानांबद्दल बोला -- लहानपणी तुम्ही कसे ढ होता हे सांगण्यात वेळ नका घालवू --

अतुल पेठे

हा माझा मित्र एक उत्तम दिग्दर्शक असून त्याने दोनदा दिग्दर्शित केलेले बेकेटचे ' वेटिंग फॉर गोदो ' मी पाहिलेले आहे. ते त्याचे अतिशय प्रगल्भतेचे काम म्हणून माझ्या लक्षात आहे. ' रंगवाचा ' च्या ऑगस्ट २०१८ च्या अंकात अतुलचा अभिनेत्यांशी ' नाट्यसंवाद ' आलेला आहे. अभिनयाच्या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांसाठी धर्मलेखच ठरावा असा हा लेख आहे. सर्वच नाट्यकर्मींनी वाचावा असा हा एक मौल्यवान लेख आहे.

नाट्यशिबिरे घेणाऱ्यांना आणि सर्वच नाट्यकर्मींना अत्यंत उद्बोधक ठरू शकणारा हा लेख लिहून अतुलने एक महत्त्वाचे काम केलेले आहे !

--- ००० ---

धर्माच्या बाबतीत मी अनाक्रमक, अहिंसक आणि सहिष्णू आहे पण देशाच्या बाबतीत नाही – कुणाचीही धमकी वा आक्रमण देशाने खपवून घेताच कामा नये.

भाषेच्या बाबतीत मी अनाक्रमक, अहिंसक आणि सहिष्णू आहे पण विचारसरणीच्या बाबतीत मी तसा नाही.

मला पटणाऱ्या विचारसरणीतले मला आवडणाऱ्या छटेचेच लोक अधिक चांगले, असे मला वाटते.

मला सगळ्यांशी प्रेमाने आणि सहानुभूतीने वागायला आवडते पण तसे ज्यांना आवडत नाही त्यांचा मला संताप येतो.

असा थोडाफार गोंधळ सगळ्यांच्याच मनांत असतो, हे मला समजते तरीही माझा गोंधळच त्यांतल्या त्यांत सर्वांच्या हिताचा आहे, असे मला वाटते.

बलात्कारी, अतिरेकी आणि देशद्रोही यांना माफ करताच कामा नये, असेच माझे मत आहे.

सत्ता मग ती कोणतीही असो, ती न्यायी असूच शकत नाही आणि ती विरोधी मतांच्या लोकांशी प्रेमाने वागूच शकत नाही, हे मला समजते पण तरीही त्यांतल्या त्यांत कुणाकडून अन्याय झालेला चालेल, हे बघावेच लागते.

मी प्रेमळ आहे तसेच सर्वजण प्रेमळच असावेत, असे मला वाटते.

मला अपमान, पराभव हे दुःखकारकच वाटतात पण सूड घ्यावा की नाही यावर माझे निश्चित मत नसते. संदर्भ पाहून आणि फायदातोटा पाहून सूडभावनाही कधी कधी मला योग्य वाटते.

व्यक्तिगत पातळीवर माझे सगळेच संबंध संघर्षमय असतात – हा एक मला मानवी जगण्याचा अटळ असा भागच वाटतो.

काय चूक आहे यात ?

( कृपया, हे माझे व्यक्तिगत निवेदन समजू नये, ही विनंती. )

अलगतावाद, संघटन आणि संघर्ष या मार्गाने गेल्यामुळे, माणूस बदलण्याच्या बाबतीत, धर्म आणि राजकारण हे अपयशी झालेले आहेत. मौल्यवान कला या मार्गाने जात नाही. त्यामुळे, आता कलाच काही करू शकेल.

तशा आम्ही सद्भावना बाळगतो
जशा वाटाण्याच्या अक्षता
कारण दुष्टाव्याचे कारणच नसलेले
जरीचे नक्षीकाम असते मध्यस्थ

उरलेसुरले श्रेय जनतेत वाटून
तो मोठा होतो मी मात्र
साधा भांगही न पाडता
सामील होतो मिरवणुकीत

पण जज अजून आलेलेच नाहीत
त्यांच्या कारचे टायर पंक्चर
झाल्याचे कळतेय तूर्तास
घड्याळ बंदच ठेवायचे ठरलेय

धीर धरता यावा म्हणून
त्याने पक्षी पाळले आणि मी
पोचलो रस्त्यांवरून भटकत
सार्वजनिक बागेत विनाबाक

आयुष्याचा अर्थबिर्थ गेला तेल लावत
असे म्हणत जज अवतरले
त्यांचा त्रासिकपणा पाहून आम्ही
वाईट न वाटून घेण्याचे ठरवले

मग कितीही होऊ दे उशीर
चिंता नको पाहू वाट
किती रे न म्हणता वाट लागली तरी

--- ००० ---

एकत्र व्हा, लढा असे जितके म्हणावे तितके परिवर्तनविरोधी शक्ती एकत्र येतात, त्याच संयुक्त फळ्या बांधतात. ह्या परिस्थितीत काय करावे ?

-- गो. पु. देशपांडे, ' प्रिय रसिक ' ऑगस्ट २०१८.

माझी प्रतिमा फायनल
इतर सर्व प्रतिमा
नष्ट होवोत

इतर सर्व प्रतिमा
नष्ट झाल्या तर
माझी प्रतिमा

कशासाठी जगेल
कुणासमोर
घर्षणाशिवाय

इतर सर्व प्रतिमा
माझ्या शत्रूच आहेत
पण अत्यावश्यक आहेत

माझ्या प्रतिमेच्या सत्याला
त्या सर्व निष्कारण
माझ्या शत्रू असल्या तरी

त्यांच्याही जगण्याला
माझा हातभार
आम्ही सर्वच आश्रयदात्या

एखाद्या प्रतिमेला
मी देऊ करतो माझी प्रतिमा
त्यागाचे सुख घेत
--- ००० ---

" आमचे घराणेच शिक्षकी पेशाचे असल्याने आम्हाला काही येत नसले तरी लोकांना आम्ही शिकवतो ! "
-- माझे कै. काका.

" टीचरला मास्तर न म्हणता, कृपया, शिक्षक म्हणा ! "
-- एक शिक्षक.

दहिहंडीसाठी मोठमोठे मंच तर उभारलेले होतेच, पण, यंदा रोषणाई प्रचंड वाढलेली दिसली ! प्रकाशाचाही गोंगाट होता !

काही माणसे एखाद्या समारंभ-मूडमध्ये उत्साहाचे प्रमाण मानसिक विकृती वाटावी इतके वाढवतात, तसे दिसताहेत आज कावळे, कबुतरे, पोपट -- स्वच्छ उन्हामुळे !

' तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य '

जयंत पवार यांची उत्तम कथा आणि अतुल पेठे यांचे उत्तम अभिवाचन ! मधे मधे आवश्यक तेवढे संगीत आणि प्रकाशाचे पूरक परिणाम ! एखादे पूर्ण नाटकच पाहिल्यासारखे वाटले !

रहस्यकथेप्रमाणेच जगण्यातही आपली तर्कावर फार भिस्त असते. सापडणारी, खोटी पडणारी आणि खरोखरची सत्ये अशा तर्कसंगती उलट्यापालट्या करणारी असतात -- हा अतिमहत्त्वाचा आणि अमर्याद आशय ही कथा देते. सत्य तर्कसंगत नसेल तर त्याचा उपयोगच काय ? -- हा एक गहन आणि उपरोधिक प्रश्न ही कथा आपल्यासमोर मांडते !

असेच एक तर्कविसंगत सत्य आल्बेर कामूच्या ' आऊटसायडर ' मध्ये होते, ते आठवले. अमुक माणसाच्या हातातल्या सुऱ्यावर सूर्यकिरण पडल्याने त्याची तिरीप नायकाच्या डोळ्यांवर आली, त्यामुळे त्याच्या हातातल्या पिस्तूलातून गोळी सुटून त्या माणसाचा मृत्यू झाला ! पण, लोक निरनिराळ्या साक्षी देऊन त्याला फाशीच्या शिक्षेपर्यंत पोचवतात !

जगण्यातली अनिश्चितता, तर्कसंगत असण्याची सततची गरज आणि निरर्थकताही -- हे सगळे या अभिवाचनातून पोचले !

अतुल पेठे आणि टीमचे अभिनंदन !

सदर प्रयोग हा भरत नाट्यमंदिरला १२४ वर्षे पूर्ण होऊन १२५ व्या वर्षात साजऱ्या होणाऱ्या अनेक कार्यक्रमांची सुरुवात म्हणून आयोजित झालेला होता. भरतने असंख्य स्पर्धा आणि असंख्य कलाकार यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिलेले आहे आणि देत आहे -- हे नाट्यतीर्थक्षेत्रच आहे ! त्यांना शुभेच्छा !

--- ००० ---

" भव्य महिला दहिहंडी महोत्सव ! "

१ आजच्या मटा पुणे प्लस पान ८ वर, ' गली गुलियां ' या सिनेमातल्या आजारी माणसाच्या अभिनयासाठी, खरोखरच आजारी पडायचा धोका पत्करून, मनोज वाजपेयीने वजन कसे बरेच कमी केले ते आलेले आहे.

२ अशोक कुमारला एकदा आजारी माणसाचा घोगरा आवाज हवा होता तर त्याने -- गरम कॉफी प्यायची आणि त्यावर बर्फ खायचा -- असे काही वेळा केले होते.

३ कमलाकर नाडकर्णींच्या एका लेखात वाचले होते की एका नटाला, पळत येऊन धापा टाकत तो काही बोलतो, असे दृश्य द्यायचे होते -- तर रीटेकची गरज पडली की तो पुन्हा लांब जाऊन पळत येई आणि धापा टाकत बोले -- तेव्हा त्याला कुणीतरी सांगितले की अरे, तू प्रत्येक वेळी पळत कशाला येतोस -- धापा टाकत बोलल्याचा अभिनय कर ना !

४ बेन किंग्सलेने गांधींची भूमिका करताना अशीच काही शारीरिक तयारी केली होती, असे ऐकिवात आहे.

अशा प्रयत्नांना अभिनय म्हणावे की खऱ्या गोष्टींना अभिनय म्हणून खपवणे म्हणावे ? काही तयारी लागतही असेल, पण, खरेच आजारी पडायचे आणि खऱ्याच प्राणपणाने धापा टाकायच्या ?

मी टीव्ही मालिकांच्या फंदात फारसा पडत नाही. तरीही घरात दोनतीन मालिकांचे वेगवेगळे शौकीन असल्याने त्या तीन मालिका घरात लावल्या जातात. मी, कधी जेवायला वाढणे चालू असते तेव्हा किंवा कधी सहजही कुणाशी काही बोलण्यासाठी हॉलमधे बसलेलो असताना, तेव्हा जे चालू असेल ते पाहतो. त्यामुळे, या जगात काय चाललेय याची मला थोडी कल्पना असते.

' माझ्या नवऱ्याची बायको ' या मालिकेत शनाया म्हणून रसिका सुनील अत्युत्तम काम करत होती. ती आता अमेरिकेला जात असून तिच्या जागी नवीन शनाया येणार, असे गेले ८-१० दिवस चालू होते. कोणती अभिनेत्री घेणार हे आव्हान, हा अगदी सनसनाटी प्रश्न झालेला होता ! आज तो नव्या शनायाच्या प्रवेशाचा भाग होणार होता ! ईशा केसकरने ते आव्हान स्वीकारलेले आहे ! ज्या भूमिकेचा इतका जबर पगडा जनमानसावर बसलेला आहे, ती भूमिका स्वीकारणे हे नक्कीच एक वेगळेच दिव्याचे काम आहे ! झाला आज ईशाचा नवी शनाया म्हणून प्रवेश ! गुरुनाथ चकित होत म्हणतो, " शनाया ! " असे, माहीत असले तरी एकदा ठसवले गेले की

बाबा आता ही आहे शनाया आजपासून ! उत्तम ! माझ्या मते ईशाने बाजी मारली ! कुणाला काही, कुणाला काही जरा फरक वाटणारच होते, पण, ईशाचे दृश्य तिने अत्यंत आत्मविश्वासाने केले ! तिच्या वेगळ्या पद्धतीने ती या भूमिकेत काही वेगळे रंग भरेल, हे नक्की !

मालिका ठीक हो पण हे सगळे कलाकार तर मला आपले वाटणारच ना ! त्यामुळे, आजचा हा भाग मीही उत्सुकतेने पाहिला ! नव्या शनायाला पुरेसा ड्रामा आणि वाव या दृश्यात उपलब्ध करून देण्यात आलेला होता. जमेगा !

ईशा केसकरचे अभिनंदन आणि तिला खूप शुभेच्छा !

--- ००० ---

आपलेच कसे बरोबर हे दाखवणारे सगळे एकत्र करत राहा -- तुमचा विरोधकही तेच करेल -- मग दोघेही बोंबलत बसा !

एकाच शक्यतेचे मन
दगडलेले
तडे जाणारे
मनाच्या माथी दगड
असे

दुसरी शक्यता
असंख्य शक्यतांचे
मऊसूत आकाश

मी दोन्ही जाणून
आहे

एक तरी शक्यता
खात्रीची दिसतेच
एकेकाच शक्यतेची
असंख्य मने

दोन्ही माहीत असल्याने

माझे मन नसते

फारसे खात्रिशीर

हमखास उपायाची शक्यता

सांगणारे

तुमचा विश्वास

नाहीच बसणार

कारण मी

एकाच शक्यतेचा नाही

--- ००० ---

आज पुण्यात मस्त खुले आकाश

आणि

सकाळचे कोवळे ऊन !

August 28

काही कारणावरून आठवण झाली -- ५० पूर्ण झाल्यावर व्हीआरेस घेऊन मी नोकरी सोडून दिली होती. नातेवाईक, मित्र, हितचिंतक यांना असे पाऊल धोक्याचे वाटत असताना. माझी व्हीआरेस बहुतेक त्या वेळी अपवादात्मक होती. ४-५ वर्षे अजून नोकरी केली असती तर होऊ शकणारा गोल्डन शेक-हँडचा लाभ दृष्टिपथात होता. नंतर, त्या योजनेत तसा अनेकांचा आर्थिक लाभ झालाही. माझे एक काका कुंडलीतज्ञ होते -- ते ठामपणे म्हणत की तू मधेच नोकरी सोडणे शक्यच नाही -- तू पूर्ण ६० वर्षांपर्यंत करणारच नोकरी ! व्हीआरेससाठी तीन महिने आधी अर्ज द्यावा लागत असे. तसा मी दिला होता. अगदी शेवटच्या दिवसापर्यंत मंजुरी आली नव्हती. अनेक विभागांकडे चौकशी होत असे -- कुठे काही शिस्तभंगाची कारवाई पेंडिंग वा विचारधीन नाही ना, वगैरे पाहून मग मंजुरी मिळे. शेवटी, आमच्या युनियनच्या एका पुढाऱ्याला घेऊन संबंधित अधिकाऱ्याकडे गेलो. नियम असा होता की तीन महिन्यांत मंजुरी न आल्यास ती मंजुरी झाली, असे समजण्यात यावे. तरीही, रीतसर झालेले बरे, हे असतेच. त्या अधिकाऱ्यांना भेटल्यावर चक्रे फिरली आणि अगदी दिवस संपताना टेलेक्सवर मंजुरी आली. नंतर एक सुट्टी होती -- त्यानंतर मला रिलीव्ह करण्यात आले !

युनियन आणि व्यवस्थापन यांच्यात झालेल्या त्या वेळच्या करराप्रमाणे नवीन अटी स्वीकारायच्या की जुन्याच अटी राखायच्या याचे निवडस्वातंत्र्य होते. अनेकांनी नफ्यातोट्याचा विचार करून निर्णय घेतले. मला नवीन अटींतले एक कलम अत्याकर्षक वाटले -- वीस वर्षे नोकरी झाल्यावर ती सोडता येणे ! बास ! त्यावर आधारित मी निर्णय घेऊन टाकला होता ! सोडताना माझी २८ वर्षे नोकरी झालेली होती.

व्हीआरेसनंतर लेखन वगैरे होईलच याची खात्री थोडीच देता येते ? पण, बरेच झाले लिहून. आणि वेबसाईट झाली. कदाचित, भारतातली अशी पहिलीच ! त्या वेबसाईटला शासनाचा पुरस्कारही मिळाला !

पण, शेवटच्या दिवसापर्यंत मंजुरी न येण्याच्या प्रकारामुळे, पुढे कित्येक दिवस, मला नोकरी चालूच ठेवावी लागल्याची स्वप्ने पडत -- कसेबसे वेळेत पोचणे, वगैरे !

आर्थिक नफानुकसान काय ते झाले असेल, पण, निर्णय योग्य होता, असेच आता वाटते !

--- ००० ---

मला ठाऊक आहे
या अंधाऱ्या लाकडावर
कोरता येतात फक्त तेच तेच
जुने समुद्र
कारण शब्दांचा प्रथमवापर
नेहमीच अज्ञात असतो
आज निरर्थक वाटणारे
माझे स्वगत उद्गार सोडता

नजरेसमोर घडलेला
अपघातही काहीच नाही
शिकवू शकत
मेंदूच्या चौकटीत

एका भाषाबाह्य द्रव्याचे

प्रतिबिंब नवे

माझ्या त्याच पुराण्या

डोळ्यांना दिसणारे

मी नुसतेच देतो ठेवून

खिशात -- या गोंगाटमयतेत

त्याला किंमतच नसल्याने

त्या प्रतिबिंबामुळे

शरीरातले ताण जर

नष्ट होताहेत तर

जगातले का नाही होणार

हा विचारही मी देतो

ठेवून खिशात

--- ००० ---

सर्व्हर उडाल्याने हजारो प्रेमालाप

थांबलेली कुंद हवा म्हणते

तरी मी सांगत होते की बाबा

चंगळवाद वाईट

तर एका विद्वानांनी

जागतिकिकरणामुळे

प्रेमप्रकरणांचा रोगट अतिरेक

झाल्याचे सांगितले

आपण वेळीच जागे झालो नाही तर

जलद संपर्कसाधनांत गुंतल्यामुळे

माणसामाणसांतले संवादच बंद पडून

पुन्हा जंगलराज येईल

असेही लेख येत होते

सगळीकडे रोबो आले तर
माणूस गंजून कचरा बनेल
आणि समुद्रातला कचरा
किनाऱ्यांवर परत आल्याने
माणसाची बुद्धिमत्ताच
दिङ्मूढ होऊन प्रलयाची
नुसती वाट पाहात राहील

बेकारीमुळे सगळीकडे
स्फोट घडवणारे अतिरेकी
हीही एक मोठीच समस्या होती

धार्मिक वगैरे कुणी नव्हतेच आता
नास्तिकांचा विजय निश्चित होता
--- ००० ---

26 AUG 2018

श्रावणात असा प्रश्न विचारलेला ज्यांना चालत असेल त्यांनीच फक्त उत्तर द्यावे --

काही हॉटेलांतले चिकन चावून मस्त खाता येते, पण, काही हॉटेलांतले चिकन कितीही चावले तरी रबरासारखे तसेच राहते -- याचे कारण काय असते ? --

१ वापरलेले चिकन शिळे असणे.
२ वापरलेले चिकन जून वयस्कर कोंबडीचे असणे.
३ चिकन नीट शिजवलेले नसणे.

४ की अन्य काही, तेही सांगा.

मसाला, करी सगळे चविष्टच असते -- पण,मुख्य प्रश्न हाच असतो.
तज्ञांनी मत द्यावे.

जरा जास्तच फरक पडतोय हो ! असे नका करू --

१ आजचा पुणे मटा पान ५ वर एक ढळढळीत बातमी आहे की ' गोंदवलेकर महाराजांच्या मंदिरावरून मारली उडी ' -- प्रत्यक्षात खाली, बातमीच्या मजकूरात म्हटलेय की सुमारे चार तास पोलीस आणि नागरिकांना वेठीला धरल्यानंतर तो तरुण खाली उतरला आणि सर्वांचा जीव भांड्यात पडला !

२ आता पुणे लोकसत्तातल्या अग्रलेखाची शीर्ष ओळ बघा -- ती म्हणते, ' चार लाखांचे थकित कर्ज ' आणि लेखाच्या मजकूरावरून दिसते की ते चार लाख कोटी आहेत !

ना माणसाच्या जिवाला किंमत राहिली ना पैशाला, हेच खरे !
-- २७-०८-१८.

सहवासात एकमेकांच्या मेंदूंत सुखाची रसायने झरणे, हेच प्रेम ! याहून जास्त घडते ते गुंतणे आणि गुंता करणे !

हे मनांचे जग आहे. इथे जात धर्म श्रीमंती वय दिसणे विचारसरणी यांचे कोणतेच बंधन नाही ! मुक्त आहे एकूणच पुरेपूर ' मैत्रीत पडणे ' !

लोकांना वेळ नसला तरी प्रत्येकाला आपले म्हणणे तर ऐकले जायला हवेच आहे ! साध्या रूटीन बोलण्यातही आवाज मोठे होताहेत ! गोंगाट होतोय !

डगमगता टांगा जुन्या टपाचा
नंबर उडालेला हडकुळ्या घोड्याचा
खडबडीत रस्त्यावर असे मन
स्वीकारलेला कवी पिचलेल्या चाबकाने
सर्वांच्या भाषा ऐकत
एकटेपणाही स्वीकारतो

लोक म्हणतात की त्याला
स्वतःची ओळखू येणारी
ठसा म्हणावी अशी शैली नाही
भाषेच्या जडणघडणीचे वास
तो विसरलेला असून
त्याचे विदारक अनुभवही
तो सांगत नाही

घोडा हा एक उपरा चेहरा
असतो त्याचा नाइलाजास्तव
त्याशिवाय असंख्य एकट्या माणसांशी
तो संवाद कसा साधणार
हे सर्व ओळखूनच तो
वेगळा राहातो आणि इतरांना
गूढात्म वाटत राहतो

तरीही काही माणसे
त्याच्या कविता वाचतात --
-- कवीला काहीच नको आहे
हे जाणवून त्यांना जाणवते
की या कवितेला वयच नाही

--- ००० ---

रात्रीच्या खिडकीतून दिसते
सराफाचे उत्तुंग दीपचिन्ह
ज्याचे किरण रोजच शहराच्या धमन्यांत
निसर्गदत्त
एक अभिमानास्पद सवय बनून
घरचे लग्न गवताळ मैदानात
करायच्या विचाराला बळ देणारी

सराफ खरा की खोटा हे माहीत नसूनही
दुकान आणि पहारेकरी तर दिसतात
काळाचे प्रतीक असणारे

नीतीअनीतीचे साचे रोज बदलणारे विचार
आणि तरीही ते मोडण्याची सोनेरी स्वप्ने
जरी ती पुरोगाम्यांना न आवडणारी
खोटे वा विश्वासघात आवडत नसल्याने

तिथून जाणाऱ्या हायवेवरून
ओझी वाहणारी वर्षे जात असतात
उन्हापावसातून
युद्ध नको युद्ध नकोच
अशा विचारात

विचार स्वतःच मुळात दुभंगलेले
असतात हे समजत असूनही
सराफ शांतपणे जेवत असतो
आत्मविश्वासाने येणाऱ्या गड्डीवर
आणि हवेलीवर प्रेम अबाधित असल्याच्या
--- ००० ---

" आंब्याच्या झाडाला शेवग्याच्या शेंगा " हे दाखवून देणारा उत्तम नट -- विजय चव्हाण ! स्मृतीस सादर प्रणाम !

सणासुदीत वाढणाऱ्या कामांमुळे लोक त्रासतात -- चिडचिड वाढते !

प्रकाशाचेही विच्छेदन
करणारे आपण लोक
आपल्याला दगड वा फूल
हे तर विश्वासाचे दीपस्तंभच
ज्यांच्या बरोबरच आपण
विक्रेते आणि ग्राहक
रेलचेल करून टाकणारे
भविष्याची

या वस्तू घटना घडवतात
आणि आपणही
आपले हातमोजे सावरत
कधी जिंकत कधी हरत
रक्ताचा रंग पाठ करत
संकटे निर्माण करत
आणि मदतीला धावून जात

इतिहासाचे भोक्ते
होतो आपण कारण
मार्केटचा आलेख
होतो आपला देव

न्यायाची भावना हवीय आपल्याला
घडत राहणारी वस्तुरूप देण्याघेण्याची
घटना म्हणूनच

या गधड्या
वस्तूंच्या आणि घटनांच्या जगात
विच्छेदनयोग्य
--- ००० ---

राग हेही प्रेमाचेच एक रूप असते
म्हणून वाघनखांनी फाडून टाकले
तुझे विचार सतत मनात घुटमळणारे

तुला हे कळणार नव्हतेच
तू असेच समजत असशील
की तीच गोष्ट पुन्हाही घडू शकेल
तेव्हाचा तो होकार पुनरुज्जीवित होईल
किंवा हे काहीच न घडता
हे सर्व विसरून तू वेगळीच
एखादी कविता लिहीत असशील

तुझी शांतता आणि माझी शांतता
वेगवेगळी कशी असेल
ती मिसळलेलीच असणार
एकच म्हणून तुला नकळत

ती शांतता तुला माझी हिंसक
म्हणजे प्रेमळ स्वप्ने पाडत राहील
कधीतरी भेट होईलच
हे दोन्हीकडचे विचार एकच होत

अर्थातच हा बंध
आता तुटणे शक्य नाही

तुझ्या विस्मृतीतही

माझा जागेपणा शिरत राहील

तुझ्यात चलबिचल करत

कारण न कळता

--- ००० ---

तिचा चेहरा सोज्वळ वाटत असल्याने तिला नकारात्मक भूमिका साकारायला मिळालेली नाही, अशी खंत एका अभिनेत्रीने व्यक्त केली आहे !

तिच्या आयुष्यात तिच्यापेक्षा

तेच जगत खरे तर मालिकांतले

स्त्रीपुरुष -- दिवसभर --

ती त्यांच्याच विचारांत राही

मैत्रिणींशी डिसकस करे

त्यांचेच प्रॉब्लेम्स

काही मैत्रिणी उगीचच

रोजच्या रूटीन कंटाळवाण्या

प्रॉब्लेम्सवर बोलण्यात

वेळ वाया घालवत

तेव्हा पाण्यातून बाहेर काढलेल्या

मासोळीप्रमाणे ती तडफडे

स्वयंपाक करताना तिला ती

मालिकेतली जबाबदार परिपक्व

आई आठवे आणि ती मनोमन

नतमस्तक होई

आपल्याला उगीचच

हे खरे म्हटल्या जाणाऱ्या
जगातले कृतक जिणे
जगावे लागते म्हणून ती
काही क्षण खिन्न होई
पण लगेचच सावरून ती
चेहऱ्यावर स्मित आणे --

आपल्या कृतक खिन्नतेचे तिला हसू येई

--- ००० ---

मार्ग

माणूस हा एक बुद्धिमान प्राणी आहे. निदान भारतात तरी याबद्दल कुणी शंका घेऊ नये. इथे कोणत्याही समस्येतून मार्ग निघतोच. आताही, " निघेल काही मार्ग " असे म्हणायची वेळ आलेलीच आहे. जे अधिकारी बेकायदेशीर मंडपांना परवानगी देतील त्यांच्यावर कारवाई करावी, असे आता नवीन आदेश आहेत. करावे काय ?

१ अधिकाऱ्यांनी चुकीची परवानगी द्यायचीच नाही आणि योग्य तितकीच परवानगी द्यायची. कायद्यात बसत नसेल तिथे परवानगी नाकारायची.
२ उत्सव मंडळांनी नेहमीप्रमाणे अर्ज करायचे -- परवानगी कशीही मिळो वा न मिळो.
३ पुढाऱ्यांनी मंडळांना सांगायचे की बिनधास्त चालू द्या सगळे -- अजिबात डोंट वरी !

कुणी तक्रार करायची हिंमत केली तरच प्रश्न येणार. अधिकारी सहीसलामत राहतील. पुढारी तर नेहमीच सहीसलामत असतात ! मग, यावर असा एक खोडा निघेल की भरारी पथके नेमा -- बेकायदेशीर मंडपांवर त्यांनी केसेस केल्या पाहिजेत -- न केल्यास त्या पथकांवर कारवाई करावी ! इथेही, इतर कुणाची तक्रार आली तरच प्रश्न येणार. नेमके तिकडेच हे भरारी पथक गेले नव्हते, असे म्हणता येईल -- किंवा तिथे मंडप नव्हताच, असे म्हणायला शंभर साक्षीदार उभे करता येतील ! सारांश, कुणालाही त्रास न होता ' मार्ग ' निघू शकेल ! मुळात, तक्रार करायची हिंमतच होऊ नये कुणाची हेच कडकपणे बघायचे !

यंदा मेट्रोचो कामे चालू आहेत ! प्रचंड प्रमाणात नवी वाहने रस्त्यावर आलेली आहेत ! एरवीच जबरदस्त वाहतूककोंडी होते आहे !

सणासमारंभाचे आनंद द्विगुणितच काय, चौगुणित होणार ! ' मार्ग ' निघतात हो, ती नको चिंता ! आणि अगदी कराव्याच लागल्या समजा काही केसेस तरी उत्सव संपल्यावर त्या मागे घेता येतीलच की !

--- ००० ---

टोळीनेच जगावे लागते -- ही श्रद्धा की अंधश्रद्धा ? आस्तिकांची असो की नास्तिकांची, माणुसकीयुक्त टोळी म्हणजे काय ?

माझा स्वभावच सोडायची वेळ आली
तेव्हा माझ्या घराच्या भिंतींतून
असंख्य बातम्या स्त्रवू लागल्या
त्यांतली पहिली बातमी
तड्यातल्या लीकेजमधून आली
ती म्हणजे ही फक्त एक
चुकीच्या कल्पनेतून आलेली
काळीशार अफवा आहे

सगळे मार्ग धुंडाळून झाल्यावर
आता सुटकाच नाही अशा ठिकाणी
सापडलेले मी एक मांजर आहे
की हरीण की ससा एवढेच आता
स्वभाव तपासून शीर्षबातमी म्हणून
जाहीर करायचे होते कोण काय
म्हणेल याचा विचार न करता

भिंतींचा रंग जुना होता
आणि पाणी मुरून आलेला
वैचारिक गारठाही शून्य झाला होता

या घरात काय चाललेय
हे कुणालाच कळणे शक्य नव्हते

ना खून ना आत्महत्या

हा एकाकीपणा आता असह्य होता
ही बातमी कुठेच नव्हती
फक्त मलाच माहीत असलेली
--- ००० ---

जगातल्या एकूण माणसांमुळेच आपल्या मनाचे त्रासदायक खरचटत राहणे. माणसे थांबवता नाही येणार, मग, खरचटणे ? -- एवढाच प्रश्न !

मानसिक आजार

यापुढे मानसिक आजारांनाही योग्य ते विमासंरक्षण मिळणार आहे. या बाबतीत आजच्या पुणे लोकसत्तामधली पहिल्या पानावरची बातमी बघा. हा एक गंभीर प्रश्न आहे. एकूण जगातच मनोरुग्णांची संख्या वाढत असून भारतात मान्यताप्राप्त म्हणजे नोंदलेले मनोरुग्ण सात कोटी आहेत ! नोंद नसलेले आणखी तिप्पट असतील.

विमासंरक्षण मिळेल, हे चांगलेच आहे, पण, मनोरुग्ण होण्यापूर्वी एक लक्षात ठेवायला हवे की मानसिक रोग हा कायद्यात बसणारा आणि गुन्हेगारीत न येणारा असेल तरच ट्रीटमेंट आणि विमासंरक्षण मिळेल, पण, तसे नसेल तर अर्थातच कायद्याप्रमाणे शिक्षा मिळेल !

ओशोंनी, फाशीच्या शिक्षेला विरोध करताना एका ठिकाणी म्हटले आहे की खून करणाऱ्या गुन्हेगाराला आपण एक कायदेशीर सूड म्हणून फाशीची शिक्षा देतो -- खरे तर त्याला सुधारगृहाची गरज असते !

मी खरेच सांगतोय
जन्मल्यापासून मला खात्रीच होती
की दर शनिवारी मी
मारुतीला जात राहणार
आणि पावसाळा वगैरे येतजात राहिला
तरी काहीच बदलणार नाही

त्याच गरिबीतल्या

उदासीन शांततेसह

बदल जे झाले ते मला

नेहमीच उपरे वाटले

माझ्या मनाच्या आत

स्वीकारले जात राहणारे

नगण्य दगड नुसते

माझ्या सुप्त मनात खोलवर

पक्के ठरलेलेच होते

कायमचे न बदलणे

उर्वरित विचारांना

उपरे घुसखोर समजत

ते विचार ढगांसारखे येत

साठून राहून घरचेच होत

माझे सखोल केंद्र त्यांना न्याय देई

ते विचारही मग

त्यांचा उपरेपणा सोडून

विनातक्रार मारुतीला येत राहात

--- ००० ---

पटपट खाली पडल्या चिमण्या

टपटप फुलांप्रमाणे

अचानक झालेल्या सूर्योदयाचा धक्का

सहन न झाल्याने --

विस्तवाशी खेळताना

पराभव मुळीच नको मनात
हे जाणकारांचे सल्ले

हरवलेल्या पालकांप्रमाणेच
विस्मृतीत गेल्यामुळेही

उधारउसनवार सगळे जगणे
संपले तर संपले
असे तर कुणीही म्हणू शकते
पिंजारलेले जग
कुणालाही अडवत नाही

असे का घडावे
या प्रश्नाने
माणसे झाली चिंताग्रस्त
मग बोलावले तरी कशाला
असे म्हणत भर कार्यातून
परतायचे विचार बळावू लागले

काहीही घडण्याला काहीही अर्थ नाही
असे जरी कळायचे म्हटले तरी
त्यासाठी काय घडावे लागेल
कोण जाणे -- असे झाले

--- ००० ---

जातिधर्मभाषाभूगोलअन्नजनुकपरिस्थिती अशा सर्व प्रभावांनी बद्ध असतो विचार -- संघर्ष अटळ -- मग, विचारस्वातंत्र्य म्हणजे काय ?

Any movement of thought will only breed further disorder. Then you will ask, how thought is to come to an end, who is to bring to a stop this perpetual motion that is going on night and day ?

THOUGHT ITSELF MUST DENY ITSELF. Thought itself sees what it is doing -- right ? -- and therefore thought itself realizes that it has to come of itself to an end. There is no other factor than itself. Therefore when thought realizes that whatever it does, any movement that it makes, is disorder ( we are taking that as an example ), then there is silence. The nature of the change from disorder is silence.

-- J. KRISHNAMURT -- ' You are the world ' -- Page 117-8. )

स्थगित ठेवलेय का ?
की कॅन्सलच करू ?
की वाट पाहणे चाललेय दुतर्फी
योग्य क्षण येण्याची ?
पण होकारात्मक तर होतेच ना ?
की पुढाकाराचा संकोच म्हणावा ?
की मानापमानाचा प्रॉब्लेम ?
मनांत तर आहेच दोन्हीकडे !
त्यात डाऊटच नाहीय !
आधी तर मीच व्यक्त केले होते की !
की कामांत व्यग्र ?
की पुढे किती वेळ देता येईल
या विचारात थांबलेय ?
दिसण्यात शब्दात एखाद्या आविर्भावात
तर स्पष्टच दिसतेय की
तेच देणे आणि तीच इच्छा !

प्रतिकूलतेचा तर वासही नाहीय !

की मीच बोलू पुन्हा ?

पण मग पुन्हा तीच नको अवस्था !

त्यापेक्षा वेळ काढ ना जरा !

बाकी सगळे आपोआप घडेल !

की आणखी कुठे गुंतणे झालेय ?

जाऊ दे !

सध्या सोडूनच द्यावा हा विषय !

पण पुन्हा तीच शंका येते !

की घडणे शक्य असलेले

टाळले तर नाहीय जात ?!

तुला काय वाटते ?

--- ००० ---

" तुमच्या दुःखाची तीव्रता अजून जरा वाढायला हवी म्हणजे तुमची कविता मौल्यवान होईल ! "

पुण्याजवळच्या नारायणगाव इथल्या सुप्रसिद्ध दुर्बिणीतून आपल्यापासून सर्वांत दूर असलेल्या दीर्घिकेचा म्हणजे आकाशगंगेचा शोध लागला आहे ! ती दीर्घिका आपल्यापासून बारा अब्ज प्रकाशवर्षे दूर आहे ! म्हणजेच, आताचे तिचे आपल्यापर्यंत पोचलेले किरण बारा अब्ज प्रकाशवर्षांपूर्वीचे आहेत ! म्हणजेच, कदाचित आता ती तिथे नसूही शकेल !

याचाच अर्थ, आपण आज करत असलेले उद्योग काही हजार वा लाख वा कोट्यवधी वर्षांनंतरही कुठूनतरी दिसू शकणार आहेत ! सबकी पोल खुलनेवाली है ! पण, आपण कुणी तेव्हा असूच शकणार नाहीय हा मोठाच दिलासा आहे !

आणि त्या पाहणाऱ्यांच्या लेखी आपली प्रतिमा बिघडली समजा तरी सध्या आपण जगत असलेल्या आयुष्यावर त्याचा काय परिणाम होणार आहे ? आणि ते थोडेच आपल्याला ओळखू शकतील ? त्यांच्या लेखी आपण फक्त उंदीर बेडूक यांसारखी माणसे असणार ! मग आत्ता तुम्ही कलेक्टर असा की सुपरस्टार !

पण, काही अब्ज वर्षांनंतरही आपण जगताना दिसणार आहे, हे नक्की !

--- ००० ---

**अमूर्त कविता**

नेटवर या विषयाचा धांडोळा घेतला. याचा परिपूर्ण अर्थ सांगता येत नाही, असे म्हटले गेलेले दिसले. शब्दांच्या ध्वनिरचनेसाठी निर्माण होणारी कविता, असाही एका ठिकाणी अर्थ दिसला, पण तो अर्थ खूपच उथळ वाटला. इंद्रियगम्य प्रतिमा नसणारी कविता म्हणजे, ' प्रेम ', ' स्वातंत्र्य ' अशा शब्दांची कविता म्हणजे अमूर्त कविता, असेही एका ठिकाणी म्हटलेले दिसले -- तेही फारसे पटले नाही. त्यामुळे, आपल्या आकलनातून आपणच मांडणी करावी, असे ठरवले. अमूर्त कविता ही वास्तवातल्या वस्तू, माणसे, दृश्ये वा अनुभव यांचे प्रतिनिधित्व करत नाही, हा यातला एक महत्त्वाचा मुद्दा दिसला. ही कविता ‘ ओळखीची ‘ नसते, असे म्हणता येईल.

आपले असणे आणि ज्ञान हे आपल्या भाषेने मर्यादित असते, हे एका अर्थाने बरोबरच आहे. माणूस हा फक्त त्याच्या प्रभावयुक्ततेतच असू वा जगू शकतो, असे गृहीत धरले तर ते बरोबर आहे. पण, हे मान्य करणे म्हणजे वर्चस्वाची इच्छा, हिंसा, अन्याय आणि विषमता मान्य करणे ठरते. हे गृहीतक नाकारून मानवी जगणे समजून घेण्याचा एक प्रवाहही सतत चालूच असतो, हे लक्षात घ्यायला हवे.

अस्पष्टपणे वा स्पष्टपणे जाणवलेला आशय व्यक्त करण्यासाठी शब्दार्थांचे वा प्रतिमांचे माध्यम वापरणे, याला मूर्त कवितेची प्रक्रिया असे म्हणता येईल. अमूर्त कवितेची प्रक्रिया उलट असते. ती शब्दार्थांच्या आणि प्रतिमांच्या अनिर्बंध साहचर्यातून आशयाची निर्मिती करते. यात अपघाताचे तत्त्व, संज्ञाप्रवाह आणि कल्पनाशक्ती यांचा वापर अधिक महत्त्वाचा ठरतो. यात वास्तवाची सवयीची ‘ शिस्त ‘ हमखास दुर्लक्षिलेली असते. कोणत्याही बौद्धिक संगतीचा मार्ग इथे त्यागलेला असतो. इथे एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा की बुद्धी ही आधी काही असण्यातून म्हणजे भूतकाळावर आधारितच काम करते – त्याचप्रमाणे, मानवी कल्पनाशक्तीही पूर्वज्ञानावर आधारितच काम करते. हे जग कधीतरी निर्माण झाले असेल तर ते ‘ काहीच नसण्यातून ‘ कल्पिलेले आहे, असे म्हणावे लागते आणि मानवी बुद्धीच्या वा कल्पनेच्याही दृष्टीने तो कायमचा चमत्कारच समजावा लागणार.

मग, अमूर्त कवितेत शब्दार्थांच्या आणि प्रतिमांच्या साहचर्यातून कल्पनेच्या मदतीने घडणारा आशय कसा असतो ? इथे दोन उत्तरे संभवतात. एक म्हणजे, तो आशय ज्ञातातलाच असतो पण तो खूपच अनपेक्षित अशा नावीन्यपूर्णतेने समोर येतो. आणि दुसरे म्हणजे तो आशय भाषेच्या मर्यादा ओलांडणाऱ्या अज्ञाताला भिडणारा वा स्पर्श करणारा असतो. यात एक मान्यच करावे लागते की अभिव्यक्तीच्या अनंत, नावीन्यपूर्ण शक्यतांचा प्रदेश इथे खुला होतो.( अमूर्ततेचे तत्त्व हे अतिवास्तववादी कविता, दादावादी कविता, व्यस्त कविता, न-कविता अशा अनेक काव्यप्रकारांत अस्तित्वात असते, हे इथे लक्षात घ्यावे. )

नेहमीच्या अभिव्यक्तिप्रक्रियेतही सर्जकतेच्या असंख्य शक्यता असतातच, तरीही, या वेगळ्या सर्जक प्रक्रियेमुळे निर्मितीच्या शक्यतांना एक वेगळा ताजेपणा, नावीन्य आणि भरपूरपणा प्राप्त होऊ शकतो.

--- ००० ---

फूट कुणातच पडू नये -- आता मराठा आणि बहुजनसमाज यांत फूट पाडण्याचे प्रयत्न, असा विषय आलाय समोर -- मग बहुजनसमाजामध्ये कोण कोण येतात ?

अमूर्त चित्रकला असते त्याचप्रमाणे अमूर्त कविता मराठीत कितपत लिहिली गेली आहे ? काही उदाहरणे सांगता येतील का ?

निर्हेतुक फिरताना समोर फुटले
जांभळ्या मुंग्यांचे वारुळ एका उत्तुंग
प्रेयसीच्या भाळातून ओसंडत --
फुटकळ वासनांचा पराभव करताना
भुंकणारी सर्व भटकी कुत्री
सामावून घेतली गेली
एका पेपराच्या वृत्त विभागात
जिथल्या सर्व बातम्या सहेतुक

--- ००० ---

कविता म्हणजे फक्त भावकविता, असे समजणे -- ही अडेलतट्टू मर्यादा, खोट्या धार्मिकतेच्या सवयीतून येत असेल का ?

एक वेडा ठीक हो, पण लाख वेडा असेल तर ? पाळू शकेल का गणेशोत्सव कायदा ?

आपल्या सर्वांच्याच एकत्रित कृतींतून आहे हे जग घडलेले आहे -- एकाच कुणाला दुष्ट म्हणणे ही एक पळवाट आहे.

पिशवीतून सूर्य बाहेर काढावा
त्या थाटात त्याने मानगूट धरून
त्याचा आवडता विचार
माझ्या टेबलावर ठेवला
मला लोक सुखवस्तू
म्हणून हेटाळत असले तरी
मला आता कोणत्याही

नवीन विचाराची गरज नव्हतीच

लागेल तेव्हा जरूर फोन करेन
मी सभ्यपणे म्हणालो
तर तो म्हणाला ते ठीक पण आता
या विचाराने तुम्हाला पाहून घेतलेय

तुम्ही विसराल
पण तो विसरणार नाही
आणि झटक्यात त्याला पिशवीत टाकून
तो निघून गेला
--- ००० ---

तहानभूक विसरून चालू आहे आंदोलन ! उपाहारगृहे, चहाटपऱ्याही बंद आहेत !
- आज फेसबुक जोरात चालेल, बहुतेक !

सकाळ शांत
विश्रांतीनंतरच्या
जाड आवाजासारखी

कोणताही दिवस वा क्षण
खूप वर्षांची वाट पाहणारा
कसा असेल मनाशिवाय

भूतकाळाने उचकटून बाहेर पडलेले
रक्ताळलेले याचक डोळे
पाहतात उगवता शुक्रतारा
--- ००० ---

खूप गोंगाट होता
सगळे आपापले तपशील सांगत होते

सगळ्यांचे तपशील
एकच असणारे जग घडवायचेय

दुःखे खरी कोणती आणि खोटी कोणती
हे ठरवण्याचे अधिकार

दुःखांचे अनिर्बंध उद्रेक
असलेल्यांनी घेतले

बाकीच्या पददलित दुःखांनी
टाहो फोडला
--- ००० ---

अवघाची संसार
-- कादंबरी – ले० रवींद्र पांढरे.

या लेखकांचे नाव प्रथमच माझ्या समोर आले ते या कादंबरीमुळेच. मराठीत हे कितपत कुणाला माहीत असतील याची शंकाच वाटते. साध्या पारंपरिक आणि सपक नावाची ही कादंबरी वाचली आणि मी अक्षरशः चकित झालो. मराठीतले हे एक महत्त्वाचे लेखक आहेत, हे मला मनोमन समजले ! फक्त १३७ पानांची ही कादंबरी मला अनेक कारणांनी महत्त्वाची वाटते. अध्यात्माचा प्रभाव, नीतीकल्पनांचा दबाव आणि नैसर्गिक अभाव यांतून एका छान साध्या कुटुंबाची होणारी वाताहात ही कादंबरी चितारते. सगळी माणसे, म्हटले तर साधे सरळ रूटीन जगणारी आहेत. कुणाला चांगले, वाईट, दुष्ट म्हणावे असे कुणीच नाही. तरीही कशा गुंतागुंती तयार होत जातात आणि त्याच कशा त्या माणसांची नियती बनतात याची सखोल समज ही कादंबरी व्यक्त करते. हिच्यावर आधारित असा ‘ घुसमट ‘ या नावाचा चित्रपट मराठीत येऊन गेला असे समजते. या कादंबरीच्या महत्त्तेला जागून आणि पेलून तो काढला असेल का याबद्दल मला दाट शंका वाटते. आणि ढोबळ कथांचा चाहता मराठी प्रेक्षक असे ‘ जीवनदर्शन ‘ स्वीकारू शकेल का, हीही शंका आहेच.

‘ मनोगता’ त लेखक काय म्हणताहेत ते पाहा – “ आध्यात्मिक पातळीवर चिंतन करण्याची माझी कुवत नाही. त्यामुळे चिंतनाला आपोआपच सामाजिक आशयाची डूब लाभली आणि एक स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहून झाली. “ मला जाणवले ते असे की या लेखकाकडे अत्यंत सखोल आणि परिपक्व चिंतनाची कुवत असून ही कादंबरी आध्यात्मिक वा सामाजिक नसून एक परिपूर्ण अशी ‘ मानवी ‘ कादंबरी आहे. म्हटले तर हे सगळे घडते एका लहान खेड्याच्या परिसरात. तिथल्या मर्यादित अनुभवविश्वात. पण, लेखक जर मानवी जगण्याची ‘ समज ‘ असलेला असेल तर या मर्यादित अनुभववस्तूतूनही तो केवढा अमर्याद आवाका घेऊ शकतो, याचे हे उदाहरण आहे. ही ‘ समज ‘ व्यक्त करणारी ही कादंबरी आहे. कथा, अनुभव – ही निमित्ते आहेत. इथे लेखक स्वतः कुठल्याही पात्रात वा ताणात गुंतत नाही आणि त्यामुळे – पर्यायाने, वाचकालाही तो तसे गुंतू देत नाही. साध्या तृतीय पुरुषी निवेदनातून साधली जाणारी ही किमया अजब म्हणावी अशी अद्वितीय आहे. माणसे, त्यांचे रूटीन, तिथला निसर्ग यांचे सहज, प्रत्ययकारी चित्रण हे या अभिव्यक्तीला समृद्धी देणारे वैशिष्ट्य आहे. आणि भाषेला असलेला खानदेशी गोडवा ! अत्युत्तम ! ही भाषा वाचायची सवय नसल्याने मला वाचनाचा वेग कमी ठेवावा लागला, पण, अशा एका महत्त्वाच्या कलाकृतीच्या संपर्कात आपण आहोत, याच्या आनंदासाठी ते आवश्यक होते.

सविस्तर परीक्षण वा समीक्षण करण्याचा हेतू नाही. पण, चाललेल्या कथानकाबरोबरच वाचकाच्या मनात आणखी खूप विचार चालू राहावेत, अशी ही एक ताकदवर ‘ भरपूर ‘ कादंबरी आहे. अपवादात्मक महत्त्वाची ! श्रीविद्या प्रकाशनाचे अभिनंदन !

--- ००० ---

अचानक गेल्या काही दिवसांपासूनच
हे असे घडतेयसे वाटतेय
म्हणजे इतरच असे नाही
मीही म्हणजे सगळेच

विशेषतः नखे कापून झाल्यावर
अचानक असे मोठ्या आवाजातच
बोलू लागलेयत ठासून अगदी

नवजात अर्भकांची तरी नको कटकट
म्हणून त्यांना बसवताहेत ध्वनिरोधक

आकाशात तर नसेल काही प्रश्न

की बाबा ते आकुंचन पावल्याने
आहेत तेच आवाज मोठे होताहेत

पण माझ्यावरून तर कळतेय की
घशाचे स्नायू ताणूनच
मी जोखतोय सगळे संबंध

एकमेकांकडे लक्ष देण्या ऐवजी
सगळे नुसते
सहलींचे विचार तर करत नसतील

आवाज वाढल्याने पक्षी भयभीत दिसताहेत
अन्न तरी शोधत असतील की नाही कोण जाणे

वातावरणात खुनाखुनी भरल्यासारखी
वाटतेय गच्च कोंडलेली वाफ भूतकाळाची
आणि हसतानाही सगळे वाटताहेत क्रूर

मने बिथरली आहेत की
आकाश आकुंचन पावलेय की
भरोसाच गेलाय अन्नावरचा

इतरांचीच असे नाही माझीही
म्हणजे सगळ्यांचीच
अन्नावरची वासनाच उडालीय

--- ००० ---

' दुरुस्त्या आणि देखभाल ' चा आजचा पुण्यातला प्रयोग हाऊसफुल ! ललित आणि मंजिरी टॉप ! आकाशचे संगीत अत्युत्तम ! बाकी सर्वच उत्तम !

पाब्लो सॅबोरिओ हा कवी १९८२ मध्ये जन्मला आणि सध्या तो डेन्मार्कमध्ये राहतो. तो म्हणतो की – माझ्या लहानपणापासूनच मी कोणत्याही प्रकारच्या औपचारिक शिक्षणाला नकार दिलेला असून ‘ चमकदार कारकीर्द ‘ या कल्पनेला विरोध केलेला आहे. सध्या मला असण्याची ' टक्केटोणपेयुक्तता ‘ कवेत घेण्याचेच अधिक महत्त्व वाटते.

कारण अंतिमतः आपण ‘ आहोत ‘ !

अशा या माझ्या अत्यंत आवडत्या कवीची एक अत्युत्तम कविता ---

काहीच नसण्याबाबत –

त्या अवजड टेबलावर
मी पुन्हा एकदा
फळाच्या चवीची कल्पना करतो

एक तर ती खोली लहान आहे
किंवा त्या क्षणापुरते
जग स्वतःकडे दुर्लक्ष करते

त्याला फार काही
अर्थ नसतो

ही स्थिती
असण्याचा हा एक
छोटासा परिसर
ही खोली
असते मला

जिभेसारखी

स्वतःच्या पृष्ठभागाहून
फारशी अधिक
कशाचीच चव न घेता

कुठेतरी
कशाचातरी
आरंभ होतो
कुणासाठीतरी

पण माझा असतो विश्वास
न्यूनतमतेवर

आणि मी पुन्हा कल्पना करतो
त्या गोडव्याची
काहीच नसण्याच्या

या खोलीचा आरंभ होण्याच्या
खूपच आधीच्या
--- ००० ---

कोई हमदम न रहा - Buscar con Google
google.com
किशोरकुमारचे मला आवडणारे एक गाणे --

शेजाऱ्यांच्या बागेत मुंगूस आहे
हे दिसतच असल्याने ते गृहीत धरता येते
ते सापाचे शत्रू असल्याचे माहीत असल्याने

सापापासून आपले रक्षणही आपोआपच
गृहीत धरले जाते

मुख्य म्हणजे आपण स्वतः असल्याचे
असेच गृहीत धरलेले असल्याने मुंगूस दिलासा देत राहते
--- ००० ---

वास्तव म्हणजे हे -- असे काही असते ?
वास्तवाची समज म्हणजे काय ?
वास्तवाची समज व्यक्त करणारी कलाकृती म्हणजे काय ?

कविता गेय वा संगीतमय असली पाहिजे असे वाटणाऱ्यांनी जरूर वाचावी अशी कोरडीठाक, मनाच्या चिंधड्या व्यक्त करणारी अप्रतिम कविता -- विष्णू खरे या हिंदीतल्या कवीच्या ' प्रत्येक शहरात एक बदनाम स्त्री असते ' या कवितेचा मनोज पाठक यांनी केलेला मराठी अनुवाद, मी शेयर केला आहे तो वाचा ! इतकी अफाट महान कविता क्वचितच घडत असते !

एखाद्या जबरदस्त स्त्रीचे सहस्रनाम घ्यायची हिंमत करणारा आणि तशी कुवत बाळगणारा हा एक अनंत विष्णू !!! खराखुरा खरे !!!

Champra Deshpande shared a post.

इतकी अफाट महान कविता क्वचितच घडत असते !

खिडकी उघडताच उफाळून आलेला
रात्रीच्या शहरी दिव्यांचा पावसाळी वारा
खूपच गुंतागुंतीच्या विचारांप्रमाणे
शोधत राहतो कुठेतरी थांबण्याचे ठिकाण

अंधाराने वेढलेले दिवे सुचवतात
त्यांच्या भोवतीचा रिकामा अवकाश
विचार नसलेला आणि एखाद्या चित्रासारखा

स्थिरतेचा आभास उजागर करणारा

पण मन घाबरते वाऱ्याने सुखावले तरीही
ते अवकाश टाळून दिव्यांवरच
केंद्रित होत राहते – दिवे आहेत आणि
अवकाश नाहीय अशा खात्रीने

त्याला त्याच्या भूतकाळातले
सर्व दिवे आठवतात जे जे घडले
त्या त्या भावभावनांचे दिनरात अतोनात
सूर्यप्रकाशातही अवकाश नसतोच असे मानत

--- ००० ---

आता काहीतरी घडेल
अशा विचारात
गर्दीच्या लोकल्स सोडल्याप्रमाणे
व्यवहार सरकत राहतात
फारसे
घटना म्हणून महत्त्व नसलेले

आपले कपडे आपल्या अंगावर
अगदी योग्य फिटिंगचे नसले तरी
कुणाला फारसे खटकत नाहीत
तोवर तेही घटनाहीन खपून जातात

एखादी उत्तेजक हाक यायला हवी
एखाद्या हव्याशा स्त्रीची
वा आध्यात्मिकही चालेल

नाहीतर सारख्या
इतक्या घटना घडत राहाव्यात सरसकट
की एखाद्या वेगळ्या
घटनेची वाट पाहायला
वेळच उरू नये

म्हणजे जगणे सार्थकी लागेल
--- ००० ---

कविता म्हणजे
असायला हवा एखादा मूड
किंवा शिल्प घडवण्याचे हत्यार
असे काही नाही
रांजण भरले की पापेही भरतात
विश्वासाने दिलेल्या अंधाऱ्या शापात
हे जितके खरे
तितकेच वस्त्रालंकार उतरवत
उद्युक्त करणेही निरर्थक

आहे त्यातच काही महत्त्वाचे घडेल
असे वाटत वाटत विचारांचे झोत
आटत जातात

तेव्हा वाटतेच
की नुसते वाटते तेच
किती वेळा
अंबारीतून मिरवणार

नुसते आहे ते आहे तसे

पाहायला हवे

--- ००० ---

हवा मला म्हणते प्रिय मित्र

भूक म्हणते तत्त्वज्ञ

आणि रहदारी म्हणते कवी

-- तिघीही खळाळत असतात एकत्र

माझ्या मनात दिवसरात्र

अन अचानक एका क्षणी

तिघीही संगनमताने

होतात अदृश्य

अदृश्य होण्याचा आनंद

मला देत

माझ्या परस्पर दिवास्वप्नात

अगम्य

--- ००० ---

प्रेम म्हणजे

भावनिक अवलंबित्व ?

एक महत्त्वाचा लेख

आपली प्रिय आणि आदरणीय मैत्रीण सोनाली नवांगुळ Sonali Navangul हिचा आजच्या पुणे मटात पान ८ वर आलेला ' डेस्कसमोरचे आणि आतले ... ' हा लेख जरूर वाचा. माझ्या एकमेव परदेश वारीत मी पाहिलेल्या तिथल्या बसेस मला आठवल्या. व्हीलचेयरवरून आलेल्यांना त्या चेयरसह आत येता यावे अशी त्या बसेसमध्ये चढण्याची सोय होती. सोनालीचा हा लेख सर्वांनी वाचावा आणि जे कुणी अशा सोयी निर्माण करण्यावर प्रभाव टाकता येईल अशा स्थानांवर असतील त्यांनी जरूर अशा काही सुधारणा होतील, हे पाहावे.

सोनाली, तू एक ग्रेट मुलगी आहेस ! तुझे ते मी अलिबागला ऐकलेले भाषण माझ्या कायमचे लक्षात राहणार आहे ! पुण्यात कधी आलीस तर कळव -- मी तुला भेटायला येईन.

--- ००० ---

या आरक्षण प्रश्नाची यापुढची कायद्याची प्रक्रिया सर्वानुमते ठरवावी -- यश वा अपयश सर्वांचे असावे -- यात राजकारणाला वाव नसावा.

या आंदोलनाला केंद्रीय समन्वय नाहीय -- काही ठिकाणची आंदोलने स्थगित तर काही ठिकाणची चालू -- असे दिसतेय !

मालूम है बहुतोंको जन्नत की हकीकत
मगर अब बात करना
मुश्किल ही नही -- नामुमकिन है !

काल न्यूज १८ लोकमत वर आरक्षण या विषयावर दोन कायदेतज्ञ बोलत होते -- जमल्यास, यू ट्यूबवर असल्यास, जरूर पाहावे !

देश किडलाय, सडलाय -- कुणामुळे ? याच्यामुळे, त्याच्यामुळे, वगैरे मिळून -- म्हणजेच आपल्या सगळ्यांमुळेच !

अनियंत्रित आंदोलन, बघे नेते, दिङ्मूढ शासन आणि सहनशील जनत्ता ! आंदोलनकर्त्यांचा रोष सर्वच राजकारण्यांवर दिसतो आहे !

सकाळची घाईची वेळ. शाळेची मुलेमुली, नोकरीला जाणारे स्त्रीपुरुष, वगैरे. एका थांब्यावर एक बस बंद पडलेली होती. तिच्यातल्या खोळंबलेल्या प्रवाश्यांना नेण्यासाठी एक अधिकच जुनीपानी, मोडकी, भंगार बस आली. सगळे प्रवासी धडाधडाधडा तीत चढले. बंद बसचे वाहक-चालक रस्त्यावर काही वाद घालत उभे होते. तरीही, त्या वाहकाला मी म्हणालो, “ गाजताय तुम्ही लोक – आज मोठी बातमी आहे तुमची – बसेस बंद पाडणारे म्हणून – “ यावर तो वाहक म्हणाला, “ अहो, आमी काय नाही करत – बंदच पडतात त करावं काय – “ यावर मी म्हणालो, “ तसं नाहीय ते – खाणारे वर मलिदा खातायत – तुम्हाला माहीत नसतंय ते – शिव्या तुम्ही खाता लोकांच्या – “ यावर, “ ते त हायच म्हना – “ तो म्हणाला. समजुतदार दिसला ! तसे तर आपण सगळेच हळूहळू अधिकाधिक समजुतदार होत चाललोय !

--- ००० ---

महाराष्ट्रके बडे बडे जिम्मेदार नेताओंमें इतना गहरा सन्नाटा क्यों है भाई ?

जे नाटक वेगवेगळ्या पद्धतीनं सादर करण्याचं सामर्थ्य अंगी बाळगतं, तेच तर मोठं नाटक ठरतं !

-- चंद्रकांत कुलकर्णी, आज दि. २२-०७-१८ चा लोकसत्ता.

सर्व नाट्यप्रेमींनी आज दिनांक २२-०७-१८ च्या लोकसत्तेच्या ' लोकरंग ' पुरवणीत आलेला, चंद्रकांत कुलकर्णी यांचा ' नाटक निवडताना ' हा लेख जरूर वाचावा.

एक राजकीय फँटसी ( काल्पनिका )

त्या दोघांनीही आपापल्या भक्तांसह, काही काळ, एकमेकांचा द्वेष केला. काळाचा महिमा, समजा, आता असा समय आला की, एक सोय म्हणून का असे ना, त्या दोघांचे उत्कट प्रेम जमू लागले ! पण, हे सर्वांसमोर जाहीर कसे करणार ? दोन्ही बाजूंच्या भक्तांना धक्का बसू शकतो ! त्यामुळे, द्वेष चालूच ठेवल्यासारखे करत प्रेम करायचे, असे दोघांनीही समजुतदारपणे ठरवले ! पण, योग्य वेळी प्रेमाची खेळी खेळावीच लागणार ! त्या दृष्टीने, भक्त बिथरणार नाहीत अशा बेताबेताने पुढे जात राहायचे ठरले ! हे राजकारण आहे -- योग्य वाटेल तेव्हा प्रेमासाठी एखादे भारी आणि पटणारे कारण सापडू शकेलच ! एकूणात, हे दोघे गुप्तपणे एकमेकांच्या प्रेमात आणि दोघांचेही भक्त मात्र भक्तिभावाने एकमेकांच्या द्वेषात, असे चित्र काहींना भासू लागले ! एक मजेशीर सिनेमा आकाराला येऊ लागला !

कृपया कुणीही चिडू वा हुरळू नये, ही विनंती. आपल्या जगण्यातल्या गुंताडायुक्त विसंगतीची -- व्यस्ततेची -- ( absurdity ची ) एक शक्यता म्हणून ही एक राजकीय फँटसी ऊर्फ काल्पनिका तयार केलेली आहे ! भूल जाव !

--- ००० ---

काल मोदीजी त्यांच्या भाषणात, सहजच, " हमारे शरद पवारजी -- " असे म्हणाले ! ते त्यांच्या शिष्यत्वामुळे की काही राजकीय घनिष्ठतेमुळे ?

कधी कधी तरी --

स्वप्नमेव जयते !

" जे विश्वास ठरावाच्या बाजूने असतील ते ' होय ' बटण दाबतील आणि विरोधी असतील ते ' नाही ' बटण दाबतील. " -- मुळात तो विश्वास ठराव होता की अविश्वास ठराव ? " होय " म्हणणे हे अविश्वासाला पाठिंब्याचे नाही ठरत ? -- जरा गोंधळ वाटला -- पण, लोकांनी मते ' नीट समजूनच ' दिली, असे दिसतेय ! आपल्यालाच ते नीट कळले नसेल, असे आता मी समजून घेतलेय !

लेथ जोशी

मी बँकेत नोकरी केली. पुरेशा कार्यतत्परेतेने केली. तेव्हाच्या कामातले एक उदाहरण देतो. सेव्हिंग खात्यांची लेजर्स, हा विषय घेऊ. एकेका लेजरमध्ये तीनतीनशे खाती असत आणि एखाद्या शाखेत समजा अशी पन्नास लेजर्स असत. या प्रत्येक लेजरमध्ये, अर्थातच, प्रत्येक महिन्याला अनेक खात्यांत देवघेव – जमा-वजा, होई. ती सर्व लेजर्स दरमहा टॅली करावी लागत. त्या कामाचे तपशील सांगत बसत नाही. पण, समजा पन्नासपैकी बावीस-तेवीस लेजर्सना फरक लागत. प्रत्येक वेळी फरक किती आहे, कसा असू शकेल वगैरे अंदाज करून ते शोधून काढून ती लेजर्स टॅली करण्यात समजा आम्ही माहीर होतो – कलाकार होतो ! पण, आता काय त्याचे ? आता सर्व कामकाज संगणकीकृत आहे. सगळी लेजर्स प्रत्येक मिनिटाला टॅलीच आहेत – फरकाचा विषयच संपलेला आहे ! आता त्या वेळची आमची सनसनाटी आणि चित्तथरारक हुशारी कुणी ऐकून तरी घेईल का ? – बास ! हाच, असाच आहे या सिनेमाचा विषय ! पहिल्या दोनच मिनिटांत हे कळते – पुढे ते रेटत नेले आहे.

एक कामाच्या तिथले सहकारी सोडले तर या जोशीला कुणी मित्र, शेजारीबिजारी कुणी नाहीत ! हा इसम कुणाशी काही बोलतच नाही ! बरे, बायको चांगली आहे, त्यांचे काही बिनसलेय, असेही नाही. तरी हा इसम बायकोलाही हे सांगत नाही की बाबा, आता लेथवर काम करणे हे कालबाह्य झाल्याने त्याची नोकरी गेलीय ! बरे, तो नोकरी गेल्याने अचानक आर्थिक गर्तेत गेला आहे, असेही नाही. बायको खाद्यपदार्थांच्या ऑर्डर्स घेते, मुलगा संगणक दुरुस्तीवर कमावतो – एक छोटी चारचाकीही घेतो ! तो काहीच प्रश्न नाहीय. मुलगा, बायको आपापल्या कामांत आणि आई जपजाप्य आणि टीव्ही मालिका यांत रममाण ! मग राहते काय ? तर या जोशीची त्या लेथ मशीनबद्दलची आसक्ती ! सिनेमाचे नावही त्यालाच महत्त्व देणारे आहे. ( त्याला ' तेच ' मशीन विकत घ्यायचे आहे ! ) जोशीचा हा भावनिक प्रश्न आहे. त्या प्रश्नाला हा सिनेमा स्पर्शच करत नाही ! एकदा, आपण आपले युनिट टाकावे, असे त्याला वाटते, पण ते होऊ शकत नाही, इतकेच ! एकदा तो स्वामींच्या मंदिरात गेलेला असताना त्याचा एक जुना सहकारी त्याला भेटतो – तो म्हणतो की येत जा इकडे, भजन-कीर्तनात मस्त वेळ जातो ! ते ठीक – तो, वेळ घालवण्याचा एक वेगळा मुद्दा झाला. या जोशीला टीव्ही, मोबाईल, भजन-कीर्तन वा इतर कसलीच आवड नाही आहे ! मग राहते काय ? मानसिक – भावनिक आसक्तीचा प्रश्न ! या प्रश्नाचा थोडाही वेध हा सिनेमा घेत नाही – त्याच्या खोलात जाणे तर राहूच द्या.

आपण काढतोय एक दर्जेदार सिनेमा – गती सावकाश राहू दे, गाणीबिणी नकोत, संवाद कमी, दृश्यमाध्यम हाताळलेले दिसले पाहिजे – हे सगळे आहे ! पण, मुख्य विषयालाच हात लावायची हिंमत होत नसेल तर दर्जेदार कसा होणार सिनेमा ? सिनेमाचा

नायक कशाचाच काही परिणाम न होता उदासपणे सगळीकडे हिंडत राहतो ! बाकी, सगळ्यांची कामे, वगैरे सगळे छानच आहे ! पण, काय शेवटी ? त्या नायकाबरोबरच प्रेक्षकांनीही काळा चष्मा चढवून गप गुमान घरी जायची वेळ येते !

बाकी, मराठी सिनेमात इतकी मशिनरी आणि त्यांतल्या कामाचे काही तपशील हे प्रथमच आले असावेत !

--- ००० ---

सकाळची चक्कर मारून येत असताना एका दिग्दर्शक मित्राचा फोन आला. तिथेच एक महानगरपालिकेचे बाकडे होते -- त्यावर बसून मी बोलत होतो. तिथल्याच एका दुकानात माल पोचवणारा एक टेंपो थांबलेला होता. त्याचे दार धरून एकजण उभा होता आणि दुसरा एकजण माल काढून दुकानात नेत होता. मी सुमारे पाच मिनिटे बोलत होतो. बरेचसे माझ्या नाटकांबद्दलच होते. बोलून झाल्यावर मी निघालो तर त्या टेंपोजवळच्या माणसाने हसून विचारले, " नाटके लिहिता काय ? " मी होकार दिला. त्याच्या चेहऱ्यावर आनंद, प्रेम, आदर, असे सगळे आले ! " तुम्हाला आवड दिसतेय नाटकाची ? " मी विचारले. यावर त्याने होकार दिला. मग मी त्याचा निरोप घेऊन निघालो. माझे नाटक न वाचता-पाहता मला एक सहृदय चाहता मिळाला होता ! त्याच्या आयुष्यात त्याच्या इच्छेप्रमाणे नाट्यकलेला वाव मिळावा, अशी मी मनोमन इच्छा केली ! खरे तर माझी काही नाटके तरी सर्व ' नाट्यशौकिनांना ' पोचतील, आवडतील असे मला अनेकदा वाटत आलेले आहे. या माणसासमोर कधीतरी माझे एखादे तरी नाटक घडावे, असे वाटले.

मी नाटक लिहितो हे नुसते माहीत होणे हे जर एक चाहता मिळवून देत असेल तर खरेच माझी नाटके सर्व तऱ्हेच्या प्रेक्षकांनी पाहिली तर किती छान होईल ! पण --- हा ' पण ' स्वीकारूनच तर लिहीत आलोय --

वाऱ्याचा घूं घूं आवाज
माझ्यासाठी नसून परस्पर
त्याचा तो आहे
असे मी नाही म्हणणार
मी असेस्तोवर
माझे मन
मला कळणार असल्याने

ते कळणे हीही
त्या वाऱ्यासारखीच

एक घटना

सजीव निर्जीव
हा फरक
खरा असेल

की सगळेच
असेल एकत्र
माझ्यापुरते कळणे
महत्त्वाचे नसलेले

सगळे एकत्र असले तरीही
एक घटना आहेच जी आहे
फक्त माझ्या मनाच्या
तीव्रतेसाठीच

तीही एक घटना होऊन
माझे जगणे

--- ००० ---

व्यभिचार

आज दिनांक १८-०७-१८ च्या पुणे मटात आलेला छाया दातार यांचा या विषयावरचा लेख वाचून समोर आलेले काही मुद्दे आणि प्रश्न --

१. पत्नीचा परपुरुषाशी लैंगिक संबंध असेल तर पती त्या परपुरुषावर व्यभिचाराचा खटला दाखल करू शकतो.

२. पतीचा परस्त्रीशी लैंगिक संबंध असेल तर पत्नी त्या परस्त्रीवर व्यभिचाराचा खटला दाखल करू शकत नाही.

३. पहिल्या कलमाप्रमाणे, पतीने दाखल केलेल्या परपुरुषाविरुद्धच्या खटल्यात तो जिंकला तरी त्याला ते अपमानास्पदच वाटण्याची शक्यता असल्याने तसे खटले फारसे होणारच नाहीत.

४. याचा अर्थ, अशा कोणत्याही परिस्थितीत, चालवून घेणे वा घटस्फोट, हे दोनच मार्ग उपलब्ध राहतात.( एकमेकांवर व्यभिचाराचे खटले करून उपयोग काय ? )

५. हे सगळे स्त्रियांना झुकते माप देणारे आहे की त्यांच्यावर अन्याय करणारे आहे ?

६. अशा प्रकारात स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व अंमलात येऊ शकेल का ? कसे ?

७. स्वामित्वभावनेशिवाय पति-पत्नी, असे काही असू शकते काय ?

--- ००० ---

डोळे

डोळे पाहतात
जे दृश्य ते
माझ्या भूतकाळावर उमटल्याशिवाय
माझा भाग नाही होत

भूतकाळ तर न्यूनगंड
आत्मकीव आत्मछळ

अंध तर व्हायचे नाहीय

--- ० ---

मला आवडलेली एक कविता --

माझे हात
खोलतात तुझ्या अस्तित्वाचे पडदे
आवृत्त करतात तुला अधिकच नग्नतेत
तुझ्या देहाचे सर्व देह अनावृत करतात
माझे हात
शोधून काढतात एक दुसराच देह
तुझ्या देहाचा पर्याय असणारा

-- ऑक्टाव्हियो पाझ.

मनाला गुंगवणे, खुश करणे, चेतवणे, कार्यप्रवृत्त करणे, चकित वा सुन्न करणे, अस्वस्थ करणे, उदास वा दुःखी करणे, यांबरोबरच, मनाच्या ' आहे त्या अवस्थेला ' समूळ आव्हान देणे , हेही कलेचे एक अति-मौल्यवान काम असते. नुसतेच मनाच्या सवयींना प्रोत्साहन देणारी कला दुय्यम असते.

झोपेत घशाला कोरड पडल्यास
मनात फुले आणावीत अशी नेणीवेला
सूचना देऊन मी झोपलो पण एस्टी निघून गेलीच
माझी सूटकेस तीत राहिली होती

स्थानक व्यवस्थापक एकटेच बसलेले होते
ते मला पाणी देत असतानाच एका वाहकाने
नेमकी माझीच सूटकेस तिथे आणून ठेवली
माझे डोळे चमकले मग तर तीच
एस्टीही पकडता येईल की काय
पटकन लघवीला जाऊन येणे गरजेचे होते
आल्यावर ओळख पटवावी असे ठरवले
पण रात्र खूप झालीय आता ऑफीस
बंद होईल ते म्हणाले तेव्हा मला जाग आली

जागेपणी माझे विचार सलग चालत
त्यांना तर्कसंगती असे
आणि माझ्या श्रद्धांचा पक्का पाया असे
माझ्या श्रध्येय प्रतिमेला वंदन करणे
आणि विरोधकांचा द्वेष करणे
यांत कधीच गोंधळ होत नसे

माझी ती सूटकेस खूप जुनी आहे
तीत माझे प्रेमाचे तुकडे आणि माझ्या
जखमांचे तुकडेही आहेत

त्या सूटकेसमुळेच मी योग्य एस्टीत असतो
नेहमीच न चुकता जाणीवपूर्वक
--- ००० ---

डास दगड संकटे आली
चाल करून पण पाण्यासारखी
इकडेतिकडे वाहून गेली
स्पर्शही न करता
माझ्या विचारांना

हे कसे घडले
कोण जाणे मी फक्त
लॉटऱ्यांचे निकाल
असा जाणवत राहिलो

कुणी म्हणाले जनुकांमुळे
तर कुणी माझा
लकी शर्ट म्हणाले

माझ्यासमोर हत्या
घडू लागली तर
मध्ये पडणेच मी करेन
बहुतेक मारला जाईन

ऑपरेशनच्या वेळी
भूल दिली जाताना
काही कमीजास्त होऊ शकते
हे समजून मी आधीच सगळ्या

सह्या करून टाकल्या होत्या

मी आपोआप जिवंत राहतोय
असेच मला वाटत राहते
--- ००० ---

रोज सूर्योदय अपूर्ण
सूर्यास्त अस्वस्थ

किती काय काय
हवेय अजून पूर्णतेला

कोट्यवधी मने
त्यांतलेच तर एक

माझे नसेल
एकूण मनांचा एक

अपूर्ण भाग
हजारो वर्षांचा

सगळी मने माझी नाहीत
तर माझेच का माझे

सगळी मने माझी होवोत
असे म्हटल्याने

सगळेच पाहिले
तर काहीच नाहीय

काहीच नसण्याचा सूर्योदय
झाला समस्त सूर्यास्त
--- ००० ---

Is there reincarnation, a continuation of the " me " in different forms ? I say, no ! -- JK.
( Can Humanity Change -- page 151. )

संगीत ऐकले म्हणून काही
डोळ्यांपुढचा अंधुकपणा कमी होणार नाही
संपत आलेले नाटक
काय देतेय विधान
याचे दगडी उत्तर
अजूनही न सापडताच मी चाललो आहे

जणू काही सगळे माझ्या
असण्यानसण्याचे आणि माझ्याच
अर्थपूर्ण अंताचे प्रश्न असल्याप्रमाणे
मी बघत असतानाच होतेय आकाशवाणी
स्वतःपुरते जगलास तर मेलास

कोणत्याही नाटकाशिवायही
माझा विश्वासच नाहीय सुभाषितांवर
माझ्या तुटपुंजा अक्कलेने
काहीही करणे मला संशयास्पदच वाटते

कदाचित आजच असू शकेल माझा शेवट
माझे गुप्त खजिने सापडू देत
दोन हजार वर्षांनंतरच्या उत्खननात

कुणालाही अभिमान, शरम वा क्रोध न वाटता

या क्षणी इतक्या वर्षांनंतरही
मी अजून गोंधळलेलाच आहे
त्यापेक्षा क्रांतीत सहभागी झाला असता
तर काय मेला असता
हेच बहुतेक शेवटचे वाक्य ऐकू येईल मला
--- ००० ---

इगोर बलाट्स्की ची आणखी एक कविता --

तिला देऊ केली गेली होती
साकारण्यासाठी एक भूमिका.एकदाच.
त्यानंतर ती राहू शकली असती सुखवस्तू
कसलीच कमतरता न जाणवता
तिच्या आयुष्याच्या अंतापर्यंत.

तिने नकार दिला. नको होती तिला
साकारायला स्वतःचीच भूमिका.

-- इगोर बलाट्स्की.

एक अति-साधी आणि अति-अप्रतिम कविता --

ते पुरेसे परके आहे

जेव्हा आरशात पाहताना
तू एका परक्याला पाहतोस
आणि ओळखतोस

स्वतःला

-- इगोर बलाट्स्की.

" कोकणी माणसाला जर कुणी संपवू पाहात असेल तर आम्ही कोणत्याही टोकाला जाऊ -- हाच संदेश मी आज माझ्या माध्यमातून दिलाय ! "

' सप्रेम भेट ' निवेदन --

माझे वाचन अलिकडे बरेच कमी झालेले आहे ( आधीही फारसे नव्हतेच ) आणि मुख्य म्हणजे आता मला फार वाचनाची गरजच नाही, असा एक सोयिस्कर भ्रम मी स्वीकारलेला आहे. वाचन मी पूर्ण बंद केलेले नसले तरी माझ्या लहरीने वाटेल तेच आणि तेवढेच वाचत आहे त्यामुळे, एक विनंती करतो आहे -- यापुढे कुणीही, काहीही माझ्याकडे वाचनार्थ सप्रेम भेट काही पाठवू नये. तसे काही आले की अभिप्राय देण्याचा माझा भिडस्तपणा जागा होतो आणि त्यामुळे एकूण भारतीयांच्या तणावात वाढ होते.

जोरदार वाचणारे काही फ्रेंडस, त्यांच्या वाचनाबद्दलची माहिती मला देत असतात -- तेवढे मला पुरेसे वाटते.

शिवाय, आपले काही लिहिण्याचे मनात आहे त्यासाठीच आता उपलब्ध वेळ वापरावा, असेही वाटते. तेही कितपत काय कसे जमेल, हा भाग वेगळा.

सारांश, कृपया सर्व ' सप्रेम भेट ' रद्द करावे, ही विनंती.

--- ००० ---

आरोग्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ' सिग्ना टीटीके हेल्थ इन्शुअरन्स ' ने भारतीयांच्या आरोग्यासंबंधी केलेल्या पाहणीतून हे धक्कादायक वास्तव पुढे आले आहे -- भारतातील नागरिकांवर असणारा ताणतणाव हा अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, चीन, ब्राझील आणि इंडोनेशिया या देशांच्या तुलनेत कितीतरी अधिक आहे.

( -- आज दिनांक ११ जुलै'१८ चा पुणे मटा पुरवणी पान १.)

यावर सुचणारे तातडीचे उपाय --

१. उजव्याडाव्यांतला संघर्ष कमी करणे.

२. लेखन-नाटक-चित्रपट यांतले विनोदाचे प्रमाण वाढवणे.

३. हास्यक्लबला उपस्थिती सक्तीची करणे.

४. अस्मितांच्या ऐवजी वेगळ्या मादक द्रव्यांची सोय करणे.

आणखी काही उपाय सुचत असतील तर जरूर सांगावेत. यातून देशाला एक सकारात्मक दिशा लागू शकेल. या अहवालाचा उपयोग आपण, आपल्याला वेळीच जागे करणारी सुसंधी असाच करायला हवा.

एक कर्तव्य म्हणून कृपया या प्रयत्नात सर्वांनी सहभागी व्हावे --

--- ००० ---

कुंद हवेचा प्रभाव स्वीकारून
आळसात राहणे हा आळसच नाही तर काय आहे
मानसिक आधारासाठी
कविता लिहिणे काय किंवा
एकूणच न्यायासाठी जान न्योछावर करणे काय
एकट्याने घडो की समूहाने
असणार तो सगळा एकाकीपणाच

खरे तर काही घडवायचेच असेल तर ते या क्षणातच
कोट्यवधींची मने बदलून जायला हवीत
अन्यथा कुचमत कुचमत होत राहणार ते
क्रांतीचे स्वप्न सर्वांनाच स्वप्नात ओढू पाहणारे

तसे तर आता हेही कळलेय की नुसते
बाहेरून कलप केलेले विचार
आता भुलवू नाही शकत
स्वप्नातल्या कोणत्याच नायिकेला

आणि या कुंद हवेत आता
रागही नाही येत अंगार होऊन धगधगता
आता तर जग बदलायचे तर
सुरुवात कुठून करायची हेच नाही कळत
कारण बाकी इतर सगळी माणसे
हवी तशी सकारात्मक नाही दिसत
बहुधा खच्चीकरण झाल्याने

मग किरकोळ काही शिव्यागाळी करत ठेवावा लागतो
हेतू जागा इतरांनाही जमेल तेवढे जागे ठेवत

--- ००० ---

" आमचा मुंबईकर सहनशील आहे.

आमचा मुंबईकर शूर आहे.

तो अनेक प्रकारच्या संकटांचा सामना करतो.

तो थोडा वेडाही आहे -- साठलेल्या पाण्यात पोराबाळांसह खेळत तो हसत असतो.

पण, त्याचा आमच्यावर अढळ विश्वास आहे.

आता काही लोक संतापून ओरडत बोलतात हो, पण, त्यांना ती सवयच असते.

ते म्हणतात, मुंबईकडे इतका पैसा आहे, तरीही कामे का नाही होत ?

अहो, पैसा काय चाटायचाय ? निसर्गापुढे माणसाचे काय चालणार आहे ?

माणूस थिटाच पडणार !

विचार करा -- मुंबईतली तळी बुजवली, विहिरी बुजवल्या, मैदाने नाहीशी झाली आणि इतकी बांधकामे झाली ! मुंबईची ही प्रगती अडवता आली असती का कुणाला ?

माणूस थिटाच पडतो हो -- पाऊस आणि समुद्राची भरती कोण थांबवू शकणार आहे ?

नम्रच राहावे लागते ! आमचा मुंबईकर हे समजून असतो !

आठ दिवसांनी बघा -- तो कसा अडीअडचणींतून घरी पोचला याच्या रंजक आणि थरारक कहाण्या तो एकमेकांना सांगताना दिसेल ! "

--- ००० ---

आपसांतले मतभेद कमी करा, शत्रुपक्षांशी मतभेद तीव्र करा -- असे लावून मानसिक तंबोरे, लढायला सिद्ध व्हा !

रोजगाराचे नवे क्षेत्र

जाहिरात क्षेत्रात नोकऱ्या करतोच ना आपण, तसेच समजायचे. तत्त्वे ही एक प्रकारची निरुपयोगी सुभाषिते असतात, हे शहाणपण इथली जनता आणि इथले सगळेच नेते नीट समजून असतात.आता तो प्रश्नच उरलेला नाहीय. स्वच्छ मनाने निवड करावी. जिथे जास्त उत्पन्न मिळेल तिकडे भरती व्हावे. हे रोजगाराचे नवे क्षेत्र आहे ' सायबर आर्मी ' चे म्हणजे सायबर सैन्याचे ! सर्वच राजकीय पक्षांना या कामासाठी कुशल कर्मचारी लागणार आहेत. सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून राजकीय पक्षांचा प्रचार करणे आणि इतर पक्षांची निंदानालस्ती करणे, हे काम ! कामाचे स्वरूप लक्षात घेता, लेखक आणि कवींना प्राधान्य मिळण्याची खात्रीच दिसते ! काही तास जीव तोडून काम करायचे आणि उरलेला सगळा वेळ लेखन-वाचनासाठी वापरायचा ! या प्रकारे अभ्यास वाढल्याने उत्तम समीक्षक तयार होऊ शकतील. ललित साहित्य, विशेषतः कविता यांना तर बहरच येऊ शकेल ! दिवसभर प्रचार करून कंटाळल्याने साहित्यातून प्रचार करणे थांबेल. बुद्धीची व्यावहारिक किंमत समजल्याने बुद्धिप्रामाण्यवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोण हे अधिक लख्खपणे आचरणात येतील. -- हे सगळे परप्रांतीयांच्या लक्षात येण्यापूर्वीच मराठी तरुणांनी पटापट या संधी पटकावाव्यात. बेरोजगारीची समस्या कमी होणे आणि सांस्कृतिक विकास होणे, या दोन्ही गोष्टी यातून घडतील. पैशाच्या उलाढाली वाढल्याने अर्थव्यवस्थेलाही गती येईल !

" आमची सायबर आर्मी जरा कच्ची पडल्याने आमचा पराभव झाला ! " असे निवडणूक निकालांचे विश्लेषण आता फार लांब नाही आहे. काळाची पाऊले ओळखा आणि त्वरा करा !

( ही पूर्ण पोस्ट उपरोधिक आहे हे सर्व सूज्ञ ओळखतीलच ! )

--- ००० ---

एक माणूस भेटला मोठ्या पोस्टवरचा
मनमोकळा आणि खरा म्हणाला
मला फक्त दोनचार पक्षी माहीत आहेत
पाचसहा फुले ओळखता येतात
काही भाज्या आणि काही फळे
रिकाम्या शेतात गेलो तर सध्या तिथे
काही पेरले असेल की पीक काढून झाले असेल

ते मला कळत नाही

शहरातले कामापुरते रस्ते मला माहीत आहेत
मी काश्मीर वा ताजमहाल वा अजिंठा काहीच पाहिलेले नाही
मी जात नाही कोणत्याही यात्रेला वा तीर्थक्षेत्राला वा उत्सवाला

मला न समजणाऱ्या शास्त्रांत मी डोके घालत नाही
विवाहकायदे लिव्हइन कायदे वारसकायदे
मला माहीत नसतात पतिपत्नी हे नाते कसे संभाळावे
यावर मी काही वाचत नाही गरजच नाही पडलेली
बरी आहे पत्नी आणि हो राजकारणातले मला काहीच कळत नाही
आपले परराष्ट्र धोरण बरोबर आहे का ते मला माहीत नाही

पूर्वी मला क्रिकेट आवडत असे अजूनही काही आठवते
एकदोन मालिका पाहतो पण अंदाजपत्रक
वा निवडणुकांचे निकाल यांवरच्या चर्चा मला बोअर होतात
दोन मुलगे आहेत त्यांचे शिक्षण नोकऱ्या लग्ने सर्व मार्गी लागलेय
सगळ्यांनाच चांगले जगता यावे असेच मला वाटते
काही वाद भांडणे वा ताणही असतातच मीही माणूसच तर आहे

पुढल्या वर्षी निवृत्त होईन आपलेही सगळ्यांबरोबर जे होईल ते होईल
--- ००० ---

दुकानात मिळणारा कोणताही कांदालसूण मसाला हा खूप तिखट असतो. मला असा तिखट नसलेला पण चविष्ट मसाला हवा होता. त्या विचारात दुकानदाराला विचारले, " ब्राम्हणी मटण मसाला आहे का ? " तो जैन दुकानदार हवालदिल होऊन दोन क्षण नुसता माझ्याकडे पाहातच राहिला ! " बरे, जाऊ दे, असेल तो घे, चल -- " मी म्हणालो. तर तो देता देता त्याने मला उत्सुकतेने विचारले, " निघालाय का खरेच असा मसाला ? "

ज्याला अमर व्हायचे असेल त्याने आपले विचार आणि मते यांना अमर करत राहावे -- त्यांचे जगणे हेच तर आपले जगणे !

माझ्या ' बस ' नामक एकांकिकेत अशी वेळ येते की नको तो वाद म्हणून एकजण असे एक निर्विवाद वाक्य म्हणतो -- " आज बावीस तारीख आहे " -- तर त्याही वाक्यामुळे प्रॉब्लेम होतात ! फेसबुकवर अनेकदा असे घडताना दिसते. मग, " जाऊ दे, मरू दे ! " असे म्हणून काहीजण कंटाळून बंदच करतात इथला बराचसा वावर ! या स्थितीला यायला प्रत्येकाला वेळ कमीजास्त लागू शकतो, पण, बहुतेकांचा प्रवास याच दिशेने चालू असतो. मीही अर्थातच त्या बहुतेकांमधलाच एक आहे.

चर्चा चालू असताना एखाद्याला मूर्खात काढणे वा हिडीसफिडीस करणे यापेक्षा मतभेदाचा मुद्दा सांगितला तर ते सगळ्यांनाच उपयोगी ठरू शकते.

रडत-कुढत-बोंबलत-भांडाभांडी करत-दुःखाचे गोडवे गात-विरहाचे उदात्तीकरण करत जगण्याला अभिव्यक्ती देणे म्हणजेच कला ?

थोडा पाऊस असूनही संध्याकाळी
पक्षी परतताहेत त्यांच्या मुक्कामाकडे

मग पाऊस थाबतो – आता वाराही नाही
पानही नाही हलत झाडांचे आणि डोंगरही शांत

याला शांतता का म्हणावे खरे तर जे आहे ते आहे
वारा तरी सोसाट्याचा कधी कुठे असतो असला तरी

जे असायचे तसे ते असत असते आणि मी
वेगळेच विचार करत असतो

मीही असतो त्याच दृश्यात तर शांतता
कोण म्हणाले असते अशांततेहून वेगळे म्हणून

डोंगराची समजा जिवंत असण्याची

पद्धत वेगळी आहे तरी त्याला काय वाटेल

माझ्याकडे पाहून पक्ष्यांना झाडांना
आणि या नसलेल्या वाऱ्याला काय वाटेल

माझे विचार करणारे मन कसे दिसत असेल त्यांना
की मन त्यांना माहीतच नसल्याने ते म्हणतील

काहीच नाही काहीच नाही काहीच नाही
किंवा खरे तर काहीच म्हणणार नाहीत

--- ००० ---

अर्थ पोचणारच नसल्याने
काम सोपे होते
मला दिसणारी निरर्थकताच
मांडायची होती

पण ती निरर्थकता तरी
जशीच्या तशी
पोचेल का
हा प्रश्नच होता

त्यासाठी शक्यतो
शब्दांना कोणतेच अर्थ
राहूच नयेत असा त्यांचा वापर
करत मन शून्य ठेवले

पण वाचणाऱ्याला शब्द

दिसणारच होते
त्यांना अदृश्य करून
कशी लिहिणार कविता

तुमचे तुम्ही
मन शून्य करा
आणि तेच समजा
माझ्या कवितेचे वाचन

एवढेच फक्त लिहून थांबलो
तर एका वाचकाने
मला पेढे आणून दिले
--- ००० ---

रोले बार्थस नामक एका विचारवंताने १९६८ सालीच एक जागतिक महत्त्वाचा उद्योग करून ठेवला ! ' लेखकाचा मृत्यू ' झाल्याचे त्याने जाहीर केले ! कोणत्याही साहित्यकृतीच्या बाबतीत मुळात ती लेखकाने का, कशासाठी लिहिली, त्याच्या मनात काय होते, हे कदापि कळणे शक्य नाही, असे त्याचे म्हणणे होते. शिवाय शब्दांच्या आणि भाषेच्या अर्थांची अस्थिरता, हाही एक मुद्दा होता -- भाषेला अमुकच असे कायमचे स्थिर अर्थ नसणे, हाही एक सत्य अडथळा होता. आणि प्रत्येक वाचकाचे वेगवेगळे प्रभावित मन -- कंडिशनिंग -- यामुळेही सगळ्यांना एकच अर्थ पोचणे शक्यच नाही, असे त्याने मांडले. वाचक वाचतो तेव्हा ती ती साहित्यकृती त्या त्या वेळेपुरतीच निर्माण होते, असे त्याचे म्हणणे ! यामुळे, एकूणच साहित्यव्यवहार वाचककेंद्री झाला ! ( अजूनही लेखकांना कोणत्या आधारावर नोबेल पारितोषिक दिले जाते, कोण जाणे ! )

शिवाय समीक्षाप्रणालींची आणि पद्धतींची संख्याही वारेमाप वाढत होतीच -- घाट, तत्त्वज्ञान, चरित्रात्मक, ऐतिहासिक, मानसिक, सामाजिक, परिवर्तनवादी, साम्यवादी, स्त्रीवादी, मूलगुणवादी, समसंभोगवादी, अमुकतमुक वर्णवादी, वगैरे ! एकाच कलाकृतीची अशी असंख्य मूल्यमापने ! सारांश, लेखकही मेला आणि समीक्षकही मेला ! फक्त वाचक राहिला !

मला एक प्रश्न पडतो की जशी साहित्यकृतीची विरचना ( त्या साहित्यकृतीतल्या कोणत्या कल्पना, धारणा कशा निर्माण झाल्या, कुणाच्या सत्तेच्या काळात वा कुणाच्या वर्चस्वाखाली तयार झाल्या -- हे चिकित्सकपणे पाहात जाणे -- ) होऊ शकते तशीच

वाचकाचीही का होऊ नये ? याचे कारण एक साहित्यकृती विरचनेला उपलब्ध असते तसा एकच वाचक घेऊन उपयोग काय ? पण, एक तार्किक शक्यता म्हणून तरी हे मान्य होऊ शकतेच ! म्हणजे वाचकही मरण पावेल !

सारांश, साहित्य-व्यवहार ही एक अस्तित्वातच नसलेली भ्रामक बाब आहे ! आणि आपण भांडत बसलोय ' कोणती साहित्यकृती श्रेष्ठ ' यावर !

--- ००० ---

माझी मुलगी संगणक-तज्ञ आहे. काही कंपन्या आणि कॉलेजेस तिला तिच्या विषयातले शिकवण्यासाठी बोलवत असतात. एकदा फोनवर बोलताना, मुद्दाम मला चिडवायला ती म्हणाली, " बाबा, तुम्हाला तुमच्या लेक्चरचे जे मानधन मिळते त्याच्या दुप्पटीहून जास्त मला मिळते ! " मी म्हणालो, " एक लक्षात घे -- तुला उपयोगी गोष्टीचे मानधन मिळते आणि मला पूर्ण निरुपयोगी गोष्टीचे ! " यावर, " कसे काय ? " तिने विचारले. म्हटले, " तुझे ऐकून विद्यार्थ्यांची करियर घडू शकते. माझे तसे नाही. लेखनात एखादा करियर करू शकणारा असेल तर त्याला मागे ओढून, लेखनात त्याची अजिबात करियर होऊ नये, अशा लेखनाच्या मार्गाला मी त्याला लावतो ! " गंमतीदार हास्याने अर्थात हा संवाद संपला.

आयुष्यभर तसा निरुद्योगीपणासाठी आणि निरुपयोगीपणासाठी मी वेळ काढतच आलो -- आता तर निवृत्तीनंतर आनंदच आहे ! त्यामुळे, साहित्य, कला यांबद्दलचे माझे आकलन व्यक्त करणाऱ्या पोस्ट मी इथे देत असतो. काहींचे मतभेद असणार याची मला पूर्ण जाणीव असते. काहीजण असेही म्हणतात की जगात यावर खूप विचार झालेला आहे आणि चालूही असतो. आपण काय खास बोलणार आहोत ? मला हे पटत नाही. आपापल्या आकलनाची प्रक्रिया चालूच राहायला हवी, असे मला वाटते. ' निरुपयोगी ' का असे ना ! आणि आपण काही परभृतपणेच जगले पाहिजे, असे नाही.

जगातली सगळ्यात निरुपयोगी गोष्ट म्हणजे कविता ! ( परिवर्तनवादी कविता असूही शकेल उपयोगी. त्यावर नको वाद. ) पण, कविता जर नष्ट झाली जगातून तर जगाची राखरांगोळी व्हायला मुळीच फार वेळ लागणार नाही !

नुसतेच ' उपयोगी ' च्या मागे धावणे हे अरिष्टामागे धावणे आहे !

--- ००० ---

वाचकाला खिन्न करणे वा उदास मूडमध्ये पोचवणे, संतप्त करणे वा खजिल करणे हे मला चांगल्या साहित्याचे लक्षण वाटत नाही.

साहित्यात ग्रामीण, दलित, नागरी, अस्तित्ववादी, उत्तर-आधुनिक वगैरे भेद सोयीसाठी पाडले जातात. साहित्य हे साहित्य असते. समीक्षकाला सर्वच साहित्याचा आवाका घेता आला पाहिजे -- त्याचा कस जोखता आला पाहिजे -- आणि ती सर्व प्रक्रिया सर्वांसाठी व्यक्त करता आली पाहिजे. दलित साहित्याचे वेगळे समीक्षक, अस्तित्ववादी साहित्याचे वेगळे समीक्षक -- असे असणे हे खुजेपणाचे लक्षण आहे.

" इंडियामें हमारे बाद अगर कोई बडा ॲक्टर है तो वो है दिलीपकुमार -- हमारे सामनेवाले रोलमे वही ठीक होंगे ! " -- हे वाक्य आहे ' सौदागर ' ची बोलणी चाललेली असताना, राजकुमार या माझ्या आवडत्या नटाचे ! या बाबतीत मी एक पिटातला प्रेक्षकच आहे ! लक्षात घ्या, त्या वेळी त्या दोन नटांत कट्टर शत्रुत्व होते -- आणि ' सौदागर ' मध्ये ते होते जिगरी दोस्त ! शूटिंगच्या वेळी दोन टोकांना दोघे बसून राहात -- एक शब्दही एकमेकांशी बोलत नसत ! पण, ' इमलीका बूटा ' हे गाणे बघा -- दंग रह जाओगे !

जशा निळू फुल्यांच्या अनेक कलाकृती मी निव्वळ निळूभाऊ आहेत म्हणून पाहिल्या तसेच राजकुमारच्या बाबतीतही केले ! दोघांचेही एक समान वैशिष्ठ्य म्हणजे -- कमीत कमी कष्टांत उत्तम अभिनय ! दोघांच्याही डोळ्यांत एक सखोल उदासी होती !

' माझा ' वर कार्यक्रम चालू होता -- तो माझा चुकला -- शेवटचा काही भाग पाहिला !

--- ००० ---

कोहिनूर हिऱ्याचे गूढ

' हॅम्लेट ' नाटकाच्या मानसिक साहचर्यातून काल मनात कोहिनूर हिरा परत जागा झाला. आमचे मुलगी-जावई लंडनला होते तेव्हा आमची तिकडे एक ट्रिप झाली होती आणि तिकडे गेल्यावर तो कोहिनूर हिरा पाहिलाच पाहेजे -- हे कर्तव्यच असल्याने -- तो जिथे ठेवलेला आहे त्या म्यूझियमला आम्ही भेट दिली होतीच. तो हिरा भारतातून इंग्लंडने चोरलेला वा लुटलेला नसून इथल्या एका शीख राजाने त्यांच्याकडच्या राणीला नजराणा म्हणून दिलेला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे, तो भारताला परत देण्याचा प्रश्नच येत नाही, असे ते म्हणतात.

त्या हिऱ्यामुळे अनेक युद्धे आणि खुनाखुनी झाल्याचा इतिहास असल्याने तो अपशकुनीही समजला जातो ! त्यामुळेच, राणीने तो तिच्या मुकुटात मढवून परिधान केला नाही, असेही म्हणतात. त्याची जुन्या काळात सांगितलेली किंमत दहा अब्ज रुपये होती -- आता पन्नास अब्ज धरून चालू ! थोडक्यात म्हणजे आपल्या डोळ्यांनी तो हिरा पाहिला जाणे अतीव महत्त्वाचे आहे !

इथे घोळ सुरू होतो ! आम्ही पाहिला तो मुकुट ज्यात तो महान हिरा बसवलेला ( एवढ्या ग्रेट खड्याला ' बसवलेला ' म्हणणे चूक आहे -- खरे तर ' जडवलेला ' म्हटले पाहिजे ! मघाशी तो शब्द आठवला नव्हता ! ) आहे ! पण, त्या मुकुटावर एक हिरा त्या मुकुटाच्या वरच्या टोकावर आहे आणि एक खालच्या रुंद भागाच्या मध्यावर आहे -- तर यांतला कोहिनूर कोणता ? तिथे, नेमका कोणता ते सांगितलेले नाही. नेटवर पाहिले तर एकदा याला प्राधान्य दिलेले दिसते तर एकदा त्याला ! आपण काही पाहून ओळखणारे रत्नपारखी नाही ! ते इंग्लिश लोक इतके विद्वान समजले जातात, पण एकालाही हे सुचलेले नाही की बाबा, हा तो नेमका कोहिनूर, असे सांगून टाकावे !

त्यामुळे, होते काय -- बघितला का कोहिनूर -- तर हो, बघितला -- पण, कोहिनूरच बघितल्याचे समाधान ? -- नाही झालेले !

मग मीच मनाने ठरवून टाकले की तो वरचा आहे तोच कोहिनूर -- काय फरक पडतो आपल्याला ? इतक्या अब्ज रुपयांच्या वस्तूचे किरण आपल्या डोळ्यांतून आपल्या मनाला स्पर्शते झाले, हेच आपले भाग्य !

तरीही, हे गूढ कुणी उकलू शकत असेल तर जरूर सांगावे ! कदाचित हा सगळा आमचा बावळटपणाही असू शकतो ! पण, फ्रेंडससमोर, ठीक आहे !

--- ००० ---

हॅम्लेट

‘ जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्स्पियरचे चारशे वर्षांपूर्वीचे अजरामर नाटक – हॅम्लेट ! ‘ अशा घोषणेने हे नाटक सुरू होते. The play is the thing – म्हणजे नाटक हीच ती गोष्ट – हे एक आणि नाटकातच एक संवाद आहे – “ प्रत्येकाचे डोळे आणि कान होतील चकित ! “ तर एकूणात भव्य सगळे ! प्रकाशयोजनेची उधळण आणि राहुल रानडे यांनी नेमकी गरज ओळखून दाक्षिणात्य चित्रपटासारखे दिलेले धडाकेबाज पार्श्वसंगीत ! शिवाय स्टार्स, बाकीचा उत्तम नटसंच, भव्य नेपथ्य आणि उंची वेषभूषा वगैरे सर्व ! पैसे वसूल झाल्याचे समाधान मिळणार, हे नक्की ! तिकीट दर १०००, ८००, ५०० आणि ४०० ! मराठी रंगभूमीवर हेही भव्य ! पण, मुख्य म्हणजे, या जगात जन्माला आल्यासरशी शेक्स्पियरचे निदान एक तरी नाटक बघून होते ! मराठीत जन्माला येऊन ज्ञानेश्वर-तुकाराम न वाचता मरणे जसे वाया जाणे आहे तसेच या जगात जन्माला येऊन शेक्स्पियरच्या संपर्कात न येता मरणे आहे !

खुद्द शेक्स्पियरच्या सुरुवातीच्या काळात त्याची नाटके सूर्यप्रकाशात होत असत – प्रकाशयोजनेचा प्रश्नच नसे – त्यामुळेच शेक्पि्ियरला त्याच्या शब्दांतून वातावरण-दृश्ये उभी करावी लागली, असे म्हणतात. कालांतराने नाटकाची तंत्रे सुधारत गेली आणि

सादरीकरण समृद्ध होत गेले. ते जरी असले तरी मुख्य मुद्दा शेेक्स्पियरचे नाटक पोचणे, हाच कधीही महत्त्वाचा असणार, मग सादर करताना तुम्ही ते तुमच्या कोणत्याही अन्वयाने सादर करा. या मराठी प्रयोगात ते घडते का, हे पाहायला हवे.

एकूण जागतिक रंगभूमीवरची ही एक महान शोकांतिका समजली जाते. मी इथे शेक्स्पियरचे मूळ नाटक आणि हा प्रयोग यांची तुलना करणारे असे अभ्यासपूर्ण काही लिहिणार नाही आहे. या प्रयोगाने काय घडते, तेवढेच लिहिणार आहे. शेक्स्पियरच्या गाजलेल्या चार शोकांतिकांचे एक मह्त्त्वाचे समान वैशिष्ट्य काय सांगितले जाते ? तर जे मुख्य पात्र म्हणजे नायक असतो तो बाकी छान, चांगला असतो पण त्याच्यात एक असा दुर्गुण असतो की ज्यामुळे त्याचा पूर्ण नायनाट होतो. त्याला ' शोकात्म दुर्गुण ' किंवा tragic flaw म्हणतात. अशा दुर्गुणामुळे होणारे ते प्रचंड अधःपतन पाहून प्रेक्षकांचे भावनिक विरेचन होते, असे म्हटले जाते. ( शोकात्म दुर्गुण आणि भावनिक विरेचन, या दोन्ही कल्पना मला पटत नाहीत, हा भाग वेगळा. ) हॅम्लेटचा सांगितला जाणारा असा दुर्गुण म्हणजे निर्णयशक्तीचा डळमळीतपणा – कृतीच्या बाबतीत गोंधळलेले असणे. या प्रयोगात ते जाणवते का ? क्लॉडियसने खरेच त्याच्या वडिलांचा खून केला आहे का, याची खात्री पटवून घेण्याचा एक मार्ग म्हणून त्याने नाट्यप्रयोगाचा उपयोग करणे, हा काही डाळमळीतपणा नव्हे. तो राजा प्रार्थना करत असताना त्याला मारल्यास तो स्वर्गात जाईल म्हणून त्या वेळी त्याला न मारणे, हेही तेव्हाच्या समजुतीप्रमाणे योग्यच वाटते. हॅम्लेट जेव्हा राणीशी म्हणजे त्याच्या आईशी तिच्या महालात बोलत असतो तेव्हा त्याला तिथल्या पडद्यामागे कुणी असल्याचे जाणवते – तो क्लॉडियसच असणार असे समजून, क्षणाचाही वेळ न घालवता तो त्या व्यक्तीत तलवार खुपसतो ! तो क्लॉडियस नसून पोलोनियस असतो, हा भाग वेगळा. पण, हा काही डळमळीतपणा नक्कीच नव्हे. To be or not to be – असावे की नसावे ( काहीजण ‘ जगावे की मरावे ‘ असेही म्हणतात ) – यातही एक ओघात येणारी निराशा जाणवते – डळमळीतपणा नाही. ( हेच स्वगत की दुसरे कोणते ते आता नीट आठवत नाहीय – पण, भराभर म्हणून संपवले जाते, कारण, उगीच खोलात गेल्याने होणारा ताप नको, पण, कानावरून गेल्याचे समाधान मिळावे ! ) तसे तर हे नाटक हॅम्लेट केंद्रीही झालेय, असे म्हणता येणार नाही. त्याची अनुपस्थिती असलेलाही बराच भाग आहे नाटकात. आपल्या इथल्या बुद्धिप्रामाण्याच्या आणि विवेकशीलतेच्या पुरोगामी वातावरणात तर हॅम्लेटचा मानसिक-वैचारिक गोंधळ नीट जाणवायला हवा होता – तसे होत नाही. पण, काय काय घडले याची एकूण गोष्ट मात्र चटपटीतपणे सांगितली जाते. एकूण शेवट सगळा सगळे बरबाद करणारा असूनही भावनिक विरेचनाची वगैरे शक्यताही निर्माण होत नाही ! कारण, ‘ डोक्याला ताप नको ‘ या तत्त्वाचा प्रचंड ‘ शोकात्म दुर्गुण ‘ असलेल्या मराठी प्रेक्षकांपुढे हे सादर करून कोट्यवधींची उलाढाल करायची आहे, हे आधीच ठरलेले आहे !

सारांश म्हणजे मुद्दलातच या नाटकाच्या आशयाला हात घालणे एक तर जमलेले नाही किंवा टाळलेले आहे !

आता खूप लिहीत बसण्यापेक्षा, माझे व्यक्तिगत काही सांगतो. मला हे नाटक शोकांतिका वगैरे वाटलेच नाही – एकूणच क्रिया-प्रतिक्रियांच्या जगण्यातला सर्वच पात्रांचा गधडेपणा व्यक्त करणारे वाटले ! Absurd – असंगत वा व्यस्त नाटकाचा शिरोमणी वाटले ! या सगळ्याचा मूळ पाया काय तर भूत येऊन अमुक म्हणून सांगते, हा ! बाकी, पुढेही चांगले-वाईट असा खेळ गृहीत धरत

पुढे जाणे ! – हे माझ्या सर्जकतेमुळे मला मस्त वाटले ! पण, हाच आशय म्हणून मांडलेला नाही आहे – तशी कुणाची हिंमतही नाही होणार !

एवढे खूप झले ! माझ्या दृष्टीने हे एक सपाट आशयाचे ' भव्य ' नाटक आहे ! मराठी प्रेक्षकाचा जन्म धन्य करणारे !

( इथे आमच्या कोल्हापूरच्या ' प्रत्यय ' चे ' किंग लियर ' आठवा. त्यांनी ते आशयकेंद्री करायचा गंभीर प्रयत्न केलेला होता ! उलाढालीचा प्रश्नच नव्हता ! तसेही नाटक असते मराठी राजा ! )

--- ००० ---

घरपोच

काल ' हॅम्लेट ' बघून निघालो पण नेहमीप्रमाणे रिक्षा मिळे ना. रिकाम्या रिक्षा जात असल्या तरी त्यांना सोयिस्कर ठिकाणी मला जायचे नसल्याने नकार मिळत होता. माझ्या मोबाईलवर ते ओला-उबेर आहे पण ते वापरायचे कसे ते समजून घेतलेले नाही. तरीही रस्त्यात उभा राहून प्रयत्न करून पाहिला. तिथेच एक पतिपत्नी उभे होते, त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. " तुम्हाला कुठे जायचेय -- आम्ही उबेर बोलावलीय -- तिकडेच जायचे असेल तर आणि तुमची हरकत नसेल तर तुम्ही आमच्याबरोबर येऊ शकता-- " ते म्हणाले. माझा मार्ग तोच होता पण मला आणखी पुढे जायचे होते. पण, म्हटले, ठीक, तिथून रिक्षा मिळेल. म्हणून त्यांच्याबरोबर निघालो. तेही ' हॅम्लेट ' बघूनच आले होते. त्यावरून विषय निघाला तो ' प्रत्यय ' च्या ' किंग लियर ' चा. आणि काय आश्चर्य ! ते दोघेही प्रत्ययशी संबंधितच होते ! ज्योती मनोहर आणि नंदन मनोहर ! नंदन यांनी तर प्रत्ययच्या ' घोडा ' नाटकात कामही केलेले होते आणि त्यांना त्यासाठी अभिनयाचे पारितोषिकही मिळाले होते ! मग, मी त्यांना सांगितले की मी चं. प्र. देशपांडे -- प्रत्ययची स्थापनाच आमच्या घरात, माझ्याच नाटकामुळे झाली होती आणि ' प्रत्यय ' हे नावही मीच दिलेले आहे ! त्यांना अर्थातच माझी माहिती होती ! आम्हा तिघांनाही आनंद वाटला ! जबरदस्त योगायोग ! मग, बऱ्याच गप्पा झाल्या. त्यांचा प्रवास मॉडिफाय ( वाढीव ) करून त्यांनी तो माझ्या घरापर्यंत केला आणि बिलही देऊन टाकले !

सारांश, प्रायोगिक लेखकाला ओळखणारेही काही असतात आणि त्यालाही जग अनुकूल असू शकते !

( ' हॅम्लेट ' वर अर्थात लिहिणार आहेच -- )

पूर्वेला असलेल्या
कोर्टाच्या मागून उगवे सूर्य
नावेतून लोकांची ने-आण करणारे
म्हणत खड्ड्यात जाऊ दे --
आम्ही काळे का झालो
आणि आमच्यावर आयुष्यभर
अंधारच का

या प्रश्नामुळे ते सतत
कोंडाळ्यात राहात
आणि गमावून बसत
एकट्याने पाण्याला स्पर्श करणे

सर्वच मने या प्रश्नावर
मात करण्याच्या प्रयत्नात
चालूच ठेवत
संधीची वाट पाहणे
एकमेकांची वाट लावण्याच्या

वकील फी खूप मागत
खोटे साक्षीदार रचून ते घेऊ शकत
सूर्यालाच वळवून त्यांच्या बाजूला

काहीजणांना कळे की
हे चक्र भेदावेच लागेल --
नावाड्यांना वाटे ते आपापले पाहताहेत
आमच्याबद्दल बेफिकीर राहून
स्वतः सुटू पाहताहेत भोसडीचे
--- ००० ---

पुरुषप्रधानतेमुळे घरांत पुरुषांचीच वट असण्याची आपल्याला सवय आहे. या समानतेच्या काळात काही स्त्रियांनी ती परिस्थिती बदलण्यात यश मिळवलेले आहे. बातमी अशी आहे की पुढच्या कोणत्याच जन्मात ही बायको मिळायला नको, या हेतूने काही पुरुषांनीही वटपौर्णिमा साजरी केलीय ! त्यांची मागणी उलटी असल्यामुळे त्यांनी वडाला उलट्या प्रदक्षिणा घातलेल्या आहेत ! हा विधी केल्यावर त्यांतल्या कितींनी घरी परतण्याची हिंमत केली आणि किती हातीपायी धड राहिलेत, ते अजून कळायचेय !

पण त्या बिचाऱ्या बेदखल राहिलेल्या कर्तृत्ववान स्त्रिया या निमित्ताने प्रकाशात आल्या, हे यातून चांगले घडलेले असून त्यातून आता आणखीही खूपजणी स्फूर्ती घेतील, असे बोलले जातेय !

--- ००० ---

मी तीन वर्षे कोल्हापुरात होतो, त्या काळात एकदोनदा एन. डी. पाटील यांची भाषणे ऐकली होती. मला ती त्यांची बोलण्याची शैली फारच आवडली होती ! आणीबाणीबद्दल बोलताना त्यांनी एक किस्सा सांगितला होता. ठिकठिकाणच्या आठवडेबाजारात तंबू टाकून कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया केल्या जात. लोकांची पळापळ होई. ते म्हणाले की यामुळे आठवडेबाजार ओस पडायला लागलेत ! कुणी किती शस्त्रक्रिया केल्या याचे रिपोर्टस वर पाठवले जात. पाटील म्हणत, भारतात एकूण किती शस्त्रक्रिया झाल्या हे कुणी सांगू शकेल का ? तो आकडा का बाहेर येत नाहीय ? यावर क्षणभर थांबून ते म्हणत की त्यात एक प्रॉब्लेम झालाय ! सगळीकडून आलेल्या रिपोर्टांची बेरीज केल्यावर आता असे लक्षात आलेय की तो बेरजेचा आकडा भारताच्या एकूण लोकसंख्येहून जास्त येतोय !

--- ००० ---

निरनिराळ्या पक्षांचे निष्ठावान
मानवी हिताचे पाईक वर्चस्वाच्या
राजकारणात काढतात आठवणी
बिचाऱ्या तत्त्वशीलांच्या
राजकारण न जमल्याने
मातीत गेलेल्या

नव्याने उघडलेल्या नॉन-व्हेज
हॉटेलातली तंदूरचिकन खाताना

एकजण मनात वागवतो त्याच्या
शत्रू नालायकाची वाट लावणे
तळागाळातले सगळे
आपलेच असल्याच्या खात्रीत
एकजण जातो मैत्रिणीसह
शैक्षणिक पिकनिकला

असे सगळे ईमानदार
जाणून असतात
वर्चस्वाची गणिते
रक्तलांच्छित कबड्डीवर ठरणारी

राजकारणातून यश मिळवून
सर्वहिताचे साम्राज्य
उभे करण्यासाठी काहीजण
जागतिकिकरणाच्या बाजारात
बाजी लावतात गरिबांच्या कपड्यांची
त्यांच्याच हितासाठी जिंकण्यासाठी
तात्पुरती तडजोड म्हणून
--- ००० ---

शहाणपण ( wisdom ) हे वाचन-श्रवण मार्गे वा कोणत्याही प्रगतीने वाढत नसते -- ते एक तर असते किंवा नसते !

एक लक्षात घ्या -- उंच जागी पाणी साचलेले नाहीय -- ते फक्त सखल भागांत साचलेय -- आणि समुद्राला भरती येतेच -- नाइलाज आहे !

पात्रनिर्माण

मी एका अशा पात्राची कल्पना करतोय की तो ज्या भाषेत जन्माला आलाय त्या भाषेने आणि ज्या संस्कृतीत जन्माला आलाय त्या संस्कृतीने त्याच्यावर पिढ्या न पिढ्या प्रचंड अन्याय केलेला आहे ! त्यामुळे, त्याला त्या भाषेचा आणि त्या संस्कृतीचा प्रचंड द्वेष वाटतो. आता तो, फार तर त्याच्या कुवतीप्रमाणे त्यात काही बदल करू शकतो, त्यातले काही वगळू शकतो वा त्यात काही वेगळी भर घालू शकतो. पण, ' जे आहे ' त्याला धरून, त्यातूनच हे घडणार ! याचाही त्याला प्रचंड, स्वछळ करणारा संताप येतो ! त्याला ' जे आहे ते ' समूळ नष्ट करून नवेच काही घडवायचे आहे. पण, तशी शक्यता फक्त अध्यात्मात असल्याचे वर्तवले जाते -- आणि ती शक्यता वर्चस्व देणारी वा सूडाचे समाधान देणारी नाही ! त्याला तो मार्ग ट्रायही करायचा नाहीय कारण तो स्वतः बुद्धिप्रामाण्यवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोणवाला आहे !

म्हणजे ही समस्या घेऊन तिच्यासह जगणे एवढेच तो करू शकतो की काय, अशा एका दिङमूढ करणाऱ्या समस्येत तो आहे !

आता त्याने सतत द्वेषात जगावे की ' जे आहे ' त्यात बदल करत प्रेमाने जगावे ?

माझे दुःख म्हटले तर
प्रतीक आहे एका ओंडक्याचे
ज्यावर बसला आहे एक पक्षी
जो म्हटले तर प्रतीक आहे
या जगाच्या अर्थाचे

विचार हेच जेव्हा उपाय होतात
प्रतीकात्मक निराकरणे होत
प्रत्यक्ष रस्त्यांवर घडणाऱ्या
अपघातांची तेव्हा ते होतात
प्रतीक लांबलचक काळाचेही
( ज्यात हवेचे बुडबुडे भावनांचे
कंटाळा आणतात )
निरर्थकतेच्या भीतीचे
प्रतीक असणाऱ्या

यातूनच कालांतराने
वेळ येते रक्त किती
कुणाकुणाचे सांडलेय याचा शोध
घेण्याची अटळ स्वीकाराचे
प्रतीक म्हणून

मुले वाढत राहतात
शिकवलेल्या भीतीत
प्रतीकात्मक खेळतबागडत
सुरळीतपणे पडणाऱ्या
पावसाचे प्रतीक म्हणून
अर्थपूर्ण पंख पसरत
--- ००० ---

" याला पुड्या बांधायलाही कुणी ठेवणार नाही -- "
-- या जुन्या वाक्प्रचाराचे साल्हाद पुनरुज्जीवन !

उदाहरणादाखल घेतली समजा एक खार
आणि तिच्या पायावरून गेली समजा
एक सायकल एका निव्वळ पोकळीत
जिथे काही ऐकूच नाही येत
आणि पाऊस पडला तरी
सरकारी ऑफिसेस सुटतच नाहीत कधी
कायमची गुलाम असल्याप्रमाणे तर काय उपाय

उगीचच कोण विमा पॉलिसी उकिरड्यावर
टाकून सिनेमाला जाईल
तेही ब्लॅकची तिकिटे काढून

असे साधे प्रश्नही ज्यांना सुचत नाहीत
त्यांना ठेवावेच का तपासणीच्या कामावर

न वाचता सह्या केल्या असतील
तर पोरेबाळे विसरा आणि जा पंढरपूरला
जिथल्या वेश्या देतात दर्शन
अनेक चित्रपटांतून माणुसकी दाखवत

नुसती निमित्ते सांगत निवडणूक
टाळता नाही येणार
तुमच्याविना काही अडणारही नाही
तुम्हीच खरे तर लुटलेत
लोकांचे सगळे नैतिक अभिमान

आता शांत राहा येईल ती खारच
लंगडत तुम्हाला वाचवायला
एक माणुसकी म्हणून पंढरपूरहून

--- ००० ---

एवढ्यातेवढ्याने भावना दुखावल्यामुळे एकमेकांच्या अंगांवर धावून जाणाऱ्या लोकांच्या या कमकुवत मनाच्या, अस्मिताग्रस्त ' पुरोगामी ' महाराष्ट्रात -- ' इतिहासाचा अंत ' अशा विषयावर बुद्धिप्रामाण्यवादातून लिहिणारा कुणी माणूस आला तर झेपेल का ? झेपणार नसेल तर बुद्धिप्रामाण्यवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या गप्पा मारून उपयोग काय ? पुरोगामीपणाची भाषणबाजी वेगळी आणि पुरोगामी असणे वेगळे !

तरीही, अस्मिताहीन अशा निर्भीड आरोग्यपूर्ण विचाराच्या दिशेने जाणे कुणाला महत्त्वाचे वाटत असेल तर एक प्राथमिक तयारी म्हणून, आमचे मित्र चिन्मय धारुरकर यांनी अनुवादित केलेला आणि ' खेळ ' च्या ३९ व्या अंकात आलेला ' इतिहासाचा पुनर्विचार ' हा लेख वाचावा. " इतिहासात अनेकांचे हितसंबंध गोवलेले असतात " -- हे वाक्य पचवू शकणाऱ्यांनी तर तो अवश्य वाचावा.

( मी स्वतः जातिवंत इतिहास-द्वेष्टा असल्याने माझे हितसंबंध या लेखात खूपच गोवलेले आहेत ! )

--- ००० ---

आमची आम्हीच ठरवलेली
आमची रात्रपाळी संपल्यावर
पहाटे आम्ही झोपतो टेंपो ट्रक, बस पाहून
त्यांच्या खाली आम्ही विसरतो ( ते स्टार्ट होईस्तोवर )
भांडणे ओरडणे आणि सगळे पाठलाग

स्टेशनकडचे हंबीरराव
निष्कारणच आमच्या गल्लीत शिरले होते
चुकूनही असेल निव्वळ
एक विहारस्वातंत्र्य म्हणून

अनिलनेही खरे तर विषय नको होता काढायला
की आपण आर्य की द्रविड की नागवंशीय
की मूलनिवासी वेगळेच कुणी
कारण खरे तर आम्हाला ते कळतही नाही
आणि गरजही नाहीय आता
कोणते महायुद्ध कुणाकुणात
आणि का झाले होते हे समजायची
आपोआप लक्षात राहणारे
सहज मिळणारे अन्न बास आहे

काहीजण अनावश्यक किंवा रोगामुळे
चावतात इकडेतिकडे यांनात्यांना त्यामुळे
माणसे आमच्यावर पिसाळतात
मारायला परवानगी नाही तर निदान
नसबंदी तरी व्हायलाच हवी भोसडीच्यांची म्हणतात
आम्ही काय प्रजा वाढवण्यासाठी थोडेच चिकटतो
एक मजा मजेत जगायचे बास
--- ००० ---

## नाटकाचा आशय आणि तंत्र

कलेत आपण नृत्य, शिल्प, चित्रकला, साहित्य असे विभाग पाहतो. लिखित संहितांत म्हणजे साहित्यात आपण कादंबरी, कथा, कविता, नाटक असे प्रकार पाहतो. त्यातही, साहित्यात पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक वा राजकीय असे विभाग पाहतो. इथे मला आणखी एक विभागणी सुचवायची आहे. ही विभागणी कडेकोट कप्प्यांसारखी बंदिस्त नसेलही, पण, ती अस्तित्वात असते. ही विभागणी आशयाच्या बाबतीत असते. आपण इथे नाटकाबद्दल बोलणार आहोत म्हणून त्या अंगाने बोलू. (१) ' डोक्याला ताप नको ' टाईप – प्रेक्षकांच्या मानसिक सवयींना विचलित न करणारा आशय – याला ' सपाट ' आशय म्हणू. (२) प्रेक्षकांच्या मानसिक सवयी विचलित करणारा आशय – याला ' सर्जक ' आशय म्हणू.

सामान्यतः व्यावसायिक वा आर्थिक नफ्याची अपेक्षा करणारे नाटक हे सपाट आशयाचे असावे लागते. तसे ते नसेल तर ते सपाट आशयाचे करून घ्यावे लागते. याउलट सर्जक नाटक हे आर्थिक फायद्यासाठी केले जात नाही. किंबहुना तोटा झाला तरी चालेल, असा हा प्रकार असतो. इथे एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा की नाटक ही एकमेव अशी सादरीकरण कला आहे की जी कमीत कमी खर्चात प्रेक्षकांसमोर आणता येते. ' एक नट आणि एक प्रेक्षक असला की नाटक सादर होऊ शकते ', ' नाटकाचा सिनेमा होऊ नये ', ' नाटकाच्या नेपथ्याला टाळी पडली तर नाटक फसले, असे समजा ' – अशा प्रकारची वाक्ये सर्जक नाटक विभागात बोलली जातात. याउलट व्यावसायिक नाटक गर्दीसाठीच असणारे, गर्दीला खुश करणे हाच हेतू असलेले आणि करमणूकप्रधान असावे लागते.

सपाट आशयाच्या नाटकात सादरीकरणातली जादूच महत्त्वाची असते. अभिनयासाठी स्टार्स असणे, नेपथ्यात विमानतळ वा स्वयंपाकघरातल्या सिंकच्या नळाला पाणी येणे, प्रकाशयोजनेच्या करामती, भरपूर पात्रे, वेषभूषा, प्रभावी संगीत – हे असे सर्व लागते. यासाठी गुंतवणूकही बरीच लागते. नफा मिळवणे हाच हेतू असल्याने, इथे ती गणिते खेळलीही जातात. हे सर्व सर्जक आशयाच्या नाटकात जमणे फारच अवघड असते. इथे एक तर अपेक्षित प्रेक्षकसंख्या कमी असते. मराठीत तर ' डोक्याला ताप नको ' हे एकूणच प्रेक्षकांचे आद्यतत्त्व असते. इथे नफा तर जाऊच द्या तोटा होण्याचीच तयारी ठेवावी लागते. सर्जक नाटकांसाठी ही एक मर्यादा असते, असेही म्हणता येत नाही. उलट तंत्राचा बडेजाव सर्जक नाटकाला मारकच ठरण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, इथे सूचकतेचे आणि अर्थपूर्ण कल्पकतेचे महत्त्व वाढते. ' एक शून्य बाजीराव ' या नाटकात फिरता रंगमंच घेऊन नाटकातल्या नाटकाचे थियेटर दाखवण्यापेक्षा कल्पक नेपथ्याने अपेक्षित परिणाम साधले जातात. रवी लाखर्यांनी माझे ' समतोल ' हे नाटक बसवले तेव्हा, मध्यमवर्गीय घराचे पूर्ण नेपथ्य न मांडता एका छोट्या पडद्यावर पंखा, फ्रिज, कपाट, टेबल-खुर्ची अशी चित्रे काढून घेतली होती ! तो पडदा हेच नेपथ्य होते ! अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

उत्तम, सखोल अभिव्यक्तीच्या गाण्यात तबलजीने वा इतर वादकांनी जास्त करामती करायच्या नसतात. पूरक म्हणून त्यांचे काम महत्वासाचे असले तरीही. काल फेसबुकवर ‘ नाटकातली भव्यता ‘ या विषयावर आपण एक चर्चा करत होतो. त्या संदर्भात, त्याबाबतचे माझे हे आकलन इथे थोडक्यात मांडले आहे.

( व्यावसायिक नाटकाला तरी अचानक कोटीकोटीची गुंतवणूक शक्य आहे का ? ‘ तुझा धंदा किती, तू बोलतोस किती ‘ असेच ते होणार ! आजाराने जर्जर झालेल्या माणसाला सांगावे की ‘ तू रोज दहा किलोमीटर पळायला सुरुवात कर – बघ कसा टुणटुणीत होशील ‘ – तसे हे होणार ! )

--- ००० ---

The constant assertion of belief is an indication of fear.

Jiddu Krishnamurti

हा एक संपावा आता पावसाळा
तर त्याने कोणती क्रांती होणार आहे
मीच फेकून दिलेली जुनी बिले
आता कशी काय घडवतील
ढगांचे नवे डिझाईन

खरे तर आता काहीच नाही केले
तरी काय बिघडेल
जन्मापसून गृहीत धरून मी
कोणतीच मोडतोड केली नाही
याचा अर्थ हे सगळे
माझ्या कर्तव्यांसाठी थोडेच थांबलेय

जे कळतच नाहीय त्यात नको बदल
असे म्हणून मी व्यक्त होत राहतो
जरी ते जिवंत निरर्थकतायुक्त
असले तरी आणि असले तरी

साठणारे बरेच अधिक शिल्लक

या कोलाहलात थांबून कोण
पाहणार आहे माझ्या आवाजांची कृती
जी हा कोलाहल नष्ट करणारी आहे

कशाला हवीय जिद्द
वेगळ्या शैलीतल्या कपड्यांतले
आपले फोटो सर्वांवर ठसवण्याची
त्यापेक्षा साधे वाटल्यास व्हावे व्यकत
नाही तर नाही
--- ००० ---

धर्म-जात-पक्ष-पगडी-पागोटे हे सर्व
' भेदाभेद अमंगळ ' ओलांडून पुण्यात पावसाळा सुरू झालाय !

' भव्य ' नसणाऱ्या नाटकांचे भवितव्य काय असेल ?

खूप जोराचा वारा आला की आमचे एक दार रात्री-अपरात्रीही खटखट वाजतेय -- त्याला हे माहीत नाही की आम्ही भुताटकीला घाबरणारे नाही !

एकच उत्कट आठवण
वर्तमानात आणून
पुन्हा पुन्हा जगणे
वा फक्त शब्दांनी
पूर्ण सहवासाचा सुगंध
फैलावणे वा नुसत्या
क्षणभराच्या किंचितशा

स्पर्शातून पूर्ण अनुभव घडवणे

यासाठी समोरचे वास्तव
ढकलावे लागते
नसण्याच्या आभासात

उन्हाने भेगाळलेल्या
जमिनीचे चित्र आणि मनात
वेगळीच आस असून
बाहेर वेगळ्याच कामाचा
प्रचंड बोजा
यांना असत्य समजून
स्वीकारावा लागतो
भौतिक सत्याचा धोका

त्या नेमक्या वेळी
काय करत असेल
मनात ती व्यक्ती
हे माहीत नसणे रद्द करून
सुपीक करून पूर्ण निर्विघ्न
पणे घ्यावा लागतो हंगाम
--- ००० ---

माझे शिक्षण, इस्माईल युसुफ कॉलेज, जोगेश्वरी, मुंबई इथले आहे -- ब्यूटिफुल माहोल !
सबको ईद मुबारक !

त्या वेळी ( आतासारखे ! ) आपण जरा तडफदार असायला हवे होतो !

सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर सी. पी. देशपांडे यांनी मुस्लिम बांधवांच्या घरी भेटी देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या आणि शिरखुरम्याचे सेवन केले -- हे एका खेड्यात घडूनही, जिल्हास्तरीय वर्तमानपत्रात आमच्या बातम्या येत ! ( एक वार्ताहर माझा मित्र होता हे सूज्ञास सांगणे नलगे ! )

सतत कुणालातरी कंडेम करणे आणि डावपेच करणे यांतून आपण खरोखर जिवंत असल्याची आपली खात्री पक्की होत राहते ! आणि आपली टोळीही !

प्रेयसी ऐवजी चिंचेचे झाड आणि
औद्योगिक प्रदर्शना ऐवजी पाणी
असा गोंधळ होऊ नये मनात म्हणजे झाले
माझ्या सुखासीन आयुष्याची
ही किमान अटच असणार

प्रत्येक वस्तूला आणि सजीवाला
द्यावेच लागेल स्वतंत्र अस्तित्व
हे माहीत असूनही एखाद्या संध्याकाळी
दृष्टी अंधुक होताना
सगळेच एकमेकांत मिसळल्याचा
भास होतो आणि मी
प्रचंड भयग्रस्त होतो

मला डावलायचे नसते
आकाशाचेही अस्तित्व
माझ्या जेवणात मला हवे असतात
तारे हत्ती मीठ आणि फूल

मला जाणीव असते की ही व्यवस्था
मी घडवलेली नाही एक पानही
मला घडवता नाही येणार

पण यातले काहीच

न बिघडू देण्याची जबाबदारी मी घेतो

माझे सुखासीन जगणे जणू या व्यवस्थेचाच

भाग असल्याप्रमाणे जगण्यासाठी

शक्य तो मी भ्रम आणि स्वप्ने टाळत राहतो

--- ००० ---

मनाच्या सर्व कृती या एकाकीपणाकडे आणि हिंसेकडे नेणाऱ्याच असतात.

उदबत्ती, पूजा, ध्यान, तीर्थयात्रा – अशा आध्यात्मिक म्हटल्या जाणाऱ्या कृती,

धर्माधारित द्वेषाच्या कृती,

आस्तिक वा नास्तिक राहून जातीय, धार्मिक समरूपतेतून येणाऱ्या हेटाळणीच्या कृती,

‘ मी चांगले, माणुसकीने वागणारा ‘ असे समजून चालणाऱ्या कृती,

‘ मी संवेदनशील, न्यायी आणि करुणावाला आणि ते स्वार्थी, नालायक, असंवेदनशील ‘ या भावनेतून होणाऱ्या कृती,

हुकूमशाही चांगली म्हणणे, अन्यायी लोक संपवलेच पाहिजेत, असे वाटणे, अमुक विचारसरणीनेच भले होणार असल्याने बाकीचे मूर्ख वाटणे, मला माणसाचे हित जेवढे समजते तेवढे कुणालाच नाही समजत, असे वाटणे – या सर्व मानसिक क्षेत्रातल्या कृती आहेत.

सगळी माणसे त्याच, तेवढ्याच मर्यादित क्षेत्रात जगत असतात. सगळ्यांचेच जगणे एकाकीपणा जोपासणारेच असते. यात अटळपणे हिंसेच्या शक्यता असणारच – मग दिसायला ती हिंसा इतरांप्रती दिसो वा स्वतःप्रती.

हे सर्व लक्षात घेतले तर, आध्यात्मिक म्हटल्या गेलेल्या एखाद्याची आत्महत्या वा तशा माणसाला एखाद्या आरोपाखाली तुरुंगात जावे लागणे, यात वेगळे काही नसते. ते कुणाच्याही बाबतीत घडू शकते. यात अध्यात्मविरोधी माणसांनी खुश होऊन उड्या मारण्यासारखे काही नसते. कारण तेही त्याच साच्यातले जगत असतात.

-- माणसाला असेच जगणे भाग आहे का, जगण्याची काही वेगळी पद्धत असू शकते का – हे म्हणायचे आध्यात्मिक प्रश्न – कारण ते वैचारिक उत्तरे मागणारे प्रश्न नाहीत. वाटल्यास विचारावेत, अन्यथा, आहे ते ' हुशारीचे ' जगत राहावे !

--- ००० ---

आज दिनांक १४-०६-१८ च्या लोकसत्तातला ' ' शेक्सपियर आणि शोकांतिका ' हा अग्रलेख वाचनीय आहे. त्यातले एक उद्धृत --

दुःख असो वा आनंद, लेखक शेक्सपियर त्या सगळ्याकडे तटस्थपणे पाहत असे. त्यामुळे ते त्याचे लिहिणे स्वतःपुरतेच राहत नाही. इतरांचेही होते.

--- ००० ---

ती म्हणे ती कधी कधी
विचार नाही करत मी म्हणे
त्याच वेळी मीही नाही
नाही करणार विचार
मग आपला दोघांचा
एकच पाऊस एकत्र पडेल

तिच्या मनाची हालचाल
मला आणि माझ्या तिला
कण न कण जाणवे
सतत चालत सादप्रतिसाद
निर्वस्त्र

कित्येक वर्षे आम्हीच आहोत
या जगात बाकीच्या फक्त कल्पना
इतक्या टोकाच्या सत्यात होई
सतत भेट

दोघेही पूर्ण कफल्लक
द्यायघ्यायला काहीच नसलेले
बेफिकीर होत नष्ट होणारे
ओठांतून आरपार

ती आश्वस्त असते
मी निवांत असतो

दोघांच्याही मनांत

दोघांच्याही

असण्यानसण्यामुळे

--- ००० ---

' आपले वाङ्मयवृत्त ' चा मे'१८ चा अंक. यात वसंत आबाजी डहाके -- Vasant Dahake -- यांचा एक उत्तम लेख आहे – ' एशरचा डोळा '. एशर नामक चित्रकाराची चित्रे ' पाहण्याची ' डहाके सरांची प्रक्रिया मांडणारा हा लेख आहे. सर लिहितात, " एशरची चित्रं पाहत असताना वास्तव या संकल्पनेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होतात. आभास, भ्रम, वास्तव, भ्रामक वस्तुस्थिती या संकल्पना परस्परांत मिसळून जातात. "

या अंकात मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि या लेखातही एशरची अनेक चित्रे आहेत. या सर्वच चित्रांबाबत या लेखात विवेचन केलेले आहे. डहाके सर स्वतः एक चित्रकार असल्याने त्यांचे अशी चित्रे ' पाहणे ' समजून घेणे ही एक सुसंधी आहे !

' आपले वाङ्मयवृत्त ' ला धन्यवाद !

कुणी लिहिलाय आजच्या लोकसत्तेचा अग्रलेख कोण जाणे, पण, आमच्या पिढीचे बालपण टच करणारे शीर्षक आहे ! ' आना सिंगापूर... ' ! हा ' सिंगापूर ' नावाचा शम्मी कपूरचा सिनेमा होता ( बहुतेक त्यात एक परदेशी नायिकाही होती ).' देखो जी देखो -- सुन लो ये बात -- जीवनमें एक बार -- आना सिंगापूर ' -- असे ते गाणे होते. आमच्यासारखी अतिनिम्नमध्यमवर्गीय मुले म्हणत, ' जीवनमें एक बार खाना शेंगागूळ ' !

अकरा शनिवार तेल घाल मारुतीला

आणि मोकळा हो

गाड्यांच्या दिरंगाईतून

-- यावरून एकच सिद्ध होते

की शब्द मनाबाहेरचे

कधीच नसतात

त्यांना फक्त

स्वातंत्र्याचा फील असू शकतो

अर्थ व्यक्त करण्या ऐवजी

स्वातंत्र्य व्यक्त होण्याने
शब्द अभ्यासण्याचा
त्रास वाचू शकतो

ज्यांना दगडफेक हेच शब्दांचे
विहितकार्य वाटते अटळपणे
त्यांचे शब्द नेहमीच फाटलेले
विखुरलेले तुकडे झालेले
आणि जखमी असतात --
प्रश्न समजण्यापेक्षा
त्यांना सूड महत्त्वाचा असतो

श्वासासाठी पाण्यातून डोके
बाहेर काढण्याचे अटीतटीचे
प्रयत्न तर होणारच -- नाइलाजाने
तेच फक्त शब्दांचे काम समजल्याने
एकमेकांच्या मनांनी सारखे
भाजून घेणे होत राहते
--- ००० ---

ड्रेनेजचे पाणी, रेल्वे, आग, फास
असे सगळे होऊन गेले कल्पनेत
आसमानमे तारा देखो मेरे नाम का
म्हणत बसलेले चटके पचवत
ऐकल्या अनेक व्याख्यानमाला

प्रत्येक वेळी भीतीने कल्पनेला
चालना मिळत गेली शेयर बाजारात
प्रत्येक वेळी भीतीमुळे फायदे हुकले

उसने घेतलेले सर्व आनंद स्वतःचेच
समजून पालनपोषण केले त्यांचे
भारद्वाज हा एक शुभशकून मानून

गेल्या वर्षीचे पाणी पुरवत हिरवी
राहिलेली झाडे आता निर्धास्त
ढगांच्या गडगडाटाने कारण
कल्पनेमुळेच आता माणूस
नम्र होण्याची शक्यता दिसतेय

माणसाचे एक बरे असते
वर्षभर उत्तेजक भावना
कधीही कडेलोटाने जन्माचे
रहस्य उलगडणाऱ्या

दो बूंद पानी दो किसी पंछीको बस
तुम्हारी जिंदगी सुधर जायेगी
आसानीसे कल्पना करते हुए –
--- ००० ---

Prabhat Vandana Sudhakar यांची काल दिनांक १०-०६-१८ ला इथे एफबीवर, कालच्याच मटात आलेल्या वसंत आबाजी डहाके यांच्या ‘ कविता आणि बांधिलकीची भूमिका ‘ या लेखाबाबत एक पोस्ट होती. ती लाख्यांनी मला टॅग केल्यानंतर मी अशी कॉमेंट दिली होती – “मी वाचला आहे तो लेख. याच विषयावर माझा एक सविस्तर लेख ' खेळ ' च्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अंकात आलेला आहे. त्यामुळे, खरे तर मी पुन्हा इथे लिहायला उत्सुक नव्हतो. तरीही, आज-उद्या माझे मत थोडक्यात मांडेन. “

त्याप्रमाणे माझे मत मांडत आहे –

मुळात डहाक्यांचा हा लेख अत्यंत निराशावादी आहे. ते काय म्हणताहेत, ते वाचा – “ ज्यांच्याकडे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक सत्ता असते ते आदेश देतात. या सत्ता सुट्या सुट्या नसतातच, त्या एकवटलेल्या असतात : एका व्यक्तीच्या, एका गटाच्या, एका समूहाच्या, एका संघटनेच्या, एका पक्षाच्या ठिकाणी.सर्वत्र हुकूमत गाजवू पाहणारी एक विचारसरणी असते. तिला काउंटर करणारी, भिडणारी, प्रतिरोध करणारी दुसरी विचारसरणी असते. ही दुसरी विचारसरणी स्थापित झाली की ती पहिलीची जागा घेते. हे आजच्या कवींना सांगण्याची गरज नाही. अर्थातच पुन्हा पहिली किंवा तिसरीच विचारसरणी कार्यरत होऊ लागते. दोन्ही विचारसरणीपाळकांच्या घोषणाफलकावर मानवाचे कल्याण, मानवाचा विकास हेच ध्येय असल्याचे लिहिलेले असते. प्रत्यक्षात कल्याण होते ते काही गटांचे हेही सर्वज्ञात आहे. हिटलर-मुसोलिनीचा फॅसिझम-नाझिजम असो की स्टालिन-माओचा साम्यवाद असो, महाकथने रचली जातात आणि कष्ट करणाऱ्यांच्या हाती केवळ करवंटीच येत नाही, त्यांच्या अत्यंत जवळचे, खाजगी जग आणि बाहेरचे जग भयाने, दहशतीने, असुरक्षिततेने भारलेले असते. “ म्हणजे, हेच सतत चालू असते, यात फरक पडत नाही. याच विचाराला सुसंगत असा या लेखाचा शेवट डहाक्यांनी केलेला आहे – खैरलांजी चालूच राहणार – ती शतकांची युगांची व्हईल खैरलांजी जख्ख म्हातारी – अशा कवितेच्या ओळीने केलेला आहे,

इथे काही प्रश्न निर्माण होतात. मुळात, इतकी निराशावादी व्यक्ती परिवर्तनवादी असू शकते का ? परिवर्तनवादी असायलाच हवे किंवा तसे असणेच आदर्श, असे इथे सुचवायचे नाही आहे. दुसरे म्हणजे निराशावाद ही एक संज्ञा झाली. प्रत्यक्ष निराशावादाचे अस्तित्व माणसागणिक वेगवेगळ्या प्रकारचे असू शकते. आपण विज्ञानवादी आहोत, त्यामुळे, Genetic Psychology म्हणजे, जनुकीय मानसशास्त्र ही एक ज्ञानशाखा म्हणून मान्यताप्राप्त आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे. कोणाच्याही स्वभावाच्या वा मूडच्या साच्यात इतर माणसांना कोंबून बसवायचा प्रयत्न करणे, हे अत्याचाराचे होईल.

यातूनच एक मुद्दा असाही स्पष्ट होतो की कोणत्याही काळात, कुणाचीही सत्ता असली तरी, सामान्य लोक अन्यायग्रस्तच राहतात. त्यामुळे, त्यांची बाजू घेत राहणे, हे कवीचे काम असते. कोणत्याही पिढीतल्या कवीचे हेच महत्त्वाचे काम असते ! म्हणजे काय ? हाच निरर्थक उद्योग कवीने पिढ्या न पिढ्या करत राहायचे ? हे तर त्या सिसिफसच्या खडकासारखे झाले ! त्याला एक मोठा खडक ढकलत डोंगरावर चढवत राहायची शिक्षा होती. शिखरावर पोचण्यापूर्वीच तो खडक गडगडत पुन्हा पायथ्याशी येई ! पुन्हा तेच – ढकलत राहणे ! त्या सिसिफसने, देवाच्या मते, काही अपराध केलेला होता म्हणून त्याला ती शिक्षा देण्यात आलेली होती, अशी ती कथा आहे. कवींना कोणत्या अपराधासाठी डहाके ही शिक्षा फर्मावत आहेत, ते समजत नाही. आणि कोणतीही माणसे वर्चस्वासाठी झटणारी आणि ते मिळताच इतरांवर अन्याय करणारीच असतात, तर हे कवी कोणत्या आकाशातून पडलेले असतात ? तेही त्या न्याय-अन्यायाच्या साखळीतलेच असणार ना ! ( यात मला एक गोष्ट विशेष वाटली – ती म्हणजे, डहाके स्वतः कोणत्याही विचारसरणीशी समरूप होऊन तिची तरफदारी करत नाहीत ! )

डहाक्यांचे म्हाणणे असे आहे की कवी हा बलात्काऱ्यांच्या, खुन्यांच्या बाजूचा असू नये. मला तरी असा कुणी कवी दिसलेला नाही की जो म्हणतो, " बलात्कार – वा होऊ देत, खून – फारच बेश्ट – मस्त ! " सामान्यतः असे कुणी नसते. कुणाचीही तडफड पाहून सामान्यतः माणूस हादरतो, त्याला वाईटच वाटते. कवीही, अगदी मग तो साधी चित्रपटगीते लिहिणारा का असे ना, असा संवेदनाहीन वा सॅडिस्ट नसतो. ती त्याची भावना व्यक्त व्हायला हवी, असा डहाक्यांचा आग्रह दिसतो. ते मात्र तसे होईलच असे सांगता नाही येणार. गालिबने मधुरा भक्तीच्या प्रेमकविता लिहिल्या, याचा अर्थ, ' मरू देत सगळे गरीब लोक ' अशा वृत्तीचा तो होता, असे नाही म्हणता येणार. या प्रकारात गंमतीचा भाग म्हणजे, डहाक्यांना बेकेटमध्येही ' भूमिका ' सापडते ! तो तर निरर्थकतेचा आणि व्यस्ततेचा जागतिक एक्का समजला जातो ! पण, कुणाला काय जाणवावे यावर कोण बंधन घालणार ? आपण ठरवले तर ' बीज भाजून केली लाही । जन्ममरण आम्हां नाही ।। ' या ओळींतही आपल्याला बांधिलकी सापडू शकेल ! मुद्दा तो नाही. अमुक आशय अमुक प्रकारे आलाच पाहिजे का – हा प्रश्न आहे. इथे आपण एक वेगळे उदहरण घेऊ. बुद्धाने प्रेत पाहिले. आपणही पाहतो. सामान्यतः येणाऱ्या प्रतिक्रिया, वाईट वाटण्याच्याच असतात. पण, बुद्ध तिथे थांबला नाही. त्याच्या मनात काही मूलभूत प्रश्न निर्माण झाले, त्यांचा त्याने शोध घ्यायचे ठरवले. त्याला दुःखी लोकांबद्दल बेफिकीर माणूस म्हणणार ? अशाच प्रकारे एखाद्या कवीची ' सामान्यतः येणाऱ्या प्रतिक्रियेहून अधिक ' अशी काही चिंतनशीलता जागी होऊ शकते. त्याला कुणीही बंदी नाही घालू शकत. ' साहित्य कलेपासून तत्त्वज्ञानाची फारकत होऊ नये ' अशा अर्थाचे सार्त्रचे एक वाक्य आहे, ते इथे आठवावे.

कविता म्हणजे नुसता क्रिया-प्रतिक्रियांचा खेळ वा अभिव्यक्ती, असे समजल्याने हे घोळ होतात. स्वतः डहाके कोणत्याही विचारसरणीशी समरूप होत नाहीत, असे या लेखावरून दिसते. मग, त्यांच्या प्रतिक्रियांचा पाया कोणता ? दुःखितांबद्दल वाईट वाटणे हाच ? असे वाईट वाटता कामा नये, असे कुणीच म्हणणार नाही, उलट तशी प्रतिक्रिया तर सामान्यच असते. मग, या लेखात मुद्दा काय आहे ? मला असे दिसते की डहाक्यांचा कल प्रतिक्रियेहून अधिक अशा चिंतनशीलतेकडे आहे, पण, आपण भूमिकेची तरफदारी करणारेही आहोत, असे त्यांना म्हणायचे आहे ! ही अवस्था नक्कीच असू शकते – ती नाकारायचा प्रश्नच नाही. त्याचप्रमाणे, उदाहरणादाखल, " Absurd is that which is devoid of purpose … Cut off from his religious, metaphysical, and transcendental roots, man is lost; all his actions become senseless, absurd, useless " -- Martin Esslin – The theatre of the absurd – page 23 ) असेही आकलन असू शकते, हे संवेदनशीलतेने समजून घ्यायला हवे.

कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रात कुणाचाच हेकटपणा महत्त्वाचा ठरू शकत नाही, हाच या टिपणाचा सारांश.

--- ००० ---

अरे, हे काय निकाल की काय ! ९० च्या आत कुणी बोलतच नाहीय ! त्यातही ९८ आणि ९९ ! महागाई खूप वाढलीय आणि आमचा न्यूनगंडही वाढतोय !

आपले आजचे प्रश्न समजून घेण्यासाठी काहीजण ऐतिहासिक विश्लेषण वापरतात, काहीजण मानवी मेंदूच्या उत्क्रांतीच्या मार्गाने जातात, काहींना वाटते की आर्थिक-सामाजिक-राजकीय याच मार्गाने हे प्रश्न सुटतील तर काहीजण तत्त्वज्ञानात यांची उत्तरे शोधतात ! म्हणजेच, मानवी प्रश्न पूर्ण कधीच समजणार नाहीत आणि त्यांचे पूर्ण निराकरण कधीच होणार नाही -- असाच याचा अर्थ नाही होत ?

या पुरोगामी महाराष्ट्रात, जातवादी लोकांना फॅसिस्ट म्हणावे की उदारमतवादी ?

इकडे काही म्हणताहेत की मीटिंग यशस्वी झाली -- हिंदी चॅनेलवाले म्हणताहेत की फेल गेली ! ते दोघे यशापयशाच्या पलिकडे गेले बहुतेक !

प्रणवदांनी बंगाली, हिंदी, इंग्रजी आणि मोहनरावांनी मराठी अशा पावसावरच्या कविता म्हणून दाखवाव्यात आज ! धूम मचेल !

काही विद्वत्तापूर्ण लेखन असे असते की वाक्याचा शेवट ' आहे ' ने होईल असे वाटत असताना तो ' नाही ' ने होतो !

विचाराला भाषा लागते. बोलीपेक्षा प्रमाण भाषा अधिक समृद्ध असते. मराठीपेक्षा इंग्लिश अधिक समृद्ध आहे. यांपैकी कोणत्या भाषेत विचार करता यावरून विचारात गुणात्मक फरक पडेल की नाही पडणार ?
( मी भाषातज्ञ वा तत्त्वज्ञ नसल्याने पडलेला हा प्रश्न आहे ! )

आपली भाषा, धर्म, परंपरा, संस्कृती -- हे सगळे शेकडो वर्षांत घडत, बिघडत, बदलत आलेले आहे. प्रत्येक वेळी सत्तेत असलेल्यांचे, वर्चस्व असलेल्यांचे या प्रक्रियेवर प्रभाव पडतच आलेले असतात. आता प्रश्न असा आहे की हे सगळे सदोष, त्रुटीयुक्त, अन्यायकारक आणि हिंसकही आहे -- तर करावे काय ? या सर्वच रचनेबद्दल नुसते असमाधानच नाही तर क्रोध आहे, तर उपाय काय ? हे सगळे नष्ट करून नवे कसे, काय तयार करायचे ? ते कुणी, कुणाच्या प्रभावाखाली करायचे ? की असे काही शक्य होऊ शकेल की हे सगळे मातीत घालून, पूर्ण कोरेपणाने पुन्हा जंगलजीवनापासून सुरुवात करायची ?

आणि भूतकाळाला धरूनच जर बदल होणार असतील तर या घाणेरड्या, अपमानास्पद जगण्याचे काय करावे ?

राग, लोभ, आसक्ती, क्रोध, सूड -- हे सगळे, आपले इतरांनी घडवलेले जगणे -- मग, आपले जगणे म्हणजे काय -- हा प्रश्नही पडू नये ?

माझी नात दुर्गा पारखी हिची वैज्ञानिक सिक्सर !

माझी नात ( मुलीची मुलगी ) दुर्गा पारखी हिचा, तिने तिच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनाबाबतचा लेख ' फ्रॉंटियर्स इन फिजिऑलॉजी ' या जागतिक नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे ! डायबेटिस२ विषयक हे काही संशोधन आहे. तिथे प्रसिद्धी मिळणे ही एक प्रतिष्ठेची बाब समजली जाते. अनेक चाळण्यांतून पार पडल्यासच असा लेख प्रसिद्धीला पात्र ठरतो. कुणाला इंटरेस्ट असेल तर त्या लेखाची लिंक --

http://journal.frontiersin.org/article/10.3389/fphys.2018.00673/full?&utm_source=Email_to_authors_&utm_medium=Email&utm_content=T1_11.5e1_author&utm_campaign=Email_publication&field=&journalName=Frontiers_in_Physiology&id=326748

यानंतर तिच्यामाझ्यात फोनवर झालेला संवाद --

" वा, दुर्गा, तू तर वैज्ञानिक क्षेत्रात आय पी एल सुरू केलीस ! -- पहिलीच सिक्सर स्टेडियमच्या बाहेर ! "

" अजून बऱ्याच सिक्सर मारायच्या आहेत, आजोबा, ही फक्त सुरुवात आहे -- छोटीशी -- "

हा जरा दिलखुलास कौतुकाचा भाग झाल्यानंतर, ' हुरळून जायचे नाही -- ' असाही एक डोस माझ्याकडून दिला जातोच !

दुर्गा आयसरमध्ये शिकत असून प्रचंड मेहनती आणि बुद्धिमान आहे. मी तर तिला ' सायंटिस्ट ' म्हणायला सुरुवातच केलेली आहे !

बुद्धीच्या क्षेत्रातही बुद्धिबाह्य कारणे, समर्थने आणि शक्ती मुक्तहस्ते वापरणाऱ्यांना ' बुद्धिवादी ' कसे म्हणता येईल ?

गूढ काही नाहीच
असे कोण म्हणाले
पाण्यात पडलेल्या
सूर्याकडे पाहून

असूच कसा शकेल
शर्टावरचा डाग
मानवी मनातून
वैश्विक अर्थ नाकारणारा

मानवी बुद्धी हेच
एक थोतांड असेल
जर पाऊस वाटत असेल
तिला फक्त एक विदूषक

हवेच्या आवरणाखाली
मृत्यूचा हात हजर असतो
हे जाणवूनही विचार
गढून राहतात बालपणात

जे असू किंवा नसू शकते
डोळ्यांदेखत पेटवू शकते
आठवणींचे छुपे संसार
सूज न ओसरणारे

आता एकच शक्य आहे
परीटघडीचा सूर्य अंथरणे

या सत्य जगावर अगूढ
विचारांचे लगाम टाईट करत

--- ००० ---

इकडचा घटस्फोटित तिकडे आणि तिकडचा इकडे -- अशी ट्रायल लग्ने होऊ शकतील २०१९ साठी --

ही मस्त आहे सूचना -- टीव्हीवर वाद, मारामाऱ्या वाढल्याने गोंगाट होऊ लागला की ते बंद करून चीयर गर्ल्स दाखवायच्या !

" बातम्या ऐकून आपसांत भांडत बसण्यापेक्षा शेयर बाजार पाहून कमवायचा प्रयत्न करणे चांगले ! "

लोकशाही स्वीकारूनही, मतभेद म्हणजे शत्रुत्व, असे वागणारे ढोंगी, क्षुद्र, असहिष्णू लोक दिसतात -- आणि दुसरीकडे,
' राजकारणात कुणीच कायमचा शत्रू वा कायमचा मित्र नसतो ' हे पुढील अनपेक्षित घरोब्याचे नैतिक सूत्र मांडणारेही दिसतात !
-- दोन्ही पद्धतींनी सर्व बाजूंचे भक्त च्यूत्यांत निघतात !

शब्द नीट माहीत असायला हवेत, अन्यथा असे होते -- " दिल तडपता है मेरा आप के आ जाने से " -- तिथे ' तडपता ' नाही, ' बहलता ' आहे !

प्रणवदांचे ऐकून आरेसेस बदलण्या ऐवजी प्रणवदाच बदलले तर -- ही शंकाही नको ! होऊ द्यावी विचारांची देवघेव ! अन्यथा, लोकशाही कसली ?

बिनघोर घोरत पडलेली माणसे
झोपेतही रागावलेली दिसत
किंवा काळजीत ' आई ' म्हणत
किंवा आपण स्वतःला पूर्णच
विसरणार तर नाही ना
या विचारात रंधा मारत राहात
आपोआप चाललेल्या रात्रीवर

यात बदल न होऊ देता
ते एरवी संवेदनशील असत
मानवाधिकारांचे नाव काढताच
ते मऊ पडत आणि सर्वांसमोर
स्वतःचे उदाहरण ठेवत

आपल्या मातीतले हाल
आधी संपावेत मग जगाचे पाहू
असे म्हणताना त्यांचा गळा दाटून येई

शेवटी जेवढे शक्य आहे
तेवढेच तास सोडावे पाणी
हे त्यांना मान्यच असे

हुबेहूब त्यांच्यासारखे न जगणाऱ्यांना
ते शत्रू समजत त्यांना रोज नव्या शिव्या देत
त्यांचे फोटो फाडत

इतर लोक त्यांचे सर्व पटल्याचे दाखवत
पण बिनघोर घोरत पडून राहात

--- ००० ---

दोन निवृत्तांमधला संवाद --

१ ( रस्त्यात पाहून -- ) अहो, जरा इकडेतिकडे बघत चला की -- शेजारून चाललेही दिसेनात का काय --

२ अरे, सॉरी -- इकडेतिकडे बघायला हरकत नाही, पण, लोकांचे गैरसमज होतात हो --

१ मन गुप्त ठेवायची सोय ठेवलीय निसर्गानं -- डरनेका नै --

--- ००० ---

कार्यतत्परतेचा उत्तुंग षटकार ! --

नो-पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दुचाकीला वाहतूक-कर्मचाऱ्यांनी चालकासह उचलून टेंपोत टाकले !

दि अदर सन

वाचनालयातून पुस्तक बदलायचे होते. या वाचनालयात मला हवी असणारी पुस्तके फारशी नाहीत. आहेत ती वाईट आहेत, असा याचा अर्थ नाही. सहज नजर टाकली आणि समोर दिसलेले ' विदेशी पडदा ' हे अमोल उकिडवे लिखित, मेनका प्रकाशनचे पुस्तक घेतले. तीन तीन पानांत एकेक चित्रपट कथा ! घरबसल्या अनेक गाजलेले जागतिक चित्रपट आपल्या मनाला स्पर्शून गेल्याचा बेश्ट अनुभव ! यात एक ' द अदर सन ' या एका पॅलेस्टाईन चित्रपटाची कथा आहे -- तीन पानांत मास्टरपीसचा अनुभव ! युद्धकाळात, एका इस्पितळात ज्यू आणि मुसलमान बाळे चुकून बदलली जातात -- आणि ते, पुढे, ती मुले अठरा वर्षांची झाल्यानंतर, एका मुलाचा रक्तगट तपासण्याच्या निमित्ताने लक्षात येते ! ( पहिला प्रश्न, अर्थातच, त्या बाईने काही अनाचार तर केला नसेल ? ) त्यानंतर शोध घेतला जातो आणि ती मुले बदलून घ्यायचे ठरते ! कट्टर शत्रुत्व असणाऱ्यांनी मुले बदलून घेणे ! तशाच शत्रुत्वाचे संस्कार झालेली !

या प्रकारात, नुसती एक ढाचा कथा म्हणून जे येते तेही डोळे उघडून देणारे आहे !

नुसती तीन पानी कथाही अशी ग्रेट असणारा हा चित्रपट जागतिक महत्त्वाचा ठेवा असणार यात शंकाच नाही !

--- ००० ---

विचार, काम, योजना -- हे महत्त्वाचे.
सत्ता, पैसा, मनुष्यबळ -- हे नव्हे.
-- हे माणसांना मान्य पण निकालांना नाही !

" कलेची महात्मता जाणवली नाही तर ती सहनही होत नाही -- उदाहरणार्थ -- शास्त्रीय संगीत ! "

यांच्याकडून ही, त्यांच्याकडून ती -- अशा प्रेरणा घेत राहावे, असे खूप आहेत आपल्याकडे ! प्रेरणा घेत घेत आयुष्य संपू शकते !

सार्वजनिक शौचालयाला अग्निशमन दलाच्या गाडीने पाणीपुरवठा ! ( पाण्या अभावी पेटून उठलेले असंख्य शौचकरी शमले ! )
-- टीवी९ ची बातमी.

प्रत्येकाचे काही मत होते सूर्य

नेमका कधी कुठून उगवला पाहिजे यावर

खात्रिशीर गणिताप्रमाणे

काळकामवेगाचे रस्ते प्रत्येकाच्या डोक्यातून सुटत

निसटलेल्या गुंडाळीप्रमाणे --

भेळेच्या डोशांच्या गाड्या निघून गेल्यावर पडलेल्या अन्नावर

पहाटे कावळ्यांच्या पार्ट्या चालू झाल्यात जणू

इतर सवंगड्यांनाही बोलवत

आपापल्या मतांच्या

पोलीस हाकलून लावत फूटपाथवरून

जरीकाठाच्या टोप्या घातलेल्या एडस झालेल्यांना

बाजारात लोक म्हणत की योग्य नाहीय हे

आधीच वेड्या असलेल्यांना झोडपून काढणे

कुणीच कुणाचे ऐकत नसल्याने जग

आहे तसे राही – खरे तर प्रत्येक उपाय

समान स्थितीत वापरून पाहून

मग ठरवता यायला हवे

जगाचे भले म्हणजे काय ते

सोल्जरकट केलेली टापटीप माणसे

जी अत्तरे लावतात ती इथल्या

पिंजारलेल्या मनांकडे नसतात

इथले स्त्री-पुरुष तर फक्त सेक्स टॉईज

प्रजा वाढत राहते विशेषज्ञ होत आणि स्वप्ने पाहात जगज्जेते होण्याची

--- ००० ---

नशीब, आमच्या वेळी बारावी नव्हती आणि साडेनव्व्याण्णव टक्के गुण मिळवायची कटकटही नव्हती !

तिने गाणे म्हणायचे
खरे तर काहीच कारण नव्हते
मी मुळीच विनयभंगाचा प्रयत्न केला नव्हता
-- ती असेच करते – पाण्यातून
माशांचा थवा गेलेला दिसला की खट्टू होत
सगळा दोष ती मलाच देते –

ती माझे असे खोटेच अपमान करते
हे माहीत असल्याने सगळ्या नटनट्या
हसून प्रयोगाला लागतात – हजारो
प्रेक्षकांसमोर जरा वेळ हेच असते त्यांच्या डोक्यांत
नंतर मीही कंटाळून निघून जातो

पण हे असे किती दिवस चालणार
सारखे जमवत राहणे तडजोडींचे नकाशे
दोघांचीही मने कमकुवतच आहेत
पण हवेय तर सगळे मनांसारखेच

सकाळी टेरेसमधल्या कबूतरांना ती पाणी घालते
खरे तर त्याचाही मला राग येतो – मी बोलत नाही
कारण शेवटी ती मला हवीच असल्याने
मी नोकरी सोडायचीही तयारी ठेवलेली असते

बोलणे नको, संपर्क नको, आठवण वा इच्छाही नको
हे सगळेच मान्य करून
मी काय देशोधडीला लागू की काय

डोळ्यांसमोर नको एखाद्या कबूतराचे नकळत तुटून पडलेले पीस

--- ००० ---

Champra Deshpande shared a post.

सुप्रसिद्ध नाटककार चं. प्र. देशपांडे (Champra Deshpande) यांचा 'विवादे विषादे प्रमादे प्रवासे'वरील अभिप्राय ....

>> प्रशान्त बागड यांचा ‘ विवादे विषादे प्रमादे प्रवासे ‘ हा कथासंग्रह वाचला. वाचायला सुरुवात करताच हे जाणवले की लेखकाने त्याच्या जगण्याच्या आकलनाला सुसंगत असा कथेचा वेगळाच घाट आणि एक वेगळीच अनपेक्षित शैली शोधलेली आहे. या लेखकाचे हे मराठीतले एक मोठे योगदान आहे. उगीचच वेगळे काही करायचे म्हणून हे केलेले नाही ( तसे जमणे अवघडच असते ) तर एका तात्त्विक आवाक्यातून हे आपोआप घडून आलेले आहे. या घाटाची आणि शैलीची वैशिष्ट्ये पाहू. मुळात या कथा एखाद्या नायक-नायिकेच्या वा एखाद्या प्रमुख पात्राच्या अशा नाहीत. त्यांत कारण-परिणामस्वरूप घटनांची साखळी ( लिंक ) महत्वाची नाही. पात्रे, वस्तू, घटना, आठवणी, इच्छा, पात्रांचे वा निवेदकाचे विचार, निसर्गातले वा इतर अनेक तपशील, अशा असंख्य गोष्टींची ही कथा असते. हे सगळे एकत्र असते – काहीच बिनमहत्त्वाचे नसते. एक प्रकारे हा समग्रतेचा आवाका असतो – नुसत्याच मानवी क्रिया-प्रतिक्रियांचा नव्हे. त्यामुळे, अमुक एक कथा इथे का सुरू झाली आणि तिथे का संपली याचा शोध घेण्यात अर्थ नसतो. यांत कथा म्हणजे काय, नायक म्हणजे काय, आशय म्हणजे काय, गाभा म्हणजे काय – अशा विषयांवरही मजकूर येतो. कारण लेखकाला त्याच्या आकलनसंगत असणाऱ्या त्याच्या शैलीच्या नवेपणाचे भान आहे. भूतकाळाचा परिणाम सांगणे वा पुढे काय होणार याची उत्सुकता बाळगणे – यांत या कथांना रसच नाही. या वर्तमानकेंद्री कथा आहेत. अशा या अनवट, विचित्र लेखनपद्धतीतून सतत जगण्यातल्या निरर्थकतेची जाणीव होत राहते. पण, ही निरर्थकता निराशावादी नसून फक्त बौद्धिक अर्थाचा अभाव सुचवणारी वाटते. सर्वच कथांत बागडांच्या या मर्मदृष्टीचा प्रत्यय येतो. पण, काही ठिकाणी बागड या शैली-नावीन्याच्या प्रेमाला बळी पडतात असे वाटते. अशा वेळी ते सगळे रुक्ष, चोथा तपशील वाटू लागतात. अशा लेखनपद्धतीत जान टिकून राहण्यासाठी लेखकाला सतत अलिप्त राहणे भाग आहे. मुळात, या प्रकारच्या लेखनाला वाचक धीराचा लागणार – हे ओळखून, खरे तर, बागडांनी त्याला हुसकावून लावणारी शीर्षके देऊ नयेत, असे वाटते. या संग्रहातली ‘ गढी ‘ ही कथा मला विशेष आवडली. संग्रहाचे नाव तेच दिले असते तर बरे झाले असते. या प्रकारच्या लेखनाला एका असिधारा भानाची आवश्यकता आहे – जरा इकडे-तिकडे झाले की त्या लेखनाची वाट लागण्याचा धोका असणार. मी काही इथे या संग्रहाचे परीक्षण करत नाहीय. मराठीतला हा एक वेगळाच ताकदवर कथाकार वाचल्यामुळे त्याची वैशिष्ट्ये इथल्या फ्रेंडसना सांगावीत, इतकाच उद्देश आहे. या कथा कशा वाचायला हव्यात याचा थोडा निर्देश व्हावा, हाही हेतू आहे. कथेचे क्षेत्र खूपच विस्तारून देणारा, लेखनातल्या स्वातंत्र्याची वेगळी क्षितिजे दाखवणारा असा हा कथासंग्रह आहे. छान वाटले ! <<

जगण्यातली सर्जकता म्हणजे पहाटे पक्ष्यांचे सर्व आवाज आपल्या मनात येऊ देणे !

तो समुद्राकडे पाय करून झोपला
तेव्हा त्याच्या स्वप्नाला एक स्वप्नातलेच
मांजर आडवे गेले
तो जागा झाला तेव्हा तो
समुद्राच्या आत होता
जिथे अनेक पूर्वीच बुडालेली जहाजे
इतस्ततः पडून होती – विशेष म्हणजे
त्यांचे श्वास चालू होते

श्वासाऐवजी मानसिक
मंत्रोच्चारांवर तो जिवंत होता
त्याच्याबरोबर आता फक्त
काही त्याची आवडती गाणी आणि
रुतून बसलेले काही अपमान होते

एरवी त्याने काळजीच नसती केली
पाण्याला येणाऱ्या गोजिरवाण्या
अक्षरओळखीच्या वासाची
कारण त्याच्या प्रत्येक बोटावर
उगवलेली होती एकेक कविता
पण आस्तेकदम जाणवणाऱ्या
लांब पल्ल्याच्या नात्यांची त्याला
भीती वाटू लागली होती

तो काही मुद्दाम हरवलेला नव्हता
आधी साधा त्याचा रुमाल हरवला होता
आणि तो शोधतानाच अचानक

त्याला झोप आली होती

--- ००० ---

" मराठी साहित्यास जागतिक पातळीवर ओळख प्राप्त होत नाही, म्हणून आपण खंत व्यक्त करतो; परंतु मराठी साहित्यिकांचे अनुभवविश्व ढोबळ मानाने मर्यादित असल्याने ते वैश्विक अनुभवाशी नाळ जोडू शकत नाही. "

-- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले --

आज दि २८-०५-१८ ची पुणे मटा पुरवणी पान २.

-- मला याचा अर्थबोध होत नसल्याने हा विषय इथे चर्चेला घेत आहे. त्यातून, कदाचित, काही मुद्दे समोर येतील. एमिली डिकिन्सन ही कवयित्री वर्षानुवर्षे एका खोलीत राहात होती म्हणे. तुकारामाचे अनुभवविश्व कोणते होते ? एकजण म्हणाले होते की आपल्याला महायुद्धांचा अनुभव नाही, म्हणून आपले साहित्य खुजे आहे ! मराठीत समजा अजून वैमानिकाच्या जीवनावर कादंबरी नाही आहे -- ही त्रुटी समजावी का ?

-- यावर काय जी असतील ती मते खुलेपणाने यावीत.

त्यांनी यांना टोला मारला !

यांनी त्यांना टोला मारला !

दोन्हीकडचे पब्लिक खुश झाले !

Champra and Abhijeet are celebrating 7 years of friendship on Facebook!

अभिजित आणि त्याच्या टीमने माझे हे नाटक ( ए, आपण चहा घ्यायचा ? ) खूप गाजवले ! खिळवून ठेवणारा, मजेदार प्रयोग करत !

आकाशातून तारा थेट
येतो माझ्या उजव्या पायाच्या अंगठ्यात
ज्याच्या थरथरीमुळे मला वाटते
भूकंप तरी होत असेल वा
रक्तपुरवठ्यात अडथळा तरी

मी असतो एका एकाकी खोलीत
जिचे नेपथ्य फक्त एक खुर्ची
एक टेबल आणि एक वर्तमानपत्र

इथे काहीच आवाज नाही वा कोणतेच
स्वप्नही नाही बाहेरच्या जगाचा
स्वर्ग करण्याचे

या खोलीच्या खिडकीबाहेर एक उंच भिंत
सुधारणा तर हजारो लागतील
मूळचे काहीच शोधत न बसता

रंग निळा -- एका बाजूच्या भिंतीचे
पोपडे निघालेले जखमी आठवणींसारखे
आणि विस्मृतीसारखा कुठे कुठे रंग
उडून पांढरा पडलेला

निराश होऊन संपायचे नाहीय
खूप मोठ्या लोकांची वाळत घातलेली उदाहरणे
मलाही प्रसिद्ध करू शकतील
भूकंपातून चमत्काराने वाचलेला माणूस म्हणून
-- मी तारा उचकटून परत आकाशात फेकतो
--- ००० ---

Champra Deshpande shared a memory.

ललित तर आहेच -- ही मंजिरी पुपालाही एक उत्तम अभिनेत्री आहे !
( माझे नाटक -- प्रेमच म्हणू याला हवं तर ... )

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या ‘ साहित्य आणि अस्तित्वभान – १ ‘ या पुस्तकातली काही वाक्ये --

१ उरलेली चार आवर्तने चलाख विडंबनावर सोपवू; एवीतेवी महाराष्ट्रातील सर्वात यशस्वी वाङमयप्रकार तोच !

( पान – २७७ )

२ वास्तविक वर लिहिले ते समीक्षेच्या मर्यादा स्पष्ट करण्यास, ‘ बुद्धिवादी ‘ महाराष्ट्रीयांस डिवचण्यास लिहिले. आधुनिक कविता ज्या तऱ्हेने वाचली जाते त्या तऱ्हेने तिच्यावर प्रकाश टाकता येत नाही.

( पान २७७ )

३ कोणत्याही शारीरिक वा मानसिक धक्क्याने कॉर्टिकल शीर थडथडू लागून मेंदूतली संवेदनांच्या व स्मृतींच्या ग्रहणांची व रचनेची क्षेत्रे झराझर प्रतिमा कशा वळतात हे आधुनिक न्यूरॉलॉजी सांगत आहे. आणि कवितेला तर्कप्रतिमा मानून आपण तिचे ‘ रस ‘ ग्रहण करीत आहोत !

( पान २७७-७८ )

४ आधुनिक जीवनाचा हा एक विशेष आहे की त्यात जाणिवेचे तुकडे पडतात. या विशेषाला विरोध करणारी कविता ही एक क्रिया. तिच्यावर बौद्धिक जाटिल्य लावले आहे तेही आधुनिक जीवनानेच. जादुटोणा संपला, अध्यात्म ठार झाले; फक्त कलेवर जीवनातील फाटक्या जाणिवा एकसंध करण्याची जबाबदारी उरली.

( पान २७८ )

--- ००० ---

धर्म हा शब्दही नको
त्या ऐवजी मी उलट्यापालट्या करून पाहीन
जगातल्या सर्व वस्तू पूजीन फुले वाहून
दगडांखालचे विंचूही

स्वछळाचे मूळ मिटले की झाले
आहे काय नाही तर ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या.
जखमी कावळ्याचे रहस्य वा अर्थ
कोणत्याही कारणाने एकमेकांच्या
उरांवर बसणाऱ्या मनांचा

यासाठी कुठेही एकत्र

जमायचे कारणच नाही फक्त
आहे तिथे जागी व्हावी लागेल
मनातली समूळ कल्पनाशक्ती
जी सहज उद्भवत राहील
या निष्कर्षहीन कवितेतून

मी नाकारतो सगळे ग्रंथ आणि तज्ञ
शंख फुंकणारे सदोदित धोक्यांचे

कविता हाच होईल धर्म
जिथे ना कुणी कवी ना कुणी वाचक
कारण उसवून गेलेला भूतकाळ
व्यक्तिमत्वे नाकारेल

या नरकातून बाहेर पाय टाकायची
इच्छा तर होणारच आहे तेवढ्या कल्पनाशक्तीनेही
--- ००० ---

मूकपणे बोललेलेही निव्वळ एखाद्या आठवणीच्या सत्यावर कुठे काही पोचणे, हा निसर्गाचा चमत्कार म्हणावा की मनांच्या तारा जुळणे ?

अमेरिका नीट माहीत नसणे

पॅडमॅन -- ये वही है ना जहाँ एक औरत हाथमे मशाल लेके नदीकिनारे खडी होती है ?
( चांगला आहे विनोद ! नंतरचे अक्षयकुमारचे अमेरिकेतले इंग्रजी भाषणही भारी आहे ! )

Champra Deshpande shared a link.

Wallace Stevens Quotes - BrainyQuote

brainyquote.com

A poem need not have a meaning and like most things in nature often does not have.

-- Wallace Stevens

कवितेला अर्थ असायची गरज नाही -- निसर्गातल्या बहुतेक सर्वच गोष्टींप्रमाणे तिला तो नसतोही.

-- वॅलेस स्टिव्हेन्स

मला माहीत झालेले असल्याने
मी ताणतो विश्वाला
विश्वातून बाहेर पडण्यासाठी
माझे ताणणे विश्वातलेच असल्याने
माझ्या मनाबरोबरच
मुरगळतात इमारती
झाडे होतात वेडीवाकडी
पृथ्वीतून बाहेर पडू लागतो रक्ताचा लाव्हा

आणि यातले कुणालाच काहीच
दिसत नाही हा माझा एकटेपणा असल्याने

माझे शब्द आणि विचार
अति-प्रयत्नशील असेपर्यंत
शोषली जात राहते माझ्या भोवतीची
माझ्या वाट्याची हवा आणि अंधारात
आकाशातले तारे भोसकत राहतात मला
त्यांचे हजारो वर्षे जुने असलेले भाले

मी माझ्या देहाबाहेर जाण्याचा

प्रयत्न करतो आटोकाट पण देह
अधिकच घट्ट होत सुकत राहतो
या सनातन द्वंद्वाने सुरकुतत

इथे अचानक पडू शकते ती ठिणगी
माझ्या इच्छेने मुळीच न येणारी
पण आठवणारी मला नंतर कधीही
मला स्वातंत्र्याचा अति-तीव्र भुकेला करत
--- ००० ---

मी अनेकांशी बोलत आलो
सगळे हेच म्हणतात की दगड
गोड आहे असे दिसले
तर मुंग्या लागणारच
तोच दगड आपल्या डोक्यांत वेदना
देत असला काठोकाठ
तरीही नाकारणार कसे
सर्व भांडणांचे मूळ
असलेले काल्पनिक फूल
ज्याच्या मालकीचा वाद
खूप गुंतागुंतीचा आहे

बलात्काराची इच्छा दबवाल पण
ती उद्भवूच नये
यासाठी मेंदूवर कोणत्या
रेघोट्या ओढणार

हिंसाच न होण्याचे सूत्र
कोणत्याच पुस्तकात नाही

मग ते शोधायचेच कशाला
त्यापेक्षा कोर्टाच्या पायऱ्या चढत
आव्हान दिल्याच्या भ्रमात राहावे
बळी तो कान पिळी या सूत्राला

हे असे होणारच आणि तेही
आणि हेही आणि तेही
हे सगळे वेदनामय गोड आहेच
अन्यथा जीवच द्यावा लागेल
--- ००० ---

I have dreamed of you so much that
you are no longer real.
-- Robert Desnos

एका फोटोचे राजकीय विश्लेषण

कर्नाटकचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री कुमारस्वामी यांच्या शपथविधीच्या समारंभातला, विरोधकांची एकी दाखवणारा एक फोटो पुणे मटाच्या दर्शनी पानावर आलेला आहे. हा जर निव्वळ त्या समारंभाचा फोटो असता तर राहुल आणि कुमारस्वामी आणि परमेश्वर हे मध्यभागी असायला हवे होते. तसे नाहीय. कुमारस्वामींच्या राजकीय दर्जाप्रमाणे ( पण, प्रसंगही पाहून ) राहुल आणि कुस्वा यांच्यामध्ये येच्युरी आहेत ! आता यात शरद पवार कुठे असावेत याचाही उत्तम विचार झालेला दिसतो. राजकीय शक्तीचा विचार करता ते मध्यभागी तर नाही असू शकत. मध्यभागी राहुलच ! ( तेच पंतप्रधानपदाचे दावेदार, हे मान्य ! ). मग, पवारांना सोनियांच्या शेजारी ( एके काळी त्या निव्वळ इटालियन असल्या तरी सध्याचे त्यांचे भारतीय राजकारणातले महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन ) मानाचे स्थान दिलेले आहे. त्या मानाने अखिलेश एखाद्या निस्पृह समाजवाद्यासारखे कडेला गेले आहेत. मायावतींनाही सोनियांच्या शेजारी स्थान मिळालेले आहे.

-- हीच २०१९ ची व्यूहरचना म्हणावी का ?

पुण्यात गडद पावसाळी हवा
आणि
गाऽऽर वारे .....

उगवलेल्या दिवसाचे बारा सारखे काप
मांडून ठेवले मानवी मुंडक्यांच्या प्रदर्शनात
विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानासाठी
-- त्यांच्या उजेडात पळालेले सर्व ससे
शेवटी फुरंगटून बसले इतकी यातायात
करून काहीच मान न मिळाल्याने

असेच असते बाबा – सर्व सायकलींची
सर्व टायर्स अनुभवाने देऊ शकतात सल्ले
की बाबा कुठे प्रत्येकाला
विरोध करत बसणार घशाला
कोरड पडलेली असताना
साध्या स्त्रीप्रेमाची

उलट खोटेच बोला आणि वागा
शेवटी कपडे बदलत बदलत
कसेबसे का असे ना मुक्कामाला
पोचून आयुष्याला टांग हाच आहे हेतू

आशावादानेही हेच करावे लागते
हेयरकटिंग सलूनमध्ये दयामाया
नसते वा नसतो कल्लोळाचा आवाजही
कारण तुमच्या अपेक्षांचा फेस आणि चुना
असलेली बिंदी असते तिथे टांगलेली
लिंबूमिरचीजवळ सदिच्छा म्हणून

तुमचे व्यापताप संभाळा आणि हळूच
करा पोबारा
--- ००० ---

कलानिर्मिती ही प्रामुख्याने मनाचे साहस असते.
-- युजीन आयनेस्को.

शक्यतो आहे तेच पाहणार मी
टेकवायच्या काठ्यांचे जंगल
अडखळत धडपडत राहात माझ्या
या जगातून बाहेर पडायचा
प्रयत्नही न करता

मी शब्दांच्या बाहेर जाणार नाही
मी कोणत्या ना कोणत्या
मूडमध्ये राहीन माझ्या वाढत्या
आठवणीच असतील
मला सापडलेले सगळे अर्थ

रेल्वेमार्गाचे माझे मूडी अप्रूप
पोसत राहीन मी सांगत
राहीन सर्वांना जगण्यातले
त्याचे सारसर्वस्व

हे एवढ्याचसाठी करेन
की तुमच्या लक्षात यावे की
तुमच्या जगण्यात हे
येऊच नाही शकत तुम्ही

कितीही संवेदनशील

असलात तुमच्या एखाद्या अटळ

मूडसह अर्थ शोधणारे तरी

माझ्या या शब्दांना या अर्थाने अर्थ नाहीत

ते कुठे काही पोचवूही नाही शकत

माझ्यातच जन्मून माझ्यातच जगणारे

--- ००० ---

मी सातवीत असताना मुंबईत ' प्रजामित्र ' नामक एक दैनिक निघत असे. पिवळट, जुनकट कागद हे त्याचे दर्शनी रूप. पण, त्याच दैनिकाने मला ' लेखक ' केले ! त्या काळात मी मोठमोठ्या कथा लिहायचो.' दैवाचा खेळ ', ' म्हाताऱ्याची नात ', ' शोकगीत ', ' आहेर ' या नावांच्या कथा मी तेव्हा लिहिल्या होत्या. एक पूर्ण पानभर छापूनही पुढील मजकूर अमुक पानावर, असे मी भारी लिहीत असे ! बघणारे चकित होत !

माझे वडील शिक्षक होते. आमचे गणिताचे शिक्षक त्यांचे मित्र होते. ते कधी कधी घरी येत. एकदा त्यांच्या बोलण्यात माझ्या लेखनाचा विषय निघाला. " बघू रे -- " माझे शिक्षक म्हणाले. मी ते प्राणपणाने जपलेले कागद आणून त्यांना दाखवले. " अरे, हे इथे वाचून नाही होणार -- मी घरी घेऊन जातो -- " ते म्हणाले. माझ्या काळजाचा ठोका चुकला, पण, इलाज नव्हता.

पुढे आठ दिवस झाले, पंधरा झाले, तरी कागद परत येईनात. मी एकदोनदा आठवणही केली. " हो, हो, बघतोच आता, शोधतोच -- " ते म्हणाले ! पुन्हा माझ्या काळजाचा ठोका चुकला ! म्हणजे, हरवलेय का काय सगळे ? शेवटी, त्यांच्या घरीच गेलो. " माझ्या काकांना दाखवायला पाहिजेत -- " असे सांगितले. तेव्हा ते म्हणाले, " अरे मी ते शोधले खूप -- मला अशी शंका येतेय की मध्यंतरी आमच्याकडे सत्यनारायण झाला ना, तेव्हा बायकोकडून ते प्रसादासाठी वापरले गेले, बहुतेक -- " खलास ! तेव्हापासून माझे सत्यनारायणाबद्दल मत बिघडले ते बिघडले !

नंतर काही दिवसांनी ' सुदैवाने ' त्यांना ते कागद सापडले ! ते मात्र ईमानदारीत त्यांनी आणून दिले !

तेव्हा, आपले आलेय म्हणून दोन दोन प्रती घेण्याचा खर्च केला जात नसे, झेरॉक्स नव्हते !

या असल्या संकटांची आता कुणाला कल्पनाही करता येणार नाही !

ते सगळे लेखन फालतू होते, हा भाग वेगळा !

उत्तम अभिनेते डॉ. हेमू अधिकारी यांचे निधन ! माझ्या ' ढोलताशे ' या नाटकात खूप मजा आणत ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

मराठीच्या प्राध्यापकाची कधी टेस्ट घ्यावीशी वाटली तर त्याला एकच प्रश्न विचारा -- केशवसुतांच्या वडिलांचे नाव काय ?

तेंडुलकर

मकरंद साठ्यांनी घेतलेली तेंडुलकरांची मुलाखत फिल्म पाहिली. त्यावर आपसात आपण काही विचार करावा, असे वाटले, म्हणून ही पोस्ट.

सखाराम बाइंडरबद्दल बोलताना तेंडुलकर म्हणाले की तो कशा परिस्थितीतून वाढलाय यात त्याच्या हिंसेचा उगम आहे. निरनिराळ्या कारणांनी प्रत्येकात हिंसा येतेच. त्याचबरोबर ते असेही म्हणताना दाखवले गेले की काही माणसांना मारून टाकावे असे त्यांना वाटते, पण, ते तसे करू शकत नाहीत, याचे त्यांना दुःख आहे. शिवाय, ते असेही म्हणाले की ते त्यांच्या पात्रांकडे चांगला-वाईट असे पाहात नाहीत. तरीही, जिथे नाना निर्माण होतो तिथे एक घाशीरामही निर्माण होतो, असे ते म्हणाले. ( म्हणजे ‘ वाईट ‘ नाही ? )

एकीकडे हिंसेची कारणमीमांसा सहृदयपणे समजून घ्यायची आणि दुसरीकडे काही माणसांना मारून टाकावे, असेही म्हणायचे, हे जगण्यात एकत्र कसे असणार ? खुन्याला वा बलात्काऱ्याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी समाजाची मागणी असते – ती चूक म्हणावी की बरोबर ?

आनुवंशिकता, जनुकरचना आणि परिस्थिती यांत हिंसेची कारणे समजा सापडू शकतात, तर काय ?

मग, हिंसेचे हे वेगवेगळे प्रकार पाहण्याचा सांस्कृतिक अर्थ काय ?

कुणीच दोषी नाही, हेही पटू शकते – मग, सारांश काय ? एकूणच क्रिया-प्रतिक्रियांचे जगणे चालूच तर असते. त्यातूनच हिंसा येते. मग काय ? आहे ते चालू द्या ?

हिंसेच्या नावीन्यातला सनसनाटीपणा उपभोगून झाल्यावर काय ?

आर्थर रँबो ( नेमका उच्चार माहीत नाही ) हा एक फ्रेंच कवी. फक्त ३७ वर्षे जगला. २१ व्या वर्षी त्याने शेवटची कविता लिहिली. त्यानंतर १६ वर्षे काहीही लिहिले नाही !

हा अज्ञाताच्या शोधात म्हणून स्वतःच्या मनावर अघोरी प्रयोग करत असे. एकूण माणसांच्या सरावातले आणि सवयीतले असे त्याचे मन राहिलेच नाही.

हेच तर त्याच्या जगन्मान्यतेचे रहस्य नसेल ?

आहेत त्या कलमांचे हवे तसे अर्थ लावा वेळोवेळी, पण, या लोकशाहीत, जय-पराजय या कलमांनीच होऊ द्यात म्हणजे झाले !

झेन कोन

एका लहान तोंडाच्या मोठ्या बाटलीत एक बदकाचे पिल्लू वाढवलेले आहे. ते आता बाटलीच्या तोंडातून बाहेर काढता येणार नाहीय. बाटली फोडायची नाही आणि पिल्लाचेही तुकडे करायचे नाहीत -- असे ते जिवंत बाहेर काढून दाखवायचे !

-- याला म्हणतात ' झेन कोन ' !

याची उत्तरे फक्त अध्यात्म आणि राजकारण, या दोनच क्षेत्रांत मिळू शकतात !

" इमोजी, चिन्हे यांच्या वाढत्या वापराने भाषेचे नुकसान होते " -- हे मला आधीच ज्ञात असल्याने मी ती वापरत नाही !

५-६ वर्षांनंतर काल डोळे तपासून घेतले. डाव्या डोळ्याची दृष्टी कमकुवत असून उजव्याची उत्तम आहे, असे कळले. चष्मा बदलायची गरज नाही, असा सल्ला मिळाला. तपासणाऱ्या डॉक्टरांचे दोन्ही डोळे उत्तम असून त्यांना चष्मा नाहीय. हे मुद्दाम नमूद यासाठी केले की या एकूण प्रकाराचे राजकीय अर्थ लावून कुणी मैत्रीत बिघाड करून घेऊ नये !

एकाच्या मोबाईलवर डिट्टो मोदींचे भाषण चालू होते. " कोण करतंय नक्कल ? " मी विचारले. " नक्कल नाही -- मोदीच आहेत -- " सुहास्य उत्तर आले !

इकडे आमच्यावर जो अन्याय झालाय तोच तिकडे त्यांच्यावरही करा आणि आमचाही फायदा करून द्या --

आपण सगळे सत्याचे आणि न्यायाचे पुजारी असल्याने आणि आपली सत्ये वेगवेगळी आणि न्याय वेगवेगळा असल्याने आपल्याला थोडेफार एकमेकांविरुद्ध बोंबलत राहावे लागणारच, त्याला इलाज नाही. पण, जगात जेवढे उच्च रक्तदाबाचे रोगी आहेत त्याच्या २० टक्के भारतात आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. राजकीय मतमतांतरांची अति-तीव्रता, हेही एक कारण असू शकते ! ' मोरूची मावशी ' या नाटकात एक वाक्य आहे -- " तुझा पगार किती, तू बोलतोस किती ! " पण, काहीजण म्हणतील की हा जगण्याचा अटळ भाग आहे !

याकडे कसे पाहावे याबाबतही आपल्यांत मतमतांतरे असणारच !

सगळेच अनैतिक असणे ही ' परंपरा ' आणि आपण स्वतः अनैतिक असल्याचे कळणे ही ' नवता ' !

विचार जुळतात म्हणून अमुक पक्षात, असे कमी झालेय -- त्यामुळे, स्वतःच्या उमेदवारांवरही पक्षांचा विश्वास नाहीय ! जनता भोळी !

या राजकरणाच्या उष्णतेमुळे भारतातल्या अनेक सामान्य नागरिकांना म्हणजे निव्वळ मतदानाच्या हकदारांना रक्तदाबाचा रोग जडला असावा, असा एक अंदाज आहे. यावर संशोधन व्हायला हवे. पण, खुद्द राजकारणी मात्र कधीही बीपीने त्रस्त असल्याचे ऐकिवात येत नाही ! हे योगिक सामर्थ्यापेक्षा नक्कीच काहीतरी भारी असणार आहे ! भारतीयांच्या आरोग्यासाठी याचे रहस्य खरे तर त्यांनी उघडे केले पाहिजे --

पूर्ण देशाच्या डोक्याला मुंग्या आणता येतील असा चमत्कार ठरवूनही कुणाला करता येणार नाही -- तो कर्नाटकी जनतेने करून दाखवला आहे ! गंमत अशी आहे की भाजपाकडे १०४ लोक आहेत -- काँग्रेसकडचे लिंगायत ७ आणि जेडीएसमधूनच काँग्रेसमध्ये आलेले ५ असे अनुपस्थित राहिले तर त्यांचेही ( काँग्रेस अधिक जेडीएस ) ११६ - १२ = १०४ च होतात ! सामना टाय होतो ! बुद्धीला फारच आव्हानात्मक ! ( मग, एका अपक्षाच्या मतावर राज्याची दिशा ठरू शकते ! त्यासाठी त्याला मुख्यमंत्री करावे, म्हणजे झाले ! )

हिंदुत्ववाद्यांना टक्कर देण्यासाठी एक राजकीय डाव म्हणून काँग्रेसने स्वतंत्र लिंगायत धर्म मागणाऱ्यांना प्रोत्साहन दिले -- पण, याचा परिणाम त्यांना हवा तितकाच मर्यादित न राहता तो धर्मवादाला म्हणजे पर्यायाने हिंदुत्ववादालाही बाळकटी देईल, हे काँग्रेसला कळत नसेल ?

ॲब्सर्डिटी अमर रहे !!!!!!!!!

मला साधारण कळलेय ते असे -- ( हे सगळेच चुकीचे असले तरी कृपया चिडू नये, ही नम्र विनंती -- )

येडियुरप्पा हे स्वतः लिंगायत आहेत. त्यांच्या पाठिराख्यांत मोठ्या प्रमाणात लिंगायत समाज आहे. त्या समाजात फूट पाडता आली तर येडियुरप्पा कमकुवत होतील. येडियुरप्पा म्हणतात की आम्ही हिंदूच आहोत ! स्वतंत्र लिंगायत धर्माला प्रोत्साहन देणे हा येडियुरप्पांना कमकुवत करायचा प्रयत्न आहे. हा डाव खेळत काँग्रेसने ' लिंगायत स्वतंत्र ' वाले लोक निवडून आणले. आता प्रॉब्लेम असा झालाय की जेडीएस म्हणजे वक्कलिंग लोक -- ते जणू लिंगायतांचे शत्रूच ! काँग्रेसचे त्यांच्याबरोबर जाणे हे त्या त्यांनी निवडून आणलेल्या ' स्वतंत्र लिंगायत ' वाल्यांना पसंत नाही ! येडियुरप्पांवर टाकलेला डाव स्वतःवरच उलटायची ही अशी वेळ आलीय !

यावरून आपण किती ' धार्मिक ' लोक आहोत याची कल्पना यावी ! हे सगळे डावपेची लोक ' धार्मिक ' आहेत !

ॲब्सर्डिटी अमर रहे !!!!!!!!!

हे हिंदू राष्ट्र होण्याची थोडी जरी शक्यता वाटत असती तर लिंगायतांनी स्वतंत्र धर्माची मागणी केली असती ?

माणसाचे मन फुटीर असल्यामुळे, त्या पायावर डावपेच करत, काहींना हुशार, धूर्त आणि पाताळयंत्री राजकारणी होता येते !

१. " – स्वार्थ हा जन्माला येणाऱ्या प्रत्येकाचा स्वभावधर्म असतो आणि त्यात गैर काहीच नाही – "

-- विजय तेंडुलकर – पुणे मटा ' संवाद ' पुरवणी दिनांक १३ मे '१८ – पान ८.

( पुढे ते म्हणतात की – स्वार्थास्वार्थात फरक असतो. स्वतःपुरताच राहतो तो क्षुद्र स्वार्थ. दुसऱ्याचं, समाजाचं हित ज्यानं साधतं तो मोठा स्वार्थ.) – इथे प्रश्न असा येतो की एकदा स्वार्थ हाच पाया असल्यावर ' मोठा स्वार्थ ' वाले सतत तसेच जगू शकतात का ? स्वार्थाचा विचार हा इतरांच्या नफ्यातोट्यावरून करावा का ? आणि स्वार्थ ही जर हिंसा उपजवणारी गोष्ट असेल तर कुणीही हिंसेपासून मुक्त कसे असणार ?

२. " हिंसेची प्रवृत्ती अलग नाही. ती मनुष्य-स्वभावाच्या इतर प्रवृत्तींत आणि जगण्याच्या मूलभूत गरजांत पक्की गुंतलेली आहे. तसेच तिला अमानुष म्हणायची पद्धत आहे, पण ती मला मानुष वाटते. म्हणून तिचा विचार मी समजुतीने आणि आत्मीयतेने करतो. तिच्या विरुद्ध किंवा बाजूने असणे मला जमत नाही. ती आहे आणि बहुधा राहणार तर विशेषणात न सापडता तिच्याकडे पाहायला जमले पाहिजे. "

विजय तेंडुलकर -- ' नाटक ' त्रैमासिक, फेब्रुवारी २००१.

३. तरीही तेंडुलकर म्हणत की ते शोध घेतात. कसला शोध ? स्वार्थ आणि हिंसा यांच्या विविधतेचा ? की मूल्यशोध ? एकदा स्वार्थ आणि हिंसा हे माणसाचे पायाभूत स्वभाव म्हणून मान्य केल्यावर ' मूल्यशोध ' कसला ?

चित्रकाराचे मूळ चित्र खूप किंमत देणाऱ्याच्या ताब्यात राहते -- मूळ कविता मात्र कुठेही, कुणालाही उपलब्ध असते !

ढगाने कोणता आकार घ्यावा
हा माझा प्रांत नाही
मी कशाला अधीर होऊ
किंवा माझ्या डोळ्यांतून
अमुकच अर्थ पोचण्यासाठी
सारखे खूप काही मनात

ठरवत घडवत राहू

पहाटेच्या पक्ष्याच्या पहिल्या
आवाजानंतरच्या शांततेत
असते कविता वाट पाहात
तिच्या समूळ कृतीसाठी

दूधवाला येऊन जातो
मग पेपरवाला
यांबरोबरच अचानक
दार निखळून पडू शकते
कवितेचे स्वागत म्हणून

ते एका कवितेनेही घडू शकते
कोणत्याही मनाच्या माध्यमातून
यासाठीच तर कवितांचे येत राहणे

कवितेचे खरे तर या क्षणाशिवाय
बाकी काही कामच नाही असू शकत
-- हे घडले तर घडेल कुठेही
मी न ठरवता
मला माहीतही न होता

--- ००० ---

मराठी रंगभूमीवर अलिकडेच आलेले ' हॅम्लेट ' हे नाटक खूप भव्य पद्धतीने अवतरलेले आहे, असे समजते. या नाटकामागे प्रचंड आर्थिक ताकदीच्या एका टीव्ही चॅनेलचे ( झी ) कॉर्पोरेट हाऊस उभे आहे, असे म्हणतात. त्यांनी मैदानात येताच धडाधड महत्त्वाच्या वेळा, तारखा बुक करायचा सपाटाच लावला, असे समजते. त्यामुळे, अनेक नाट्यनिर्मात्यांच्या पोटात गोळा आलेला आहे. त्यावर ओरड सुरू झालेली आहे. जे मूळ नाट्यनिर्माते रंगभूमी जगवत आले त्यांच्यावर हा अन्याय आहे, असा सूर आहे. तसे तर मोठे

नाट्यनिर्माते छोट्या नाट्यनिर्मात्यांची कुठे फिकीर करत होते, असाही प्रश्न विचारला जातो आहे. ' हॅम्लेट ' सारखे दर्जेदार नाटक रंगभूमीवर येण्यात रंगभूमीचे हितच आहे, असेही काहींना वाटते आहे.

याला सांस्कृतिक घुसळण म्हणावे की नुसतीच धंद्यातल्या स्वार्थाची भांडणे ?

खरे तर मी कल्पनाही नव्हती केली
की या धूर ओकणाऱ्या जगात
ही असेल एक मोकळी पोकळी
शांत आणि तरीही उत्तेजक
असेल हलकेच अनावृत होणारे
एक प्रेक्षागृह ज्याच्या पायऱ्या
पाहूनच आपला भूतकाळ नष्ट व्हावा

रस्त्याने चालताना जागोजागी दिसत
सोलून पडलेली रक्तबंबाळ मने
आणि दिसत आशावादी मोरांचे
झडलेले दिवे दुर्गंधीत
यात कसे शक्य होते
माझ्या अस्तित्वात
माझीच अंत्ययात्रा साजरी होणे

माझी अविरत धडपड
आणि प्रचंड घामट तहान
तुला नव्हतीच शोधत
उलट तुला शिव्या देत
समरूप होत होती
माझ्या भाषेच्या अस्मितेशी

मी न अपेक्षिलेले तुझे आगमन

सौम्य आणि सर्वच देणारे असे अकल्पित
ठरले कारण माझ्या स्मृतिभ्रंशाचे
त्यामुळे राहिलो नाही मी तुझा भागही
इच्छा नाही आणि काहीच नाही अशा या समाप्त जगात
--- ००० ---

And meditation is not something that you practice for an hour or ten minutes and the rest of the day do your mischief. Meditation is the whole of life and that is the beauty of meditation, It is not something set aside, it covers and enters into all our activities and to all our thoughts and feelings. So it is not something that you practice or give attention to once a day or three times a day or ten times a day and the rest of the day live a life that is shoddy, neurotic, mischievous, violent.

-- JK.

फ्रेंडस, वाढदिवसानिमित्त
प्रचंड शुभेच्छा पोचल्या !
मनःपूर्वक धन्यवाद !
माझ्याही सर्वांना शुभेच्छा !

मांडूची पुनर्मांडणी
उत्पत्ती-स्थिती-लय यांचे एकत्र दर्शन

चंद्रमोहन कुलकर्णी यांचे ‘ मांडू ‘ हे चित्र-शिल्प प्रदर्शन पाहून आलो.

चंद्रमोहन ही व्यक्ती आपल्या ओळखीची असू शकते पण, चित्रकार म्हणून त्यांना दिसते काय, हे त्यांच्या चित्रांतूनच दिसते – आणि ते एक पूर्ण अनोळखी जग असते. भूतकाळातल्या मांडूची पडझड झालेली असून आता त्याचे फक्त काही भग्न अवशेष – खंडहर शिल्लक आहेत. यांचे फोटो काढले तर नक्कीच खूप सूक्ष्म बारकावे टिपले जातील, पण, ते असे या चित्रांतल्या सारखे नसतील. चित्रकाराला आज तिथे नसलेलेही बारकावे दिसू शकतात आणि या वास्तूंचे मूळ सत्य उभे करण्याला महत्त्व देत तो प्रत्यक्षातल्या दृश्याची पुनर्मांडणीही करू शकतो. त्या काळातल्या धनिकांचे महाल, प्रार्थनामंदिरे, राजवाडे असे सगळे हे आज तिथल्या गोरख

चिंचेच्या झाडांसारखेच ओकेबोके आणि रुक्ष झालेले आहेत. त्या पूर्ण परिसराचीच, म्हटले तर, जान गेलेली आहे. अशा वेळी हा चित्रकार तिथे पोचतो आणि त्याच्या सर्जक नजरेच्या स्पर्शाने पुन्हा तो परिसर जिवंत होतो. पण, आता त्याच जुन्या जगण्याची पुनरावृत्ती होणे शक्य नाही. आहे या स्थितीत, चित्रकलेतले वैभव म्हणून या मृत प्रदेशाला संजीवनी मिळते आहे. जगणे जसे परिपक्वतेचे निमित्त होऊ शकते तसेच हे ओसाडीचे सत्य त्रिकालाचा सर्जक आवाका घेतला जाण्याचे निमित्त घडते आहे. ही स्केचेस आणि शिल्पे म्हणजे त्या काळातले स्थितिरूप सौंदर्य, एका दीर्घ काळात होणारा विनाश आणि जन्ममृत्यूचा एकत्रित आवाका घेणारे अवशेष यांचे जिवंत भान घेणे आहे.. आणि हे सगळे शांत आणि सुंदर आहे. कोणत्याही भावनिक क्षुब्धतेशिवाय.

चंद्रमोहनांचे काम स्तिमित करणारे आहे. अनेक लहानमोठ्या आकारांतली ही चित्रे आणि शिल्पे,.काळ्यापांढऱ्या आणि क्वचित निळ्या रेषांचे हे अवर्णनीय मायाजाल आहे ! बहुतेकदा ते फक्त चित्रविषय तेवढाच चित्रित करतात पण काही वेळा, त्या विनाशाची जाणीव देणारे विखरून पडलेले दगड, एखाददुसरे हडकुळे भटके कुत्रे आणि गोरख चिंचेची रुक्ष झाडे असे काही सोबत दाखवतात. काळ्यापांढऱ्या आणि कधी निळ्याही रेषांतून जाणवणारा छायाप्रकाशाचा खेळ तर गुंगवून टाकणारा आहे !

तिथे मित्रवर्य दिग्दर्शक अतुल पेठे आणि चित्रकार मित्रवर्य जयंत जोशी भेटले – हा एक अलभ्य लाभच झाला !

उगीचच बंदूक घेऊन
एकेक पक्षी मारत बसायची गरजच राहणार नाही
जनुकीय अभियांत्रिकीने दुःखाची जनुके
काढूनच टाकायची नाळ कापण्याआधीच
मग
प्रेम मिळो न मिळो आनंदात असाल
यश मिळो न मिळो आनंदात असाल
तुमची मते फेल होत राहिली तरी आनंदात असाल
तुमचा पक्ष हरला तरी आनंदात असाल
फर्स्ट डे फर्स्ट शो चुकला तरी आनंदात असाल
तुमच्या ऐवजी तुमच्या मित्राला ज्ञानपीठ मिळाले तरी आनंदात असाल
तुमचा प्रदेश वापरत ते आनंदात आणि इकडे तुम्हीही आनंदात
तुम्हाला तुमच्या आणि त्यांना त्यांच्या धर्माची गरजच न राहिल्याने
तेही आनंदात आणि तुम्हीही आनंदात

स्त्री-पुरुष एकमेकांना सोडून गेले दुसऱ्या आकर्षणाने
तरी दोघेही आनंदात
युद्धच नाही धोका नाही भीती नाही
म्हणून सगळेच आनंदात

पण यातून काहीच बदल होणार नाहीत असे नाही
मेंदूचा आकार वाढत गेल्याने कवटी मोठी होईल
पायांचे तळवे मोठे होतील बुबुळे तिप्पट कान दुप्पट होतील
ढेरपोटे होतील सगळेच
पण अर्थात आनंदीच असतील

आनंदी असण्यासाठी काहीच करावे लागणार नाही
मग अधोगती होत जाईल पुन्हा ते जुने जनुक हवेसे होतील
की काय कोण जाणे ---
--- ००० ---

मी काही भक्तिमार्गी वगैरे नाही पण मला भजने ऐकायला आवडतात ! उदा आज तळपदार आवाजातली प्रिय परवीन सुलतानाची कबीर भजने ऐकली !

आपल्या या जगात उत्तुंग, ग्रेट असे खूप काही आहे -- आपल्या झोळीत मावेल ते, हाव न धरता, घेत राहावे --

दुकानदाराने दिलेल्या खुर्चीवर
मी बाहेर बसून असतो रहदारीच्याही बाहेर
माझ्या कामाला वेळ असल्याने
मला माहीत असते की आता
कोणतीही अस्वले चाल करून येतील माझ्या मनात
मी कितीही टाळले तरी

जगातल्या सर्व गुन्हेगारीचा उगम
माझ्यातच आहे माझ्या गुप्त काळोखात

हे मला मान्यच असते – असे कोणतेच नसतात
गलिच्छ विचार जे

लाज आणून करू शकणार नाहीत
माझे अनैतिक हिंसक मन
कोमेजून टाकत मृतवत

माझे प्रचंड प्रयत्न चालतात कधीही उद्भवू शकणाऱ्या
माझ्या आजाराची भीती मनात येऊ न देण्याचे
कारण ती भीती फोफावणे हाच एक आजार होऊन बसतो

आनंदात राहा आणि चांगले विचार करा
हे माहीत असूनही माझा अंधार
उजेडाला भोके पाडून आत घुसतच राहतो

मला कळून चुकले आहे
अमुक विचार येणे वा न येणे
हे नाहीच माझ्या ताब्यात – कोणताच विचार
न येणे ही फक्त एकच असणार वेगळी शक्यता
--- ००० ---

आजच्या पुणे लोकसत्ता पुरवणीत ' मूत्रविकार ' यावर एक लेख आलेला आहे. त्या लेखात, काय काय खाऊ नये याच्या यादीत जवळ जवळ सर्व धान्ये, कडधान्ये, भाज्या, फळे -- असे सर्वच कव्हर झालेले आहे ! काय खावे यासाठी एकाही पदार्थाचे नाव नाही ! खूप विचार केल्यावर, साध्या पाण्यात बुडवून थोडी चपाती चालेल, असे दिसतेय !

टोटल आहारच बंद केला तर ( मनुष्य मरून ) सगळेच रोग बरे व्हावेत, अशी यात सदिच्छा दिसतेय !

असे लेख लिहिणाऱ्यांनी कृपया, काय खाल्ले तर चालेल, हेही सांगावे म्हणजे लोकांना जिवंत राहणे सोपे पडेल !

आपले मित्रवर्य आणि ज्येष्ठ चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांच्या चित्र-शिल्पांचे ' मांडूची पुनर्मांडणी ' हे प्रदर्शन पुण्यात भांडारकर रोडवरच्या आर्ट टुडे या गॅलरीत सुरू होत असून ते ९ ते १३ मे पर्यंत चालणार आहे. मी तर माझ्या धाकट्या नातीला घेऊन जाणार आहेच -- जमेल त्या सर्वांनी ते पाहावे. या निमित्ताने आजच्या पुणे मटाच्या पुरवणी पान ८ वर त्यांची मुलाखत आलेली आहे. ती वाचून ते प्रदर्शन पाहणे अधिक फलदायी ठरू शकेल.

खूप शुभेच्छा, चंद्रमोहन !

Chandramohan Kulkarni

पुण्यातली वसंत व्याख्यानमाला गेली दोन वर्षे वातानुकूल प्रेक्षागृहात -- त्यामुळे, त्या सुखद गारव्यासाठी प्रेक्षक येतात ! --

मनांसह असणारा एकपणा
म्हणजे रस्त्यावर सांडलेल्या डिझेलवरून
घसरणारी वाहने आणि त्या वाहनांचे
रक्त बधीर पुढील रस्त्याचा परवाना होणे

प्रेमाच्या नावाखाली आपण असंख्य
तारे ओलांडले आणि लक्षही नाही दिले
केकाटत्या जखमांकडे आपल्याच
घोषणांच्या घर्षणातून झालेल्या

अवयव सगळे पाठ पण
विसरत राहिलो आपण
आपापल्या पाळीव छंदांचे एकटेपण
आणि तरीही नेहमीच उमलले आपले चेहरे
आलबेल म्हणत प्रत्येक वेळी

पण हे खरे असू शकते का
आपल्याच जिभा एकमेकींना स्पर्शताना
घेऊ शकतात का सर्व बातम्यांचा आवाका

किंवा करू शकतात का
या शहरातली रहदारी आवाजहीन
वाहनांचे दरवाजे उघडे ठेवून

आपण समजून राहिलेले बरे
इथली प्रत्येक गोष्ट एकटीच असणार
त्याची फिकीर न करता सुखात बुडत
समजूनउमजून व्हायला हवे आपण एक
न घसरता आणि पुरेशा खोटेपणासह सहज
--- ००० ---

जुगाड

हे नाटक काल पाहिले.
वर्षातून दोनदा ( जयंती आणि पुण्यतिथीला ) ट्रॅफिक जॅम होईल असा महापुरुष असल्याशिवाय एखाद्या समाजाला ओळख मिळत नाही -- तसा महापुरुष नसेल तर खोटा इतिहास रचून त्याला जन्माला घालणे हाच उपाय ! -- या भन्नाट कल्पनेवरचे हे नाटक आहे. या कल्पनेत मोठ्या आवाक्याच्या आणि सखोल आशयाच्या शक्यता आहेत. पण, साधे एक करमणुकीचे नाटक करायचे, असे ठरवल्यामुळे त्या शक्यता हरवलेल्या आहेत.

एका आदिवासी समाजासाठी असा महापुरुष जन्माला घालायचा आहे ! हे लोक थोडीफार गुन्हेगारी करत चांगले जगताहेत, असे दिसते. टापटीप पोषाख आणि सुंदर स्त्री-पुरुष. जुनकट कपड्यांतले मळकट आदिवासी पाहणे कदाचित प्रेक्षणीय होणार नाही, असेही असेल. मालिकांमध्ये कसे सगळे मस्त नव्या कपड्यांत हिंडत असतात, तसेच.

अनेक नाट्यमय घटनांनी नाटक पुढे जात राहते. हृषिकेश जोशी आणि चिन्मय मांडलेकर हे निष्णात अभिनेते उथळ घटनाही तारून नेतात. काही ठिकाणी हृषिकेशचे ओरडून बोलणे आहे -- ते चालू नाटकाच्या प्रमाणाबाहेर ओरडले जाते. सुरुवातीचे प्रयोग आहेत -- पुढे हे नीट जुळवून घेतले जाईलच.

या नाटकाच्या कल्पनेच्या सहवासात प्रेक्षकांनी राहावे, हेही महत्त्वाचे वाटावे, असा हा प्रकार
कल्पना भारी -- नाटक ठीक !

दुसऱ्या कोणत्याही आधुनिक मराठी कवीने अभिजात भारतीय परंपरेशी इतक्या स्वाभाविकपणे दुवा जोडलेला आढळत नाही. रेग्यांनी जर वृत्तेसुद्धा संस्कृत वापरली असती तर त्यांच्या कवितेला मराठीपणा लाभलाच नसता. उशिरा जन्मलेले एक पंडितकवी म्हणून आपण त्यांच्याकडे पाहिले असते. पण आता मात्र, रेग्यांनी आपल्या कवितेद्वारा एका विस्मृत परंपरेला आधुनिक मराठी कवितेत वाट करून दिलेली आहे. असे करतानाही त्यांनी आपली आधुनिकता टिकवलेली आहेच. कारण, त्यांचा दृष्टिकोण कर्मठ, पुनरुज्जीवनवादी नाही. डोळसपणे त्यांनी प्रेमानुभवाचे मूलभूत मूल्य शोधले आहे.गांधीवादी किंवा जनसंघी, भव्य नीतीचा पुरस्कार करणारे किंवा पुराणमताभिमानी, ही कविता स्वीकारू शकत नाहीत. तिच्यातला व्यक्तिवाद, स्वत्वनिष्ठा आणि नीती आधुनिक आहेत.

-- दिलीप पुरुषोत्तम चित्रे -- साहित्य आणि अस्तित्वभान -- पृष्ठ १३३.

-- १. प्रेमानुभवाचे मूलभूत मूल्य -- म्हणजे काय, हे समजले नाही.

२. कोणत्याही आग्रही मतांच्या माणसांना कोणतीच कविता खरे तर समजणार नाही. की निरनिराळ्या आग्रहांसाठी निरनिराळ्या कविता असू शकतात ? उदाहरणार्थ कम्युनिस्टांसाठी वेगळ्या कविता -- असे ?

३. या आधीची पोस्ट लक्षात घेता, मराठी भाषेची नसलेली परंपरा घेऊन रेग्यांनी मराठी कविता लिहिली -- असे म्हणावे का ?

कवितेला काही अबाधित व स्वायत्त मूल्ये असतात की नाही, याबाबत माझ्या मनाची खात्री होत नाही. एवढे मात्र निश्चित की, कवितेअगोदर भाषा अस्तित्वात असतेच आणि भाषा ही कवितेची आवश्यक पूर्वस्थिती आहे. तसेच कवितेअगोदर त्या त्या भाषेत एक काव्यपरंपरा असते आणि तीही कवितेची आवश्यक पूर्वस्थिती होय. कवितेला वाचक असावे लागतात. ही कवितेची तिसरी आवश्यक पूर्वपरिस्थिती. म्हणून भाषा, वाङमयीन परंपरा व संकेत, आणि मुख्य म्हणजे वाचकांचे वाचनाचे उद्देश, या तीन मुख्य संदर्भांत कोणत्याही कवितेचे आपण विश्लेषण वा रसग्रहण करू शकतो. वा भाषा जे करू शकते ( पण नेहमी करतेच असे नाही ) त्याच्या पलिकडचे काहीही कविता करू शकत नाही. वाचकाला जे जाणवू शकणार नाही असे काहीही कविता जाणवून देऊ शकत नाही. वाङमयीन परंपरेत जे अंशमात्रही नव्हते, असे काहीही कविता निर्माण करू शकत नाही. मात्र भाषेची काही असामान्य कार्यशक्ती कवितेत व्यक्त होऊ शकते. वाचकाला जे अगोदर अमूक एका रूपात जाणवले नव्हते ते कविता जाणवून देऊ शकते. आणि वाङमयीन परंपरेत जे अंशमात्रच होते त्याला कविता संपूर्ण रूप देऊ शकते.

-- दिलीप पुरुषोत्तम चित्रे – साहित्य आणि अस्तित्वभान – पृष्ठ १२६.

-- १. वरील विवेचनात काही आंतरविरोध जाणवतात का, हा पहिला प्रश्न. जाणवत असतील तर कोणते ?

२. उत्तरसंरचनावादाप्रमाणे ( जो पूर्णपणे बौद्धिक प्रक्रियेतूनच मांडला गेलेला असला तरी आपल्याकडच्या कूपमंडुकी बुद्धिप्रामाण्यवाद्यांना परवडणारा नाही ) मूळ कलाकृती – मूळ अर्थ – असे काही नसतेच. प्रत्येकाच्या प्रभावयुक्ततेने ( म्हणजे conditioning ने ) अर्थ ठरतात – हे जर असेल तर ’ पूर्ण रूप देणे ‘ वा ‘ नवीन काही जाणवून देणे ‘ म्हणजे काय ?

३. भाषिक परंपरा स्थिर आणि मर्यादित असते का ? आणि सर्वांना समान तरी असते का ?

--- या प्रश्नांवर मते यावीत.

वर्षानुवर्षे एकच टोपी घालणारा माणूस
पडू शकतो धाडकन दहाव्या मजल्यावरून खाली
आणि तेव्हाच कळू शकते की
त्याच्या टोपीला मुंग्या लागलेल्या असून
त्याचे पूर्ण रक्त आधीच वाळून गेलेले आहे

तो स्वतःला प्रतिनिधी म्हणवत असू शकतो
सर्व गांजलेल्या आणि गंजलेल्या मनांचा
कुठाय मन असे विचारले तर तो
छाती फाडून दाखवत असू शकतो
त्याच्या पूज्य दैवताचा फोटो

तसा तो नास्तिक म्हणवत असू शकतो स्वतःला
जरी त्याची एकमेव प्रेयसी जाणून असू शकते
त्याच्या पायांत ठोकलेले खिळे
आणि त्याच्या आईने त्याला आशीर्वाद देऊन लावलेली तीट

ती टोपी त्याला अंतिम वाटत असू शकते स्फोटक
आणि सर्व असत्ये उडवून लावणारी
तो जेवतानाही उपरोधिक हसू शकत असू शकतो अन्नातली भेसळ ओळखून

तो पडला नसून त्याने उडीच मारली असेही असू शकते
आणि त्याने चिठ्ठीही लिहून ठेवलेली असू शकते
त्याच्या प्रिय कुत्र्याच्या पाठीवर
“ ज्यांना ज्यांना आपण स्वतः बरोबरच आहोत

अशी खात्री असू शकेल मुठी वळलेली
त्या सर्वांचा शेवट असाच असू शकेल – ‘ तो खरेच खरे
समजत असावा सगळे ‘ असे मुंग्यांनी म्हणावे असा – “
--- ००० ---

काही गोळ्यांनी संसर्ग जातो
पण मूड असा होतो त्रासिक
की संबंध बिघडतात

आता या प्रश्नावर गोळी नसते
म्हणून आपण पिकनिकचे ठरवतो
जुन्या आठवणींच्या गप्पा मारत
सरळ आपण निसर्गात घुसतो

कार पार्क करून आपण
सर्वांच्या आवडीनिवडी
लक्षात घेत वेळ वापरतो

ताज्या वाऱ्याच्या वनभोजनात
पुन्हा तो मूड आठवतो
पण आपण सर्वांना
रंगीत पक्षी दाखवतो

हेच तर हवेय -- सगळे हसतात
मग मुलांची भांडणे होतात
रडेपर्यंत ताणली जातात

तरीही फिरणे होते
सूर्यास्त पाहत पाहत

वापसी सुरू होते

आता संसर्ग नको आणि तो मूडही नको
जे झाले ते झाले – असा थकवा येतो
--- ००० ---

ऑक्टोबर

" Barkis is willing " म्हणजे " बार्किसची इच्छा आहे " या डिकन्सच्या वाक्याप्रमाणेच, " where is Dan ? " म्हणजे " डॅन कुठे आहे ? " हे वाक्य भाषेत रुळू शकते. प्रेमाचे किंचित अंकूर फुटले असतील-नसतील तेवढ्यात तिला अपघात होऊन ती कोमात जाते. पण, अपघात होण्यापूर्वीचे तिचे शेवटचे वाक्य असते, " डॅन कुठे आहे ? " या धाग्यावर त्याचे प्रेम फुलत जाते -- अगदी तिच्या मृत्यूनंतरही पूर्णतेला जाते ! -- प्रेमकथेची ही एक अद्वितीय कल्पना आहे ! यातून माणसाच्या मनोव्यापारांत खूप खोल मुसंडी मारणे शक्य होते. पण, ते घडत नाही. हा चित्रपट, सुचलेल्या कल्पनेचे नावीन्यच राबवत बसतो. त्यामुळे, अभिजाततेच्या दर्जाला न पोचता तो एक वेगळा, धाडसी, कौतुकास्पद चित्रपट -- या मर्यादेतच राहतो.

एक तर फाईव्ह स्टार -- श्रीमंती माहोल, मधेच येणारे इंग्रजी संवाद, उंची इस्पितळाचे खूप तपशील आणि सर्वच पात्रे रुबाबदार आणि आत्मविश्वासपूर्ण ( आणि करमणुकीचा नेहमीचा मसाला नसणे ) -- यांमुळे हा चित्रपट मासेसचा होणार नव्हताच. पण, अधिक खोलात जाणेही न झाल्याने तो ग्रेटही नाही होऊ शकलेला ! नुसताच धोका पत्करून पैसे वाया घालवले आहेत ! ( हे सर्व मी आशयदृष्ट्या लिहीत आहे. )

मी काल हा चित्रपट पाहिला तेव्हा थियेटरमध्ये मोजून बारा प्रेक्षक होते !

--- ००० ---

संध्याकाळी लागताच दिव्यांतून
अमृत पाझरते म्हणून
मी काही हुरळून जात नाही
तरीही त्याला वाटले की
तिच्यामाझ्यात जवळीक वाढते आहे
म्हणून त्याने मला काही

तिच्याबद्दल विचारले
थियेटरच्या पायऱ्या उतरताना

मी बोललो काही साधेसेच पण
त्याने काही वेगळेच सांगितले
( असावे ) तिला जणू मी
एक रुक्ष बेफिकीर तिच्याबद्दल
फारसे बागकाम नसलेला

तरीही तिच्यात काहीच फरक नव्हता
तिचे हास्य तेच तसेच होते ढगांपलिकडचे पण पूर्ण विश्वासाचे

तो याने हवालदिल झाला
( असावा ) असे मला वाटले
पण मी ते दिसू दिले नाही
निष्कारणच मनात मुद्दाम
तिचे प्रेम बाळगत

तिने ते खरेच समजून प्रतिसाद
दिला समजा तरी चालेल किंवा बेहत्तर
पण जरा आलाच आहे एक विचार मनात की
तिच्यात खरेच काहीतरी जागे होतेय बागेसारखे
--- ००० ---

फेबूवर अमुक पक्षाच्या बाजूने आणि तमुक पक्षाच्या विरुद्ध लिहिण्याचे पैसे मिळू शकतात, म्हणे ! आता, लेखनावर उपजीविका चालू शकेल !

महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा, मुंबई इथे काल ' नाट्यलेखन ' या विषयावर चार तास बोलून आलो ! विद्यार्थी-विद्यार्थिनी, आयोजक आणि मीही खुश झालो ! चार तास बोलायचेय म्हणून मी बराच मजकूर डोक्यात तयार ठेवला होता -- त्यातल्या एक तृतियांश मजकूरावरच बोलून झाले !

नंतर ग्रुप फोटो चा कार्यक्रम झाला. " ज्यांना अभिनयांत इंटरेस्ट आहे त्यांनी हसा -- ज्यांना लेखक व्हायचेय त्यांनी हसू नका -- " असे फोटो काढताना मी गंमतीने म्हणालो. एका मुलीने विचारले, " सर, दोन्हींतही इंटरेस्ट असणाऱ्यांनी काय करावे ? " म्हटले, " अर्थात हसावे ! कारण लेखकापेक्षा नट-नटीच महत्त्वाचे ! "

मजा आली !

जे आहे ते
अशी कविता दिली की
सगळे फोन बिझी होतात
काही नव्हतेच जणू
त्यांच्या आधी
असे दाखवत
त्यांना तहान तरी लागते
प्रामाणिक किंवा
ते अंघोळीला तरी
निघून जातात मग्नपणे

समस्या वा त्यांचा गुच्छ
देऊन केलेले कडवट
स्वागत त्यांना आवडते
ते हसून आभार मानतात
‘ आपले ‘ जग एकच
असल्याच्या खात्रीने

समस्येशिवाय जग
जाणवणार कसे
या विचारात ते

दारू एंजॉय करत
अनुभवातून विश्वास
मिळाल्याप्रमाणे
गूढ हसतात

आता बदल नको असतो
शेवटपर्यंत

--- ००० ---

हवाही जगच
डोळ्यांना कानांना नाकाला
चिकटलेले खोलवर
मधल्या अंतरामुळे
वाटते जे बाहेर

अंतरही भरलेले जगाने
डोळ्यांकडे पाहणाऱ्या

मी जगाच्या सावलीत
कधी तिला कुरवाळणारा
कधी तिच्यामुळे भयभीत

सर्व माणसे जगाने
एकमेकांना घट्ट चिकटलेली
आतल्या आत
खाऊ पाहणारी एकमेकांना
त्वचेच्या रंध्रारंध्रातून
कधी दूर जात रागाने
तर कधी उकळत सुखाने

जगाच्या या
पडद्याबाहेरचे
काही दिसत नाही

जगाबाहेरचे जग
असेलच तर असे
चिकटणारे नसेल

--- ००० ---

सरकारी कागदपत्रांवर
सह्या करताना उठलेले
मधमशांचे मोहोळ
प्रत्येक विचाराला डसत गेले
मग तो विचार बागेत
झालेल्या विध्वंसाच्या
सहानुभूतीचा असो की
प्रतिकूल परिस्थितीमुळे
करपून गेलेल्या भविष्याचा

नाही तरी आयुष्य
ठेचकाळतच चाललेले होते
स्वर्गातल्या सुखोपभोगांच्या
कल्पनांवरून
खेळवत आकाशाची
गोजिरवाणी पिल्ले
प्रेमळ खडकाळ खळग्यांतून

निर्वाणीचे हवेच काही उत्तर

म्हणून उलथलेला सूर्यास्त
कपडे धुवावे तसे धूत गेला
भूतकाळातले इच्छाबळ निर्घृणपणे

किंचित प्रसिद्धी असूनही
आता अत्युच्च शक्य नव्हते
प्रयत्नही टिकेनासे झाले
म्हणून मग मरणाला मानहानी
मानण्याचे भविष्य बळावत चालले
--- ००० ---

सुभाषितांवर आधारित आयुष्य बेतता नाही येत !
( यालाही सुभाषितच म्हणणार ? )

जगण्यातली अनिश्चितता निश्चित असते आणि निश्चितता अनिश्चित !

समजून-उमजून मन हानिकारक विचाराकडेच वळत राहते -- त्याला वळण लावण्याचे प्रयत्न स्थिती अधिकच बिघडवतात --

सत्य हे फक्त असू शकते
ते ‘ असू देता ‘ नाही येत
ते वापरताही नाही येत
कोणत्याही समस्येवर
जरी त्याच्या असण्यात
सर्वच समस्या होतात नष्ट

आपली समस्या तरी काय आहे
हे दिसण्यातच ते उदय पावते
त्याच्या जवळपास वा कुठेही

आपण थांबूच नाही शकत

एक कणही हवेपण नाही चालत
नकोच ते वापरणे असे मनाने म्हणताच
आपोआप लागते ठेच हृदयाचा ठोका चुकवणारी

भयानक म्हणजे काय ते इथे कळते
आणि आता परतीचे दोर कापलेले
आता परतणे म्हणजे खंगून मरणे

याची चुंबकीय शक्ती प्रचंड असते
जगता जगता खरे तर
तिकडे वळणे होतेच टाळणे न जमल्यास
आणि मग सुरू होतो हा खेळ
त्याच्या प्रखर निर्मम असण्याचा

सत्याला काहीच नाही करावे लागत
स्वयंचलित नियम सगळे आपल्याच मृत्यूचे असतात
--- ००० ---

पार्लेच्या मँगो बाईटला कागदी आवरण कसे चढवायचे हे सुचणारा खरोखर एक अद्वितीय कलाकार असणार ! ते आवरण दिसण्यापासूनच आंबा सुरू होतो !

उपटसुंभ म्हणाव्यात अशा
फारशा वापरल्या न गेलेल्या
वस्तू तरी कोणत्या वापराव्यात कवितेत
ज्या करतील काही नव्या अर्थांचा वर्षाव
-- कुकरची शिट्टी शेवटी
स्थिरच असणार अर्थापूर्वी वा नंतरही

-- तसेच असणार हायवेवरचे

उत्तान मल्टिप्लेक्स --

ज्याच्या मर्यादा स्थिरच असणार मनात

अपघातात फरफटत गेलेल्या दुचाकीची

मनातली स्थिर भयानकता

ही हळहळ चीड पराभूतता

यांहून काय वेगळे देणार

माझ्या मनाच्या सवयींतच आहे

सर्व वस्तूंचा आणि घटनांचा मृत्यू

मी जन्मलो तेव्हापासून

रोज त्या मृत्यू पावत आहेत

माझ्या शिक्षणाची

परतफेड म्हणून

आता मला कंटाळा आला आहे

मी एकेक वस्तू दहन करत नाही बसणार

माझ्या मनाच्या यंत्रणेच्या मुळाशीच

बाँब ठेवावा लागेल

इंटरेस्टिंग जगण्याच्या माझ्या स्वप्नाचा --

त्या स्थिर स्वप्नालाही उडवेल असा

--- ००० ---

महानगरपालिकेच्या अहवालाप्रमाणे, प्रमाण वाढलेय म्हणतात --

मुंबईत ३१ टक्के लोक मनोरुग्ण आहेत !

राजधानीची जर ही अवस्था तर एकूण महाराष्ट्राचे काय असेल ?

आता कुणी कुणाला म्हणावे --

" कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा ? "

विचारार्थ ------

The Ultimate Escape

What do we mean by the problem of sex? Is it the act, or is it a thought about the act? Surely, it is not the act. The sexual act is no problem to you any more than eating is a problem to you, but if you think about eating or anything else all day long because you have nothing else to think about, it becomes a problem to you. Why do you build it up, which you are obviously doing? The cinemas, the magazines, the stories, the way women dress, everything is building up your thoughts of sex. And why does the mind build it up, why does the mind think about sex at all? Why, sirs and ladies? It is your problem. Why? Why has it become a central issue in your life? When there are so many things calling, demanding your attention, you give complete attention to the thought of sex. What happens, why are your minds so occupied with it? Because that is a way of ultimate escape, is it not? It is a way of complete self-forgetfulness. For the time being, at least for the moment, you can forget yourself and there is no other way of forgetting yourself. Everything else you do in life gives emphasis to the "me," to the self. Your business, your religion, your gods, your leaders, your political and economic actions, your escapes, your social activities, your joining one party and rejecting another,all that is emphasizing and giving strength to the "me." When there is only one thing in your life that is an avenue to ultimate escape, to complete forgetfulness of yourself if only for a few seconds, you cling to it because that is the only moment you are happy.

J. Krishnamurti, The Book of Life

वारा येतो-जातो
काही पाने म्हणतात
त्याचा हेतू चांगला नाही
काही म्हणतात
हा तर जुनाच आहे

माझे लक्ष असते
मनाने -- मन कुठले नवे असणार
त्याची बरीच पाने
वाळलेली आहेत

पण वाऱ्याला
काही चिकटत नाही
सगळे चिकटते ते
माझ्याच भूतकाळाला

मी मनाला थांबवतो
कारण शक्यच नाही
इतक्या सगळ्या पानांशी संवाद --
जे लागायचे ते लागू देत अर्थ
प्रत्येक पानाला पटणाऱ्या
अर्थाने कसे जगणार
नवे आणि सदहेतूपूर्ण

निर्मनुष्य वारा हेच
मी माझे जगणे करतो --
जाईल तिथे जसातसा जाऊ दे म्हणत
समूळ जातो मी वाऱ्यावर कुठेही
--- ००० ---

उपाय जरूर करावेतच -- पण, कोट्यवधी लोकांनी सतत प्रक्षुब्ध राहणे, हे हानी स्वीकारणे होते आहे. ते कमी व्हावे.

या जगातल्या कोट्यवधी गोष्टी
मी पाहिलेल्याच नाहीत
ताजमहालही नाही
आणि जे मी पाहतो
ते फक्त माझ्या विचारांनी
आणि विचार बदलले की सगळे
मला वेगळेच दिसते
हे मला कायमच्या विचाराने
माहीत आहे माझ्या विश्वासार्ह

तसेच सगळ्यांचे असणार
संकट येईल तेव्हा कळेल गधड्याला
किंवा वाटू शकते आणूयाच मुद्दाम
साल्यावर एक टेस्टिंग फाशी

हिरिरीने कवटाळावे
असे जर काहीच नाही वाटत
तर का म्हणून मी शत्रू समजून
कुणाचेही कपडे फाडत फिरू

कधी कधी वाटते
सगळ्यांचा शत्रू होण्यापेक्षा
थोड्यांचा व्हावे सशक्त बाजू निवडून
आपल्याला पौष्टिक असणारी

विचारांची झेप ही एवढीच
कोणतेच विचार देत नाहीत

योग्य उत्तर हे मला माहीतच आहे कायमचे

--- ००० ---

गोंधळ आणि बिनगोंधळ
दोन्हींना वाव ठेवून
मी कवितेत
गोंधळाचे प्राबल्य वाढवतो
कारण मला माझी
संरक्षणयंत्रणाही
संभाळायची असते
मी कशाचे संरक्षण करतोय
हे माहीत नसले तरीही

मला विविधता उत्तेजक
वाटत असली तरीही
सर्वांचे स्वभाव आणि मते
एकसारखीच असावीत
असेही वाटते अपरंपार

कुणाचाच कुणालाही त्रास नाही
अशा जगाची कल्पना मला आवडते
फक्त स्त्री-पुरुषांत मात्र माफक
घर्षण आणि आकर्षण असावे
हा मात्र मला सुखाचा नाइलाज वाटतो

निश्चित सांगायचेच नाहीय काही
माझ्या कवितेतून गोंधळ
आणि मुख्य म्हणजे अनिश्चितता
यांच्याकडेच लक्ष जायला हवेय

कारण दोन्हीही पूर्णपणे निरर्थक
आणि वेगळेपणासह समान

--- ००० ---

मी स्थिर असतो तेव्हा जगही स्थिर असते
स्थिरपणे बदलणारे पण निश्चित
असतो सतत आमच्यातला युद्धाचा प्रसंग
जिवंतपणे जखमी करत राहणारा

मी प्रवाही झालो की जगही होते प्रवाही
म्हणजे युद्ध संपून आम्ही
सहज साजरी करत राहतो मैत्री
स्थिरता वाहून गेल्यामुळे

माझे रामभरोसे आयुष्य
आणि माझे हुशार निर्णय
जगाला मार्गदर्शन करू इच्छित असले
तरी सगळ्यांनाच असते आपापल्या स्वप्नांची घाई

यालाच जग आणि मी म्हणतो व्यवस्था
जीत राहूनच ती बदलायची आहे अशी
विद्रोही क्रांतिकारक जग आणि मीही
यातूनच येणाऱ्या एका नव्या व्यवस्थेकडे कूच करणारे

आमच्या प्रणयरम्य आठवणी आणि अपमान
एकत्रच संघर्षरत असतात आमच्यात सतत
रणकंदन माजवत तेच तेच तसेच प्रसंग
अर्थ लावत जे जे घडून गेले त्याचे निश्चित

वर्चस्वाची आणि सुखाची आणि संघर्षाची भूमी

असणारी आमची स्थिर व्यवस्था अबाधित ठेवून

तीमधले काही नेमकेच तपशील फक्त

बदलण्याचे आमचे ऐतिहासिक उदात्त प्रयत्न रामभरोसे

--- ००० ---

Tobacco Kiosk poem - Fernando Pessoa poems | Best Poems

best-poems.net

मधेच कधीतरी मला आठवण होते आणि मग मी ही माझी अत्यंत जिवाभावाची कविता पुन्हा एकदा वाचतो – फर्नांडो पेसोआची ' टोबॅको किओस्क ' म्हणजे ' तंबाखूची टपरी ' ! ही घ्या लिंक --

सगळीकडे रस्ते खणून ठेवलेले

वायर्स पाईप्स पेव्हर ब्लॉक्स खड्डे दगड धोंडे माती

कुठेही चालत गेलो आयुष्यात तरी हेच

न ठेचकाळण्याची काळजी घेत

आम्ही मार्गस्थ हसतो

एकमेकांकडे पाहून

समान त्रास भोगण्याची मजा म्हणून

चिडून आणखी आतलेही उरलेले सगळे

दुरुस्तीला काढायची आमची तयारी नसते

काहीच नीट नाही असा हाच एक देश आहे

की जगभर असेच आहे घुसमटलेले

वाताहातीवर पडलेले

विकृत नैसर्गिक ऊन

अत्तरे तर किती आहेत बाजारात

आणि मोरपिसांचे पंखे

घटनेचे सामूहिक पारायण ठेवायचेय
यंदाच्या गणेशोत्सवात
नाही नाही नुसते स्त्रियांचे नाही
सर्व समान या न्यायाने
सर्व जात धर्म भाषा वाले

सीरिया नामक देशातही रस्ते असेच
उखडलेयत म्हणे
काय काय साठवणार या छोट्याशा मेंदूत
जो मर्त्य आहे हाच दिलासा
--- ००० ---

‘ नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य ‘
( कथासंग्रह ) – प्रणव सखदेव. --

प्रणवच्या या कथासंग्रहात एकूण आठ कथा आहेत. एखाद्या लेखकाचे मूल्य हे त्याने सर्वाधिक गाठलेल्या उंचीवरून करायला हवे -- तो कमी उंचीवर कसे किती खेळला यावरून नव्हे. या संग्रहातल्या पहिल्या सात कथा या ‘ ठीक ‘ या सदरात येणाऱ्या आहेत. त्यांतही समकालीन जगण्याचे विविध काप आहेत – किमान सफाई, मध्यमवर्गीय जगण्यातल्या मानवी संबंधांतले प्रश्न, ताण – हे सगळे आहे – तरीही, या कथांतून प्रणव त्याचा सर्वोच्च आवाका गाठतोय, असे वाटत नाही. ते, या संग्रहात शेवटी येणाऱ्या शीर्षक-कथेत मात्र घडताना दिसते. इतर सर्व कथांहून ही कथा खूपच अधिक ताकदीने लिहिलेली आहे !

‘ नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य ‘ ( यातला ‘ भी ‘ दीर्घ हवा, असे वाटते – नीट पाहून घ्यावे ) या कथेत प्रणव, लेखक म्हणून खूप मोठा परिसर हाताळतो. लग्न नको असणे, मूल नको असणे, आपल्या आवडीने जगायचा हट्ट असणे – या पद्धतीच्या प्रश्नांतून सुरू होणारी ही कथा पुढे – असंख्य गोष्टींच्या परिणामांतून एखादी गोष्ट घडणे वा एखाद्या गोष्टीचे असंख्य परिणाम होणे – असा, तत्त्वज्ञानात्मक आवाका घेत जाते. एकच कथा अनेक दृष्टिकोणांतून मांडण्याचे ‘ राशोमान ‘ तंत्र सोडून ही कथा, कथेचा एकेक तुकडा वेगवेगळ्या पात्रांच्या ‘ पाहण्या ‘ तून मांडत जाते. यात, मग, ' काळा तलाव ' हेही एक पात्र बनते. या कथेत, प्रणव कथेचे नुसते वस्तुरूप अस्तित्व दाखवत नसून, जगण्याच्या एकूण रचनेतली अतर्क्यताच दर्शवतो आहे, असे वाटते. असे झाले म्हणून तसे झाले – ही एकरेषीय समजूत इथे निकालात निघते. ( मोठमोठ्या कालखंडांची अशा सामान्यीकृत पद्धतीने एकरेषीय मांडणी करणारे इतिहासकार आणि भाष्यकार इथे आठवून पाहावेत ! ) या अतर्क्यतेला ही कथा स्पर्श करत असल्याने ही निराकरणहीन कथा ठरते.

कुणाला कंडेम करावे वा कुणाचे गुणगान करावे, असे यात काही राहात नाही. अतितीव्र नाट्यमयता नसलेल्या अशा आधीच्या सात कथांच्या पार्श्वभूमीवर ही कथा थेट खुनाच्या घटनेपर्यंत जाते ! आणि प्रणव तशी ती जाऊ देतो !

नव्या लेखकांमध्ये प्रणव हा, एखाद्याच स्थिर दृष्टिकोणातून जगणे समजून घेता येणार नाही याचे भान असलेला लेखक व कवी आहे. ही काही सवयीतून येणारी व्यक्तिगत कुवत वा हुशारी नव्हे. ही समज सर्वांसाठी महत्त्वाची ठरू शकते आणि ती सर्वांची असूही शकते. अशी समज, क्वचित का असे ना, व्यक्त करणारा लेखक हा सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा असतो.

--- ००० ---

बोलणे व्हायचे
त्या ओघात एकदा
अगदी आतलेही बोलले गेले होते
तिने होकारही दिला होता
पण तिच्या ओढणीवर त्या वेळी
तिच्या ऑफीसकामांची यादी होती

ते आता फिट आहे
तिचेही असावे
पुन्हा तो विषय नाही
तरीही सतत आहेच
एकटी असताना एखाद्या क्षणी
तिचेही डोळे एकाग्र होत असतील
( मला प्रचंड लुभावणारे )
-- या जगात समानाधिकार असून
लोक तो वापरत नाहीत
हे फार वाईट आहे

की मीच पुन्हा तेच म्हणू
जणू ती वाटच पाहात असल्याप्रमाणे
-- मी न म्हटल्याने तिचे वाट पाहाणे

वाया तर नाही जाणार

या अंधुक क्षणी ही कविता
सोडतोय मी या विश्वात
ही नक्कीच लक्ष्य गाठेल
तत्क्षणी असेल तिथून तिने
सिग्नल द्यावा
--- ००० ---

माझी एक थियरी आहे
आपण मेंदू कुठे मुडपतो
त्यावर आपला स्वभाव ठरतो
खालच्या बाजूला इहवादी
आणि वर श्रद्धावान
पण असते सगळे
शारीरिकच
( यावरून विचार करा
नीतीबीती सगळे खोटे असते )

घराच्या खिडकीतून
बाहेर पाहताना किंवा
एखादे गाणे ऐकताना
मी ठरवून वेगवेगळ्या ठिकाणी
माझा मेंदू मुडपतो
खाली व्यवहारी
वर कलानुभव
पण असते सगळे
शारीरिकच
वर जरा ( तात्पुरता )

स्वभाव मऊ पडतो

इतकेच

मुडपलाच नाही तर

म्हणजे स्वभावहीनताच की

तिला शब्द नसतो

बिनशारीरिक

ओळखणार कसे

--- ००० ---

प्रत्येक वर्षी कमीजास्त

पक्षी मरतच असतात

नेमका पाऊस किती पडावा

हेही निश्चित नसल्यावर

एखाद्या व्यक्तीला अपमान

किती सहन व्हावे हे कसे सांगणार

हवेचाच प्रश्न असल्याचे पाहून

कुणी तिला धार लावू लागतात

त्यातच एकजण म्हणतो

या विश्वातच श्वासापेक्षा

उच्छ्वासच अधिक महत्त्वाचा आहे

आणि मग येतो पेच लक्षात

काम तर बुद्धीनेच चालवावे लागणार

आणि ती तर हवा फक्त

बाहेरून आतच घेऊ शकते

यावर जरा वाहत्या रस्त्यावर

शांत राहाणेच ठीक
अशा विचाराने
सर्व वादावादी थांबवून
विसावा म्हणून पक्ष्यांना
दाणे टाकणे चालू राहते

काहीतरी केले तर पाहिजे
या विचाराने मग आधी अपमानाचा
बदलाच घ्यायचे ठरते
--- ००० ---

INSANITY Beyond Understanding
( अनाकलनीय वेडेपणा ) – बाजीराव पाटील.

आपले फेसबुक मित्र बाजीराव पाटील यांचे हे एक अचाट आणि अफाट पुस्तक आहे ! ते वाचून जो शहाणा होणार नाही त्याला गॉन केस म्हणून सोडून द्यावे लागेल. अमेरिकेतल्या एका व्यसनमुक्ती केंद्रात समुपदेशक म्हणून काम करताना त्यांना आलेले अनुभव आणि त्यांनी पाहिलेल्या अनेक मनोविकृतींच्या कहाण्या या पुस्तकात आहेत. निव्वळ आततायी, उद्रेकमय आणि अराजकी मनांचे जग !

महाराष्ट्रातल्या एका खेडेगावात वाढलेले हे बाजीराव पाटील कष्ट, चिकाटी आणि जिद्द यांच्या जोरावर अमेरिकेत पोचले आणि तिथे एक ख्यातनाम समुपदेशक झाले, हे खरोखरच प्रेरणादायक आहे ! त्यांचे सहकारी आणि रुग्ण यांच्या प्रेमामुळे ते हे पुस्तक लिहायला उद्युक्त झाले.

दारू आणि अनेक मादक द्रव्ये यांच्या विळख्यात सापडलेल्या अनेक व्यक्तींच्या या कहाण्या आहेत. त्यांतल्या ‘ सर्व काही व्यक्त करणाऱ्या ‘ संवादांमुळे त्या जिवंत, स्फोटक आणि जगण्याचे विदारक दर्शन घडवणाऱ्या झालेल्या आहेत. हे सगळे बारकाईने आठवून लिहिणे सोपे नव्हते. बाजीरावांच्या सखोल समजुतदारपणामुळे या सत्यकथांना अत्यंत मौलिक अशा ललित साहित्याचाही दर्जा प्राप्त झालेला आहे.

पुन्हा माणसात येण्याची इच्छा असलेल्या आणि ती इच्छाही हरवून बसलेल्या अशा व्यक्तींचे हे जग आहे. यांतल्या बऱ्याच व्यक्ती बेघर, बेसहारा आणि बेकार आहेत. काही स्त्रियांची उपजीविका वेश्याव्यवसायातूनच चालते आहे. कधीही तोल जाऊ शकेल, कधीही हिंसक होऊ शकतील, अशी ही माणसे आहेत. खुद्द बाजीरावांसारख्या समुपदेशकाचा अपमान करणे, त्यांना अत्यंत घाणेरड्या शिव्या देणे – असेही बेभानपणे वागणारी ही माणसे आहेत. अशा लोकांमध्ये स्वतःचा तोल संभाळून राहणे ही सखोल माणुसकीची एक अद्वितीय अशी साधना आहे – तपस्या आहे ! नुसते उपजीविकेचे वा पैसे मिळवण्याचे काम म्हणून हे होऊच नाही शकणार. हृदयात सखोल करुणा असलेला माणूसच हे करू शकेल. हे सर्व वाचताना आपोआपच आपण बाजीरावांबाबत आदरभावनेने नतमस्तक होत जातो. यात क्वचित काही व्यक्ती तर एखाद्या तत्त्वज्ञाचा बाप वाटाव्यात अशा बुद्धिमान आणि बिनतोड वाद घालणाऱ्या आहेत. त्यांनाही बाजीराव कसे हाताळतात हे पाहून आपण थक्क होतो !

या पुस्तकातले बाजीरावांचे तिथल्या रुग्णांबरोबरचे संवाद ही एक शहाणपणाची अद्वितीय संपन्नता आहे ! किती तऱ्हांचे अनपेक्षित वागणे-बोलणे ! किती तऱ्हांच्या विकृती सहन केलेली आणि आता स्वतःही अनेक विकृतींना बळी पडलेली ही माणसे ! याला विकृतींचे एक विश्वरूप दर्शनच म्हणावे लागेल. अशा या जगातले बाजीरावांचे बोलणे-वागणे हे अनेक प्रकारे समृद्ध करणारे आहे. अशी व्यक्ती इथे फेसबुकवर आपली फ्रेंड म्हणून वावरते आहे, याला आपले भाग्यच म्हणायला हवे !

मी वाचलेल्या निवडक ग्रेट पुस्तकांपैकी हे एक पुस्तक आहे. यातला कण न कण स्वतः वाचला पाहिजे – निवेदनातून वा माहिती देण्यातून ते समजणे शक्यच नाही. यापुढचा काळ हा वाढत्या मानसिक समस्यांचा काळ असण्याची शक्यता अनेकदा व्यक्त केली जाते – त्या पार्श्वभूमीवर तर या पुस्तकाचे विशेष महत्त्व आहे. तोल गेलेल्या अशा व्यक्ती आता तुमच्या-आमच्या जीवनाचाही कधीही भाग होऊ शकतात – हे लक्षात घेता या बाबतीत आपले भान आणि सजगता वाढणे महत्त्वाचे आहे. ही महत्त्वाची कामगिरी पार पाडू शकणारे पुस्तक लिहिल्याबद्दल बाजीराव पाटील यांचे अभिनंदन आणि मनःपूर्वक धन्यवाद !

Bajeerao Patil

नजरानजर झाली तेव्हाच
उघडल्या गेलेल्या पुस्तकांतून
अंधार बाहेर पडले अनाहूतपणे
याचा अर्थ ढगांत निराशा होती
असा नाही
सेक्सच्या ऐवजी

मॅरॅथॉन रेस आठवली जात होती
इतकेच

परंतु होती ती रात्रच
पाने सगळी काळीच दिसत होती
तिथेच कुठे कुठे पक्षीही असणारच
विनास्वप्न झोपी गेलेले

म्हटले तर शांतता होती
म्हटले तर थकवा होता
आणि म्हटले तर
घडेल ते घडेल
या विचारात मन स्तब्ध होते

एकानंतर दुसरा क्षण
असे पाहिले तर
ते संधीची वाट पाहणेही ठरू शकले असते

रोजच्या रोज कोण गाणार भजन
म्हणून विस्कटलेल्या मातीतही
पावसाची वाट पाहणे होते
एक प्रकारचा आशावादच नाही तर काय
--- ००० ---

दगडावर बसलेले फुलपाखरू
ही एक घटना पाहून
प्रश्न निघतो दगडाच्या आणि मग विश्वाच्या
उत्पत्तीचा – मनच मनाला
नेमते डिटेक्टिव्ह

ते असंख्य गोष्टी शोधत राहते
पण त्याचबरोबर
फुलपाखराचे डिझाईन
कुठे कुणाला कसे सापडले असावे
अशा घटनांचेही विचार करत राहते

स्वतःचे असणे ही एक घटना
आणि दगड हे एक मूलभूत सत्य
आणि उगवत्या प्रत्येक दिवसामुळे
वाढणाऱ्या वयाची पृथ्वी
असे चालू राहते
घटनेने घटनांना जोखणे

मनाची घटना पाहतेय विश्वाच्या घटनेकडे
असा मूळ गुन्ह्याचा शोध चालूच राहतो
आणि सापडणारे सर्व तपशील
उपयोगी पडत असल्याने
मन होते भूतकाळाचे संग्रहालय

पण गुन्हेगार सापडण्याचे काही
नावही दिसत नाही
-- आपण तर नाही बाबा तो --
--- ००० ---

सध्या फेसबुककडे दुर्लक्ष --
फिर मिलेंगे --

तसे घडले काहीच नाही
ना विचारांचे कपचे उडाले
ना भावनांचे टवके
नुसतेच एक सनातन आकर्षण
आयोडीनच्या वासाप्रमाणे
वर्षानुवर्षे पसरत राहिले

ती होती एक
नृत्यातली पोझ
स्टेशनच्या जिन्यावरून
पळतानाही आठवणारी

हाच का म्हणू नये
आयुष्याचा पाया
नग्न आठवणींचा
उत्तेजित रंध्रांचा

डोळ्यांतून ओसंडणारे
लाखो रेशीमधागे
माझ्या मनाच्या
सुखलोलुप तुकड्यांना
जायबंदी करणारे धर्मबंध

त्या क्षणीचा तो चेहरा
त्या आधीचे ते वादळ

हजारो वर्षांची ही प्रेमकविता
या क्षणी मनाच्याही मर्यादा न --

--- ००० ---

एके काळी आपल्या नद्या, तळी स्वच्छ होती याचा पुरावा हवा असेल तर साठच्या दशकातली हिंदी चित्रपटांतली गाणी बघा --

सतत कुणाच्यातरी विरोधात असणे हेच जगणे, ते व्यक्त करणे हेच स्वातंत्र्य आणि एकमेकांना अपमानित करून दुखवत राहणे हाच बंधुभाव !

( स्वगत -- ) काही वेळा सर्जक लेखन फारसे कुठे नीट ' पोचत ' नाही. इलाज नाही. छोड दो ! आणि मुळात ते फालतूही असू शकेल !

एकच असायला मत म्हणजे सत्य नसते. विरोधी असत्यांनी भडका उडू नये.

ना एखादा मूड ना रागलोभप्रेम
अशी निखळ अस्तित्वाची कविता लिहायची तरी
वस्तू लागणारच जन्मल्यानंतर
डोळे उघडण्या आधीच्या अमर अंधारातून येणाऱ्या
असंख्य आवाजांतून नेमके विचार शोधणाऱ्या

नुसतीच सुरुवात आलेली असते समोर
हजारो बातम्यांसारखी विस्कळित
दगडावर सतत आपटत राहणाऱ्या
पाण्यापेक्षा दगडच अधिक स्वच्छ
असे म्हणत लिहिता लिहिताच
पूर्ण होत जाणारी तणावपूर्ण

विरोधी पक्षनेते येतात तलवारी घेऊन
म्हणतात की ही निराशा होतेय
असे केले तर कोणतीच कुत्री
रक्षण नाही करू शकणार
येणाऱ्या पिढ्यांच्या सुखसंभारांचे

स्वतःच्याच मुलांसाठी स्वतःचे
जगणे त्यागायला तुम्ही नकार देताय

हळूहळू झालेली मेंदूची प्रगती
मान्यच असते हजारोंचे ऋण
ज्योतिष आणि रत्ने यांचा प्रचंड बोर्ड
दिसतो तीस दिवसांत वांच्छित न घडल्यास
सर्व पैसे परतीची खात्री देणारा
तरीही मन धजत नाही
सक्तीचे मुखवटे पांघरून
अज्ञातवासात जायला

एस्टी स्टँडवर दुरून दिसावा
झिंगून पडत आलेला मित्र
तसा जिवंत राहण्याचा विचार
वाटतो बाहेरच्या बाहेर अविचारी
कळकट गाडीवर चहा पिणाऱ्या
माझ्या या उपलब्ध मनाला न शोभणारा

तरीही मी आत्महत्या नाही करत
किंवा समोरचा क्षण टाळण्यासाठी
झोपेची गोळीही नाही घेत
मधेच कुणीतरी माझ्या खिशावर लावलेला
गुलाब संभाळत मी शांतपणे
पितो मीठा लस्सी अविचल असल्याप्रमाणे

डोळे उघडले तेव्हा सर्व वेद पाठ होते
तरीही अंधार नष्ट झाला नाही
तेव्हापासून उडाला माझा विश्वास शब्दांवरचा

आणि तरीही जडले व्यसन कविता लिहिण्याचे
होऊ दे आयुष्याची नासाडी असे म्हणत

शेवट येण्यापूर्वीच उलगडायलाच हवेय
या मानसिक कोंडीचे कोडे

निखळ अस्तित्व ही नुसतीच
एक कल्पनाच तर नसेल
आपला आपला झेंडा म्हणून फडकणारी
कार्यरत असण्याची एक समजूत म्हणून
--- ००० ---

३० मार्च '१८ चा ' लोकप्रभा ' आत्ताच वाचला. मित्रवर्य रवी लाखे -- Ravindra Damodar Lakhe यांच्या दिग्दर्शन शैलीबद्दल, आपला प्रिय अभिनेता ललित प्रभाकर -- Lalit Prabhakar -- याने लिहिलेला लेख या अंकात आहे. ललितने अत्यंत आदरपूर्वक आणि सर्व महत्त्वाचे मुद्दे घेत हा लेख लिहिलेला आहे. दिग्दर्शक म्हणून असणारे लाख्यांचे ' असणे ' ललितने नेमके व्यक्त केलेले आहे, एखाद्या अभिनेत्याने, एवढ्या थोडक्या शब्दमर्यादेत, इतके भरगच्च लिहावे, हे क्वचित घडते !

या लेखासाठी ललितचे अभिनंदन !

मी पितो माझ्याबरोबर
कधीकधी माझी कोल्ड कॉफी
जिच्याबरोबर माझा
चॉकलेटी भूतकाळ
सौम्य मध्यमवर्गीय

जी मी एंजॉय करतो
काही मित्रांसोबत
ज्यांची मैत्री
गेली काही वर्षे सौम्य

माझ्या कॉफीसोबत

माझे हॉटेल सौम्य वाऱ्याचे

आतल्या आत एक मस्त

खाजगी आठवण जपणाऱ्या

माझ्या कॉफीचा सुगंध

अर्धोन्मीलित संध्याकाळी

माझे अनेक संघर्ष

सौम्य करणारा

माझ्या छान फ्रेश चेहऱ्यामागे

माझ्या कॉफीला माहीत आहे

तिचे क्षणिक थंड अस्तित्व आणि

सांध्यरंगात लुप्त होणारा तिचा शेवटचा सौम्य थेंब

हे आता संपण्याच्या भीतीचा चरा

देऊन जाणारी माझी सौम्य प्रिय कोल्ड

--- ००० ---

अशांत असणे म्हणजेच हिंसक असणे

असे मी म्हणालो तेव्हा नुक्तेच

तुझे नहाणे झाले होते आणि तू तुझ्या

संगणकाला पाणी घालायला

निघाली होतीस सजूनधजून --

तू माझ्याकडे लक्ष न देता तुझे ओठ

सूर्याच्या दिशेने वळवलेस ते

माझा अपमान करण्यासाठीच जणू

तुझ्या खिडकीखालून वाहणारे साप
माझ्या स्वप्नातही आले होते आणि नेमका
तेव्हाच मी शोधत होतो मुतारी --
सत्वर मोकळे व्हायचे होते मला
माझ्या प्रिय कंडक्टरच्या उपकारातून
मला विनातिकीट आणणाऱ्या
या पदापर्यंत बिनबोभाट

मार्केटात तुझी खूप प्रसिद्धी होती --
गोडी लावून नकळत संमोहित
करण्याच्या तुझ्या कसबावर खुश होते
सगळे चराचर अविरत

माझ्या अशांततेतून पडणारे
माझ्या हिंसेचे माझ्या मानसिक
रक्ताचे थेंब जात होते
वाहत्या सापांच्या तोंडांत
आणि प्रचंड धावपळ करूनही
सापडतच नव्हती मला मुतारी
--- ००० ---

उंदीर या विषयावर सभागृहात इतके विदारक हास्यस्फोटक भाषण ऐकायला मिळणे, ही एक खास पर्वणी होती ! जय हो श्री खडसेजी !

हजारो वर्षांत माणूस कधीही शांततेने जगू शकलेला नाही -- हे, आपल्या हिंसक वागण्याला मिळणारे, एक छान समर्थन आहे !

Surrealism is based on the belief in the omnipotence of dreams, in the undirected play of thought.

-- Andre Breton

अतिवास्तववाद हा स्वप्नांच्या सर्वव्यापी शक्तिमानतेच्या धारणेवर आधारित असतो आणि ही शक्तिमानता विचाराच्या दिशाहीन क्रीडेतून येते.

-- आंद्रे ब्रेटन.

चीन, रशिया या कम्युनिस्टांचे जाऊ द्या -- आपल्या देशात तरी, कम्युनिस्टांसह सर्वांनाच लोकशाही आणि विचारस्वातंत्र्य महत्त्वाचे वाटतात, हे आपले भाग्य आहे ! राष्ट्रवाद आणि देशप्रेम यांशिवाय देश थोडाच असू शकतो ? त्या अस्मिता तर आपल्या रक्तातच आहेत ! म्हणजेच, आपण एकूणात, वैचारिक आदर्श आहोत !

आयुष्यात स्त्रिया आल्या नाहीत, असे नाही, पण, लग्न करायचेच नाही, हा संजीवकुमारचा निर्धार होता. कारण विचित्र होते. त्याच्या घराण्यात कुणीही पुरुष पन्नास वर्षांच्या पुढे जगत नाही, असा इतिहास होता ! आपल्यामुळे कशाला कुणा स्त्रीच्या आयुष्यात वैधव्य आणि दुःख आणा, या विचाराने त्याने तो निर्धार केलेला होता. आणि आश्चर्य म्हणजे, खरेच तो पन्नासच्या आतच गेला ! त्याचा भाऊही पन्नासच्या आतच गेला, म्हणतात !

काय डोके चालवायचे यावर ?

( यूट्यूबवरील सारेगामा वीकेंड क्लासिक रेडिओवरून. )

करमणूक करून घेणे, माहीत नसलेले अनुभव घेणे, निरनिराळ्या मूडसमधून जा-ये करणे, माहिती मिळवणे, कलाकौशल्याने थक्क होणे -- हे सगळे जगण्यातले रूटीन आहे. कलेचे कार्य या रूटीनमधलेच असते की काही याबाहेरचे असते ?

प्रज्ञावंत तत्त्वज्ञ रसेल म्हणतो, " मानवी समजुती या संदिग्ध व संकीर्ण असतात. या समजुती निश्चितपणे एकच घटना किंवा एकच गोष्ट नेहमी सूचित करत नाहीत. या समजुती निरनिराळ्या प्रकारच्या वस्तुस्थितींच्या मिश्रणाला व्यक्त करणाऱ्या असतात. मानवी समजुती एखाद्या तार्किक विधानाप्रमाणे स्पष्टपणे सत्य किंवा असत्य नसतात. त्या सत्य आणि असत्य यांचे धूसर मिश्रण असतात. "

-- संजय आर्वीकर -- नव अनुष्टुभ -- जाने-फेब्रु '१८ -- पान ८२.

" इकडे कॉर्नरला थांबवा -- मला आत जायचेय -- तो वनवे आहे -- " मी रिक्षावाल्याला म्हटले. तरी त्याने त्या वनवेमध्ये रिक्षा घातली ! " अहो, हा वनवे आहे -- " मी म्हणालो. " असू द्या हो, काका -- तुमच्यासारख्या चांगल्या माणसासाठी तोडायचा थोडा नियम ! " असे म्हणून त्याने मला माझ्या इच्छित ठिकाणीच सोडले ! बरे झाले, तिथे पोलीस नव्हता, नाही तर माझ्या त्या ' चांगुलपणाची ' त्याला झाली असती शिक्षा !

-- आपण कुणाला तरी, इतक्या थोडक्या ओळखीतही, असे ' चांगले ' वाटू शकतो, याने मला खूपच अपराधी वाटले !

तत्त्वनिष्ठ लोक इतरांचा द्वेष करतात आणि तत्त्वहीन लोक भ्रष्टाचारात प्रगती करतात !

प्रत्येक पक्ष, कोणती ना कोणती भीती उभी करून, तारणहार म्हणून मते मागणार -- कोणती भीती अधिक महत्त्वाची ते लोकांनी ठरवावे !

अवकाशात कण आणि प्रतिकण असतात. त्यांची निर्मिती रिकाम्या अवकाशातही होऊ शकते ! म्हणजे नसण्यातून असण्याची निर्मिती ?

घरापाठीमागे तोच आहे
डोंगराचा खडक
निरनिराळ्या वयांत
कोणकोणत्या गावांत मी काय काय केले
हे सांगणारा जो आज मला
परिपक्व समजतो

वेश्येचे आकर्षण असणे
आणि त्याच वेळी
दया वाटणे तिच्या नाइलाजाची
ही अवस्था आज बावळटही वाटते
आणि ढोंगीही नुसतेच तिला
काही पैसे देऊन निघून जाणे
अंधारात नीतीमान होत

मी मतदान केले वर्षानुवर्षे

फक्त देशहितासाठी

तरीही कोट्यवधी लोक

न्यायाविना तडफडत राहिले

जसा मीही एक तुलनेने

कमी अन्यायानेही

अतिविद्ध होणारा

सदोतीस वर्षांपूर्वी माझा एक वाद

गेला होता शारीरिक हिंसेपर्यंत

ते आठवत त्या खडकावर पडतेय ऊन

मऊ होतोय तो क्षणभर कारण आता

तो स्वतःला खूपच समजुतदार समजतोय

--- ००० ---

खरे तर एकाच कवितेने

व्हायला हवेय निराकरण

आत्मस्तुतीने फाटके कपडे

का शिवता येत नाहीत याचे

का होत नाही मानसिक

मूडसची मालिका

विलीन वर्षानुवर्षे असलेल्या

अत्यावश्यक विश्रांतीत

उभे पीक जळून गेल्याप्रमाणे

भकास झालेल्या वाऱ्याने

गारवा कसला मिळणार

अतिरेकी हल्ल्यात व्हावा विध्वंस

तशा घटना अटळ आणि हेकट
आणखी किती वर्षे
भरत राहणार स्मृतींचे कप्पे

समोर उद्दिष्ट होते
म्हणून तरलेय थोडे तरी अवसान
शेजारीपाजारी राहिलेत
विसंबून की आणेल
कोणते ना कोणते कबूतर
निर्वाणीचा निरोप

रोज चैनबाजी करावी
इतका उत्साहच नाहीय
एका फटक्यात कवटीच्या
आतबाहेर बदल हवाय
--- ००० ---

सोंगाड्यांचा विनोद अस्सल असतो. तो आमच्या शहरी विनोदाला मागं टाकेल. लक्ष्मीबाईंचा विनोद बघा, बहिणाबाईंचा विनोद बघा. त्या विनोदाची जात अस्सल आहे. गोंड लोक तर कमालीच्या कोट्या करताना दिसतात. सुशिक्षित शहरी लोकांचा विनोद हा वक्रोक्तीचा ( सटायर ) असतो. सटायरमध्ये खोचक प्रवृत्ती प्रभावी असते. त्यामुळं स्वतःला हसण्याची प्रवृत्ती नष्ट होते. सटायर हे शस्त्र बनतं. ते शस्त्र वापरता आलं, की हाती सत्ता आल्यासारखं वाटतं. त्यामुळं निर्मळ निर्व्याज विनोद नष्ट होतो.
-- दुर्गा भागवत – ' साहित्यिक गप्पा दहा साहित्यिकांशी ' – जयवंत दळवी – पान १३८.

पाब्लो नेरुदा -- चिलियन कवी -- १९७१ चे नोबेल -- कम्युनिस्ट -- प्रेमकवितांसाठी प्रसिद्ध -- त्या कविता नेटवर उपलब्ध --

Champra Deshpande shared a memory.

अति-महत्त्वाचे म्हणून पुन्हा --

Poetry is an act of peace.

-- Pablo Neruda

अमाप प्रगतियुक्त हे मानवी जग संभाव्य ९ कारणांनी ' अगा जे झालेचि नाही ' असे होऊ शकते येत्या फक्त १०० वर्षांत ! -- स्टिफेन हॉकिंग.

सर्व माणसांचा सारांश म्हणून दगडांतून
रक्त पाझरू लागले – दगडांच्या वेदना
ही प्रमुख समस्या म्हणून मान्य झाली
सर्वांनाच पटत होते की नद्या नाले पर्वत
कुणालाच वेदना नकोत – वेदनाहीनच हवे
सगळे जगणे

सिगरेट पिणारी माणसे याच कामात
व्यग्र झाली – सगळे बदलल्याशिवाय
पृथ्वी फिरत राहते याने ते संतापून जात
नद्या नाले म्हणत सारांश असाच
असत आला आहे – थोटकांचा कचरा
कमीजास्त होत

दुकानदार रोज नाइलाजाने शटर्स उघडत
खेळाडूंना अंडी खावीच लागत
चित्रकार बुडून जात उत्तुंग आणि सखोल
आशयात

दगडांच्या मनांत येई उठावे हल्ले करावेत
ते किंचाळत रस्ते उखडतही इमारतींना
आगीही लावत – नद्या म्हणत वेडे आहात
सारांश बदलत नाही आणि हे समजत असूनही
तुम्हाला मस्त चैन हवीय तुमच्यापुरती सिगरेटी
पिण्याची रक्त तर सर्वच मनांतून पाझरतेय

शेवटचा माणूस जेवेपर्यंत राजा जेवत नाही असे शक्यच नाही
या पृथ्वीवर सूर्याची समदृष्टी आदर्श मानणाऱ्या मानभावीपणे
--- ००० ---

टीव्हीचे कारनामे --

१. ' निवडणूक अटळ ' हे समजू शकतो, पण, ' बिनविरोध निवड अटळ ' ?

२. अमिताभ बच्चन यांची तब्येत बिघडल्याची बातमी देताना -- " श्रीदेवींना जाऊन १०-१२ दिवसच होताहेत आणि आता ही बातमी आल्याने रसिकांना धक्का बसला आहे ! " !!!

" माझ्या मनाचे प्रोग्रामिंग तुझ्या मनाच्या प्रोग्रामिंगपेक्षा श्रेष्ठ ! "

स्वयंचलित प्रतिक्रिया देत राहणे आणि त्यालाच ' लाईफ ' म्हणणे !

टीव्ही चर्चेतल्या वक्तव्यांना छाप्यात बातमीचे स्थान का मिळत नसावे ? टीव्ही माध्यम निरर्थकच समजले जात असेल का ?

मराठी भाषा, कला, संस्कृती यांबाबत विद्यार्थ्यांत विशेष सजगता निर्माण व्हावी या हेतूने या वर्षी राज्य शासनातर्फे ' रंगवैखरी ' ही एक अभिनव नाट्याविष्कार स्पर्धा घेण्यात आली होती. तीबाबतचा एकूण अनुभव सांगणारा आणि पुढील योजनांची माहिती देणारा, आपले मित्र गिरीश पतके यांचा लेख आजच्या मटाच्या ' संवाद ' पुरवणीत पान ३ वर आलेला आहे. जरूर वाचा !
शासनाचे अभिनंदन करावे अशी ही एक खास कल्पक स्पर्धा आहे !

आजच्या -- १०-०३-१८ च्या -- मटामधला, माझा मित्र अतुल पेठे याचा, ' अडलंय माझं थेटर ... ' हा लेख खूप महत्त्वाचा वाटतो !

आज ०९-०३-१८ च्या लोकसत्ता मधल्या ' लोकमानस ' या सदरात, मी, श्री. कनाटे यांच्या प्रतिक्रियेवर दिलेले माझे उत्तर आलेले आहे -- ते असे --

कलेचे सैनिकीकरण

दि. २५ फेब्रुवारीला लोकसत्तेत आलेल्या माझ्या लेखावरची दि. २८ फेब्रुवारीला आलेली श्री. गणेश कनाटे यांची प्रतिक्रिया वाचली. तीवर माझे विचार –

१. बंदिस्त शासकीय विचारांमुळे निरनिराळ्या देशांतून पलायन करावे लागलेले लेखक आपल्याला माहीत आहेत. सैनिकीकरणाच्या हट्टाग्रही अपेक्षा अशा पद्धतीने राबवल्या जात असतातच. हेकट विचाराला सत्तेची जोड मिळाली की ते घडते आणि घडणार. शोषितांच्या अनुभवावर आधारित असेल तेच फक्त साहित्य, असे म्हणण्यात इतर सर्व साहित्य प्रकारांचे ‘ ठरवलेले ‘ भवितव्यही अध्याहृत असते. दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, लंकेश यांचे खून निंद्यच आहेत. पण, कुणी जर असे म्हणू लागले की सर्वच लेखकांनी त्यांना आदर्श मानून त्यांचे विचार आत्मसात करून तशाच बलिदानाला तयार व्हावे, अन्यथा ते साहित्यिकच नाहीत ( असे डॉ. गणेश देवी म्हणतात ), तर ते स्वीकारता येणार नाही. कुणालाही आदर्श, गुरू वा अधिकारी न मानणारे खूप लेखक असतात. कला हे लढाईचे माध्यम आहे, असे काहींना वाटतही असेल, पण, जगातले कित्येक मौल्यवान लेखक, ती एक शहाणपणाकडे, परिपक्वतेकडे, सजगतेकडे जाण्याची प्रक्रिया मानतात. कलात्मक सर्जकतेतून समजूत आणि सामंजस्य यांनी युक्त असे मानवी जगण्याचे भान येणे, हे महत्त्वाचे मानणारेही खूप लेखक आहेत. ते सगळे नाकारणाऱ्या आणि फक्त अमुक विचारांचेच आणि अमुक अनुभवांचेच असले पाहिजे साहित्य, अशा हट्टाग्रही निष्कर्षांच्या भूमिकेला सैनिकीकरणाचे विचार, असेच म्हणावे लागेल.

२. मराठीत सततच ‘ भूमिका घ्या ‘ असा लेखकांच्या कानीकपाळी धोशा लावणाऱ्यांची काय असते मांडणी ? ‘ फक्त अ थांबेल ‘ असे म्हणण्याचा अर्थ ‘ बाकीच्यांनी घरी जा ‘ असाच होतो. हे भूमिकावाले सर्व साहित्य प्रवाहांची आस्थेने दखल घेतात का ? आणि ‘ कलेचा मृत्यू ‘ ! तसे तर ideology चा म्हणजे विचारसरणीचा ( म्हणजे भूमिकेचाच ) मृत्यू, इथेही माणूस पोचलेला आहे. भूमिकावाले यांतल्या कशाची दखल घेऊ इच्छितात ? या सर्व वैचारिक टप्प्यांसह कलानिर्मिती अखंड चालूच असते, हे एक सत्य आहे.

३. लेखक एक तर भूमिकावादी असतो किंवा व्यक्तिवादी, एक तर डावा असतो वा उजवा – असे विचार हे – साहित्य म्हणजे पूर्वनियोजित विचारांचा आविष्कार, या ‘ भूमिकावादी ‘ विचारसरणीतूनच येतात. वर्डस्वर्थचे ‘ शांततेतून पाहणे ‘ , गाओ झिंगझिआन या लेखकाने सांगितलेला distanced gaze – म्हणजे दुरून, तटस्थपणे पाहणे – हे समाजवादी वा व्यक्तिवादी, अशा द्वंद्वात बसवता येत नाही. आपल्या, लोकशाही असलेल्या देशात सर्वच कलाप्रवाहांना खुला वाव असायला हवा.

४. मी म्हणतो ते सोडून बाकी कुणी साहित्यिकच नाहीत, अशी उद्दाम, आक्रमक मांडणी करणाऱ्याला साहित्यातले काही कळत नाही, असे म्हणण्यात वावगे वा असभ्य काहीच नाही. ( तेही, वर्षानुवर्षे लेखन करणाऱ्या अनेकांना मूर्ख ठरवत असतातच ). त्यांच्या

अध्यक्षीय भाषणात साहित्याबद्दल कोणती समज व्यक्त झालेली आहे ? ‘ पेरिले ते उगवते । बोलल्यासारिखे उत्तर येते । तरी कर्कश बोलावे ते । किंनिमित्त ।। ’ हे महत्त्वाचे आहे.

असंख्य भूमिकांमुळे जगभर रणकंदन चालू आहे. कलेने आणि साहित्याने तेच हिंसक काम जोमाने पुढे रेटत राहिले पाहिजे, असे म्हणण्यात सांस्कृतिक काय आहे ? की या प्रश्नाची अशी मांडणी होऊ शकेल – “ सांस्कृतिक कृती म्हणजे भूमिकांचे संघर्ष. जगात, माणसाच्या इतर अनेक कृतींतून जशी प्रचंड हिंसा निर्माण होते तसेच सांस्कृतिक कृतींतूनही घडणे अटळ आहे. याला फार तर माणसाची अटळ शोकात्मिका म्हणता येईल ! “ -- म्हणजेच, भूमिकावाद हा माणसाला एका अटळ अशा निराशावादाकडे नेतो का ? आणि या निराशावादात जगणे हेच सांस्कृतिक जगणे म्हणावे का ?

या प्रश्नावर तर आपण सर्वचजण गंभीरपणे विचार करू शकतो.

-- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

कल्पनेने ऐकले मी तुझे घर
येऊ दिले तुझे बालपण
माझ्या किनाऱ्यावर
जेव्हा कळायच्या आधीच
तुझे भविष्य अंधारणार होते

मी काहीच विचारले नव्हते
आणि या क्षणातली तू होतीस
आत्ताच अचानक जन्मलेली ताजी
माझे दिखाऊ संरक्षक कवच भेदणारी
नुसत्या साध्या अनलंकृत नजरेने

दोघांचा एकत्र वर्तमान
गेला हव्याशा भविष्यात
काठाकाठाने अबोल तीव्रतेत

तुझ्या विस्तीर्ण सावलीत
तुला मी करायला लावली
माझी छाननी निःशेष
हवी होतीस तू अनिर्बंध

आपण झालो वर्तमानप्रेमी
तुझे सर्वच कपडे मला दिसेनासे झाले
अशा अद्वैताने आकर्षणच
नष्ट झाले तर

आपली सर्व दारे सताड उघडी
आणि भन्नाट आकाश
--- ००० ---

सर्वच सर्जक कलाकृतींचे पायाभूत मूल्य समता हेच असते -- त्या तशा बौद्धिक हेतूने युक्त नसल्या तरी !

आपली डोकी फुटताहेत आतून
बाहेरून फुटताहेत आपले सर्व समूह
जाती, पक्ष, संस्था, देश, धर्म
आपल्या डायनिंग टेबलांचे
तुटताहेत पाय
आपल्या मित्रपरिवारांत
फुटताहेत गैरसमजांची वारुळे
आपल्या ऑफिसांत होताहेत भूकंप
आपल्या चारित्र्यांचे वाजताहेत बारा
भर बाजारात
आपल्या करियर्सचे भरंवसे डळमळताहेत
आपली मुले राहतील का नीट की

त्यांचीही फुटतील भविष्ये

यांतल्या प्रत्येक प्रश्नावर
घेतोय आपण वेगवेगळ्या गोळ्या
प्रत्येक प्रश्नाचे गाठतोय आपण
वेगवेगळे तज्ज्ञ
असंख्य आश्वासने देणाऱ्यांचे फुटलेय पेव

दिङ्मूढ होणे, बधीर होणे,
तोल जाणे, भरकटणे,
छिन्नमनस्क होणे, हिंसक होणे

हे सगळे घडतेय धावाधाव
चालू आहे – हे सगळे एकत्र --
एक कसे होईल --
हा प्रश्न तरी अखंड राहो
--- ००० ---

सीरिया प्रश्न खूप किचकट आहे -- नीट समजतच नाही -- अनेक कट्टर भूमिकांमुळे विवेकाचा आवाज लोपलाय की काय ?

पन्नास वर्षांची प्रथा बदलून
अचानक नारळांऐवजी कंपासपेट्या
येऊ लागल्या काळाचा महिमा म्हणून
त्या स्वीकारल्याही जाऊ लागल्या

त्याचे एक गुरू म्हणत
संघर्षाशिवाय काहीच मिळत नसते
नुसताच न्याय देणारे न्यायी
कुणी नसते – त्याच वेळी

इकडे विठाई हसे
तुकाई माथा काठी हाणे आणि माउली
मूक राही

आपण निरमाऐवजी डबलबी
कधी सुरू केला ते तो आठवत राही
आपले बालपण इस्लामपूरऐवजी
परभणीत अधिक चांगले
जाऊ शकले असते का
हा विचार त्याला सतावे
आणि तसे झाले असते तर
इतके असे मानसिक
गोंधळच नसते झाले
या विचाराने तो खट्टू होई

क्रांती झटकन होते आणि विकास
हळूहळू होतो या विचाराने त्रस्त
असताना तो अनवाणी वारीला जाई
वारकऱ्यांमध्ये येत्या निवडणुकांच्या चर्चा होत
--- ००० ---

राजकीय विद्वानांची विद्वत्ताही त्यांचे व्यक्तिगत रागलोभ आणि इच्छा यांवर आधारित वापरली जाते, हे जनतेला समजत असावे !

" अरे, उत्तर-संरचनावादी काय म्हणतात की कोणतीही कविता आहे तशी कधी कुणाला पोचतच नाही – प्रत्येक वाचकाला ती कविता वेगवेगळीच पोचत असते – मूळ कविता असे काही नसतेच – तिच्या वाचकागणिक वेगवेगळ्या झेरॉक्स कॉपीज असतात फक्त ! – म्हणून, मी काय म्हणतो – कविता कशी असावी, यावर लढाई करण्यापेक्षा, आपल्या मूळ कविता कुठे पोचतच नाहीत, हे आपले कॉमन दुःख साजरे करू या का आपण ? – पण, नकोच – आपले दुःखही वेगवेगळेच असायचे साले ! "

The artist is not a person endowed with free will who seeks his own ends, but one who allows art to realize its purposes through him. As a human being he may have moods and a will and personal aims, but as an artist he is 'man' in a higher sense - he is 'collective man,' a vehicle and moulder of the unconscious psychic life of mankind. (Carl Jung, Psychology and Literature, 1930)

खूप आजारपणानंतर
अनेक महिन्यांनी ट्रॅफिकमध्ये यावे
तसे पुस्तक प्रदर्शन
पण आता न्यूनगंड नाहीय
पुस्तकांची हजारो नावे पाहून येणारा
उलट त्याच्या चेहऱ्यावर एक
किंचितसे स्मित

पूर्ण मानवजातीचा एकच मेंदू असून
त्याचा काही भाग माझ्याकडे आहे
या विचाराने तो शांत आहे --
कुठे ना कुठे पाहिले जातेच आहे
ना हे सगळे --
आता तो सही सलामत
विना अपघात
जगेल सहज

तो घेतो फक्त एक
अष्टावक्रगीता --
तू विचार करून काय
साधणार आहेस --

तू कोणत्याही वर्णाचा वा आश्रमाचा

नसल्याने हिंसा करणे

वा कुणावर दया करण्यासाठी

हपापलेले असणे

हे आता घडणार नाही

हे वाचून त्याचा मेंदू सर्व मेंदूंना स्पर्शतो

--- ००० ---

उद्या समजा कॉँग्रेस-बीजेपीवाले तयार झाले पक्षांतराला तर कम्युनिस्ट स्वीकारतील का त्यांना ?

खोटे असणे आणि नसणेच

यांत निवड कशी करणार

खोटे निदान असते तरी

जे नाहीच ते खरे असले तरी

असण्याबरोबर स्पर्धा कशी करणार

खोट्याचे असणे खोट्याला

धरून बसता येते

त्याने त्याला सतत

असण्याचा दिलासा मिळतो

समाधान आणि खात्री मिळते

खोटे दुःख भोगते

त्याचे ताण शरीरात

पसरतात कॅन्सरसारखे

जरी त्याला ते सर्व नकोसे असते

आणि हवी असते त्याला सतत

त्यातून सुटका ( पण असण्यातच ! )

तरीही खोटे स्वतःला नॉर्मल समजते
तशाच एकमेकांच्या ताणतणावांनी
प्रेमाद्वेषांनी त्याला मिळते
शिक्कामोर्तब त्याच्या खरेपणाचे

त्या तीव्र सातत्यातून खोटे ( वाह ! )
आयुष्य सुंदर आहे म्हणते
तडफडत मरत राहते इतर अनेक
खोट्यांबरोबर हसतखेळतरडत

--- ००० ---

हा एक नेहमीच दिसणारा कावळा आहे
त्याच्याही बाबतीत असे बरेच आहे
जे घडायला हवे होते
पण ते त्याला काहीच कळत नाही

आमच्या घराचा पाया खणताना
सापडलेला एक गुंतागुंतीचा दगड
मी बाळगलाय एक नैसर्गिक
कलाकृती म्हणून
पण तिला आपल्या बुद्धीने अर्थ द्यावा
की न द्यावा त्याचे मूळ स्वरूप न बिघडवता
या विचारात मी असतानाच
तो कावळा म्हणतो
तो तुला सापडलाय तर दे अर्थ
अन्यथा तो नुसता दगडच तर आहे

म्हणजे कावळ्यालाही

काही ना काही कळते हे नक्की
कदाचित माझ्याहून खूप थोडा काळ
आणि खूप थोडी स्मृती
यांवर चालत असतील त्याचे विचार

त्यामुळे
मला काय हवे होते ते मागे पडते
आणि आश्चर्य -- मन मानेल तेव्हा मी
वैफल्यातून बाहेर पडतो
आणि त्या कावळ्याप्रमाणेच स्वतःला
बाहेर पाहू लागतो – माझ्याशिवाय
--- ००० ---

माध्यम, संदर्भ, या ठिकाणी आणि संकल्पना -- हे शब्द भाषेतून काढून टाकले तर पुढाऱ्यांची पैदास बंद होईल आणि भ्रष्टाचार थांबेल !

होळीच्या माध्यमातून मिळालेल्या रंगांच्या माध्यमातून आपण आनंदाच्या माध्यमाकडे जातो आणि त्यातून मग खुश होण्याच्या माध्यमातून तासंतास घालवत मग त्यातून आलेल्या थकव्याच्या माध्यमातून आपण बोंबलत झोपेच्या माध्यमात बुडून जातो !

Discussing his creative process, Simic has said: "When you start putting words on the page, an associative process takes over. And, all of a sudden, there are surprises. All of a sudden you say to yourself, 'My God, how did this come into your head? Why is this on the page?' I just simply go where it takes me."

दाहिनीच्या रांगेत
आपले प्रेत लावून
प्रतीक्षेत आपल्या नंबराच्या
असल्याप्रमाणे कोण राहणार हो जगत
इतके मतभेद बाळगत

मी पडतो

माझ्यातून बाहेर

आणि सहज फेरफटका

मारतो रोमँटिक गाण्यांतून

कोणत्याही नायिकेच्या

नादी न लागता

जरी एरवी होऊ शकले असते

हवे ते न घडण्याचे संघर्ष

हे मन मुलायम --

बसू देत बोंबलत तिकडे

ते मतभेद जोपासणारे

प्रेतांना हार घालून

परंपरागत फुशारकीत

विचार फेकून देता येतात

हे माहीत असल्याने

मी मनसोक्त विचार करतो

माझे कंगवे जेव्हा विंचरत

असतात माझी भाषा

आपण प्रेत नसणे म्हणजे जिवंत असणेच की

--- ००० ---

I am not made for politics because I am incapable of wanting or accepting the death of the adversary.

-- Albert Camus

नाही तरी फुकटच मिळालीयत तिकिटे
म्हणून हल्ला कोण घेईल ओढवून
त्यापेक्षा ओकाऱ्या थांबवून
हो ला हो करणेच
कधीही शहाणपणाचे होईल

उद्दिष्ट म्हणून सडका
कचरा पेटवला तरी त्याच्यातही काही
त्यांच्या घामाच्या भावना
गुंतवलेल्या असणारच
ते म्हणणारच की खूप मोठे
काही नकोच आहे
त्यापेक्षा नष्टच करू आम्ही उगीचच
तुम्ही उभारलेले भ्रम

साबणाचे वेष्टन काढताना
सुचलेली कविता
ही काही माझी जाहिरात नसते
माझी माझ्याअविरत प्रयत्नांतून
सुटका करणारी ती असते फक्त
एक निव्वळ निःशस्त्र प्रेमिका

ते म्हणतायत जगायला
लागतात किती अशा भावना
कशाला ते मिसळींचे उत्सव

खरे तर लिंगभावनाही
नष्ट व्हाव्यात सगळ्यांच्या
--- ००० ---

एक निरीक्षण -- चर्चेसाठी नाही --

करोडोंचे उत्सव साजरे करणाऱ्यांसह जो जे बोलेल त्याला ' भूमिका ' म्हणताहेत -- तो शब्द सपाट होतोय !

एबीपी माझा वर आज दिवसभराचे साहित्य संमेलन चालू आहे --

( माहितीसाठी जारी -- )

सलील चौधरींची कमाल -- एका कुत्र्याचा संगीतमय आवाज --

' मेम दिदी ' सिनेमातले ' बेटा वॉव वॉव वॉव ' हे गाणे ऐका --

मेरी बिंदिया ।

तेरी निंदिया ।

ना उडा दे ।

तो कहना ।।

-- अहो, मॅडम, तुम्ही गेलात तरी हेच होत राहणार आहे !

लोक आहेत इकडे महासत्ता होण्याच्या फिकरमध्ये

आणि तुम्ही सगळ्यांची झोप उडवत राहा !

सॉरी --

तुमचा कुठाय काही दोष ?

सगळा दोष तुमच्या त्या बिंदियाचा आहे !

जियो !!!

आज रविवार दिनांक २५-०२-१८ च्या लोकसत्तेतला, माझा, ' कलेचे सैनिकिकरण ' हा लेख जरूर वाचा.

Champra and Prasannakumar G. are celebrating 6 years of friendship on Facebook!

१९७६ पासूनचा मित्र !

याने कोल्हापुरात माझी तीन नाटके आणि एक एकांकिका दिग्दर्शित केली ! — with Prasannakumar G. Kulkarni.

February 23

Champra Deshpande shared Dilip Vengurlekar's photo.

हिंदीत -------------------

पिस्तूलधारी विद्यार्थ्यांचा हिंसाचार रोखण्याचा एकच मार्ग म्हणजे शिक्षकांनीही जवळ पिस्तूल ठेवणे !
-- अमेरिकेचे अध्यक्ष.

नकोच तेढ म्हणून
एखाद्या वासराने
देवाची करुणा भाकावी
तसे माझे मन
भास-आभास सीमेवर

उड्डाण पुलावरून
पलिकडे घरंगळताना
माझ्या आठवणी
मला घाबरवतात
उंचावरून खाली
पाहिल्याप्रमाणे

एकूण जगातच
बरोबरता यावी
म्हणून प्रयत्न
करणारा मी कोण

आता अधिक जखमा
होऊ नयेत आठवणी

यासाठी मला नम्रपणे
चेक आऊट करणे मान्य

मी माझी पाळीव भावना
देतो सोडून – पण त्यामुळे
समोरच्याला वाटते आता
त्याच्याही आयुष्याची दोरी तुटेल --
तो घाबरून हिंसक होतो
--- ००० ---

पाश्चात्य देशात चित्रकार कुणाला आपले चित्र समजावून सांगत नाहीत. आपल्याकडे ते रसभरित वर्णन करून सांगण्याची प्रथा आहे. आपल्याकडचा चित्रकार स्वतःचे चित्र समजले पाहिजे, या कल्पनेतच गुरफटलेला असतो. हे गुरफटणे त्याच्या चित्रभाषेला संकुचित करते, हे त्याला कळत नाही, हे दुर्दैवच म्हणावे लागेल !
-- प्रभाकर कोलते, मटा संवाद पुरवणी, रविवार दिनांक १८-०२-१८.

' जिंदगी ख्वाब है ' या माझ्या नाटकाचा हिंदीतला पहिला प्रयोग येत्या २६ ला औरंगाबादला होणार !

माझे, कानडीतले ' ढोलताशे ' आज बंगळुरूत २५ वा प्रयोग साजरा करत आहे ! कर्नाटकातल्या अनेक शहरांतून आजवर उत्तम प्रतिसाद मिळाला आहे !

एका सहिष्णूने मला संघिष्ट म्हटले आणि दुसऱ्या एका सहिष्णूने साडेतीनटक्केवाला म्हटले !

आय बी एन १८ लोकमत या मराठी चॅनेलवर काल रात्री ९ ते १० झालेल्या ' बेधडक ' या, कार्यक्रमात मी होतो. साहित्य संमेलनातल्या अध्यक्षीय भाषणावर चर्चा होती. तोच कार्यक्रम आज सकाळी १० ते ११ पुन्हा प्रक्षेपित होणार आहे. शक्य असेल त्यांनी जरूर पाहावा.

आपल्याकडील साहित्यिक व कलाकारांच्या एका वर्गास एका विचारधारेचे लांगूलचालन करण्यात कमीपणा वाटत नाही. अशी मंडळी पुरोगामी या नावाने ओळखली जातात.एके काळचे समाजवादी, कालानुरूप असहाय जगणे वाट्यास आलेले साम्यवादी, आदी

या गटात मोडतात.यांचा वैचारिक स्वातंत्र्यास पाठिंबा असतो. परंतु निवडक डाव्यांच्या दंडेलीविरोधात हा गट काही बोलत नाही. परंतु असहिष्णुतेच्या मुद्यावर डावे हे उजव्यांतकेच कडवे आणि असहिष्णू असतात, हे काळाच्या ओघात अनेकदा सिद्ध झालेले आहे.

-- आजच्या ( २०-०२-१८ ) च्या पुणे लोकसत्ता च्या अग्रलेखातून.

आदर्श काही कुठाय परफेक्ट
माझ्या आयुष्यात या विचाराने
मी राजकीय बातम्या वाचणे बंदच केले
खोल विहिरीतच मी थांबून राहायचो
बराच काळ तेव्हा फक्त पंतप्रधान
कोण आहेत एवढेच मला माहीत असायचे

नकाशाच्या सूचनांप्रमाणे मी
गंतव्याला पोचलो तरी
तिथे प्यायचे पाणीच नसायचे किंवा वाऱ्याने
धूळ फार उडायची ज्यामुळे माझी सगळीच
स्वप्ने धोक्यात यायची

माझे शिक्षणच चुकलेले होते
एकच अर्थ निघेल असे छान
मांजर पाळता येते याच
निष्ठायुक्त खात्रीने मी दुधाची
बशी घेऊन प्स प्स करत
त्याला बोलवत राहायचो

माझी प्रेयसी हसायची फक्त
सुरुवातीला नंतर ती भेटेनाशीच झाली
त्यापेक्षा ती शॉपिंगमध्ये
गढून गेली असे मला नंतर समजले

थोडे दिसताहेत बदल

या आधारावर मी मात्र कपडे झटकत

आशावादी राहात आलोय अविरत स्वप्नमय

--- ००० ---

सोलापूर रस्त्यावर बियरच्या बाटल्यांची खोकी घेऊन जाणाऱ्या एका ट्रकला अपघात झाला -- जखमींना मदत करण्या ऐवजी लोकांनी आधी खोकी पळवली !

बहुधा मी बाळगत नाही माझी मते

काही तासांहून अधिक काळ

-- अशा ओळींतून मानवी जगण्यातला गधडेपणा व्यक्त करणाऱ्या, पीटर शेल्डाल सारख्या कवीला, तो ठाम भूमिका घेत नाही म्हणून, नैतिकतेच्या पिस्तुलातून गोळी घालायची ?

खरे तर लेखक म्हणून लक्ष्मीकांत देशमुख यांचा पिंड आक्रमक लेखकाचा नव्हे. सनदी अधिकारी म्हणून सेवा बजावताना त्यांनी बांधिलकी मानून कामही केले आणि लेखनही केले. त्यामुळे व्यवस्थेशी जुळवून घेण्याची सवय असू शकते. परंतु निवृत्तीनंतर सगळी बंधने झुगारून त्यांनी फक्त लेखकाचीच भूमिका अंगिकारली असल्याचे अध्यक्षीय भाषणातून दिसून आले. जातिवंत लेखकाचे हेच वैशिष्ट्य असते. उदरनिर्वाहासाठी करावयाच्या नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणची भूमिका वेगळी आणि लेखक म्हणून भूमिका वेगळी असते. -- आजच्या ( १९-०२-१८ च्या ) पुणे मटा मधला अग्रलेख.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी किंमत मोजणारे विचारवंत आहेत का ? – न्या. चपळगावकर.

आजचा ( १९-०२-१८ चा ) पुणे लोकसत्ता, पान, ४.

बेळगाव प्रश्नावर अध्यक्ष – कोणताही राजकीय पक्ष या बाबतीत ठाम भूमिका घेत नाही. कारण त्यांना दोन राज्यांमध्ये निवडणूक जिंकायची असते. – आजच्या ( १९-०२-१८ च्या ) पुणे मटामधली बातमी, पान, १.

-- म्हणजे, जुळवून घेणे, तडजोडी, राजकीय यश मिळवणे, बाजू घेणे, बरोबर काय आहे, हे पाहणे, न्यायालयाचा मान राखणे – असे असंख्य प्रभाव, आपापल्या स्वार्थासाठी समजून घेत सगळे चालू असते ! यालाच राजकीय वागणे-जगणे म्हणावे लागेल. सगळे मानवी जगणे राजकीयच असते, अशी भूमिका मांडणाऱ्या या अध्यक्षांचे म्हणणे काय आहे ? त्यांना विचारून सर्व पक्षांनी आणि सरकारने भूमिका घ्यावी ? आपण स्वतःच फक्त नैतिकतेचे आणि परिपूर्णतेचे मेरुमणी आहोत – असे त्यांचे म्हणणे दिसते ! त्यांची मते असू देत काहीही, पण, इतरांबद्दल हेटाळणीचा आणि इतरांना तुच्छ लेखण्याचा सततचा सूर कशाला ?

या साहित्य संमेलनाला उपस्थित असलेले गुजराती लेखक डॉ. सितांशू यशश्चंद्र म्हणाले की लेखकाची भूमिका म्हणजे डाव्या वा उजव्या विचारसरणीशी वा एखाद्या राजकीय चळवळीशी बांधिलकी असणे नव्हे तर मानवी जगण्याकडे त्याच्या सर्जकतेशी असणाऱ्या बांधिलकीतून पाहणे. ते पुढे म्हणाले की लेखकाने एखाद्या विचारसरणीला जखडून घेणे हे धोक्याचे होईल.

February 16

Champra Deshpande shared Ravindra Damodar Lakhe's post.

Madhav Vidwans ह्यांची महत्त्वाची पोस्ट.

"भारतीय तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती यांचे आज पुण्यस्मरण (निधन १७ फेब्रुवारी १९८६)
कृष्णमूर्ती काहीच रेडिमेड उत्तरे देत नसल्याने त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार सांगणे कठीण आहे. पण त्यांच्याकडून आपल्याला प्रश्नाकडे बघण्याची दृष्टी मिळू शकते. कृष्णमूर्तींकडे तातडीच्या उत्तरासाठी आलेला माणूस निराश होतो. त्याचबरोबर कृष्णमूर्ती कोणतीच सांत्वना देत नाहीत. तुमचे प्रश्न तुम्हालाच समजावून घ्यायला सांगतात. रडण्यासाठी कोणालाही ते आपला खांदा उपलब्ध करून देत नाहीत... अशा प्रकारची गर्दी त्यांच्याभोवती टिकली नाही. जवळच्या व्यक्तींच्या मृत्यूने व्यथित झालेले अनेक जण त्यांना भेटतात पण कृष्णजी ते दु:ख त्यांना कुरवाळू देत नाहीत. युद्धात पुत्र गमावलेली एक माता त्यांना भेटते तेव्हा कृष्णजी त्या मातेला ती जर स्वत:ला एका देशाची देशभक्त मानत असेल तर ती तिच्या मुलाच्या मृत्यूला जबाबदार असल्याचे सुनावतात. कारण या भेदांनीच युद्ध घडतात.

कृष्णमूर्तींचा सारा भर हा स्वत:च्या तटस्थ निवडरहित अवलोकनावर आहे. कोणताही मुद्दा ते व्यक्तीला स्वत:लाच समजावून घ्यायला सांगतात. ते त्या संबंधित भावनेचे निरीक्षण करायला सांगतात. कोणत्याही विकारभावनेला शरण न जाता त्या भावनेच्या मुळापर्यंत

जायला ते प्रवृत्त करतात. त्यातून त्या समस्येची मुळे उखडली जातात. अनेक संवादातून कृष्णमूर्ती भीती, लोभ, वासना, क्रोध, हिंसा या भावनांचा असा शोध घ्यायला लावतात. आपल्यात मानसिक आळस असल्याने आपण ते टाळतो. ते म्हणतात, आधुनिक माणसाने विज्ञानाचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी केला असून ती सर्व साधने केवळ स्वत:शी गाठ पडू नये म्हणूनच वापरली जाताहेत. मनाला सामोरे जाणेच आपल्याला नको आहे. कोणतीही भावना समस्या म्हणून समोर आल्यावर त्या भावनेला थेट भिडू शकलो तर समस्येच्या मुळापर्यंत आपण जाऊ शकतो.

ऐकणे आणि पाहणे या शब्दांचे कृष्णजींनी सांगितलेले अर्थ मूलभूत आहेत. पूर्वग्रहविरहित ऐकणे आणि बघणे यावर ते भर देतात. आपले सर्व बघणे आणि ऐकणे हे स्मृतींवर आधारित असते. शब्दांशिवाय जवळच्या संबंधांच्या आठवणींशिवाय सर्व स्मृतींशिवाय आपण बघू शकत नाही. अशा पूर्वग्रहांशिवाय बघणे-ऐकणे यातूनच प्रज्ञाशील मनाची निर्मिती होते.

कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ते सर्व सामाजिक व राजकीय समस्यांसाठी ते नेते राजकारण इत्यादींना जबाबदार धरू देत नाहीत. हिंसेसाठी हिटलर-मुसोलिनी अशी सोपी उत्तरे ते स्वीकारत नाहीत. बाह्य जगातील गोंधळाला आपल्या आंतरिक मनातील गोंधळ संस्कारबद्धता गतकालातील स्मृतीतून उत्पन्न होणारा विचार ते जबाबदार मानतात. त्यामुळे जगातील युद्ध, हिंसा, भ्रष्टाचार, लोभीपणा यांची बीजे आपल्यातच असल्याने जगातील मोठे प्रश्न हे आपल्याच जाणिवेचे प्रक्षेपण असते. त्यामुळे ते समाजपरिवर्तन वगैरे कल्पना नाकारतात. परिवर्तन हेच खरे परिवर्तन असते. सर्व सामाजिक-राजकीय आर्थिक क्रांतीने केवळ साचा बदलतो. व्यक्तीच्या चेतनेत परिवर्तन होत नसल्याने या तथाकथित क्रांत्यांना पुन्हा नव्या क्रांत्यांची गरज लागते. मूलत: खोलपणे तुमची जाणीव ही जगातील सर्व माणसांच्या जाणिवेसारखी असते. या अर्थाने तुम्ही म्हणजेच जग असता आणि तुम्ही जर भीतीपासून मुक्त असाल तर तुम्ही जगाच्या जाणिवेवर परिणाम करू शकाल. कार्यकर्त्यांना हे पटणे थोडे जड जाते पण रशियन क्रांती किंवा इतर विचारसरणीने बदल घडवण्याचे प्रयत्न कसे फसत गेले हे बघितल्यावर ही भूमिका पटते.

प्रेम हा कृष्णजींच्या मांडणीचा गाभा आहे. आमच्या जगण्यात प्रेम नाही म्हणून समस्या आहेत असे ते मांडतात. पण प्रेमाची त्यांची कल्पना ही साचेबद्ध नाही. विचारांची वटवट थांबल्यावर सहज उमललेल्या प्रज्ञेतून प्रेम अवतरते. या अर्थाने कोणीच प्रेम करत नाही. परस्परसंबंधात मालकी भावनेऐवजी प्रेमाची गरज ते प्रतिपादन करतात.
एखादी शास्त्रीय संगीताची मैफल आपण गाण्यासारखी पाठ करू शकत नाही. पण ती रागदारी आपल्यावर शब्दातीत परिणाम करते. तसेच कृष्णमूर्तींचे आहे. ते काय म्हणतात हे समजून सांगता येत नाही. पण ते ऐकताना वाचताना आपल्या जाणिवेत आकलनात नकळत बदल होण्याची प्रक्रिया सुरू होते...
herambrk@rediffmail.com (दिव्या मराठी मधून)"

माझे फेसबुक --

१७ डिसेंबर २०१७ --

लेखकांना परिस्थिती समजावून सांगणे आणि त्यांनी काय केले पाहिजे ते सांगणे – हाच या अध्यक्षांच्या भाषणाचा सारांश असणार आहे, असेच दिसते आहे !

२६ डिसेंबर २०१७ –

Mangesh Narayanrao Kale सगळे तथाकथित विद्वान, सर्वच लेखकांनी भूमिका घ्यायला पाहिजे असा धोशा लावत आहेत -- त्यावरून चाललेय -- सध्याच्या नियोजित अध्यक्षांबद्दल तर माझी भविष्यवाणीच आहे की हे फक्त -- मराठीला अभिजात भाषेचा दर्जा, सीमावाद आणि लेखकांना परिस्थिती समजावून सांगून त्यांनी काय केले पाहिजे, हे सांगणे -- एवढेच बोलू शकतील ! साहित्यावर हे शून्य बोलतील !

तुम्हाला फक्त बाहेरून दिसत असतील या वायर्स
तशाच त्या आतूनही आहेत किंवा आतूनच बाहेर
ज्यांत मी गुरफटलोय त्या सवयीच्या असल्या तरी
काही आता सोयीच्या नसलेल्या माझा चेहरा
तुम्हाला सतत आक्रसलेला दिसतो तो त्यामुळेच

माझ्याकडे उपाय नाहीय आजूबाजूचे जग
नाही का मी स्वीकारून चालत मी
पूर्वग्रहयुक्त जगतो असे आरोप होतात माझ्यावर पण
कोणते ना कोणते पेय असतेच ना प्रत्येकाच्या मनात

तरीही मी रस्ते गॉगल्स मॉल्स तलाव
सगळे बदलायला तयार असतो
सामोपचारासाठी मी सर्वांसाठी
भेळही मागवतो हवाबदलासाठी
सुरू करतो अनेक ब्रँडचे मसाले विकणेही

इतके गुंताड्याचे पूर्णच कुणाला पसंत पडेल
हे शक्यच नसते त्यामुळे मी अनेकदा दाखवत
राहतो की मी काही तुमचा शत्रू नाहीय

जगातल्या कशावरच नाहीय माझा कंट्रोल
तरीही मी अहिंसेची बाजू घेतो
काहींना हा माझा आपमतलबीपणा वाटतो
अशा वेळी गर्दीच्या लोकल्स मी सोडून देतो

हॉटेल अमुकच स्टार्सचे असावे यापेक्षा
तिथे मिसळ-पाव मिळणे हेच मला महत्त्वाचे असते
--- ००० ---

९१ वे साहित्य संमेलन

१ पुढल्या वर्षीपासून संमेलनाला सरकारकडून ५० लाख मिळणार.
२ मराठी विद्यापीठाला सरकार अनुकूल.
३ मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी सरकारचे प्रयत्न जारी. साहित्यिकांच्या मंडळासह केंद्र सरकारला भेटणार.
४ मराठी ही ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्न करणार.

-- वा ! बेश्टच ! बरेच प्रश्न उद्घाटनातच मार्गी लागताहेत !

संघर्षमय मनाने
शांतता आणायच्या प्रयत्नात असतो
माझ्या मनातला एक डास

मच्छर म्हटलेले नाही आवडत त्याला
त्याच्या जगात त्याला पुरेसा

मान मिळतो आणि नेतृत्वही

तो सभा घेतो
आझाद मैदानावर
रात्री अंगार फुलेपर्यंत

कशाला आणि कुणाला स्मृतीतून
गाडायला हवे कायमचे भूतकाळात
हे त्याला निर्घृणपणे माहीत असते

फक्त कर्तव्य म्हणून तो
दोन घास खातो संबंध करतो
पोरांना शाळेत घालतो

सगळे धगधगत्या मनानेच
करण्यावर त्याचा कटाक्ष असतो
शांततेचे विसरायचेच नसते

डोळे लाल बीपी आणि मूळव्याध
यांसह तो शांततेचे स्वप्न बघतो
प्रामाणिकपणाने आणि निष्ठेने
--- ००० ---
रंगवैखरी

राज्य मराठी विकास संस्थेने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धेतल्या पुणे विभागाच्या अंतिम फेरीला काल मी उपस्थित होतो. साहित्यासह, नाट्य, चित्र, शिल्प, नृत्य आणि संगीत यांपैकी तीन कलांचा समावेश असेल असे नाट्याविष्कार सादर करायचे होते. ' महाराष्ट्री ते मराठी ' असा विषय दिलेला होता. मराठी भाषा, परंपरा आणि संस्कृती यांचा विद्यार्थ्यांनी खोलात जाऊन अभ्यास करावा आणि त्यावर आधारित अशी अभिव्यक्ती नाट्य माध्यमातून सादर करावी, ही खरोखरच

एक अभिनव आणि अद्वितीय अशी कल्पना आहे. व्यवहारात आणि व्यावहारिक यशासाठी इंग्रजी अधिक उपयोगी आहे हे स्वीकारून मराठीकडे थोडेफार दुर्लक्ष होण्याच्या या काळात ही स्पर्धा अधिकाधिक महत्वाची ठरत जाईल, हे स्पष्टच आहे.

मराठी ही सुमारे आठ कोटी लोकांची भाषा असल्याने ती मरणार नाही – टिकून राहील, हे जरी खरे असले तरी तेवढ्यावर संतुष्ट राहणे योग्य होणार नाही. मराठी टिकणे म्हणजे काय ? ' पुण्याहून संगमनेरला जायला साडेपाच वाजता एसटी आहे ' अशा किरकोळ माहितीच्या देवाणघेवाणीपुरती भाषा वापरात राहणे म्हणजे ती टिकणे नव्हे. नुसती भाषा नव्हे तर भाषेची अभिव्यक्तीची शक्तीही टिकायला हवी आणि वाढत राहायला हवी. सूक्ष्म आणि गहन अर्थ या भाषेतून व्यक्त करणारे अनेक साहित्यिक या भाषेत होऊन गेलेले आहेत. त्यांचे साहित्य समजून घेणे आणि तशाच सशक्त, कसदार अशा नव्या अभिव्यक्तीही येत राहणे, हे भाषा सशक्तपणे जिवंत राहण्यासाठी आवश्यक आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून तसे प्रयत्न होत राहू शकतील, हे मराठीसाठी अत्यंत महत्त्वाचे वाटते.

पुढल्या वर्षापासून, या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतल्या जाणार आहेत, असे समजले. त्याची गरज आहेच. ' नाट्य म्हणजे मानवी संबंधांतले ताणे-बाणे, गुंते, त्यांतल्या समस्या, संघर्ष ' याचे फारसे भान विद्यार्थ्यांना नसल्याचे जाणवले. सादर होणारे नाट्याविष्कार अधिक दर्जेदार आणि कसदार होण्यासाठी जगण्यातल्या प्रश्नांचे विद्यार्थ्यांचे भान कसे वाढेल आणि ते व्यक्त होण्यासाठी त्यांची भाषेवर आणि या स्पर्धेत समाविष्ट असलेल्या इतर सर्वच कला प्रकारांवर हुकुमत कशी वाढेल, हे पाहायला हवे.

ही स्पर्धा म्हणजे नुसताच माध्यमांना धार लावण्याचा उपक्रम न राहता, त्याला मानवी जगणे समजून घेण्याच्या प्रक्रियेची जोड मिळत राहिली तर हा उपक्रम अधिकाधिक मौल्यवान ठरत जाईल, हे निश्चित !

--- ००० ---

हा प्रश्न खरेच पडलाय असे समजून --

किस किस किस
किसको प्यार करूं
कैसे प्यार करूं
तू भी है, ये भी है
वो भी है, हाय!
किसको प्यार करूं…

मेरे लिए तो हो गयी मुश्किल
कैसे बांटूं एक मेरा दिल
किसको प्यार करूं...

देखूं जिधर मैं, शोले ही शोले
दिल है आखिर, कैसे न डोले हाय
किसको प्यार करूं...

इक-इक सूरत, प्यार की मूरत
सबको लेकिन, मेरी ज़ुरूरत
किसको प्यार करूं...

गावे आणि घरे खूप बदलली
बसचालकवाहक ओळखत
माझ्या भोवतीच्या भिंती
आणि रूटीन माणसे
बदलत राहिली
झाडे रस्ते दुकानेही

सगळेच तात्पुरते
आपले मानले गळ्याशी
आल्याप्रमाणे
काळ प्रत्येक वेळी

हलकल्लोळ दिसू नाही दिला
ढेकूण चावले म्हणून
त्रागा नाही केला

हे झाले की मग

ते संपले की मग

शेवटी एकच वर्ष उरेल

म्हणजे जगायचेय

ते नंतरच

या हास्यास्पद जगण्याला

पावसाची धार लावत राहिलो

आणि पुन्हा बदलीच्या ऑर्डरची

वाट पाहात बसून राहिलो

अनंत काळ एका दगडावर उगीचच

--- ००० ---

लोकशाहीचा उभरता स्तर --

" तो सारखा मंदिरांत जाणारच, म्हणतोय -- मंदिरांत जाऊन त्याला आनंद मिळतो म्हणे -- "

" अरे, तो चिकन खाऊन जातो मंदिरांत -- भ्रष्ट करतो मंदिरं -- "

" आता तो म्हणतोय की तुमच्यासारखं भ्रष्टाचार करून मंदिरांत गेलेलं चालतं का -- "

" त्याला म्हणावं आता भेट -- देवाच्या नाही -- जनतेच्या दरबारात -- "

कोणत्या ना कोणत्या मानसिक सवयींत स्वतःला जखडून घेऊन जगण्यातला प्रवाहीपणा थांबवणे म्हणजेच प्रवाहपतित होणे !

एखाद्या टोकेरी राहिलेल्या

काट्याकडे लक्ष न दिल्याने

पसरत राहते अस्वस्थता

हवेत पाण्यात अन्नात

वाटते आपले कपडे आहेत
खूपच घट्ट वा ढगळ
आपले बोलणेही अस्ताव्यस्त
आपले विचार हाताबाहेर
आणि आपला चेहराही
आपल्या मापाचा नसलेला

हे आवरणार कसे
या विचाराने आपलीच बँक
आपल्या डोळ्यांसमोर
लुटली जात राहते

एवढी वर्षे आपण तोल संभाळला
प्रत्येक संबंधात अपेक्षेप्रमाणे
भिऊन वागलो आणि हसलो
बरोब्बर मापात वेळोवेळी

परीक्षा दिल्या नोकरी केली
संसार केला देशाचे सर्व
कायदे पाळत
तरीही हे असे का घडावे

नेमके कारणच पाहायला हवे
--- ००० ---

माझी नात चि. पूजा देशपांडे हिने, पुणे महानगरपालिकेने आयोजित केलेल्या १७ वर्षांखालील मुलींच्या बॅडमिंटन स्पर्धेत अंतिम सामना जिंकून आज ( १०-०२-१८ रोजी ) महापौर चषक मिळवला ! हे अर्थात तिच्या मेहनतीचे फळ आहे !

दर्द-ए-डिस्को

दोन अंकी नाटक -- ले०दिग्द० विद्यासागर अध्यापक.

' आधी बसू मग बोलू ' तसेच ' साखर खाल्लेला माणूस ' अशी छान वेगळ्या बाजाची विनोदी नाटके लिहिणारा हा लेखक. त्याच्या कॉलेज जीवनात तो नेहमीच माझ्या संपर्कात असे. आम्ही ' अवकाश कलामंच ' ही एक नाट्यसंस्थाही त्या काळात स्थापन केली होती. त्या काळात विद्यासागरने माझी दोन नाटके आणि दोन एकांकिका दिग्दर्शित केल्या होत्या. थोडक्यात म्हणजे माझ्या आत्मीयतेचा माणूस ! त्यामुळे, काल त्याचे ' दर्द-ए-डिस्को ' हे नाटक पाहिले. तीन जोडपी आणि एक मॅनेजर -- सगळे मरून स्वर्गात आलेले -- असा माहोल. " तुला आवडतेय तेच ती बोलतेय म्हणून तुला पटतेय -- ती जर म्हणाली की दारू पिणे खूप चांगले तर ते मलाही पटेल -- " -- असे काही मजेदार संवाद, तसेच, लैंगिक विकृती असलेल्या प्राध्यापकाची बायको त्याला म्हणते, " वर्गात तेच -- स्वर्गात तेच ! " असे काही कोटीबाज संवाद -- यांनी मजा येत राहते. विद्यासागर हा नुसताच एक करमणूकप्रधान लेखक नाहीय, हे जाणवते. तरीही, हे नाटक नीटसे जमलेले नाही. थोड्याच वेळात, इथे काय काय घडू शकेल याचा अंदाज येतो आणि खरोखरच त्यातले नानीन्य संपते. संहितेतली ताकद मर्यादित असल्याने तंत्र आणि दिग्दर्शन हे नाटकाला फारसे तारू शकत नाहीत.

तरीही, नव्या लेखकांतला हा एक चांगला आश्वासक लेखक आहे, हे नक्की !

--- ००० ---

माणसाच्या जगण्यात सर्जक क्रांती घडेल तर सांस्कृतिक मार्गानेच घडेल -- राजकीय संघर्षांतून नाही --

You may know how to write poems, technically most perfect, but you may not be a poet. To be a poet implies, does it not, being capable of receiving the new - to be sensitive enough to respond to something new, fresh.

-- J. Krishnamurti.

जगाबाहेर पाऊल टाकायला
जगातले पाय नाही चालणार
घोरपडीसारख्या चिकटलेल्या मनाने
पारतंत्र्याचे बंद नाक
खुले कसे होईल

प्रेमावर अवलंबून राहिलो
तेव्हा दुबळा बनलो

कोवळे ऊन आणि नदीनाले
यांचेच गोडवे गात राहिलो
अंधारून आल्यावर भयभीत झालो

कुणी काय करायला हवे
हे सांगण्यात मन
वाकबगार होत गेले
जगातले अन्याय नष्ट करण्याचे
मास्टरमार्ग मेंदूत फिट होत गेले
चेंज म्हणून मधे मधे सूर्यास्त
पाहण्याचा परिपाठ ठेवला

जगातल्या मोठ्या सत्ताच
घोळ करतात आक्रमकपणे
घडवतात अतिरेकी मला धोका
निर्माण करणारे ज्वालामुखी

मला माझा निष्पापपणा
विजयी व्हायलाच हवाय
ॲट एनी कॉस्ट
--- ००० ---

मी स्वतः हिंसक असेन तर जगातली हिंसा थांबवण्यासाठी माझ्याकडून हिंसक कृतीच घडणार ! -- हेच व्यवस्थेत राहून ती बदलण्याचे प्रयत्न !

विचार असण्याच्या आणि नसण्याच्या तीव्र सीमारेषेवर होणारी शब्दक्रीडा म्हणजे कविता !

विचारासाठी मी सँडविच वापरतो
ज्यातून माझे श्वास ऐकतात
माझे बालपण
जेव्हा विचारासाठी
मी सायकल चालवत असे फास्ट

माझे बदलते मूडस कळावेत
म्हणून मी उपास करतो
पाऊस पडत असला तरी
मी झोप काढतो

इतरांचे विचार
अव्हेरण्यासाठी
मी आधी बॅटिंग घेतो
माझी पूर्ण टीम
देशोधडीला लावतो
निव्वळ प्रतिकार म्हणून

हिरव्या बागा
नाही करत मला आकर्षित
कारण फुले हुंगत अटळपणे
आठवणीतल्या दुःखाचा चहा
पिताना माझी दृष्टी भाजते

मला शांतता हवी असते
कुणालाही इजा न करता
मला वीजबिल भरायचे असते
सुखाची तजवीज म्हणून
--- ००० ---

काम सुरू करायचे -- आपण त्यात मग्न होतो -- काही तासांनी ते काम संपते ! -- हे पाहून वाटते की हे सुरू करायला उगीचच उशीर लावला आपण !

Champra Deshpande shared a memory.

मोहितने दिग्दर्शित केलेले ' नाणेफेक ' हे माझे पहिले नाटक --
यानंतर त्याने कानडीतले ' ढोलताशे ' दिग्दर्शित केले --

05 February 2018

Yesterday

पाय तुटका घोडा
आणि डोळे फुटका वाघ
ही बदलू या बोधचिन्हे
आपल्या जागेपणाची आणि झोपेची

हा विचारही ऐकायला
कुणी तयार नाही
आता आहे हीच समर्थनांची सवय
आणि गुरगुरीचे भजन
चालू ठेवू म्हणाला समाज
जरा हळूच चालू म्हणाला
एवढे काही अधीर
व्हायचेच नाहीय म्हणाला

थोड्या जुन्या गप्पा काढू
अपार कष्टांचे भोगचित्र दाखवू
पोरांना आणि सांगू निवांत राहायचे
आणि मजेत माजात राहायचे

हे फक्त आपल्यांत तसे तर नाला
रेडी ठेवायच्या आणि डोळ्यांसाठी गोट्याही

एका वा दहा पिढ्यांत
हाडीमासीची सवय थोडीच मोडते
घोड्याचे पाय तोडणाऱ्यांवर
वाघाच्या डोळ्यांनी जरब ठेवू
-- व्हिलनना व्हिलन म्हटले तरी
भूतकाळ चालूच राहणार ना – कशाला उगीच
--- ००० ---

शुभा गोखले यांचे चित्रप्रदर्शन
‘ बाजार ‘

बाजार हा इथे मासळी बाजार आहे. पण, भाषेत जसा तो त्रासिक अर्थाने येतो, तसा नाही. इथे मासळी बाजारातले नेहमीचे रूटीन वातावरण आहे. कोणतीही सनसनाटी घटना नाही किंवा खूप उग्र म्हणाव्यात अशा कुणाच्या प्रतिक्रियाही नाहीत. या चित्रांच्या नायिका आहेत मत्स्यगंधा – निरनिराळ्या वयांतल्या कोळणी आणि अर्थातच मासे. ( मासे ओळखीच्या आकारांपासून अमूर्त आकारांकडे जाणारे. ) सोबत टोपल्या, कोयते, कावळे, मांजरे -- हाही सर्व माहोल आहेच.

चित्रे समजून घेणे म्हणजे काय ? साहित्यात शब्द हे माध्यम असते – ते विचारक्रियेच्या अधिक जवळ असल्याने चित्रांपेक्षा समजायला अधिक सोयीचे असते का ? मला तसे नाही वाटत. कविता समजून घेणे आणि चित्र समजून घेणे यांतल्या काही प्रमाणातल्या विश्लेषक क्रियांतली भिन्नता सोडली तर ‘ साकल्यात्मक ‘ समजणे सारखेच असते, असे मला वाटते. काही दीर्घ काळाच्या निरीक्षणानंतर आणि चिंतनानंतर काढलेली ही चित्रे आहेत, हे उघडच आहे. या कोळणींबद्दल सहानुभूती वा अनुकंपा व्यक्त करण्यासाठी आहेत का ही चित्रे ? तसे वाटत नाही. त्यांची दुःखे, त्यांची संकटे यांचा अनुभव वा फील देण्यासाठी आहेत का ? तसेही नाही. त्यांच्या कष्टप्रद जीवनाचे उदात्तीकरण करणे, हाही उद्देश नाही वाटत. मला मुख्यतः जाणवली ती त्या कोळणींची रूटीन हाताळण्यातली सहजता – त्रासिक वा क्रोधी न होता असणारी त्यांची जगण्यातली परिपक्वता. इथले कावळे जसे याचक आहेत तसेच ते अतृप्त इच्छा-वासनांचेही निदर्शक आहेत. या कोळणींकडून ज्याला ज्या जशा हव्या तशा मागण्या होत राहणार आहेत. पण त्या ‘

शहाण्या ‘ आहेत. काय, कसे हाताळायचे, हे त्यांना समजते. त्या कोळणींची ही ‘ समज ‘ व्यक्त करणारी ही चित्रे आहेत, असे मला जाणवले. हे आकलन, अर्थातच, कळत न कळत चित्रकर्तीमध्ये आलेले आहेच. त्याशिवाय ते चित्रांत येणे शक्यच नाही.

जगण्यातली ती सहजता, ती परिपक्वता आणि ते आकलन व्यक्त करणे हेच या चित्रांतल्या दर्जेदार, मौल्यवान सर्जकतेचे रहस्य आहे. त्यामुळेच, एक प्रकारे हे अभावग्रस्त व्यक्तींचे चित्रण असूनही उदासी निर्माण करत नाही. चित्रकर्तीनेही ही चित्रे काढणे हे एका आनंदाने केलेले काम वाटते. काही ठिकाणी असणारे चमकदार रंग, पोतांचे आणि परिमाणांचे प्रकार यांतून हे जाणवते. मौल्यवान कलेत अनुभव-द्रव्य कोणते आहे त्याचे स्वतंत्र महत्त्व राहात नाही ते या सर्जकतेमुळेच. चित्रकर्तीने हे असे सगळे जाणीवपूर्वक केले असेल, असे नव्हे. एक कलावंत म्हणून ते तिचे असणे आहे. ही चित्रे म्हणजे ते व्यक्त होण्याची प्रक्रिया. ज्या कोळणीच्या अंगाखांद्यावर अधिक कावळे बसले आहेत ती वयस्कर आहे – केस पिकलेली आहे. तिला हे सगळे ‘ सहज ‘ जगणे आहे. हे असे पशुपक्षी हे तिचे सुहृदही झालेले असू शकतील.

ही चित्रे, म्हटले तर, कोणताही संदेश देत नाहीत. ती काही सामाजिक भाष्यही करत नाहीत. ती व्यक्त करतात एक रूटीन, कष्टप्रद आणि तरीही परिपक्व जगणे.

ही आपल्यापर्यंत पोचणारी परिपक्वता हेच या चित्रांचे जगणे !

--- ००० ---

प्रारंभिक जगण्यात मी
असण्याबद्दल मला खात्री होती
आकाशाचा आकार पाहून पाहून
मी खिशातले सगळे टाकून दिले

हे मी तुम्हाला का सांगतोय
तर तुमचीही माझ्या लेखी
तीच अवस्था आहे जरी चिडून
तुम्ही माझे तुकडे करू शकता

तुम्हाला माझ्याबद्दल
असेच वाटत असेल तर ठीकच आहे

पण माझ्याकडून झालेल्या एखाद्या वर्चस्वाने
तुम्ही कायमचे डूख धराल तर ते खोटे आहे

आपण एकमेकांना
परीटघडीचे दिखाऊ
खोटेच धरून चालायला हवे
खरे तर

मीच फक्त खोटा आणि बाकी
सगळे खरे असे तर नाही होऊ शकत
हजारो वस्तू साठवत तुम्ही श्रीमंत
म्हणवून घेऊ इच्छिता

एवढाच त्याचा अर्थ
म्हणूनच हे सांगितले
हे चुकून आणि शेवटचे समजा
तुम्ही असा वा नसा – तुमची मर्जी
--- ००० ---

मूर्खपणा करायचा तर तो खूप गुंतागुंतीचा, भरपूर तपशीलांचा आणि प्रचंड करायचा म्हणजे तो कुणी चॅलेंज करत नाही -- जसे हे विश्व !

येत्या निवडणुकांवर डोळा ठेवून सादर केलेला आणि समाजातल्या सर्वच घटकांची घोर निराशा करणारा अर्थसंकल्प !

मी तुला विसरणार नाही
याचा अर्थच मी गुंतून राहीन
मन केंद्रित करत आणि त्याचे
दुःख भोगत आनंदाने

मी विकृत राहीन
तुला तसे आवडते मी तुझ्या
स्पर्शाने मनमुराद जखमी होणे
म्हणून – मी तुझा आदर करेन

तुला आणखी काय आवडेल
ते तू सांगच – मीही
त्याच विचारात राहीन
उन्हापावसात

तुलाच खाईन तुलाच पिईन
तुला नष्ट करून
तुझे स्मारक बांधून
मग पश्चात्तापात दग्ध होत राहीन

माझ्या स्मृतीतून उकरून काढेन
तुला बाहेर पुन्हा सदेह जिवंत
तू मरूही नाही शकणार
माझ्या तीव्रतेने नष्ट होऊनही

माझ्या मनात – हवी तशी राहा
सतत बंदिस्त पण आपोआप उमलत
आसुसून स्वागत करत
माझ्या सर्वच कृतींचे जणू प्रथमच
--- ००० ---

निसर्ग

ग्रहणाच्या निमित्ताने कोट्यवधींचे निसर्ग पाहणे झाले ! पहाटेही ब्यूटिफुल चंद्र ! ही एक गंमत आहे -- एक पृथ्वी, तिच्यावर जीवसृष्टी असावी म्हणून हवा, पाणी, सूर्य आणि समुद्रावर कंट्रोल ठेवण्यासाठी चंद्र ! काय गरज होती हा सगळा उपद्व्याप करायची ? इतके अब्जावधी योगायोग घडायची ? या सगळ्याचा फायदा काय ? उपयोग काय ?

माणसाचे डोके असे आहे की त्याला फायदा वा उपयोग हा त्या त्या कृतीच्या बाहेर -- इतरत्र दिसावा लागतो ! ती कृती हाच फायदा, उपयोग आणि पूर्णता -- असे त्याला दिसू शकत नाही ! -- आहे याच्या बाहेर हेतू कसला ?

तसेच कवितेचे आहे -- तिचा फायदा काय, उपयोग काय ?

कविता हीच पूर्णता असते ! ती लिहिणे ही पूर्णता -- तसेच, ती वाचणे हीही पूर्णताच !

कविता निसर्ग असते !

--- ००० ---

कपड्यांचा शौकीन नसलेला एकजण -- " ढिगांनी कपडे बाळगायला मी काय कै. जयललिताजींचा मराठी भाऊ थोडाच आहे ? ! "

तुझ्यासाठीच हा महाल
तू आलीस की काळाला लागेल शिस्त
तुझ्या उन्मादक उत्पातात
हरवले जातील
जगण्याच्या रकान्यांतले
अग्रक्रमी असणारे आकडेही

हे नुसते तुझी वाट पाहणे नाही
तुझ्या आठवणीत जगणेही आहे
जणू न समजणाऱ्या भाषेत
कुणी गाते आहे

तुझ्या सर्व अवयवांचे

तारसप्तक

तुझ्या कटाक्षांचे पोषाख

तुझ्या हालचालींची वलये

तुझ्या ओठांतून आलेले

किंचित ओले अनवधानी

प्रतिसादांचे थवे

आपटतात आता मऊ

पडलेल्या माझ्या भूतकाळावर

जे असते माझे जगणेच

मला यातून सुटायचे नाहीय

माझा अंतिम श्वासही संपू दे यातच

मलाही नकळत

पेटू दे माझी चिता – मृत्यूपूर्वीच

--- ००० ---

काही निवडक प्रतिक्रियांची अभिव्यक्ती कलेत श्रेष्ठ ठरत असेल तर प्रतिक्रियांच्या उच्चनीच जाती ठरवता आल्या पाहिजेत !

उजेड पडला म्हणजे

पूर्ण मनासारखे झाले असे नाही

जाता जाता उडत उडत

कुणीही काहीही म्हणेल

त्याचा अर्थ मी

स्वतःला विसरलो असे नाही

मन उगवले तेव्हाच

एक तीव्र मतही हजर झाले

आज हे जे रुक्ष बरड दिसतेय

पूर्ण स्टेशन

तिथूनच एक दिवस सुटेल गाडी

असे मानणारे आम्ही एकत्र आलो

-- मुळात हे स्टेशन आलेच कुठून

हा प्रश्न अवैज्ञानिक असल्याने आम्ही

तो विचारणाऱ्याचा गळा आवळला

मन असेस्तोवर सवयीने

प्रेमातही खोट निघणार

हे मी मनाने ओळखूनच होतो

मग हे विसरून

रममाण होण्यासाठी

आम्ही खूप

शृंगारशिस्त तयार केली

एकेक विसरणे आणि

एकेक दुरुस्त करणे

हे वैज्ञानिक असल्याने पटत होते

--- ००० ---

आय पी एल प्रमाणे कवींचे सामने --

मराठी कवी विक्रीला उभे --

काय, किती येतील साधारण किंमती ?

कवितेचे अंगण म्हणजे फक्त कवीचे व्यक्तिगत अनुभवक्षेत्र, असेच अनेकांना वाटते. एखाद्या नाटककाराप्रमाणेच कवीही पात्रनिर्मिती करू शकतो, हे बऱ्याचदा लक्षात घेतले जात नाही. त्यामुळे, कवितेतला ' मी ' म्हणजे खुद्द कवी स्वतःच, असे गृहीत धरले जाते. कवीचा स्वतःचा अनुभवही, आशयाचा आवाका वाढताना, नुसताच एक व्यक्तिगत प्रतिक्रिया असा राहात नाही. इतर कोणत्याही वाङमय प्रकाराप्रमाणेच कविता हेही एक खुले, अनिर्बंध माध्यम असते. हे पाहता, कविता समजण्यासाठी कवीचे चरित्र वा चारित्र्य माहीत असायची गरज नसते. कविताही वास्तव, कल्पित, आभासी, अबोधातून आलेली, अति-वास्तव हाताळणारी, ॲब्सर्ड -- कशीही असू शकते. कविता म्हणजे कवीची, वास्तवावरची फक्त एक प्रतिक्रिया, असे समजणे, हे त्या माध्यमाला खुजे करणे आहे.

शेवटची चिंधी
टाकायची वेळ आली तेव्हा
प्रचंड हट्टीपणा गोळा झाला
पूर्ण विश्वाची कट्टरता
हिंसकपणे झाली माझे मन

माझ्याच हातून व्हायला हवे
सगळे भले – माझी अनुकंपा
माझी कणव हेच सर्व तळपायला हवे
माझ्या सत्कारांनी दुमदुमून जायला हवी
पृथ्वी – कित्ती चांगला माणूस
असा माझा अभिनिवेष
मान्य व्हायला हवा सर्वांना
नम्रपणे नमून

म्हणून मीच आणून ठेवले हारतुरे
मीच लावल्या पताका आणि
न्यायभावनेने उद्रेकू लागलो
इतरांच्या वागण्यासाठी शिस्त

त्या चिंधीला शरण जाऊन

मी पुन्हा जमवले सगळे वस्तुमात्र
माझ्या साध्या जगण्याचे वैभव
-- चांगलेच तर जगतोय
म्हणून खूपचजण उतराई राहिले

माझे अपयश फक्त मलाच समजलेले होते
त्याचा संताप अधिकच तीव्रपणे मी शोषकांवर काढला
--- ००० ---

युती असो की आघाडी असो की एकूणच राजकारण -- सगळेच एकमेकांवर, फूट पाडण्याचे आरोप करताहेत ! आणि हो -- एकात्मतेचे आवाहन !

खरा लेखक कोण, वगैरे -- यावर खूप झालीय चर्चा आपल्यांत !
त्यामुळे, सध्या दुर्लक्ष !

वेगवेगळ्या देशांतली वेगवेगळी ' रामायणे ' सादर होणार आहेत, म्हणे ! काहींत रावण हा खलनायक नाहीय ! ही सर्वांना सहिष्णुतेची संधी आहे !

टीव्हीवरची एक रेसिपी --

सुरुवातीला हे करायचे -- याला फक्त पाच मिनिटे लागतात --
नंतर हे असे करायचे -- यालाही फक्त पाचच मिनिटे लागतात --
एवढे झाले की हे दोन तास फ्रिझमध्ये ठेवायचे --
दोन तासांनी काढले की मग, हे असे डेकोरेशन करायचे -- याला फक्त पाचच मिनिटे लागतात !
मग, हे लगेच तुम्ही सर्व्ह करू शकता !

विचार, व्यक्ती, पात्र, विभूती, देश, धर्म, पक्ष, जात, भाषा, इतिहास, पुराण -- अशा कशाशीही समरूप ( identify ) होऊन स्वतःची प्रतिमा बनवणे, हा आहे मूळ प्रश्न ! त्या प्रतिमेला धक्का बसणे म्हणजे प्राणांतिक वेदना ! अशी माणसे प्रतिकारासाठी मरायलाही तयार होतात ! बहुसंख्य माणसे अशीच असण्याच्या वातावरणात, एकमेकांना सहिष्णुता शिकवणे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे गुणगान करणे, यांसारखे विरंगुळे नाहीत !

एका रस्त्याने मी येत होतो. एका ठिकाणी एक प्लास्टिकचा पांढरा बोर्ड लिहिणे चालू होते. एक भाजी केंद्र चालू होत असून निवडलेल्या स्वच्छ भाज्या घरपोच मिळतील आणि त्या मागवण्याचा नंबर अमुक, असे होते. त्याखाली आणखी एक ओळ होती की ----- ची कामेही करून दिली जातील. पहिला शब्द चुकला होता म्हणून तो पुसून तो पुन्हा लिहिणे चालू होते. " आधी ' इले ' लिही -- त्यात काही प्रॉब्लेम नाही -- हं -- आता ट ला क जोड आणि ट च्या खाली उलटा अर्धा बाण काढ -- हं -- आता बाजूला एक रेघ काढ -- " एवढे झाल्यावर तो काढून घेणारा मालक म्हणाला, " अरे, ते वरचं राहिलं की -- ते काढ -- " मग त्या लिहिणाऱ्याने वेलांटी काढली. " भले शाबास -- आता क लिही -- की झालं ! " त्या लिहिणाऱ्याने तसे केले. ' इलेक्ट्रीक ' असा शब्द पूर्ण झाला ! मी ही मेहनत बघत उभा होतो. तो लिहिणारा माणूस घाम पुसत असताना मी म्हणालो, " तो क्ट्री तुम्ही दुसरा काढलाय -- तो पहिला पाहिजे -- " काढून घेणाऱ्याच्या चेहऱ्यावर स्मित आले पण लिहिणारा अत्यंत निराश होऊन माझ्याकडे पाहू लागला --

माझ्या लक्षात आले की हा निराश आहे तोवर ठीक आहे, पण, त्या निराशेचे रूपांतर जर का क्रोधात झाले तर आपली चटणीच होईल !

विजेच्या वेगाने मी तिथून सूंबाल्या केला !

--- ००० ---

Parra brought the skepticism of science to his literary work, rejecting traditional poetic techniques and experimenting with prose-like styles, everyday images and grotesque humor in what he called "anti-poetry."

Parra refused to be classified: "I am neither a rightist nor a leftist," he wrote, "I just break with everything!"

-- या अजब ग्रेट कवीला निरोपाचा प्रेमभरा सलाम !

एका व्याख्यानातल्या ५४ व्या मिनिटाला --

" तुम्हाला हे समजतेय की नाही, ते देतो सोडून सध्या आणि मी पुढे जातो -- कारण कधीतरी कुणीतरी हे समजून घेईल -- हे महत्त्वाचे आहे -- "

-- जे. कृष्णमूर्ती.

आपले विरहांत वाट पाहणे
असे की जणू आता अवतरणार आहे
अंतिम सत्यच आपल्या हृदयांच्या ठोकळ्यांत
जे असेल अंतिम सुखही
आपल्या समगोंधळ मनांना हवेसे --
त्यामुळे तर आहोत आपण
एकमेकांना धरून

दरम्यानच्या काळात
आपण लिहू विराण्या या विश्वासाने
की त्या इथे स्वर्ग आणतील

मुस्काडे फोडली गेल्याने
नाराजीत असलेली आणि तरीही
गाणारी फुलपाखरे आहोत आपण
लैंगिकतेपेक्षा सावध प्रतीक्षा
अधिक मौल्यवान मानणारी

सगळ्यांचे सगळे डाव
ओळखून आहोत आपण
आपले डाव अधिकाधिक सक्षम करत --
स्मशानांना बहाल करू आपण कधी ना कधी
आपल्या सर्व अडथळ्यांची प्रेते

शिकारीचा शेवट दृष्टिपथात असला तरी

काळाचा नाही निश्चित अंदाज --

पूर्ततेच्या दुंदुभी वाजतीलच --

तोवर एकमेकांना धरून राहू

--- ००० ---

हे असे प्रश्न माझ्या अज्ञानातून वा अर्धवट वाचनातून वा बावळट कल्पनेतून येत असावेत -- म्हणजे बघा -- स्वयंचलितता वा रोबोंचा वापर वाढत जाणे भाग आहे कारण नफेखोरी आणि मुबलक उत्पादन यांसाठी ते आवश्यक आहे ! यातून, अर्थातच, खूप लोकांच्या नोकऱ्या जाणार ! मग, उत्पादित झालेला माल विकत कोण, कसा घेणार ? बेकार लोकांकडे पैसेच नसणार ! म्हणजे, यातून भांडवलशाहीची आत्महत्याच घडेल का ? की निवांत बसून लोकांना फुकटात सर्व गरजा, सोयी, सुविधा, चैनी पुरवल्या जातील ? अशा गुलहौशी, मस्तमौला जगात माणसे एकमेकांशी कशी वागतील ?

बीजेपीची सत्ता कशी टिकेल, काँग्रेसची सत्ता कशी पुन्हा येईल, जातिभेद कधी संपतील, भारत महासत्ता कधी होईल, गरिबी कधी संपेल, हिंदू धर्माची जागतिक श्रेष्ठता कधी प्रस्थापित होईल, भारतात साम्यवादी क्रांती कधी होईल -- असे निरनिराळ्या गटांचे वा समूहांचे असणारे असे खूप प्रश्न असतात -- त्यांतच खरे तर आयुष्य संपून जाते ! पण, असे काही प्रश्न आहेत का की जे पूर्ण मानवजातीचे समान -- तीतल्या प्रत्येक माणसाचे आहेत ? कोणते ?

Champra and Navnath are celebrating 2 years of friendship on Facebook!
थोडक्या अवधीत ' ढोलताशे ' गाजवणारा हा दिलखुलास मित्र !
या मैत्रीस खूप शुभेच्छा ! — with Navnath Prasad Kambli.

ज्याने उठावे त्याने मराठी लेखकाला पकडून त्याच्या टाळक्यात आधी बोध हाणावा, अशी फॅशनच पडत चालली आहे ! आता सावरकर संमेलनाचे अध्यक्ष श्री. मिलिंद रथकंठीवार म्हणताहेत की साहित्यिक भूमिका घेत नाहीत ! ( आजची पुणे मटा पुरवणी ). अलिकडेच राज ठाकरे यांनीही हाच बोध दिला ! ' भूमिका ' हा शब्द, असे जर सगळेच वापरू लागले तर हे भाषिक अराजक नाही होणार ? आणि असे झाले तर, ' भूमिका न घेणे हीही एक भूमिकाच ' हा अर्थ मान्य करून ही बोध चळवळ बंद का होऊ नये ?

श्रीलंकेत स्त्रीने दारू विकत घेण्यावर बंदी घालणारा कायदा आहे ! म्हणजे, तिला एखाद्या पुरुषाकडून दारू आणवून घ्यावी लागणार ! -- म्हणजेच, पुरुषाचे काम वाढवणारा असा हा पुरुषविरोधी कायदा आहे !

साध्या शब्दांतून अवाढव्य आशयाचे बुलडोझर

आपले इथले मित्र रवींद्र लाखे यांच्या १७ कविता एकत्रितपणे ‘ नव अनुष्टुभ ‘ च्या नोव्हे-डिसेंबर ’१७ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. या कवितांची बाह्य लक्षणे म्हणजे -- त्या अत्यंत साध्या वाटतात आणि त्यांत इंद्रियगम्य प्रतिमांची गर्दी दिसत नाही. आकारानेही त्या खूप मोठी जागा व्यापणाऱ्या नाहीत. सारखे जागतिक वा देशी घटनांचे संदर्भ किंवा आजच्या जीवनशैलीतले तपशील, हेही फारसे दिसत नाहीत. सांगीतिक लयही फारशी जाणवत नाही. थोडक्यात म्हणजे, दिखाऊ देखणेपणापासून लांबच राहणाऱ्या या कविता आहेत.

आणि तरीही, या कविता प्रचंड आशयघनतेचा प्रत्यय देणाऱ्या आहेत ! त्यामुळेच, कोणतीही कविता एका वाचनात पुरेशी पोचत नाही. पुन्हा वा पुन्हापुन्हा वाचावी लागते. म्हटले तर एखाद्या व्यक्तिगत अनुभवापासून वा जगण्याच्या एखाद्या कंगोऱ्यातून ही कविता सुरू झालेली दिसते, पण, असा एखादा अनुभव वाचकात परावर्तित करणे हा तिचा हेतूच नसल्याचे लक्षात येते. ही कविता कोणत्याही विशिष्टतेशी न थांबता त्या त्या क्षणीचे पूर्ण जगणेच कवेत घेऊ पाहते. ही प्रक्रिया सामान्यतः वाचकाच्या सवयीची नसते. या अर्थाने, ही कविता सवयीच्या जगण्यावर तिच्या अमर्याद आशयाचा बुलडोझर फिरवते ! या कवितांचा पूर्ण आशय त्यांच्या ओळींत वा शब्दांत मर्यादित होऊ शकणारा नसल्याने या कविता कायमच गूढ वाटत राहतात. साठलेल्या भूतकाळातून प्रतिक्रिया देणे हा या कवितेचा हेतूच नाही. सर्वस्वाने, जगण्यातल्या आत्ताच्या, या क्षणाचा आवाका घेण्याची ही प्रक्रिया आहे. या कवितांतून येणारी आशयाची आवर्तने आणि आधीच्या व नंतरच्या बाबींच्या गुणवैशिष्ट्यांचे एकमेकांत मिसळणे – ही या कवितांची खास कलात्मक बाजू म्हणता येईल. या, माणसाच्या जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांच्या तत्त्वज्ञानात्मक-अध्यात्मिक आशयाच्या कविता आहेत. अशा कविता मराठीत अपवादात्मकच आहेत. इथे सविस्तर समीक्षण करण्याचा हेतू नाही. पण, या कवितांच्या अपवादात्मक मूल्यात्मकतेकडे लक्ष वेधणे, एवढेच करायचे आहे. सांस्कृतिक परिपक्वता आणणाऱ्या या कविता आहेत. उदाहरणादाखल ही कविता बघा –

कासव

जागं असतं माझ्या एकटेपणातलं
रिकामपण
दिवसरात्रभर

पृथ्वी आपल्या पाठीवर
तोलून धरणाऱ्या कासवासारखं

कासव कुठलीही हालचाल
करू शकत नाही

समोर रिकामपणाचा समुद्र
आणि पृथ्वीनं लादलेलं एकटेपण

कासवाच्या एकटेपणातलं
भयाण रिकामपण
रोज अंगावर येतं माझ्या

माझा जीव
आवरून घेतो आपले
अक्षांश रेखांश
स्वतःच्या अंगाशी

मी स्थिर निश्चल राहतो फक्त
तोलून धरली जाते माझी पृथ्वी

मी रमतो कृतिहीन
माझ्या अंतर्मग्नतेत

-- अनेक मळलेल्या वाटा सोडून चिंतनात्मकतेने आपल्या चोख वाटेने जाणारी ही खरी कविता आहे !

--- ००० ---

आजच्या पुणे मटातल्या बातमीप्रमाणे, मा. राज ठाकरे औदुंबर साहित्य संमेलनात गेले होते. तिथे ते म्हणाले की " लेखकांनी राजकीय भूमिका घ्यायला हवी ! " रोज असा बोध खाऊन खाऊन मराठी लेखक विषबाधा होऊन मरणार बहुतेक ! पण ते असो ! या निमित्ताने ' भूमिका ' हा शब्द आता डाव्यांच्या तुरुंगातून सुटून सर्वांच्या वापरासाठी खुला झालेला आहे, हेच एक स्वागतार्ह झाले, म्हणायचे ! याचप्रमाणे, ठाकरेजींनी ' विवेक ' हा शब्दही मुक्त करणे गरजेचे आहे !

जगणे आवाक्यात घेण्याचे माणसाचे मार्ग --

तत्त्वज्ञान -- विचार

धर्म -- श्रद्धा

कला -- अनुभव

शास्त्र -- पुरावे

-- असे थोडक्यात म्हणता येईल का ?

समान आनंद देणाऱ्या दोन विरुद्ध बाबी --

रविवारच्या पेपरांत वाचनीय मजकूर (१) असणे (२) नसणे !

झोप इतके बंद करू पाहते जग

की भीतीच वाटावी

आकाशच नष्ट होण्याची --

तेवढ्यात एक मित्र येतो

खांदे हलवतो

तोंडावर पाणी मारतो आस्थेचे --

माझ्याबरोबर त्याला

गप्पा मारत फर्निचरच्या

चहा प्यायचा असतो

धूळ झटकत उजाळा देणारा

मला स्वप्नातला सूर्यही चालणार असतो

झोपमोड न करणारा पण

उघड नको असते ताजेही वर्तमानपत्र

शांतपणे ओरखडे ओढणारे स्वभावतःच

मोर आणि एल आय सी ऑफीस

असा संघर्ष असल्याप्रमाणे
मला बाजू नाही घेता येत त्याची वा माझी --
उपस्थित तो मित्र मला
न्यायाची चाडच नसल्याचा
माझ्यावर आरोप करतो
आणि मला तर फक्त झोपायचे असते

पुन्हा कधीतरी उत्साह येईलही माझ्यात
पण सध्या मला झोपेतल्या झोपेत
आकाश न हरवता ही वेळ फक्त
पार पाडायची असते त्या मित्राला दुखवूनही
--- ००० ---

झोप इतके बंद करू पाहते जग
की भीतीच वाटावी
आकाशच नष्ट होण्याची --
तेवढ्यात एक मित्र येतो
खांदे हलवतो
तोंडावर पाणी मारतो आस्थेचे --
माझ्याबरोबर त्याला
गप्पा मारत फर्निचरच्या
चहा प्यायचा असतो
धूळ झटकत उजाळा देणारा

मला स्वप्नातला सूर्यही चालणार असतो
झोपमोड न करणारा पण
उघड नको असते ताजेही वर्तमानपत्र
शांतपणे ओरखडे ओढणारे स्वभावतःच

मोर आणि एल आय सी ऑफीस
असा संघर्ष असल्याप्रमाणे
मला बाजू नाही घेता येत त्याची वा माझी --
उपस्थित तो मित्र मला
न्यायाची चाडच नसल्याचा
माझ्यावर आरोप करतो
आणि मला तर फक्त झोपायचे असते

पुन्हा कधीतरी उत्साह येईलही माझ्यात
पण सध्या मला झोपेतल्या झोपेत
आकाश न हरवता ही वेळ फक्त
पार पाडायची असते त्या मित्राला दुखवूनही
--- ००० ---

नियम आणि कायदे हे निःपक्षपातीपणा आणि निःस्वार्थीपणा यांवर आधारित असतात. माणसाचे मन तसे नसते. हा एकच आहे कळीचा प्रश्न !

January 11

Champra Deshpande shared Satish Tambe's post.

अनेक वर्णनकार हे बेमालूमपणे लेखक म्हणून वावरतात .
पदकींचे वैशिष्ट्य असे की
ते आपण अट्टल रचनाकार आहोत हे दर्शवणाऱ्या कविता लिहितात .
ते एकुणातच ताकाला जाऊन भांडं लपवत नाहीत .
त्यामुळे त्यांची कविता आवर्जून वाचावीशी वाटते .
आणि एक खुसखुशीत आनंद देते

---------------------------------------------------------

Milind Padki

शतायुषी स्तोत्र

भीमरूपी महारुद्र / हनुमान तो वीरभद्र
त्यासि वंदून हे स्तोत्र / ठेविले जे जगापुढे
शतायुषी कसे व्हावे / कोलेस्टेरॉल मोजावे
आणि त्यासी रोखावे/ दोनशेच्या आत ते
रुधिरमात्रा त्याची येते / अन्नातुनी वीस टक्के
आणि बाकी ऐंशी टक्के / शरीरचि बनवे पां
प्राणिज पदार्थ नच खावे/ लाल मांस टाळावे
चिकन तेही कमी खावे / कोलेस्टेरॉल सर्वत्र
कमी स्निग्धांशाचे दूध / एक टक्का दोन टक्के
लक्षात ठेवावे पक्के / डेअरी मध्ये जाताना
बाकी ऐंशीचे काय / त्यानेच बुडत्यात पाय
स्टॅटिन औषधे माय / त्याच्यासाठीच बनविली
रक्तदाब मोजावा / अती चढू नच द्यावा
रोखुनी तोही धरावा / एकशेवीसच्या आतचि
व्यायाम औषधे आसने / अशा अनेक उपायाने
रक्तदाब तो रोखणे / शक्य सहज त्वांसि पां
साखर हा शत्रू मोठा / मधुमेह हाणी सोटा
स्नायूंचा टाळावा तोटा / चाळीशीच्या नंतरी
सूर्यनमस्कार घालावे / डंबेलही असू द्यावे
मधून मधून मापावे / शरीराचे वजन ते
बी एम आय काढावा / चोवीसखाली आणावा
आणि तेथेंचि रोखावा / मिताहार करोनिया
व्यायामाचे फायदे तोटे / वजन त्याने नच घटे
वजन-नियमन-रहस्य मोठे / कमी खाणेचि प्राप्त पां

दिवसभराचे खाणे/ सहा भागी विभागणे

एकेक तो भक्षणे / दोन-तीन तासांनी

शतायुषी होण्यामध्ये / शरीराचा भाग छोटा

मनाचा भाग जो मोठा / मन जणू सर्वकाही

खिन्नता जडू नच द्यावी / अनेक माणसे जोडावी

नव-साधने वापरावी / फेसबुक उत्तम ते

त्यामध्ये मात्र पहा / काही पथ्ये पाळावी

कटू चर्चा टाळावी/ रक्तदाब वाढे तो .

रॅपामायसीन औषध नवे/ एक मिलिग्रॅम रोज घ्यावे

नवजीवन पावावे / नवे जाणा रहस्य हे

दोनशे रुपयांची कविता / मोफत तुम्हां देतो आता

पहातो कसे ठेवता / आरोग्य-वर्तन आपले !

जय जय रघुवीर समर्थ

निकॅनोर पारा ची कविता

तरुण कवी

हवे ते लिहा हो

तुम्हाला आवडेल त्या कोणत्याही शैलीत

खूपच रक्त वाहून गेलेय पुलाखालून

एकच मार्ग बरोबर असतो

असे मानत राहण्यात

कवितेत काहीही चालते

पण अर्थात एक आहे बुवा अट

कोरे पान आहे तसे राहू नये
अबोल
--- ००० ---

हसत्या वेदनेतून तरी घेईल
का कधी कुणी
विश्वरहस्याचा शोध
उगीचच आल्यासारखा
घेईल का कुणी एखादा पेग
प्लास्टिकच्या विचारातून
खराखुरा मानून

बागेतले कागद कपटे
म्हणजे निरुपयोगी झालेल्या
कंटाळलेल्या भावना आता कुणाला
वश होण्याची ताकदच संपलेल्या

स्त्रिया खेळतायत फुटबॉल
म्हणून नेटमध्ये दबा धरून
बसलेले संगणक माऊस
विसंबतात म्हाताऱ्या स्मृतीवरच
जी शरीराच्या कणाकणाला
देत असते हसती वेदना

बिलंदरच म्हणावे लागेल आकांक्षांनी
हे ठिणग्यांचे धार लावणे भूतकाळाला
आणि कोडकौतुकच करावे लागेल
भिंतीभिंतीवर पडलेल्या थुंकीच्या
डागांचे लाल न-चित्रकला म्हणून

एका उसळत्या जगाच्या

आत्महत्येच्या दिशेने

डोक्याला पांढरी हसती वेदना बांधून

--- ००० ---

लई इंटरेस्टिंग

मला माहीत नसलेली एक मजेदार गोष्ट मला ' प्रिय रसिक ' च्या, जाने०१८ च्या ३०१ व्या अंकामुळे कळली. त्यात दासू वैद्यांचा तेंडुलकरांबाबत एक लेख आहे. त्यात तेंडुलकरांच्या ' अशी पाखरे येती ' या नाटकाबद्दलचा हा किस्सा दिला गेलाय. तेंडुलकरांच्या या नाटकात ' बंडा ' नामक एक आरेसेस वाले पात्र आहे, हे आपल्याला माहीतच आहे. त्याच्या कर्मठपणाचे खुसखुशीत विनोद त्या नाटकात आहेत. पुढे या नाटकावरून जब्बार पटेलांनी एक हिंदी सिनेमा बनवला. ( तो प्रदर्शित झाला नाही. ) तर त्या सिनेमात वातावरण केरळचे घेतलेले होते. बंडा हे पात्र आहे तसे ठेवलेले होते पण, ते कॉम्रेड दाखवले होते. त्याचे संवादही बदलले नव्हते. आणि तरीही, कर्मठपणातून येणारा ओरिजिनल विनोद अबाधित राहिलेला होता !.

मूळ विनोदाबरोबरच, आरेसेस चा कॉम्रेड होऊनही विनोद तसाच मजेदार राहणे -- यात आणखी एक वेगळाच चरचरीत आणि भेदक विनोद आहे ! येतोय ना लक्षात ?

लई इंटरेस्टिंग !

पोस्ट एंबेड करायची म्हणजे काय ?

विचारच नका करू

तुम्ही कुणाच्या विरोधात असा वा नसा

तुमचे नुसते असणे बास आहे

अन्यायग्रस्त चेहऱ्यांनी त्यांनी तुमच्याकडे

पाहायला क्रोधमिश्रित आणि खात्रीने

तुमच्या चपलेत आलेला खडा

तुम्ही पाय झटकून काढाल पण

घशात अडकलेला रस्ता कसा टाळणार

त्यांना दिसणारा प्रत्यक्षात

असो वा नसो

हे हसण्यावारी नाही नेता येणार

हा तर जिवाशी खेळ

तुमच्याच खिशात हिंसा आहे

असे म्हणून खात्रीने ते

तिचा स्फोटही घडवू शकतात

पेपरवेट फिरवत शीळ वाजवत

तुम्ही निष्काळजी असल्याचेही

नका दर्शवू तुमचे जाणीवपूर्वक शौर्य

शेवटी याच जगात काय ते घडणार

इथे कुणीच नाहीय निष्पाप

पसारा आवरा आणि जरा शहाणे व्हा

समझोत्याचे स्मित ठेवा चेहऱ्यावर

आणि म्हणा, " सगळेच कानांवर हात ठेवत असले

तरी त्या फूटपाड्यांमुळे आपल्यांत फूट नको ! "

--- ००० ---

एका जुन्या आणि मी न पाहिलेल्या मराठी सिनेमातला ऐकीव विनोद --

प्लँचेटचा कार्यक्रम चालू असतो. कुणीही कसलाही आवाज न करता प्लँचेट स्टोव्हला बोट लावून बोलावलेल्या आत्म्याची वाट पाहायची असते. तेवढ्यात कुणीतरी किंचित शिंकल्याचा आवाज येतो. राजा गोसावी लीडर ! ते विचारतात " कोण शिंकलं ? " कुणीच काही बोलत नाही. मग ते एकेकाला विचारत जातात -- तू ? तू ? तू ? -- प्रत्येकजण " नाही " म्हणतो ! शेवटी राजा गोसावी म्हणतात, " मग, मीच असेन ! "

हा विनोद का आठवला असावा, याचा मी विचार करतोय --

‘ सत्यासाठी बलिदान देण्याचा काळ ‘ – डॉ. गणेश देवी यांचे प्रतिपादन.

( ‘ संवाद ‘ पुरवणी, काल, रविवार दिनांक ७ जाने’१८ चा पुणे मटा. )

वरील मांडणीतले शेवटचे दोन उतारे –

“ जे खरेच अल्पसंख्य आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष करायला जगभरच्या वाढलेल्या मध्यमवर्गाला भाग पाडलं जातंय. यावर मात करणं शक्य आहे; पण त्यासाठी पूर्णवेळ द्यावा लागणार आहे. एक काळ असा होता की, केवळ आपल्या संस्थेत राहून, विद्यापीठात राहून, थोडंसं लिखाण केलं, थोडंसं आडून आडून बोललं तर बदलाच्या प्रक्रियेत माणसं थोडाफार हिस्सा घेऊ शकत होती. आज तेच काम करावं लागेल. साहित्याचा वसा, समाजात बदल करणं हाच आहे, हे न विसरता आपल्यापैकी प्रत्येक साहित्यिकाने पुन्हा एकदा मानवाची प्रतिष्ठा राखण्यासाठी अहोरात्र परिश्रम घ्यायला हवेत. जगभर लोकांशी प्रतारणा करणाऱ्या सत्ता, संरचनांना खाली खेचले पाहिजे. त्यासाठी ज्ञाननिर्मिती केली पाहिजे, जिच्या माध्यमातून प्रचारकी थाटाला, केवळ गाजावाजा करणाऱ्यांना नामोहरम करू शकू.

भव्यदिव्य भूतकाळ आपल्याला पुरेशी शिदोरी देऊ शकणार नाही. आपल्याला पुन्हा नवी राजकीय परिभाषा, मानव्याची आणि संवादाची भाषा निर्माण करावी लागेल. हिंसा आणि तिरस्कार गडद होत असतानाच्या काळात साहित्य, विचार आणि सत्य यासाठी बलिदान देण्याचा हा काळ आपण गमावणार काय ?, असा विचार पुन्हा एकदा करावा लागेल. आपल्यातला प्रत्येकजण दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश व्हायला तयार नसेल तर आपल्यापैकी कुणीही साहित्यिक नाही. “

याच मांडणीत सुरुवातीच्या भागात एक वाक्य आहे की, “ एखाद्या साहित्यिकाचा खून होतो याचं साहित्यिकाला दुःख होत नसेल तर उपयोग काय ? “ – हे लक्षात घेता, मी वरील मांडणीप्रमाणे लिहिणारा नसल्यामुळे आणि तरीही स्वतःला साहित्यिक समजत असल्याने, या मांडणीत होणाऱ्या माझ्याच खुनाचे ( आणि आणखी अनेक साहित्यिकांच्या खुनांचेही ) मला दुःख होणे योग्य ठरेल ! हे प्रतिपादन, आता मराठीचे क्षितिज ओलांडून सर्व जगातल्याच लेखकांचे प्रबोधन करू पाहात आहे, हा मराठी विद्वत्तेचा विस्तार विशेष लक्षात घेण्यासारखा आहे ! ‘ निर्भय बना ‘ असा भव्य संदेश देणारे हे विचार आहेत !

या प्रकारच्या विचारवाल्यांना साहित्याचे आणि कलेचे सैनिकीकरण -- regimentation – करायचे असून सर्व कलेतून मानवी जगणे आणि मूल्यात्मकताच हद्दपार करायची आहे, हे ( पुन्हा एकदा ) लक्षात घ्यायला हवे. त्यासाठी हे किती अधीर आणि वेडे झालेले आहेत, तेही पाहायला हवे. “ आता तुमचे इतरांसाठीचे प्रबोधन थांबवून स्वतःसाठी जरा समुपदेशन घ्या “ असे त्यांना ( पुन्हा एकदा ) सांगावे लागणार आहे. त्यांना कलेतली, साहित्यातली विविधता आणि त्यातून व्यक्त होऊ शकणारी मूल्यात्मकता समजतच

नसल्याने ते हे उद्योग करत आहेत. अशा विद्वानांना, उथळ, अविचारी, आततायी, हिंसक, खुनी, अतिरेकी आणि तालिबानीच म्हणायला हवे. ( की नुसत्याच ' अविवेकी ' या शब्दात या सर्व शब्दांचा सगळा अर्थ येईल ? ) स्वतःच्या आकलनातल्या मर्यादा घालवण्या ऐवजी ते सगळे मानवी जगणेच त्यांच्या संकुचित समजुतीत कोंबून बसवू पाहात आहेत. इथे हे कदापि शक्य होणार नाही, हे स्पष्ट दिसत असूनही, मानसिक विकृतीमुळे ते त्या अशक्यतेच्या दगडावर रोज डोके आपटत आहेत ! ( हे त्यांना एकदा तरी कुणीतरी सांगायला हवे – म्हणजे मग नंतर, ‘ पुन्हा एकदा ‘ सांगता येईल ! )

--- ००० ---

' पति गेले गं काठेवाडी '

सुनील बर्वे यांच्या हर्बेरियम या उपक्रमात जुनी उत्तम नाटके पुनरुज्जीवीत केली जातात आणि त्यांचे प्रत्येकी २५ प्रयोग सादर केले जातात. त्यातच अवतरलेय हे ‘ पति गेले गं काठेवाडी ‘ ! १९६८ साली पहिल्यांदा येऊन गेलेले हे नाटक आज ५० वर्षांनंतर पुन्हा समोर आलेय ! हे पाहता आज या नाटकाचा बहुसंख्य प्रेक्षक नवाच असणार आहे. मी जुन्या संचातले नाटक पाहिले नव्हते, त्यामुळे, मलाही ते ‘ आजचे नवे ‘ नाटकच होते. काल पुण्यातला या नाटकाचा शेवटचा प्रयोग होता, तो मी पाहिला. बाल्कनीसह बालगंधर्व हाऊसफुल होते ! अशा हलक्याफुलक्या नाटकाला असा तुडुंब प्रेक्षक असला की अधिकच मजा येते ! कालचा याचा प्रयोग २२ वा होता. आता आणखी ३ प्रयोग मुंबईत करून मग याचे प्रयोग थांबवले जाणार आहेत. मुंबईतल्या लोकांनी हे नाटक पाहण्याची संधी हुकू देऊ नये, हे सांगून ठेवतो.

व्यंकटेश माडगुळकरांचे नाटक आणि विजय केंकरे यांचे दिग्दर्शन, म्हणजे मामला ‘ जमून आलेला ‘ असणार याची कल्पना होतीच. पोषाखी नाटक आणि अभिनेत्यांची उत्तम फळी ! या नाटकाला लोकनाट्याचा एक मजेदार बाज आहे. एक छोटीशी, ‘ कल्पनातीत ‘ म्हणव्यात अशा गोष्टी साध्य करून दाखवण्याची कथा. अशी कथा खुलवत, फुलवत सादर करणे हे निव्वळ दिग्दर्शन आणि अभिनय यांचे बेमालून विणलेले असे अद्भूत काम असावे लागते. तसे ते इथे झालेले आहे. निखिल रत्नपारखी, अभिजित खांडकेकर, ललित प्रभाकर, ईशा केसकर आणि मृण्मयी गोडबोले, अशी जबरदस्त टीम आहे ! दिलखुलास प्रसन्न करून टाकतात ! यांच्याबरोबर असणारे गायक, नर्तक, वादक हेही मेजवानी म्हणावेत, असे आहेत ! राहुल रानड्यांचे संगीत, शीतल तळपद्यांची प्रकाशयोजना आणि प्रदीप मुळ्यांचे नेपथ्य बेश्टच ! एखाद्या नाटकाचा सर्वांगसुंदर प्रयोग म्हणजे काय, हे पाहायचे असेल तर हे नाटक पाहाच.

एक हलकेफुलके, दिलखुलास, मजेदार, सुंदर, प्रसन्न नाटक !

असे ‘ बनावट आणि बनेल ‘ नाट्य खूप दिवसांनी पाहिले. मजा आली !

--- ००० ---

माणसे भाबडी असतात की
जाणूनबुजून सात्त्विक की जाणीवपूर्वक
थोडी वा फार ढोंगी याचा अंदाज
त्यांच्या आरामखुर्च्यांच्या
संतापांच्या प्रकारांवरून
करायचा प्रयत्न करायचा म्हणजे

चुकून झालेल्या स्पर्शांनीही
उद्दीपित होणाऱ्या लिंगांचे
भवितव्य जोखणेच ते

इतक्या वेगवेगळ्या तापमानांतल्या
सर्वांच्याच प्रामाणिकपणाच्या तुळशी
दारूत बुडवून खा की
योन्यांवर ठेवा सजावट म्हणून
तरी निष्पाप आणि पवित्रच राहणार
जणू त्यांच्या वैचारिक मंजिऱ्या

संभावित हिंसा धडधडीत
समंजस सामोपचार
आणि मान्यताप्राप्त परिपक्व निर्दोषत्व
यांनीच तर विणलेय
हे आक्रमक दहशतीचे सभ्य वस्त्र

सगळेच वाट पाहतायत
सत्याची लॉटरी फुटायची
शेवटी बेंबीत बुच मारले जाते
ही परंपरा माहीत असून अपरंपार
--- ००० ---

धार्मिक दुफळी टाळून धर्मवाद – त्यातून पुढे जातीय दुफळी टाळून जातवाद – आणि त्यातून पुढे आपोआप साम्यवाद – अशी दिसते ही प्रवासाची दिशा ! पण, त्यासाठी, सिनेमा, सिनेगीते आणि क्रिकेट यांचे वेड, हे सर्व ओलांडून पुढे जावे लागेल ! अर्थातच, अचूक इतिहासाच्या पक्क्या अभ्यासाने हे नक्कीच साध्य होऊ शकेल !

याला absurdity किंवा अतार्किकता किंवा निर्बुद्धपणा न म्हणता हा एक ' दुर्दम्य आशावाद ' आहे, हे कृपया लक्षात घ्यावे !

एक विचार भिरभिरत आला
आणि कवटी फोडून पसार झाला
पडलेले टाके सांधणारे नव्हते
तर रक्त आणि प्राणवायू
तसेच क्रोध आणि विजय
यांतले अंतर खोलवर फाडणारे होते

सगळ्यांनाच जिंकायची खात्री
असल्याने सगळीच शस्त्रे
निर्भय झालेली होती

आपापली भडक स्थिरता
युद्धभूमी करत
वीजप्रवाह खंडित करत
अंधारमय होत होते
प्रत्येक घराचे मनोगत

आता फक्त वाट पाहायची होती
अंतिम समारंभाची ज्यात
झेंडे उंचावत म्हणणार होत्या
सर्व माता अंगाईगीते
त्यांच्या जखमी बालकांसाठी

अपेक्षित घटना घडणे

हेच असणार होते सार्थक

बदला घेऊन प्रस्थापित करणारे

शक्तिस्तोत्र जे उच्चारले गेले होते याआधीही

अशाच आनंदाने मनाला सत्य समजून

--- ००० ---

मोबाईलचे चार्जिंग स्लो होत असेल तर तो दोष चार्जरचा की मोबाईलचा ? उपाय ?

अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ।। -- हेच फक्त खरे ! तुका म्हणजे मानसिक साचा -- प्रोग्रामिंग !
( हे रस्त्यावर थुंकणे नव्हे ! )

घडणाऱ्या आणि हेतूपूर्वक घडवलेल्या घटनांचे आपल्या फायद्यासाठी नियोजन करणे म्हणजे राजकारण ! हे जमणाराच खरा परिपक्व आणि धूर्त !

न्यूनगंड वा अहंगंड असलेल्यांना आपला इतिहास देदीप्यमान असल्याचे ठसवण्याची गरज वाटते. याने मानवी संबंध बिघडतात.

मी एका गल्लीतून येत होतो. अर्थात डाव्या कडेने. तर थोड्या दूर अंतरावर एक कुत्रे स्थिर उभे असलेले दिसले. म्हणजे मी तिथे पोचेपर्यंतही ते हलणारच नव्हते, बहुतेक. साले माझीच वाट बघतेय का काय ? आपण त्याच्या जवळून पास होत गेलो आणि त्याच्या जवळून गेल्यामुळेच त्याला राग आला आणि चिडले-चावले तर ? काय भावात पडायचे ते ! मग मी हळूहळू साईड बदलली. उजव्या कडेने चालू लागलो. त्याच्यापासून शक्य तितके जास्त अंतर ठेवून मी पुढे गेलो. मी जवळून गेल्यामुळे, मला चावावे, असा विचार त्याच्या मनात येऊ नये, हा उद्देश ! आणि मी असा त्याला नकळत जणू अभावितपणे साईड बदलून चाललोय, असेही त्याला वाटू नये, याची मी काळजी घेतली ! आलो सहीसलामत सुटून ! जरा पुढे गेल्यावर मागे वळून पाहिले तर ते साले अजून तिथेच, तसेच उभे होते ! म्हणजे, माझा साईड बदलण्याचा निर्णय योग्यच झाला म्हणायचा !

या जगात राहून राहून या असल्या गोष्टींत मी एकदम निष्णात-एक्सपर्ट झालोय ! डोंट डिस्टर्ब द स्लीपिंग डॉग, अशी इंग्लिशमध्ये एक म्हण आहे -- म्हणजे निद्रिस्त कुत्र्याला विचलित करू नका ! मी शक्य तो कुठल्याच कुत्र्याला विचलित करत नाही ! ज्या ज्या कुणाचे मन कसे चालेल याचा आपल्याला अंदाजच येत नाही, अशा सर्व ठिकाणी ही युक्ती मला उपयोगी पडते !

You will not be punished for your anger, you will be punished by your anger. Buddha
तुमच्या क्रोधासाठी नव्हे, तुमच्या क्रोधाकडून तुम्ही दंडित व्हाल. – बुद्ध.

माणूस -- या वर्षी सगळं चांगलं हूंदे, देवा --
देव -- म्हणजे तू कसाही वागलास तरी ना ?
माणूस -- होय देवा --
देव -- उलटा फीर, तुला लाथ घालायचीय --
( माणूस उलटा फिरून पळून जातो. )

या वर्षी टीव्हीसाठी निरनिराळ्या पक्षांचे प्रवक्ते म्हणून पैलवान नेमले जावेत आणि सर्व चर्चा आखाड्यात व्हाव्यात, हीच विनंती !

--- ००० ---